
# ह्या परिणामांचे फळ काय मिळेल

रतनचन्द भारिल्ल



# प्रकाशकीय

जैनसमाजाचे मूर्धन्य विद्वान पंडित रतनचंदजी भारिल्ल यांची नविनतम कथा कृति 'ह्या परिणामांचे फळ काय मिळेल' प्रकाशित करतांना आम्हास अंत:- करणांतून आनंदाचा अनुभव होत आहे.

कथानक पद्धतीत लिहिली गेलेली कृति 'ध्यान' ला केंद्रित करुन लिहिली गेली आहे. पात्रांचे चरित्र आणि कथोपकथन ह्याचा केंद्रबिंदू मुख्यत्त्वे करुन 'ध्यान' च आहे. ह्याचा मुख्य विषय वाचकांना पापभावांपासुन सुरक्षा प्रदान करीलच, तद्वतच नैतिक जीवन जगण्याचा आणि धर्मध्यानाचा मार्ग सुद्धा प्रशस्त करील.

प्रस्तुत कृतीच्या माध्यमातुन लेखकानी आत्मघातकी आणि कुगतिस कारणीभूत असणाऱ्या आर्त रौद्र परिणामांची जाणीव करुन देण्याचा यशस्वी प्रयोग साधला आहे की ज्या आत्मशत्रु बनुन अंत:करणात निरंतर वास करीत आहेत आणि वृद्धींगत होत आहेत.

ही कृति नांवाप्रमाणे सर्व दृष्टीनी परिपूर्ण असल्याचे जाणवत आहे. वाचकांच्या सुप्त भावनांना जागृत करणारी ही कृति नांवानुसार विविध पात्रांच्या चरित्रांद्वारा समस्त संसारी जीवांच्या वर्तमानकाळांत होणाऱ्या आर्तरौद्र ध्यान आणि त्याचे परिणामांची जाणीव करीत असतांनाच त्यापासुन सुटका होण्याचा मार्ग दिग्दर्शन अतिशय उत्कृष्टरित्या करीत आहे की ज्यामुळे वाचक प्रभावित झाल्याशिवाय राहात नाही.

जसेकि सर्वमान्य आहे की आधुनिक काळांत नैतिकता जागृत करण्याकरिता कथासाहित्य सर्वाधिक प्रभावी आहे आणि सशक्त माध्यमसुद्धा आहे. ह्या पद्धतीतील लिखाण बालकांना तर आकर्षक वाटतेच. पण तरुण वर्ग आणि प्रौढ़ांनी सुद्धा एकदा वाचण्यास प्रारंभ केला तर ते पूर्ण केल्याशिवाय राहात नाहीत.

'ह्या परिणांमाचे फळ काय मिळेल' हे शिर्षक वाचताच वाचकांच्या मनांत एक जिज्ञासा जागते की लेखक ह्या कृतीत कोणत्या परिणांमाची चर्चा करु इच्छितात ?

पुस्तकाच्या विषयवस्तु संबंधाने लेखकानी स्वत:च 'मनोगत' मध्ये संक्षिप्त संकेत दिलेले आहेत.

लेखकाविषयी पण आम्ही अधिक काय लिहिणार ? घरोघरी वाचल्या जाणाऱ्या आपल्या पुस्तिका, आपले व्यक्तित्व, कर्तृत्व आणि विचारांचा परिचय देत आहेत.

संस्कार, अखेरचा निरोप, णमोकार महामंत्र, सामान्य श्रावकाचार, जिनपुजन रहस्य अशा अनुपम पुस्तिका आपली देणगीच आहे. ह्यांच्या अनेक आवृत्या हिंदी, मराठी, गुजराती भाषेमध्ये वाचकांसमोर आल्या आहेत.

समयसारादि ग्रंथावर झालेल्या पुज्य गुरुदेवश्री कानजीस्वामींच्या प्रवचनांचा तीन हजार पानांपेक्षाहि जास्त आपल्या लेखणीत झालेला गुजराथीमधून हिंदीमधील अनुवाद प्रवचन रत्नाकर भाग १ ते ८ पर्यंत आणि भक्तामर प्रवचन, समाधिशतक प्रवचनच्या रुपात प्रकाशित झालेले आहेत.

कोणत्याहि डोकेदुखीत न पडणारे सतत साहित्य सेवेमध्ये रत असणारे पं. रतनचंदजी भारिल्ल स्वत: अभीक्ष्ण ज्ञानोपयोगाद्वारा सातिशय पुण्याचे काम करीतच आहेत शिवाय अध्यात्मप्रेमींनापण भरपूर लाभान्वित करीत आहेत.

ह्या कृति निर्मितीमुळे आपण निश्चितच अभिनंदनास पात्र आहात. आपण निरपेक्ष हेतुने नावलौकीकाची अपेक्षा न बाळगता जैन साहित्याची सेवा करीत आहात त्यामुळे आपला जेवढा उपकार मानावा तेवढा थोडाच आहे.

पं. दिनेशभाई एम. शहा आणि त्यांची धर्मपत्नी (डॉ.) सौ उज्ज्वला शहा – हे दोघे ही अध्यात्म प्रेमी व सखोल अभ्यासू आहेत. डॉ. हुकमचंदजी भारिल्ल व पं. रतनचंदजी भारिल्ल द्वारा लिहिलेल्या जवळ-जवळ सर्वच कृतिंचे मराठी भाषांतर यांनी आपल्या स्वत:च्या आवडीने निस्पृहतेने केले आहे. या कृतिचा ही अनुवाद यांनीच केला आहे म्हणून आम्ही त्यांचे हार्दिक आभारी आहोत.

प्रस्तुत प्रकाशनाच्या किंमत-सवलतीत ज्या महानुभावांकडुन आर्थिक सहयोग प्राप्त झाला आहे, त्यांचे आम्ही अंत:करणपूर्वक आभार मानतो. जयपुर प्रिंटर्स प्रा. लि. जयपूर ह्यांनी ह्या पुस्तकाचे सुंदर मुद्रण केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केल्याशिवाय राहवत नाही.

आम्हास विश्वास वाटतो की प्रस्तुत कृतिसुद्धा लेखकाच्या अन्य कृतिंप्रमाणे वाचकांच्या पसंतीस उतरेल. तीन महिन्यातच हिन्दीत तीन आणि मराठीत एक शिवाय गुजराथीत निघणारे संस्करण ह्याच्या लोकप्रियतेची साक्ष देते.

१ नवम्बर, १९९६ **नेमीचन्द पाटनी**

महामंत्री, पण्डित टोडरमल स्मारक ट्रस्ट,ए-४, बापूनगर, जयपुर ३०२०१५

# मनोगत

इष्टानिष्ट मिथ्याकल्पना करत,
शोक-संतप्त रहात,
दैहिक दु:ख सहन करत,
विषय-सुखाची कामना करत,
जे आमचे दिवस व्यतीत झाले आहेत,
निराकुल सुखाने रिक्तच राहिले आहेत;
हे आर्तध्यान आहे.
दु:खाची खान आहे.

रात्रंदिवस रडत-रडत,
मोह-निद्रेमध्ये झोपत,
दु:खाचे बी पेरत,
राग-द्वेषाची काळीख पोतत,
आम्ही जे अहर्निश डोके खपवितो
तिर्यञ्च गतिचा ताना-बाना बुनतो
हे आर्तध्यान आहे.
विकृत मनोविज्ञान आहे.

स्व-पर प्राण हनत,
असत् प्रलाप करत,
पर धन हडपत,
विषय-रत रहात,
आम्ही जो आनंद अनुभवतो,
पाप-पंकात फसतो;
हे रौद्रध्यान आहे.
दु:खद दुर्ध्यान आहे.

विकथा ऐकता-सांगता,
रागरंगामध्ये रमता,
मोहमदपान करता,
सुखाभासामध्ये जगता,
हसता-हसविता आम्ही जे हर्षित होतो,
मानवी जीवन व्यर्थ गमवितो,
हे रौद्रध्यान आहे.
नरक-निदान आहे.

खरेच, काय आम्ही पशूहून निकृष्ट आहोत ?
ज्ञानशक्तिने अगदीच रिक्त आहोत ?
नाही, अनन्तसिद्धांना पहा ना,
ज्यांनी काम-क्रोधांना जिंकले;
कोण म्हणतो आम्ही अपुरे आहोत,
आम्ही तर अनन्त गुणांनी भरपूर आहोत.
न घडविलेले चैतन्य हीरे आहोत.
घडविण्याची हळू-हळू तयारी करणारे आहोत.

नेसलेला होता आम्ही आज पर्यन्त,
एकत्व-ममत्व-कर्तृत्वाचा वेश;
यामुळेच आजपर्यन्त
चतुर्गति चे दु:ख भोगले
या भूल-भुलैयांमध्ये भटकून
धोकेच धोके खाल्ले
हेच नाही कळाले की
ह्या परिणामांचे फळ काय मिळेल ?

- रतनचन्द भारिल्ल

# समर्पण

प्रस्तुत कृति "ह्या परिणामाचें फळ काय मिळेल" याचा मूल उद्‌गम स्तोत्र आचार्य-कल्प पडितप्रवर श्री टोडरमल यांचा अनुपम ग्रन्थ मोक्षमार्ग प्रकाशकाच्या त्या मार्मीक ओळी आहेत, ज्यांनी मला त्या ओळींच्या विषय वस्तुला कादंबरीचे रूप देण्यासाठी प्रेरीत केले आहे.

ग्रन्थाच्या मूळ ओळी या प्रकारे आहेत-

चांगली होनहार आहे. यामूळे ज्या जीवाला अशा प्रकारचा विचार येतो कि मी कोण आहे ? माझे काय स्वरूप आहे ? हे चरित्र कसे बनत आहे ? हे माझे जे परिणाम होत आहेत, यांचे काय फळ मिळेल ? जीव दु:खी होत आहे तर दु:ख दूर करण्याचा काय उपाय आहे ? मला इतक्या बाबतींचा निर्णय करून ज्यामध्ये माझे कल्याण होईल ते करायचे.... ।

या प्रेरणेसाठी मी वरील ग्रन्थकर्त्यांचा कृतज्ञ आहे आणि या कृतिच्या रूपामध्ये त्यांची मूळ विषयवस्तु त्यांनाच समर्पित आहे.

- लेखक

## प्रस्तुत संस्करण सवलतीमध्ये पोहोचविण्यासाठी दान देणाऱ्या दातारांची सूची

**३०००/- रुपये प्रदान करणारे :** •श्री वी.के. जैन, कुवैत

**१०००/- रुपये प्रदान करणारे :**

•श्री माँगीलालजी मीठालालजी बोरा, भिण्डर
•श्री उल्लासभाई एम. जोवालिया, मुम्बई
•श्रीमती मधुबेन रमेशचन्दजी मेहता, मुम्बई
•श्रीमती कैलाशबेन विनोदचन्द रायचन्द शाह, मुम्बई
•श्री सुरेन्द्रभाई जेठाभाई, सिकन्दराबाद,
•श्रीमती त्रिशलाबाई प्रभाकरजी सावजी, औरंगाबाद •श्री अरुण आर. दोड़ल, मुम्बई,
•श्रीमती प्रभाबेन विनोदचन्द शाह, मुम्बई
•श्री वीरचन्दभाई चतुर्भुज अजमेरा, मुम्बई
•श्रीमती कस्तूरी दोशी ध. प. स्व. श्री गुमानमलजी दोशी, अजमेर

**५००/- रुपये प्रदान करणारे :**

• श्री वीरचन्द भाई मोटाणी मुम्बई • श्री हिम्मतलाल हरिलाल शाह, मुम्बई • श्रीमती रूपाबेन देवांग कामदार, मुम्बई • श्री विजयकुमारजी चिवटे, बेलगाँव • श्री प्रभाकरभाई कामदार, अहमदाबाद
•श्री विनयदक्ष चैरिटेबल ट्रस्ट, मुम्बई
• श्री शान्तीनाथ सोनाज, अकलूज

**३००/- रुपये प्रदान करणारे :** • श्री राजेन्द्रकुमारजी नरसिंहपुरा, इन्दौर

**२५१/- रुपये प्रदान करणारे :** • ब्र. हीरालाल खुशालचन्दजी दोशी, मांडवे

---

१७,०५१

# १

अवघ्या बारा वर्षाचा बालक धर्मेश जेव्हा आपल्या नियमित दैनंदिनीनुसार ठरलेल्या वेळी धुतलेले पांढरे शुभ्र धोतर आणि केशरी रंगाचे उपरणे घालून, काखेमध्ये पूजेचे पुस्तक धरुन, लहानशा थाळीमध्ये अष्टद्रव्यं घेऊन, '**दृष्टं जिनेंद्रभवनं भवतापहारी...**' असे पुटपुटत स्तोत्र गुणगुणत जिनमंदिराला जात असे ते पाहून त्याच्या वडिलांना अत्यानंद होत असे.

शेजार-पाजारचे आणि पेठेमध्ये राहणारे लोक देखील त्या मनमोहक बालकाचे मनोहर बाह्य व्यक्तिमत्व पाहून मोठ्या प्रेमाने मनातल्या मनात आनंदित होत तर असत परंतु हात जोडून 'अहो भगत, जयजिनेन्द्र ! पंडितजी- आपल्या पाया पडतो हं.' असे म्हणून स्वत:चे आणि इतरांचेही मनोरंजन करीत असत.

धर्मेश देखील नि:संकोच भावनेने मनातल्या मनात हसत असे आणि क्षणभर थांबून महात्मा गौतम बुद्धाप्रमाणे आशीर्वाद दिल्यासारखे हात उंचावून त्यांच्या अभिवादनाला मौनरुपाने उत्तर देत पुढे मार्गक्रमणा करीत असे. जणुं त्याने त्यांना धर्मवृद्धिचाच आशीर्वाद दिला असावा.

ही एक दिवसाची गोष्ट नव्हती, तर त्याच्या दैनंदिनीतील एक अविभाज्य अंगच बनले होते; जे तो गेल्या पाच वर्षांपासून रोज करीत होता.

ह्या बाल्यावस्थेतील धर्मेशची ही धार्मिक वृत्ती पाहून लोक त्याची खूप प्रशंसा करीत असत. एके दिवशी गावातील लोक गप्पा मारण्यासाठी एकत्रित जमले असताना त्याच्याविषयी गोष्ट निघाली. समजूतदार असा एक माणूस म्हणाला -

''हा भव्यजीव पूर्वजन्मीचा कोणी महान आत्मा असावा, जो ह्या जन्मी असे धार्मिक संस्कार घेऊन आला आहे-आता त्याचे वय ते काय आहे ? तरी देखील केवढा गंभीर व्यक्तिमत्वाचा वाटतो. ह्या लक्षणांवरुन तर असे वाटते की हा मोठा झाल्यावर निश्चितपणे एखादा ज्ञानी-तपस्वी होईल.''

दुसरा एक वृद्ध इसम म्हणाला, - ''अरे बाबा ! भले हा भव्यजीव वयाने लहान आहे; परंतु ह्याचा आत्मा तर अनादिचा आहे नां? पूर्वजन्मीचे संस्कार तर आहेतच, ह्या जन्मीसुद्धा ह्याला आपल्या वडिलांकडून धार्मिक संस्कार मिळाले आहेत..

कदाचित आपणास माहित नसेल, ह्याचे वडिल देखील ह्याच्याप्रमाणे लहानपणापासूनच 'भगतराम होते भगतराम.' ते देखील आत्ता आत्तापर्यंत दररोज पूजा-पाठ करीत होते. वयाच्या पाचव्या वर्षापासूनच जेव्हापासून त्यांनी ह्याचे शाळेमध्ये नाव दाखल केले, तेव्हापासून ते ह्यालादेखील दररोज आपल्या-बरोबर पूजा करण्याकरिता मंदिरामध्ये घेऊन जात होते. आता तर ते बिचारे कौटुंबिक अडचणीत असे गुरफटले आहेत की काही विचारु नका- त्यांचा धर्म-बीर्म एका बाजूला कोपऱ्यात पडला-बिचाऱ्याला उद्यापन करून पूजापाठ करण्याचेही सोडून द्यावे लागले.

जरी त्यांना धर्माचे खास ज्ञान नव्हते तरी देखील भावना उच्च प्रकारची होती. धर्माचरणानेच मनुष्यजीवन आणि पशुजीवन ह्यामध्ये फरक आढळून येतो अशी त्यांची मान्यता होती; नाहीतर आहार, निद्रा, भय आणि मैथुन तर पशु आणि मनुष्यांमध्ये समानच असतात. धर्माचे महात्म्य सांगताना ते मोठ्या गर्वाने म्हणत असत. -

**'धर्म करत संसार सुख, धर्म करत निर्वाण।**
**धर्मपंथ साधे बिना, नर तिर्यंच समान॥'**

बस, अशा मान्यतेप्रमाणे ते श्रावकाचे षट् आवश्यक कर्तव्यांचे पालन करणेच आपला धर्म आहे असे मानत होते आणि हीच प्रेरणा ते आपल्या पुत्राला - धर्मेशला देत असत. वेळप्रसंगी काही दिवसांकरिता पाहुणे म्हणून

आलेल्या पंडितांची प्रवचनं सुध्दा न चुकता ऐकत असत. मग भले त्यातील काही समजो वा न समजो, पण ऐकत मात्र अवश्य होते.

ते म्हणत असत - अरे बाबानो ! जेवढा वेळ प्रवचन ऐकण्यात जातो, तेवढा वेळ पाप प्रवृत्तिपासून दूर तर राहतो नां ? विषय जेवढा पदरी पडेल तेवढे चांगले !

अशा विचारानेच ते आयुष्यभर धर्माचरण करीत होते. परंतु पत्नीला लकवा झाल्याकारणाने ते कौटुंबिक परिस्थितीमध्ये अशा तऱ्हेने अडकले की, दररोज पूजा-पाठ तर राहो पण वेळेवर देवदर्शन देखील दुर्लभ झाले. परंतु वडिलांच्या प्रेरणेने आणि शेजाऱ्यांच्या प्रशंसेमुळे प्रोत्साहित होऊन धर्मेश गेल्या सात आठ वर्षांपासून दररोज पूजा-पाठ मोठ्या दृढतेने न चुकता करीत आहे.''

त्याची गोष्ट संपते न संपते तोच धर्मेशचा एक तरुण मित्र म्हणाला - ''आपले म्हणणे योग्य तर आहे; परन्तु कदाचित आपणास हे माहित नाही की आजकाल पूर्वीसारखा त्याच्यामधील उत्साह दिसून येत नाही; तो हल्ली बहुतांशी विचारामध्येच बुडलेला असतो.''

वास्तविक गोष्ट अशी होती की जो जो धर्मेशचे सामंजस्य वाढत गेले, तो तो त्याला आपल्या अज्ञानपणाचा आभास होऊ लागला-त्यामुळेच पूजेसंबंधी त्याच्या मनात अनेक प्रश्न उभे राहू लागले होते.

ज्या क्रियाकांडाला तो आत्तापर्यंत धर्म समजून करीत आला होता, त्या संबंधी त्याच्या मनात अनेक प्रश्न उभे राहू लागले होते.

तो असा विचार करी की, - शेतकरी शेतात बी पेरतो तर त्याला जास्तीत जास्त सहा महिन्यामध्ये कित्येक पटीने धान्य मिळते, एखादा माळी बागेमध्ये वृक्ष वेली-लावतो तर त्यालासुद्धा दोन चार वर्षांमध्ये सुगंधित फुलं आणि मधुर फळं मिळू लागतात, परंतु मी तर वयाच्या पाच वर्षापासून गेल्या पंधरा वर्षांपासून धर्म-ध्यानाची शेती करीत आहे, पूजा-भक्तीच्या जलाने त्याला सिंचन करीत आहे, सदाचार रूपी पहारेकऱ्यांकरवी त्याच्या रक्षणाची संपूर्ण व्यवस्था देखील करून ठेवली आहे; परंतु प्रशंसा, प्रोत्साहन आणि बक्षिसरूपी गवतासारख्या

केरकचऱ्याशिवाय खरी समता, शांती, निराकुल सुखस्वरूप धर्मवृक्षाचा अंकुर देखील फुटला नाही. धर्माचे फळ तर समता, शांती निराकुलताच आहे नां ? अशा दृष्टिकोणातून माझी आयुष्यरूपी जमीन ओसाडच दिसून येते. माझ्या वडिलांनीसुद्धा आयुष्यभर पूजा केली परंतु त्यांच्या परिणतिमध्ये तसेच कौटुंबिक परिस्थितिमध्ये देखील कोणती अनुकूलता दिसून येत नाही; वास्तविक त्यांच्याच म्हणण्यानुसार धर्माचे फळ तर तात्काळच मिळते, त्यांच्याही हाती आजपर्यंत काही लागले नाही तर मग हे सर्व का घडले ? कसे झाले ?

धर्मेशच्या मनाला आणखी एक हा प्रश्न देखील टोचत राहिला की, जैनदर्शनाच्या मान्यतेनुसार जेव्हा भगवान वीतरागी असल्या कारणाने पूजा करणाऱ्यांवर किंवा निंदा करणाऱ्यांवर संतुष्ट किंवा रुष्ट होऊन कोणाचे बरे वाईट करीतच नाहीत, राग-द्वेष-रहित असल्याकारणाने कोणालाही काही देत-घेत सुध्दा नाहीत; तर मग त्यांची पूजा-अर्चा करण्याचे प्रयोजनच काय उरते ?

न तर पूज्य परमात्म्याला देखील भक्तांच्या भक्ति-पूजेपासून काही प्रयोजन आहे आणि न पूजा करणाऱ्यालासुद्धा त्यांच्याकडून काही मिळत आहे, तर मग अशा पूजेचा काय फायदा ?

ह्याशिवाय आणखी अनेक लहान मोठे प्रश्न धर्मेशच्या मनाला अशांत अस्वस्थ करीत होते. जसे -

जेव्हा सिद्ध भगवान आपल्या आव्हानाने लोकांतापासून येथे येत नाहीत, तर मग त्यांचे आव्हानन, स्थापना आणि सन्निधिकरण आपण का करतो ?

जेव्हा पूज्य परमात्मा सर्वज्ञ आणि सर्वदर्शी आहेत, आपल्या मनामधील असलेल्या सर्व गोष्टींना, आपल्या भक्ती-भावनांना, मनातील इच्छा-आकांक्षांना जर चांगल्या प्रकारे जाणतच आहेत; तर मग त्यांच्यासमोर आपली दु:ख सांगण्याचे आणि त्यांचे गुणगान करण्याचे काय औचित्य उरते ?

जेव्हा ते पूर्ण अस्नान व्रत घेऊन मुनी झाले आहेत आणि पूर्ण पवित्र होऊन मोक्षाला गेले आहेत तर मग त्यांच्या अभिषेकाची सुध्दा काय गरज आहे ?

जेव्हा ते तहान-भूक वगैरे सर्व दोषरहित आहेत, तर मग नाना प्रकारच्या नैवेद्यांची त्यांना काय गरज आहे ? मग अष्ट द्रव्यांनी त्यांची पूजा का केली जाते ?

जेव्हा आमच्या आव्हाननामुळे भगवान आलेच नाहीत, जेथे काही सर्जन (क्रिया) देखील झाली नाही, तर मग विसर्जन कसले ?

– असे एक-दोन नव्हे, तर अनेक प्रश्न त्याच्या मनात उठत-ज्याचे उत्तर त्याला मिळत नसे. ह्या निव्वळ एकट्या धर्मेशच्याच शंका नसून आज धर्मेश सारख्या न जाणो कित्येक तरुणांच्या मनात हे ज्वलंत प्रश्न उठत असतील, ज्यांना ते वेगवेगळया कारणास्तव व्यक्त करु शकत नाहीत. अनेक व्यक्तींना आपल्या मनातील विचार वाणीमध्ये प्रकट-व्यक्त-करण्याची पात्रताही असत नाही. ज्यांच्यामध्ये पात्रता असते त्यांच्यामध्ये अशी हिंमत असत नाही की ते आपल्या वडीलधारी माणसांसमक्ष प्रचलित धार्मिक रीती-रिवाजांबद्दल प्रश्न विचारु शकतील.

जर कदाचित एखाद्याने हिंमत करुन विचारलेच तरी त्याच्यावर धाकधपटशा दाखवून त्याला गप्प बसविण्यात येते. जर एखादा अडेल असेल अथवा बडबड्या असेल तर त्याला नास्तिक आहेस, मूर्ख आहेस, धर्माबद्दल काही समजत नाही वगैरे सांगून त्याची उपेक्षा केली जाते.

परंतु धर्मेशच्या बाबतीत असे काही घडले नाही; कारण त्याने इतरांप्रमाणे अश्रद्धापूर्वक तर्क-वितर्क केले नाहीत, परंतु त्यांच्या समाधानाकरिता सातत्याने प्रयत्नशील रहिला आणि त्याने पूजा-अर्चा करणे देखील सोडले नाही.

पूर्वीप्रमाणे आपल्या सर्व धार्मिक क्रिया चालू ठेवून त्याने जिज्ञासेच्या भावनेने आपल्या शंकांचे उचित समाधान मिळविण्याकरिता विशेष तज्ञ पंडितांशी संपर्क साधण्याचा निश्चय केला; कारण तो जाणत होता की, भले मला आता ज्ञानात येत नाही; परंतु पूजा व व्रत-उपवास वगैरे धार्मिक क्रियांमध्ये काही विशिष्ट रहस्य अवश्य दडलेले आहे. एवढी प्रचलित असलेली प्राचीन पूजनपध्दत आणि धर्म क्रिया सर्वथा निरर्थक असू शकत नाहीत.

धर्मेशच्या तर्कसंगत आणि विचार करायला लावणाऱ्या प्रश्नांचे पड साद जेव्हा त्याच्या वडिलांच्या कानावर पडले तेव्हा अशा अश्रध्देमुळे कोठे एखादी कुलदेवता रुष्ट तर होणार नाही नां असे भय त्यांना वाटू लागले. धर्मेशचे वडील धर्मभीरु तर होतेच, ते मनातल्या मनात आपल्या इष्टदेवाचे स्मरण करुन म्हणू लागले -

"हे प्रभो ! अजून धर्मेश तर वीस एकविस वर्षाचा लहान मुलगा तर आहे, त्याला अक्कल ती काय असणार ? म्हणून त्याला खुळा समजून क्षमा कर-हे तर आपण जाणतच आहात की तो अश्रध्दाळू तर नाही, उद्दंड आणि नास्तिक सुध्दा नाही; परंतु तो खूप विचारशील आहे, एक एक मुद्यावर अनेक तास फार सूक्ष्मतेने विचार करतो, जोपर्यंत त्याला पटत नाही, तोपर्यंत एखाद्याच्या नुसत्या सांगण्यावरुन तो ऐकत नाही-मानत नाही. म्हणून त्याच्या शंकांचे समाधान कोणत्याही तऱ्हेने झालेच पाहिजे; नाहीतर तो धर्ममार्गापासून ढळूदेखील शकतो."

ते बिचारे हे समजत नव्हते की जिनेंद्र भगवान वीतरागी असल्याने एखाद्याच्या प्रार्थनेमुळे प्रसन्न अथवा निंदेमुळे नाराज होत नाहीत.


ही गोष्ट वेगळी आहे की, **जे त्या वीतरागी देवाच्या पवित्र गुणांचे स्मरण करतात, त्यांचे मलिन मन स्वयं निर्मळ होते, त्यांचे पापरूप परिणाम स्वयं पुण्य आणि पावित्रतेमध्ये पलट तात. अशुभ भावांपासून बचाव होणे आणि मन निर्मल होणेच जिनपूजेचे - जिनेंद्रभक्तीचे - खरे फळ आहे.**

**ज्ञानी धर्मात्मा लौकिक फळाच्या प्राप्तिकरिता पूजा-भक्ती करीत नाहीत ते तर जिनेंद्रदेवाच्या मूर्तीच्या माध्यमातून निजपरमात्म स्वभावाला जाणून, ओळखून, त्यामध्येच स्थिर होण्याची, रममाण होण्याची इच्छा करतात. अशा भावनेनेच एक न एक दिवस भक्त स्वतः भगवान बनतो.**

ह्या गोष्टीपासून धर्मेशचे वडिलच काय पण स्वतः धर्मेश अनभिज्ञच होता. त्यावेळी धर्मेश हे जाणत नव्हता की - **जिनेंद्र भगवान न कोणाचे बरे-वाईट करतात आणि न करु देखील शकतात; कारण जैनदर्शन अकर्तावादी दर्शन आहे. त्यानुसार कोणी कोणाच्या सुख-दुःखाचा, लाभ-हानिचा, जीवन-मरणाचा कर्ता-धर्ता नाही.**

धर्मेश अजूनही जैनदर्शनाच्या ह्या सूक्ष्म सिध्दांताच्या बाबतीत काही जाणत नव्हता. तत्त्वज्ञानाचे विषय ऐकण्या-समजण्यासाठी आत्तापर्यंत त्याला संधीच प्राप्त झाली नव्हती की ज्यायोगे त्याने त्याबाबतीत काही जाणावे. त्याच्या गावी न एखादी वीतराग-विज्ञान पाठशाळा होती आणि न नियमित स्वाध्यायाची परंपरा देखील ! बस्स, पूजा-अर्चेपर्यंतच त्यांचे धर्म कार्य मर्यादित होते, त्यामुळे तो शिकणार तरी कसा ?

हळु-हळु धर्मेशच्या मनामध्ये धर्माचे स्वरूप आणि त्याच्या साधनांचे औचित्य जाणण्याची जिज्ञासा वाढू लागली - त्यामुळे तो स्वतंत्रपणे स्वाध्याय तर करुच लागला आणि त्याच बरोबर इतरांच्या अनुभवांचा लाभ घेण्याचा प्रयत्नही करू लागला. तो कोणतीही वाचलेली किंवा ऐकलेली गोष्ट डोळे झाकून मान्य करण्याऱ्यांपैकी नव्हता. त्या विषयांवर मनातल्या मनात तो बराच ऊहापोह करीत असे - आवश्यकतेनुसार नियमपूर्वक तत्त्वचर्चा, शंका-समाधान देखील करे अथवा करवून घेई - परंतु आत्तापर्यंत त्याला कोठूनही कोणतीही समाधानकारक उत्तरं सापडत नव्हती. तरी देखील त्याने आपल्या धार्मिक दैनंदिनीतील गोष्टी पूर्वीप्रमाणे चालूच ठेवल्या आणि खरे समाधान प्राप्त करण्याचे प्रयत्नही चालू ठेवले. •



# २

धर्मेश आणि अमित एकाच पेठेमध्ये राहणारे होते. एकत्रच खेळलेले व मॅट्रीकपर्यंत एकाच शाळेमध्ये बरोबर शिकलेले होते-लहानपणी दोघांची अत्यंत घनिष्ट मैत्री होती. दैवयोगाने दोघांची संस्कृति, धर्म व जातदेखील एकच होती. दोघेही एकमेकांकरिता प्राण द्यायला तयार असत आणि एकमेकांचा विरह दोघांनाही सहन होत नसे. परंतु का कोणास ठाऊक, किशोर वयामध्ये पाऊल ठेवताच दोघांच्या विचारसरणीमध्ये जमीन अस्मानाचा फरक पडला.

धर्मेशने मॅट्रीकनंतर शिक्षण सोडून दिले आणि अमितने कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. अमितने कॉलजचे शिक्षण मन लावून पूर्ण तर केले: परंतु हळू हळु तो भौतिकतेच्या चमचमणाऱ्या आकर्षणामध्ये अधिक गुरफटला-त्यामुळे धन उपार्जन करण्याकरिता चोवीस तासदेखील त्याला कमी पडू लागले.

धर्मेशचा स्वभाव न जाणो कसा बनला होता ! तो भौतिक वातावरणापासून अलिप्त-अप्रभावित तर राहिलाच. परंतु आपल्या वडिलांच्या कुलधर्माच्या प्रभावापासूनदेखील तो अलिप्तच राहिला. तो निष्पक्ष राहून सदैव खऱ्या धर्माच्या मुळापर्यंत पोहोचण्याच्या प्रयत्नात राहिला.

धर्मेशचे वडिल न तेरापंथी होते न वीसपंथी-त्यांचा आपला वेगळाच पंथ होता, ज्याला आपण कुलपंथ म्हणू शकू. ते आपल्या कुलपंथाबाबतीत कट्टर होते, त्यांना त्यांच्या पूर्ण आयुष्यामध्ये कोणीही कुलपंथापासून विचलित करु शकला नव्हता. त्यांचे म्हणणे होते की -

"फॅशनच्या बाबतीत जग कोठपासून कोठपर्यंत पोहोचले आहे. पगडी गेली पागोटे आले, पागोटे गेले टोपी आली, टोपी देखील गेली फक्त बोडके डोके उरले. उघड्या डोके वाल्यांनी देखील रोज नवनवे आकार बदलले. कधी

हिप्पीकट तर कधी सफाचट; परंतु खऱ्या शीखाने तर न पगडी सोडली न केस कापले, खऱ्या मुसलमानाने देखील लांब दाढी आणि गोल टोपी सोडली नाही. अशातऱ्हेने आमच्या जैनकुळामध्ये सुद्धा काही सिद्धांत आहेत - धर्माचे काही नियम आहेत. आम्ही त्यांना का सोडावे ? धर्म तर सदैव क्षेत्राच्या व काळाच्या प्रभावापासून अप्रभावित राहतो, अलिप्त राहतो.''

पित्याच्या ह्या विचारसरणी बाबतीत धर्मेशचे असे म्हणणे होते की, दृढतापूर्वक धार्मिक नियमांचे पालन करणे फार चांगली गोष्ट आहे. ह्याबाबतीत कट्टरता असणे वाईट गोष्ट नाही, परंतु ती कट्टरता योग्य परीक्षा केलेली आणि विचारपूर्वकच असली पाहिजे; नाहीतर सुधारणा होण्याच्या शक्यता पूर्णपणे नाहीशा होतील. परीक्षा अथवा विचार केल्याशिवाय कोणत्याही कुलपरंपरेला धर्म मानून बसणे आणि त्यापासून जराही विचलित न होणे - हा देखील कोणता धर्माचा मार्ग नाही. परंतु अशा कट्टरपंथी व्यक्तिला कोण समजावू शकतो की जी व्यक्ती कोणाचे ऐकूही इच्छित नाही आणि आपल्या चाकोरी पासून वेगळी व्हायलाच तयार नाही ?

धर्मेशच्या वडिलांनी धर्मगुरुंपासून हे ऐकलेले होते की, धर्माच्या बाबतीत ऊहापोह करणे तसेच शंका-कुशंका प्रगट केल्याने अनर्थ होतो आणि पापसुद्धा लागते. ह्यामुळे त्यांची धारणा (समज) अशी झाली होती की धर्म तर श्रद्धा-भक्तीचा विषय आहे, त्यामध्ये तर्क-वितर्क कां करावा बरे ?

धर्मेशचे पूर्ण कुटुंब धर्मभीरु होते. त्यामुळे कुलपरंपरागत पद्धति सोडून वागणे तर दूर राहो धर्माबाबतीत काही बोलणे-ऐकणे, विचारपूस करणे देखील त्यांच्या आवाक्यातली गोष्ट नव्हती. ते तर धर्माला अत्यंत घाबरत होते- त्यांना नेहमी भीती वाटत असे की त्यांची एखादी धर्मक्रिया देवी-देवतांच्या आणि भगवानाच्या असंतोषाचे कारण न बनावी, त्यांच्या कोणत्याही वागण्याने ते नाराज होऊ नयेत. वीतरागी देव-शास्त्र-गुरुंमध्ये श्रद्धा ठेवणाऱ्या आणि प्रत्येक बाबीला तर्काच्या कसोटीवर कसणाऱ्या धर्मेशला त्यांच्या अशा प्रकारच्या धर्माचरणाचे वावडे होते.

धर्मेशचे वडिल आपली कमजोरी लपविण्याकरिता मोठ्या गर्वाने म्हणत असत की - "तत्त्वांच्या गोष्टी भले आमच्या समजण्यामध्ये येत नसतील, परंतु आम्ही धर्मकार्यामध्ये कधी मागे राहिलो नाही. आम्ही आमच्या पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या धार्मिक परंपरांना कधी सोडलेले नाही-ह्याचकारणास्तव भगवानाच्या कृपेने आज आमचे घराणे सर्व बाबतीत संपन्न आहे, सदाचारी आहे; नाहीतर आमचे वाटोळे होण्यामध्ये केवढा बरे वेळ लागला असता? भगवानाची अवकृपा आणि एक एक व्यसन सर्व कुटुंबाचा सत्यानाश करते."

अशातऱ्हेने पापभीरुतेमुळे त्यांच्या सर्व कुटुंबियांचे जीवन सदाचारी होते. येथवर तर सर्व काही ठीक आहे; परंतु निव्वळ ह्या कुलाचाररूप बाह्य धर्मप्रवृत्तिंनाच धर्म मानून संतोष मानत होते, स्वत:ला कृतकृत्य समजत होते - ही गोष्ट धर्मेशच्या अंतरात्म्याला पटत नव्हती-म्हणून त्याने संकल्प केला की वडिलांच्या विचारधारांमुळे प्रभावित न होता धर्माच्या खऱ्या स्वरूपापर्यंत पोहोचण्याचा आपण पूरेपूर प्रयत्न करावा.

परंपरागत रूढींवर विचार न करता-सवरता चालणाऱ्यांपैकी धर्मेश नव्हता. जसे म्हटले जाते की, सिंहाचा छावा नेहमी चाकोरी सोडूनच चालतो; त्याप्रमाणे धर्मेशची विचारसरणी योग्यच होती.

तो विचार करीत असे की हे कुलाचाररूप व्यवहारधर्माचे पालन सदाचाराचा संस्कार कायम ठेवण्याकरिता योग्य आहे, परंतु मग प्रत्येक कुळाचा, प्रत्येक जातीचा धर्म वेगवेगळा कसा असू शकतो बरे ? धर्माचे स्वरूप तर एकच असले पाहिजे आणि तो भगवानच कसा असू शकतो की जो सर्वसामान्यांसारखा राग-द्वेषाला वश होऊन भक्तांच्या छोट्या छोट्या गोष्टींवर संतुष्ट किंवा रुष्ट होतो ?

जेव्हा दोन चार रूपयाचे मातीचे मडकेसुद्धा वाजवून-ठोकून आपण विकत घेतो तर हा तर भव-भवाच्या सुख-दु:खाचा प्रश्न आहे, अनंत संसार सागराच्या दु:खातून पार होण्याचा प्रश्न आहे; ह्याला परीक्षा केल्याशिवाय, विचार विनिमय केल्याशिवाय असेच डोळे झाकून आत्मसात कसे केले जाऊ शकते ? हा मनुष्य जन्म आणि त्यामध्येदेखील असे सुंदर संयोग वारंवार

थोडेच प्राप्त होतात ? न जाणो कोणत्या जन्माच्या पुण्याचे हे फळ असेल की ज्यायोगे ही सुवर्णसंधी आपल्याला लाभली आहे - खरोखर ही संधी म्हणजे आंधळ्याच्या हाती पक्षी गवसला आहे, ह्याचा तर पूरेपूर लाभ घेतलाच पाहिजे. ह्या दुनियादारीमध्ये काय ठेवले आहे ?

धर्मापासून भय कसले ? धर्मभीरुपणाच तर एखाद्याला धर्मांध बनवितो. म्हणून कोणी काहीही म्हटले तरी शांततापूर्वक ऊहापोह करुन धर्म आणि पुण्य-पाप यांच्या मुळापर्यंत पोहोचावेच लागेल. धर्माच्या तलस्पर्शी-सखोल-ज्ञानाशिवाय वर वर धर्मात्मा म्हणविले जाणे स्वत:लाच अंधारात ठेवण्यासारखे आहे.

ही पण शक्यता आहे की सत्य ओळखण्यामध्ये कळत-नकळत कधी आपल्या एखाद्या पिढीकडून चूक झाली असेल आणि आपणास त्याचा थांगपत्ताही नसावा - हेसुद्धा काही समजूतदारपणाचे लक्षण नाही. अहो ! जेवढी कुळं, जेवढ्या जाती, जितक्या व्यक्ति तेवढे धर्म ? हे सगळे काय आहे ? ते धर्मगुरु, ज्यांनी पापाचे भय दाखवून अनर्थ होण्याच्या भयाने सर्वांना घाबरवून सोडले आहे, ते देखील तुम्हा-आम्हासारखे ह्या पृथ्वीवरील मानव आहेत. ज्याप्रमाणे जेथून त्यांनी धर्म शोधून काढला आपणसुद्धा का न प्रयत्न करुन पहावा ? वास्तविक मला मनोमन वाटते की धर्माचे आचरण परीक्षा करूनच अंगिकार केले पाहिजे.

अमितच्या आई-वडिलांवर पाश्चात्य वातावरणाचा पगडा होताच शिवाय त्यात ते चांगलेच गुरफटलेही होते. धर्माच्या गोष्टी न त्यांनी पूर्वी कधी ऐकल्या होत्या न त्यांनी ऐकण्या-समजण्याचा कधी प्रयत्नदेखील केला होता.

सिनेमांमधून व लौकिक जीवनामध्ये धर्माच्या नावावर धंदा करणाऱ्या कित्येक ढोंगी धर्मात्म्यांचे विकृत स्वरूप पाहून त्यांची उरली-सुरलेली धर्मावरील आस्थादेखील नाहीशी झाली होती. आता त्यांना धर्म म्हणजे ढोंग आहे ह्याशिवाय दुसरे काही नाही असा समज झाला होता. त्यांना धर्माच्या गोष्टी कल्पनाविश्वातील कपोल कल्पित गोष्टीसारख्या वाटत होत्या.

ते स्वत:ला फार शिकले-सवरलेले हुषार व्यक्ति मानत होते, परंतु त्यांच्या हुषार-तीक्ष्ण बुद्धिमध्ये ही गोष्ट का लक्षात येत नव्हती की, सिनेमामध्ये प्रत्येक गोष्ट वाढवून-अतिरंजित करुनच दाखविली जाते आणि लौकिकामध्ये जर एखादा धर्माच्या नावाखाली दगाबाजी करीत असेल तर ह्यावरून धर्म कपोल कल्पित कसा होतो ? सगळे धर्मात्मा ढोंगी कसे होतील ?

सिनेमांमध्ये अधिकांश पोलीस आणि राजकारणी नेते भ्रष्टच दाखविले जातात, तर काय त्या आधारे सर्व पोलीस खाते आणि सर्व राजकीय नेते अपराधी मानून त्यांना शिक्षा दिली जाऊ शकते ? परंतु एवढा विचार-विनिमय करायला त्यांना फुरसतच कोठे होती ?

बस्स, कमवणे-खाणे आणि मनोरंजन करणे-हेच भोगमय भौतिक जीवन होते त्यांचे ! त्यांच्या ह्या वातावरणाच्या प्रभावाने त्यांचा मुलगा अमित देखील वाचू शकला नाही. तो देखील विषयानंदी वातावरणात रमून गेला.

जिथे एका बाजूला जुन्या पिढीद्वारे पेरलेले विषयानंदी वातावरणाचे विषबीज, भोगोपभोग सामुग्रीचे खत पाणी मिळाल्यामुळे अमितच्या आयुष्यामध्ये विषवृक्षाच्या रूपाने उमलू-वाढू लागले, तिथे दुसरीकडे त्याचा मित्र धर्मेशचे जीवन आपल्या पूर्व पर्यायगत धार्मिक-संस्कारांमुळे भौतिक आकर्षण आणि कुलाचाराच्या अडसरांना बाजूला सारत सतत सत्याच्या शोधामध्ये अग्रेसर होत चालले.

**वास्तविक संस्कारांची उगमस्थानं दोन असतात. एक पूर्व पर्यायापासून आलेले आणि दुसरे माता-पिता, कुटुंब-परिवाराकडून आलेले.** ज्यांच्या आयुष्यामध्ये धार्मिक संस्कारांचा संयोग न पूर्व जन्मापासून प्राप्त झाला आहे आणि न आई-वडिलांकडून मिळत आहे त्यांच्या दुर्दैवाची काय कथा ? त्यांना तर चोहीकडे पसरलेल्या भौतिकतेच्या जाळ्यामध्ये अडकणेच आहे; परंतु ज्यांना सुदैवाने केव्हा, कोठून ना कोठून धार्मिक संस्कारांचा संयोग होतो, त्यांचे आयुष्य सफल होते, धन्य बनते.

जरी धर्मेश आणि अमितच्या विचारसरणीमध्ये जमीन-अस्मानाचा फरक होता, तरी त्यांच्या मैत्रीवर अजूनही त्याचा कोणताही असर झाला नव्हता-ती अलिप्तच होती. म्हणूनच ते एकमेकांना सुधारु इच्छित होते.

अमित विचार करीत असे - धर्मेशचे नशीबच खोटे आहे. बिचारा अशिक्षितच राहिला. हल्लीच्या काळात हायस्कूलचे शिक्षण काय शिक्षण आहे ? उच्च शिक्षणाच्या सर्व सोयी उपलब्ध होत्या; परंतु पुढील शिक्षणात त्याने रस दाखविलाच नाही. आता बिचारा दुकानावर दिवसेंदिवस गप्प-गप्पसा बसलेला असतो. न जाणो कोणत्या विचारात असतो ? न हसणे न खेळणे - न नृत्य गाणे पाहणे किंवा ऐकणे.

शेवटी एवढे मोठे आयुष्य कसे घालविणार हा ? बिचाऱ्याच्या आयुष्यातील जगण्याची मजाच नाहीशी होत चालली आहे.

कधी एखादी चांगली संधी साधून त्याच्याशी बोलेन. पाहू या काय होऊ शकते ते ? बिचारा अवेळीच निम्मा म्हातारा होऊ लागला आहे. माझ्या वयाचा असून देखील माझ्याहून दहा-पंधरा वर्षांनी मोठा दिसू लागला आहे. खरे आहे, अधिक विचार व्यक्तिला अवेळीच म्हातारा करतात.

तसे त्याचे वय काही अजून जास्त नव्हते; पंचवीस वर्षाचे वय काय जास्त वय असते काय ? हे तर खाण्या-पिण्याचे-खेळण्याचे वय आहे; परंतु धर्माच्या भानगडीत (लफड्यात) पडल्याने त्याच्या वयाच्या मानाने त्याच्यामध्ये प्रौढपणा अधिक आला आहे. त्याच्या चेहऱ्यावर चिंतनाची झलकसुद्धा स्पष्ट दिसू लागली आहे. कपाळावर तीन आठ्या तर सदोदित असतातच. बोलणे सुद्धा बैराग्यासारखे करू लागला आहे. पँट-सूटा ऐवजी सदरा-धोतर आणि टोपी घातल्याने तो आणखीन वयस्क वाटू लागला आहे.

धर्मेशचे अशातऱ्हेचे आयुष्य घालविण्याचा प्रकार, ज्यामध्ये एक तरुण अर्ध्या म्हाताऱ्या सारखा भासणे, अमितला पसंत नव्हते. ह्या गोष्टीमुळे उलट त्याच्यावर विपरीत परिणाम झाला. तो विचार करू लागला - धर्मेशची अशी अवस्था पाहून माझी तर ही पक्की खात्री झाली आहे की जर सदैव चिरतरूण रहावयाचे असेल तर - शेजारच्या वस्तिमध्ये भले आग लागो पण आपल्या मस्तीमध्ये मस्त रहावे.

मनातल्या मनात अशा विचारामध्ये बुडलेल्या अमितला झोप आली आणि तो गाढ निद्राधीन झाला. •

# ३

**अज्ञानी असणे तेवढे हानिकारक नाही, जेवढे हानिकारक आहे आपल्या अज्ञानाचे ज्ञान न होणे, आपल्या अज्ञानाचा स्वीकार न करणे.** धर्मेशमध्ये हा दोष नव्हता. त्याला धर्माचे ज्ञान तर नव्हते परंतु आपल्या धर्मासंबंधीच्या अज्ञानाचे ज्ञान बरोबर होते. त्याला आपल्या उणीवेची निरंतर जाणीव असे. त्यासाठी जी काही साधनं शक्य होती ती मिळविण्यामध्ये त्याने जराही कुचराई केली नव्हती.

असे म्हटले जाते की, जेव्हा स्वत:ची तयारी होते तेव्हा साधनांची देखील उणीव रहात नाही. ह्यालाच शास्त्रीय भाषेत असे म्हटले जाते की, **जेव्हा आपल्या उपादानाची तयारी होते तेव्हा निमित्तकारण आकाशातून अवतरतात.** पहा नां! भगवान महावीर स्वामींच्या दहा भवापूर्वीच्या सिंहाच्या पर्यायीमध्ये जेव्हा उपादानामध्ये सम्यग्दर्शनाची तयारी झाली होती तेव्हा उपदेशाच्या निमित्ताच्या रूपाने संजय आणि विजय नावाचे मुनिराज जंगलात आकाशातूनच उतरून आले होते.

धर्मेशच्या बाबतीत देखील असेच घडले. एक वयोवृद्ध बहुश्रुत विद्वान पंडित जिनेशजी कोठे जात असताना धर्मेशच्या गावाजवळच त्यांची गाडी बिघडली. त्यांना तेथेच थांबावे लागले. धर्मेश आणि गावातील लोकांच्या विनंतिवरुन पंडित जिनेशजींच्या प्रवचनाचा लाभ तर समाजाला मिळालाच तसेच धर्मेशने आपल्या मनात अनेक दिवसांपासून साठलेले प्रश्नसुद्धा विचारले.

धर्मेशचे जिज्ञासापूर्वक विचारलेले प्रश्न ऐकून पंडितजींनी खूप समाधान प्रगट केले.

धर्मेशचा पहिला प्रश्न होता – मी नियमित पूजा-अर्चा करतो तसेच माझ्या वडिलांनीसुद्धा आयुष्यभर पूजा केली आहे; परंतु त्याचे फळ आजपर्यंत का दिसले नाही ?

धर्मेशच्या प्रश्नाचे उत्तर देताना पंडित जिनेशजी म्हणाले - ‘‘हे खरे आहे की एवढे दिवस देवपूजा करण्याचे जे फळ तुला मिळाले पाहिजे, ते मिळाले नाही. हे खरेदेखील असू शकते की तुझे वडिलदेखील आयुष्यभर देवपूजा करीत होते, तरीदेखील त्यांच्या परिणतीमध्ये काही विशेष परिवर्तन (बदल) दिसत नाही. ते देखील कोरेच्या कोरेच राहिले; परंतु तुझा असा विचार करणे योग्य नाही की पूजेचे काही देखील फळ मिळाले नाही.

अच्छा ! आता तूच सांग की जर लहानपणापासून तू पूजा-अर्चा केली नसतीस तर काय तुझ्या मनामध्यें पूजेसंबंधी हे प्रश्न उभे राहिले असते जे आता उभे राहिले आहेत ? काय ही जिज्ञासा जागृत होणे हा काही लाभ नाही ? जे लाभले नाही, त्यामध्ये देखील पूजा-पद्धतिचा काही दोष नाही. ती तर आपल्यामध्येच काही मुळात चूक होत आहे की ज्यामुळे तुला अभूतपूर्व लाभ झाला नाही. असो काही हरकत नाही, कमीत कमी आत्मनिरिक्षण करण्याची संधी तर गवसली. हा सुद्धा एक चांगला लाभच आहे ना ?

अरे ! तसे पाहिले तर राजमार्ग देखील हाच आहे. जेव्हा मूलभूत वस्तुचे कोणते ज्ञानच नव्हते तर अशा परिस्थितीमध्ये जर हे केले नसते तर दुसरे तरी काय केले असते ?

जर खऱ्या देव-शास्त्र-गुरुंच्या शरणी गेला नसतास तर एखाद्या अन्य अदेव-कुदेवाच्या शरणी गेला असतास. किंवा एखाद्या कौटुंबिक गोरखधंद्यामध्ये अडकला असतास. निश्चितपणे कोणत्या ना कोणत्या पाप प्रवृत्तिमध्येच अडकला असतास, कोणती ना कोणती विकथाच करीत राहिला असतास. जेवढा वेळ पूजे-अर्चेमध्ये गेला, तेवढा वेळ विषय-कषायांपासून दूर तर राहिलासच नां ? काय हानि झाली ? म्हणून ह्याला सर्वथा निरर्थक तर म्हणू शकत नाही; **परंतु असीमित काळापर्यंत ह्यामध्येच गुरफटून राहणे, ह्यालाच धर्म मानून संतुष्ट होणे योग्य नाही**, कारण ही सुवर्णसंधी वारंवार मिळत नाही. समुद्रामध्ये फेकलेल्या रत्नाप्रमाणे अशा सुवर्णसंधीची प्राप्ति दुर्लभ असते की ज्यामध्ये सत्याचा शोध केला जाऊ शकतो.

ह्यादृष्टिने तुझा असा विचार करणे खरे आहे की अज्ञान दशेमध्ये केल्या गेलेल्या भावशून्य क्रिया फलद्रूप होत नाहीत.

कविवर बनारसीदासजींनी म्हटलेसुद्धा आहे -

**"जो बिन ज्ञान क्रिया अवगाहे, जो बिन क्रिया मोक्ष पद चाहे ।**
**जो बिन मोक्ष कहे मैं सुखिया, सो अजान मूढन में मुखिया ॥**

जे आत्मज्ञानाशिवाय धार्मिक क्रिया करतात, जे क्रिया केल्याशिवाय मोक्षपद इच्छितात, जे मुक्त झाल्याशिवायच आपल्याला सुखी मानतात; ते खरोखर मूर्खांचे सरदार आहेत. म्हणून धर्माचे यथार्थ ज्ञान तर असलेच पाहिजे."

धर्मेशने मन:पूर्वक समाधान प्रकट करीत म्हटले - "आता माझ्या पूर्णपणे लक्षात आले की, दररोज भगवानाची पूजा करणे सर्वथा निरर्थक नाही. आपण विकथा वगैरे पापभावांपासून निश्चितपणे वाचलो तर जातो; तसेच जे काम करतो, त्याविषयी विशेष (अधिक) जाणण्याची जिज्ञासा देखील जागृत होते. नि:संशय एवढा लाभ तर मलादेखील झालाच आहे. परंतु गोष्ट अशी आहे की - "जे वीतराग भगवान भक्तीमुळे प्रसन्नच होत नाहीत, ज्यांना भक्तांच्या पूजेपासून काही प्रयोजनच नाही. तसेच जे भक्तांना कोणती मदत करीत नाहीत, त्यांची भक्ति करणे तर गाढवासमोर गीता वाचण्यासमानच झाले नां ? त्यांची भक्ति अथवा पूजा करण्यामध्ये काय लाभ आहे ? आम्ही इतर दर्शनामधील त्यांनी मानलेल्या देव-देवतांची पूजा का न करावी, जे भक्तांचा कैवार घेऊन प्रकट होतात, वेळ-प्रसंगी त्यांची मदतसुद्धा करतात, भक्तांची दु:खं दूर करतात, भक्तांच्या मनापासून दिलेल्या हाकेने त्यांचे सिंहासन तात्काळ हलू लागते ?"

पं. जिनेशजींनी समजावले - "**अहो ! वास्तविक जगामध्ये असा कोणी ईश्वर नाहीच की जो एखाद्याचे दु:ख दूर करून त्याला सुखी करु शकेल. तसेच बहुतांशी सर्व दर्शनांनुसार संसारामध्ये जी काही सुख-दु:ख असतात, ती सर्व आपापल्या पापपुण्यानुसार असतात.**

सर्वशक्तिसंपन्न ईश्वरामध्ये विश्वास ठेवणाऱ्या दर्शनामध्येसुद्धा अशा अनेक पौराणिक कथा आहेत की ज्यामध्ये ईश्वरीय शक्ति असफल झालेल्या

दिसून येतात. हिन्दी साहित्यातील प्रसिद्ध महाकवि तुलसीदास यांची ही ओळ तुझ्या समाधानासाठी पुरेशी आहे -

**कर्मप्रधान विश्व करि राखा, जो जस करै सो तस फल चाखा**

ह्या संदर्भामध्ये जैन आचार्य अमितगतिंच्या सामायिक पाठाचा हिंदी अनुवाद देखील पाहण्याजोगा आहे -

**स्वयं किये जो कर्म शुभाशुभ, फल निश्चित ही वे देते।**
**करे आप फल देय अन्य तो स्वयं किये निष्फल होते ॥**

धावा करणाऱ्या भक्ताच्या मदतीला धावत येणारे देव-देवतासुद्धां पुण्यप्रतापामुळेच येतात - पाप्यांच्या मदतीला तर कोणी येत नाही.

मुनिराज ऋषभदेवांचेच पहा नां ! त्यांचे गर्भ, जन्म व तप कल्याणक साजरे करणारे इंद्रदेखील, ज्यावेळेला सहा महिन्यांपर्यंत दररोज आहारासाठी निघून सुद्धा दातारांना आहाराची विधि माहीत नसल्याने मुनिराज ऋषभदेव आहार न घेताच परतत होते; त्यावेळेस मदतीला धावून आले नाहीत.

ह्यावरुन हे सिद्ध होते की कोणी कोणाला मदत करीत नाही आणि करुही शकत नाही.

गीते सारख्या प्रसिद्ध हिंदू ग्रंथामध्येदेखील निष्कामभक्ति करण्याचाच उपदेश दिला आहे म्हणून पूजा-भक्ति एखाद्याला प्रसन्न करण्याकरिता किंवा लौकिक कार्यांच्या सिद्धिकरिता केली जात नाही आणि तसे करणेही योग्य नाही."

पं. जिनेशजींनी पुढे सांगितले - "जे लोक असे मानतात की भगवान भक्तांचा दयार्द्र धावा ऐकून धावत येतात ते भ्रमात आहेत. खरोखर ते भगवानाला ओळखतच नाहीत. अरे बाबा! भगवान सर्वज्ञ आणि सर्वदर्शी तर असतातच तसेच ते वीतरागी देखील असतात.

भोळ्या-भाबड्या भक्तांच्या मान्यतेनुसार भगवान जर खरोखरच दया दाखवून अपराध्यांना क्षमा करु लागले तर मग आपणच विचार करा की, अशा परिस्थितीमध्ये अपराध करण्याची प्रवृत्ति वाढेल का घटेल ?"

एक समजुतदार श्रोता म्हणाला - "अशातऱ्हेने तर निःसंशय अपराध करण्याची-पाप करण्याची-प्रवृत्ति वाढेलच; कारण अपराध्यांवर आणि पापींवर जो काही थोड्या फार प्रमाणात अंकुश राहिला आहे तो परभवामध्ये नरक-निगोदाच्या दुःखांच्या भयामुळे आणि ह्या भवामध्ये कायद्याच्या शिक्षेमुळे राहिला आहे, तो देखील नाहीसा होईल.

अशा मान्यतेने मंदिरापुढे अवश्य मोठमोठ्या रांगा लागतील, परंतु पाप आणि अपराध तर वाढतच राहतील; कारण पापांना माफ करवून घेण्याचा सोपा उपाय जो त्यांना उपलब्ध झाला आहे !

आजकाल तर लोकांची अशी अवस्था आहे की रात्रंदिवस मिथ्यात्व आणि कषायवश घोर पापं करीत आहेत, आर्त-रौद्र ध्यानामध्ये आकंठ निमग्न असतात. त्याच बरोबर दररोज सकाळ-संध्याकाळ जिनमंदिराध्ये मोठ्या गर्वासह भगवानासमोर हात पसरून सुस्वरामध्ये हाव-भावासह आलोचनापाठ म्हणतात - जणु खूप मोठ्या बहादुरीचे काम करुन आले असावेत आणि भगवंतांना आपली गौरव-गाथा ऐकवित असावेत."

पंडितजींनी त्याच्या म्हणण्याला स्पष्ट करण्याकरिता म्हटले - "हे बंधु ! तुझे म्हणणे अगदी खरे आहे - ह्या संदर्भामध्ये कविवर जौहरीकृत आलोचना पाठाची एक-एक ओळ ध्यान देण्यायोग्य आहे. उदाहरणार्थ काही ओळी अशा प्रकारे आहेत -

विपरीत एकांत विनयके, संशय अज्ञान कुनयके ।
वश होय घोर अघ कीने, वचतैं नहिं जात कहीने ॥

कुगुरुनकी सेवा कीनी, केवल अदयाकरि भीनी ।
याविधि मिथ्यात बढ़ायो, चहुँगति मधि दोष उपायो ॥

हिंसा पुनि झूठ जु चोरी, पर-वनितासों दृग जोरी ।
आरम्भ परिग्रह भीने, पन पाप जु या विधि कीने ॥

सपरस रसना घ्रानन को, चखु कान विषय सेवन को ।
बहु करम किये मनमाने, कछु न्याय-अन्याय न जाने ॥

फल पंच उदंबर खाये, मधु मांस मद्य चित चाहे ।
नहि अष्ट मूलगुण धारे, सेये कु-व्यसन दुःखकारे ॥

दुइवीस अभख जिन गाये, सो भी निस-दिन भुंजाये ।
कछु भेदाभेद न पायो, ज्यों-त्यों करि उदर भरायो ॥

निद्रावश शयन करायो सुपने मधि दोष लगायो ।
फिर जागि विषय-वन धायो, नानाविध विष-फल खायो ॥
आहार-विहार-निहारा, इनमें नहिं जतन विचारा ।
बिनदेखा धरा उठाया, बिन शोधा भोजन खाया ॥
तब ही परमाद सतायो, बहुविधि विकलप उपजायो ।
कछु सुधि-बुधि नाहिं रही है, मिथ्या मति छाय गयी है ॥
हा! हा!! मैं दुठ अपराधी, त्रस-जीवन-राशि विराधी ।
थावर की जतन न कीनी, उरमें करुणा नहीं लीनी ॥
पृथिवी बहु खोद कराई, महलादिक जांगा चिनाई ।
पुनि बिन गाल्यो जल ढोल्यो, पंखातैं पवन विलोल्यो ॥
हा! हा!! मैं अदयाचारी, बहु हरितकाय जु विदारी ।
तामधि जीवन के खंदा, हम खाये धरि आनंदा ॥
हा! हा!! परमाद बसाई, बिन देखे अग्नि जलाई ।
ता मधि जीव जु आये, ते हू परलोक सिधाये ॥
बीध्यो अन्न रात्रि पिसायो, ईंधन बिनसोधि जलायो ।
झाडू ले जांगा बुहारी, चिंटी आदिक जीव बिदारी ॥
जल छानि जिवानी कीनी, सो हू पुनि डारि जु दीनी ।
नहिं जलथानक पहुँचाई, किरिया बिन पाप उपाई ॥
जल मल-मोरिन गिरवायो, कृमि-कुल बहु घात करायो ।
नदियन विच चीर धुवाये, कोसन के जीव मराये ॥
अन्नादिक शोध कराई, तामै जु जीव निसराई ।
तिनका नहिं जतन कराया, गलियारै धूप डराया ॥

पुनि द्रव्य कमावन काजै, बहु आरंभ हिंसा साजै ।
किये अघ तिसनावश भारी, करुणा नहिं रंच विचारी ॥

इत्यादिक पाप अनंता, हम कीने श्रीभगवंता ।
संतति चिरकाल उपाई, वानी तैं कही न जाई ॥

अशा तऱ्हेची आपल्या अपराधांची कबुली जी भगवानासमोर केली आहे, जर तशी कबुली न्यायालयामध्ये न्यायाधीशासमोर दिली असती तर आपण कधीच गजाआड झालो असतो.

अन्याय तर निसर्गामध्येसुद्धा नाही, म्हणून तर आपण संसाररूपी कारागृहातच आहोत. तसेच पापांचे फळ भोगल्याशिवाय आणि अपराधी वृत्ति सोडल्याशिवाय ह्या दुःखापासून सुटका प्राप्त करण्याचा इतर कोणताही उपाय नाही.

आपणास हा भ्रम सोडला पाहिजे की, आपण पाप करीत रहावे आणि आलोचना पाठ म्हटल्याने भगवान आपणास क्षमा करीत राहतील.

प्रतिक्रमण, प्रायश्चित्त व आलोचना तर एवढ्यासाठी केले जातात की आपण आपले दोष व अपराध कबूल करुन पुनश्च त्याची पुनरावृत्ती करु नये. परंतु जोपर्यंत पुनरावृत्ति होत राहील तोपर्यंत नुसते आलोचना वगैरे पाठ म्हटल्याने प्रयोजनाची पूर्णता होणे शक्य नाही.

जे लोक दररोज स्तुतिपाठ वगैरे म्हणून आपल्या कर्तव्याची इतिश्री मानतात आणि आमच्या सर्व पापांचे क्षालन झाले आहे असे समजतात, ते अजूनही भ्रमात आहेत. त्यांची पापमय प्रवृत्ति जेथल्या तेथेच आहे, जरासुद्धा कमी होत नाही. म्हणून हेच मानणे ठीक आहे की, जी काही पापं किंवा अपराध आम्ही केले आहेत, किंवा करीत आहोत, त्यांना कोणती दैवी अथवा ईश्वरीय शक्ति किंवा भगवान माफ करु शकत नाहीत. त्याचे फळ तर आपल्याला भोगावेच लागेल.

माखनलाल चतुर्वेदी यांनी अशा भोळ्या भक्तांवर आणि त्यांच्या भगवानावर उपहासात्मक काव्य लिहिताना योग्य तेच म्हटले आहे की –

**हे भगवान । तू क्या कर सकता है इन्साफ ।**
**अरे ! प्रार्थना की रिश्वत पर कर देता है माफ॥**

म्हणून केवळ वीतरागीदेवच आराधना करण्यायोग्य आहेत, भले ते कुणाचे काही करीत नाहीत; परंतु त्यांच्या पवित्र गुणांचे स्मरण-आठवणच पापींच्या पापरूप मळाने मलिन झालेल्या मनाला निर्मळ करते. आपल्या मनाचे निर्मल होणेच जिनदेवाच्या पूजे-अर्चेचे खरे फळ आहे."

धर्मेशने पुढचा प्रश्न विचारला - "जेव्हा जैनदर्शनानुसार भावांमुळेच पुण्यबंध-पापबंध होतो आणि भावांमुळेच बंध-मोक्ष होतो. तर मग पूजेच्या पद्धतिमध्ये देखील भावपूजेलाच महत्त्व मिळायला हवे होते. द्रव्यपूजेला एवढे महत्त्व का दिले गेले ?

भव्य जिनमंदिर, विशाल जिनबिम्ब, एक नव्हे-दोन नव्हे तर आठ आठ द्रव्य, तेसुद्धा थाळी भरभरून, नाचणे-गाणे, टाळ, झांज-मृदुंग - ह्या सर्वांची काय आवश्यकता आहे ? वीतरागी भगवंतांना ह्या सर्वांपासून काही प्रयोजन नाही. सर्वज्ञ असल्या कारणाने ते भक्तांच्या सर्व परिणामांना चांगल्याप्रकारे जाणतात सुद्धा, मग हे अवडंबर का केले जाते?"

पंडितजींनी शांत चित्ताने ह्या प्रश्नाचे उत्तर असे दिले - "हे सर्व अवडंबर भगवंताकरिता केले जात नाही तर तुमच्या-माझ्यासारख्या चंचल मनाच्या भक्तांकरिता करावे लागते. ह्यांच्या शिवाय आपले मर्कट मन कोठल्या एका जागी स्थिर टिकत नाही. आपले चंचल मन रानातील माकडांप्रकारे विषय-वृक्षांची विषफळं चाखण्याकरितां सैरावैरा धावपळ करीतच असते-त्याला तेथून हटविण्यासाठी आणि शुभभावांमध्ये टिकविण्यासाठी हे सर्व साधन म्हणून स्वीकारले गेले आहेत.

ज्याप्रमाणे लहान मुलांचे मनोरंजन करण्याकरितां नानाप्रकारच्या नवीन नवीन खेळण्यांची अवलंबनं आवश्यक आहेत, त्याप्रमाणे भक्तिमध्ये मन रमविण्यासाठी ही विविध अवलंबनं आहेत. डोळ्याला अवलंबन परम शांत मुद्रायुक्त जिनबिंब दर्शन, वाणीला अवलंबन पूजेतील पद्य पाठ, मनाला अवलंबन पूजेच्या अर्थाचा विचार तसेच उपयोग यद्वा-तद्वा भटकू नये म्हणून गीत-संगीत वगैरे साधनांचा

उपयोग केला जातो. जो जो स्थिरता वाढत जाते, तो तो ही सर्व साधनं कमी कमी होत जातात. पूजेच्या ओळीमध्येसुद्धा आले आहे नां, की -

**'आलम्बनानि विविधान्यवलम्ब्य वल्गन्, भूतार्थयज्ञ पुरुषस्य करोमियज्ञम् ॥**

हे भगवान ! ह्या विविध अवलंबनांचे अवलंबन घेऊन मी आपली पूजा करतो आहे.' मुनिराजांद्वारे मन आणि इन्द्रियं जिंकली जातात त्यासाठी त्यांना द्रव्यपूजा आवश्यक असत नाही. ह्यावरुन स्पष्टच जाणवते की अशा विविध सामुग्रींची गृहस्थाला काय आवश्यकता आणि उपयोगीपणा आहे.

परंतु लक्षात ठेवावे, वीतरागी अहिंसाप्रधान धर्मामध्ये अवलंबन देखील पवित्र आणि अहिंसकच असतात. म्हणून आपली प्रत्येक धार्मिक क्रिया अहिंसकच असली पाहिजे.

ज्यांना जिनेंद्र भगवानाच्या वीतराग-विज्ञानमय स्वरूपाची माहिती देखील नसावी, ज्यांना त्यांच्या सर्वज्ञता आणि वीतरागता सारख्या अनुपम गुणांवर श्रद्धापण नसावी, जे जिनेंद्र भगवानाला भक्तांचा उद्धार करणारा आणि दुष्टांचा संहार करणारा मानत असावेत, जे त्यांना अधमउधारक, पतितपावन, दीनदयाळू मानत असतील; त्यांच्या मनामध्ये वीतरागी स्वभावाचे महात्म्य कोठून येईल ? त्यांच्या वीतरागी व्यक्तित्वाविषयी भक्ति-भाव कोठून येतील? कारण अशा प्रकारची सर्व कामे करुणा व क्रोधाशिवाय तर शक्य होऊच शकत नाहीत. अशी मान्यता बाळगणाऱ्याकडून तर वीतरागी भगवानाच्या भक्ति ऐवजी त्यांचा अवर्णवादच होतो.

वीतरागी जिनेंद्रदेवाच्या स्वरूपाशी जे अपरिचित आहेत असे भक्त तर भगवानाचे आणि त्याच्या भक्तीचे मूल्यांकन देखील आपल्या मागण्यांच्या पूर्ततेच्या हिशोबानेच तर करतात. त्यांच्या मनामध्ये भगवानाबद्दल निष्काम भक्तिभावना कोठून आणि कशी येईल?

खरी पूजा आणि भक्ति तर वीतरागी देव-शास्त्र-गुरुच्या यथार्थ ओळखीपूर्वकच होते आणि ज्यांना ह्यांची जाण/ओळख होते, त्यांनाच पूजेद्वारे पापांची निवृत्ति आणि आत्म्याची प्राप्तिरूप खऱ्या फळाची प्राप्ति होते आणि हेच तर पूजेचे मुख्य प्रयोजन आहे.

पूजेचे मुख्यपणे दोनच हेतू/कारणं/प्रयोजन आहेत, एक पापांपासून वाचणे आणि दुसरे परमात्मपद प्राप्त करण्याचा मार्ग प्रशस्त करणे.

**पहिले प्रयोजन तर अशा तऱ्हेने पुरे होते की जोपर्यंत अरिहंत व सिद्ध परमात्मा आपल्या ध्यानात विहरतात; तोपर्यंत पाच पाप, पाचही इन्द्रियांचे विषय आणि राग-द्वेषादि विकारीभाव आपल्या मनात येऊ शकत नाहीत; कारण ध्यानामध्ये परमात्मा आणि पाप दोन्ही एकत्र असू शकत नाहीत.**

क्षेत्र काळाच्या अपेक्षेने देखील जिनमंदिर आणि पूजेअर्चेच्या वेळी विषय-कषायाच्या वातावरणापासून अलिप्तच राहतात. मंदिराच्या मर्यादित सीमेमध्ये विषय-विषामध्ये रुचि असणारे प्रवेशच करीत नाहीत.

**दुसरे प्रयोजन देखील परमात्म्याच्या स्वरूपाला द्रव्य-गुण-पर्यायाने जाणल्याने, ओळखल्याने, त्यामध्येच मनाला रममाण केल्याने पूर्ण होऊन जाते.**

जोपर्यंत परिपूर्ण ज्ञान आणि पूर्ण पवित्रतेची प्राप्ति आपल्या जीवनामध्ये होत नाही, तोपर्यंत इच्छा न करता देखील शुभभाव असल्याने ज्ञानी धर्मात्म्यांनासुद्धा सातिशय पुण्यबंधदेखील सहजच होत रहातो, ज्याच्या निमित्ताने लौकिक अनुकूलतासुद्धा सतत राहते.

इतर अज्ञानी जीवांचेदेखील जर पूजा करते वेळी कषाय मंद असतील तर तेवढा वेळ पापापासून निवृत्ति झाल्याकारणाने त्यांनादेखील यथायोग्य पुण्याची प्राप्ति होते. जर एखाद्याच्या मनामध्ये लौकिक इच्छेमुळे तीव्र कषाय असतील तर पूजेसारखे पवित्र कार्य करीत असूनसुद्धा पापबंधच होतो; कारण पुण्य-पापाचा बंधसुद्धा परिणामा (भावा) मुळेच होतो.

म्हटले देखील आहे -

**बन्ध-मोक्ष परिणामन ही सों, कहत सदा ये जिनवर वाणी।**

धर्मेशचा आणखीन एक प्रश्न सिद्ध भगवानाच्या आव्हानना संबंधी होता - "जेव्हा सिद्ध परमात्मा संसारात पुनश्च येतच नाहीत, आठही कर्मांचा अभाव झाल्याने येऊसुद्धा शकत नाहीत तर मग सिद्धपूजेमध्ये आपण त्यांचे आव्हानन का करतो? ह्याचे काय औचित्य आहे? पूजेच्या पाच अंगांमध्ये आव्हानन, स्थापना आणि सन्निधिकरण - तीन हेच तर आहेत. पूजेच्या

अंगांमध्ये ह्यांना एवढे महत्त्व का आहे? आणि जेव्हा आव्हान वगैरेचे औचित्य जर सिद्ध होत नसेल तर मग विसर्जनसुद्धा कोणाचे होईल?"

पंडितजींनी धर्मेशच्या शंकेचे समाधान साध्या लौकिक उदाहरणासह मानसशास्त्रीय पद्धतिने देण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले - "समजा, आपला एखादा नातलग आहे, ज्याच्याशी तुमचे अगदी घनिष्ट संबंध आहेत, कौटुंबिक अडचणींमुळे अथवा असाध्य रोगामुळे तो आपल्या घरी होणाऱ्या लग्न प्रसंगी येऊ शकत नाही. अगदी शंभर टक्के खात्री आहे की तो येणार नाहीच - अशा वेळेला त्याला लग्नाची आमंत्रण-पत्रिका पाठविली पाहिजे कां नाही ?"

धर्मेशने उत्तर दिले - "भले कोणी येवो अथवा न येवो, येऊ शकतील अथवा न येऊ शकतील हा त्यांचा प्रश्न आहे; परंतु आपण आमंत्रण तर दिलेच पाहिजे. आमंत्रण न देण्याची कल्पना सुद्धा करता कामा नये. अहो! मी तर असे म्हणतो की जर नाईलाजाने ते येऊ शकले नाहीत तर आशीर्वाद घेण्याकरिता स्वतः वधु-वराने त्यांच्या घरी गेले पाहिजे."

धर्मेशच्या उत्तराच्या आधारेच पंडितजी म्हणाले -

"लौकिक व्यवहारामध्ये जेव्हा आमंत्रण न देण्याची कल्पना करणे देखील उचित नाही - सहन होत नाही - तर मग धार्मिक क्षेत्रामध्ये असा प्रश्नच का उठला की जेव्हा अरिहंत-सिद्ध येत नाहीत तर मग त्यांचे आव्हानन करावयाचे की नाही करावयाचे? अरे! तुम्ही आव्हान करण्याबाबतीत प्रश्नांकित होत आहात. भक्त तर त्याला म्हणतात की जर त्याच्या हातात असते तर त्याने स्वतः सिद्धालयामध्ये जाऊन सिद्ध परमात्म्याला बोलावून आणले असते. काय तुम्ही भक्तीभावांनी भरलेल्या स्तुतींमध्ये-स्तोत्रांमध्ये वीतरागी परमात्म्याला देखील कशा-कशा विशेषणांनी संबोधले गेले आहे कशा कशा उपमा दिल्या गेल्या आहेत हे पाहिले नाही काय? म्हणून पूजेमध्ये आव्हानन करणे काही अयोग्य/ अनुचित क्रिया नाही."

धर्मेशने एक क्षणभर थांबून आपल्या प्रश्नाबाबतीत पंडितजींच्या प्रबळ युक्तिवादावर गांभीर्याने विचार केला तेव्हा त्याच्या अंतरंगातून आवाज आला -

खरोखर गोष्ट तर अशीच आहे - अरिहंत व सिद्ध भगवान भले येवोत किंवा न येवोत, येऊ शकतील अथवा न येऊ शकतील; परंतु जे परमात्मा आपले परम हितोपदेशी आहेत, आपले आदर्श आहेत, परमगुरु आहेत, परमपूज्य देवाधिदेव आहेत, आपलेच पूर्वज आहेत; त्यांची आपणास दररोज आठवण न व्हावी, त्यांचे आपण आव्हानन न करावे - असे कसे होऊ शकेल? भगवानाला ओळखणाऱ्या भक्ताच्या मनामध्ये हा प्रश्न उत्पन्नच होत नाही की भगवानाला आव्हान करावे की न करावे ? ते तर करतातच आणि सर्व भक्तांनीसुद्धा केलेच पाहिजे.

अहो! एक गोष्ट ही देखील आहे की ते भले ह्या संसारामध्ये परतत नाहीत; परंतु आपल्या ज्ञानात तर ते येऊ शकतात ना! वेळोवेळी स्वप्नात देखील येतात आणि ध्यानातही येतात. ध्यानामध्ये येण्यापासून त्यांना कोण अडवू शकतो बरे ?

म्हणून तर महावीर-वंदनेमध्ये म्हटले आहे -

**वे वर्धमान महान जिन विचरें हमारे ध्यान में**

भले सिद्ध परमात्मा प्रत्यक्ष आले नाहीत, फक्त ध्यानामध्येच आले, तरी देखील आपले प्रयोजन तर सिद्धच होते/ पुरे होते.

धर्मेशच्या चेहऱ्यावरील उत्साह पाहून पंडितजींनी आव्हाननासंबंधी प्रश्नाला बालमानस-शास्त्राच्या एक अत्यंत सरळ व रोचक उदाहरणाने स्पष्ट केले.

त्यांनी म्हटले - "त्यावेळची गोष्ट आहे की जेव्हा लोक दोरी-बादली घेऊन विहिरीवर स्नान करण्यास जात असत. विहिरीच्या काठावर पाणी पडत असल्याने शेवाळ जमत असे, त्यामुळे विहिरीत घसरुन पडण्याची शक्यतासुद्धा असे; परंतु काळजी घेण्याशिवाय दुसरा कोणता उपाय नसे.

एकदा एक लहान मुलगा आपल्या वडिलांच्या मागे मागे जात विहिरीवर आंघोळी साठी गेला व विहिरीच्या टोकाजवळ जाऊन बसला. वडिल ओरडले - 'अरे ! कोठे जाऊन बसला आहेस, तेथून बाजूला सरक! दिसत नाही किती शेवाळे जमले आहे ते - पाय घसरताच.... !!!!!

वडिलांचे वाक्य पुरे होते न होते तोच तो मुलगा धडामदिशी विहिरीत पडला. पाणी कमी असल्यामुळे आणि सरळ पडल्याने बुडला नाही आणि कोठे मारही लागला नाही. परंतु तो मनोमन खूप घाबरला होता.

मुलाला विहिरीत पडलेला पाहून वडिलसुद्धा घाबरले. विहिरीतून आवाज आला, बाबा-बाबा इकडे या आणि मला संकटातून वाचवा. येथे चोहीकडे सापच साप आहेत, बेडकंसुद्धा आहेत, पाणीसुद्धां खूप थंड आहे; लवकर या लवकर आणि मला बाहेर काढा.

मुलाचा आवाज ऐकून वडिलांचा जीव भांड्यात पडला की निदान मुलगा वाचला तर खरा आणि अगदी पूर्ण शुद्धीवर आहे; परंतु मी काय करुं? त्याच्या जवळ कसा जाऊ ?

त्याच्यापर्यंत पोहोचणे तर शक्य नव्हते परंतु त्यांना एक उपाय सुचला, त्यांनी दोर विहिरीत सोडला-दोर तीन वेढ्यांनी विणल्यामुळे मजबूत होता; मुलगा त्याच्या आधारे वर येऊ शकला असता, परंतु तो नादान मुलगा दोरीच्या सहाय्याने वर न येता वडिलांनाच म्हणत राहिला ... तुम्ही येथे या.... तुम्ही येथे या ...

बस्स ! हीच परिस्थिती भक्त आणि भगवानाची आहे. सर्व भक्त भवकूपामध्ये पडलेले आहेत आणि भगवान भवकूपाच्या काठी सिद्धशिलेवर बसले आहेत. भक्त त्यांना आव्हान करतो. परंतु भगवानदेखील काय करणार? त्यांनी येथे भवकूपामध्ये येणे तर शक्य नाही. हां ! त्यांनी देखील त्या मुलाच्या वडिलांप्रमाणे सम्यग्दर्शन-ज्ञान--चारित्ररूप तीन वेढ्यांनी विणलेला मजबूत मोक्षमार्गरूपी दोर भवकूपामध्ये सोडून ठेवला आहे. भक्तांची इच्छा असेल तर त्या दोराच्या आधारे सिद्धशिलारूप भवकूपाच्या काठावर आपल्या परमपिता परमात्म्याजवळ पोहोचू शकतात.

जर नादान भक्त भगवानाने दाखविलेल्या मोक्षमार्गावर न चालता फक्त 'अत्र अवतर-अवतर' म्हणत त्यांचे आव्हानच करीत राहिले, त्यांना येथे भवकूपामध्येच बोलावित राहिले तर त्या मुलाप्रमाणे भक्त देखील भवकूपामध्येच राहून रडत बसतील.

अहो! भक्तीवश भक्ताला सर्व काही म्हणण्याची सूट आहे; परंतु ज्ञानी भक्त वास्तविकतेपासून अनभिज्ञ असत नाहीत.

जे समंजस भक्त असतात, ते भगवानाच्या भक्ती-पूजे बरोबर त्यांनी दाखविलेल्या मार्गावर चालतात आणि एक ना एक दिवस स्वतः भगवान बनतात. ह्याविरुद्ध जे भगवानाच्या भरवशावर भपकूपामध्ये पडल्या-पडल्या नुसतेच बोलवित राहतात, त्यांनी दाखविलेला मार्ग ऐकण्याचा व समजण्याचा प्रयत्न देखील करीत नाहीत; ते भवकूपातून बाहेर पडत नाहीत.

अहो ! पूजा-भक्तिच्या माध्यमातून आपल्याला ओळखून भक्तापासून स्वतः भगवान बनणेच पूजेचे मूळ प्रयोजन आहे."

पंडितजीद्वारे अशा सोप्या आणि सुबोध शैलीमधून केलेल्या समाधानाने धर्मेश तर आनंदित झालाच, इतर लोकांनीसुद्धा त्याचा भरपूर लाभ घेतला.

प्रश्न तर अजून भरपूर होते, परंतु वेळे अभावी सर्व प्रश्नांना उत्तर देणे शक्य झाले नाही; परंतु जे काही समाधान केले गेले त्याने श्रोते गद्‌गदित झाले होते.

तसे तर पंडित जिनेशचंद्रजी धर्मेशच्या गावाशेजारच्या आदर्श नावाच्या गावातच रहात होते, तेथे सुखसोयी तर शहरा सारख्याच होत्या; परंतु शहरांसारखा कोलाहल, धाव-पळ, घाण आणि गुंडशाही नव्हती. दळणवळणाची सर्व साधनं होती. शुद्ध ग्रामीण वातावरण आणि दूध-दही, फळ-भाज्या वगैरे सर्व साधनं सहज प्राप्य होती. पंडीतजी अंतर्मुख वृत्तीचे असल्याने त्यांना एकांतात राहणेच अधिक आवडत होते. त्यांचा स्वाध्यायदेखील स्वान्तःसुखायच होता. पुढे पुढे करुन तत्त्व प्रचार-प्रसाराचे आयोजन वगैरे करणे त्यांच्या स्वभावात नव्हते, एखादा करीत असेल तर खूषच असत; परंतु स्वतः काही करण्याची त्यांची इच्छाच होत नसे. ते अशा प्रयोजनाने कोठे जात-येत देखील नव्हते. ह्याकारणामुळेच त्यांची सर्वसामान्य लोकांमध्ये विशेष प्रसिद्धि किंवा जास्त ओळख नव्हती.

धर्मेशने जर अधिक आग्रह केला नसता तर धर्मेशच्या गावीसुद्धा प्रवचन किंवा तत्त्वचर्चा ते करणार नव्हते. धर्मेशचे भवितव्य चांगले होते की विनासायासच पंडितजींशी घनिष्ट परिचय झाला. ते जाण्यास निघाले असता पंडितजींना सर्वांनी पुन्हा येण्याकरिता हार्दिक आमंत्रण दिले; परंतु पंडितजींना कोठे येण्या-जाण्यामध्ये विशेष रसच नव्हता; म्हणून त्या लोकांना साधारण औपचारिक आश्वासन देऊन ते आपल्या गावी परतले. •

# ४

धर्मेश जन्मापासूनच जिज्ञासू होता. तो लहानपणीच आपल्या वडिलांना आणि शेजाऱ्यांना असे काही प्रश्न विचारत होता की त्याचे उत्तर देता देता त्यांची पुरेवाट लागायची. असे अनेक प्रश्न असत की ज्याची उत्तरं त्यांनासुद्धा ठाऊक नसत. त्यांना निरुत्तर पाहून धर्मेश म्हणत असे – "काही हरकत नाही, आता काही घाई नाही, नंतर विचार करुन उत्तर द्या;पण द्या जरूर."

अगोदरच्या पिढीपासून तर त्याला धार्मिक संस्कार मिळतच होते, त्यावरुन असे वाटत होते की पूर्वीच्या पर्यायामध्ये तो धर्मात्मा असला पाहिजे; नाहीतर असे नित्योपयोगी प्रयोजनभूत प्रश्न त्याच्या मनामध्ये कसे उद्‌भवतील ?

तो जसजसा मोठा झाला, तस तशी धर्माचे मर्म जाणण्याची त्याची जिज्ञासा प्रखरच होत गेली. त्याला कधीही कोठे एखादी नवी माहिती प्राप्त करण्याची संधी मिळत असे तेव्हा तो त्या संधीचा फायदा घेतल्याशिवाय रहात नसे. तो अधिकांश आपल्या वेळेचा उपयोग आपली ज्ञानपिपासा शमविण्यासाठी करीत होता.

जेव्हा पं. जिनेशजीचे धर्मेशच्या गावी अनायासे आगमन झाले होते, तेव्हा धर्मेशने त्यांनासुद्धा आपल्या मनातील प्रश्न विचारते होते आणि पंडितजींद्वारे आपल्या मनामध्ये बराचकाळ साचलेल्या शंकांचे आगमानुसार आणि युक्तिसह समाधान झाल्याने हार्दिक समाधानाचा अनुभव केला होता; तेव्हापासून तो पंडितजींच्या पांडित्यावर आणि त्यांच्या सहज सरळ स्वभाव व उदारतेमुळे पूर्णपणे प्रभावित झाला होता. पंडितजींच्या प्रेरणेने तो खूप स्वाध्याय देखील करु लागला होता व तेव्हा त्याने आपल्या मनाशी अशा संकल्प केला होता की पंडितजींच्या ज्ञानाचा आपण पूर्ण लाभ घेतला पाहिजे. मग त्यासाठी मला हवे तेवढे कष्ट करावे लागले तरी मी पाठीमागे सरणार नाही. पंडितजींना त्रास

दिल्याशिवाय त्यांचा अधिकात अधिक लाभ कसा काय घेतला जाऊ शकतो ? ह्या विषयी तो विचार करू लागला

जेथे इच्छा तेथे मार्ग. थोड्याशाच प्रयत्नाअंती धर्मेशला सहजपणेच पं. जिनेशजी सारखे नि:स्वार्थी, अध्यात्म विद्येमध्ये निपुण, सर्व तऱ्हेने निरपेक्ष ज्ञानगुरु मिळाले. मग काय सांगावे ? धर्मेशने आपल्या विद्यागुरु जिनेशजींकडून तत्त्वाचा भरपूर लाभ घेतला. पंडित जिनेशजींचे सानिध्य मिळाल्याने जणु तो कृतकृत्यच झाला होता. तो खूप आनंदित होता. पं. जिनेशजी देखील धर्मेश सारखा प्रतिभाशाली आणि धार्मिक कार्य संपन्न जिज्ञासु शिष्य मिळाल्याने खूप खुष होते. जणु मणि-कांचन योगच झाला होता. असे म्हटले जाते की एक आणि एक दोनच नव्हे अकरादेखील होतात. खरोखर पंडित जिनेशजी आणि धर्मेश एक आणि एक अकरा झाले होते.

पंडितजी जेथे रहात होते, आत्तापर्यंत तेथे त्यांच्याद्वारे दोन वेळा आध्यात्मिक प्रवचनं आणि एकावेळेला शंका-समाधानाच्या रूपाने तत्त्वचर्चा तर होतच होती, ह्याव्यतिरिक्त ते स्वत: दोन क्लास (वर्ग) देखील चालवित होते; परंतु ह्या कार्यक्रमाचा लाभ काही वयोवृद्ध लोकच घेत असत. पंडितजींची ज्ञान-गंगा तर सतत वहात होती; परंतु त्याला समजणारे असे काही मोजकेच लोक होते.

आपल्या संकल्पानुसार धर्मेशने तेथे नियमितपणे जाऊन तेथे जास्तीत जास्त थांबून पहिल्या पाच वर्षामध्ये चुपचाप पंडितजीद्वारे प्रवाहित ज्ञान-गंगेमध्ये आकंठ निमग्न राहून ज्ञानामृत पान केले. आध्यात्मिक शास्त्रांचे गंभीर सखोल अध्ययन, मनन, चिंतन करुन ज्ञान उपार्जित केले आणि तत्त्वचर्चेमध्ये शंका-समाधानाद्वारे आपल्या ज्ञानाचे परिमार्जन करून आपल्या ज्ञानाला आणि श्रद्धेला खूप निर्मल केले. तदनंतर पंडितजींच्या इच्छेनुसार प्रचार-प्रसाराला चालना देण्याकरिता मोठ्या उत्साहाने नव-नवीन योजना त्यांच्यासमोर मांडल्या. पंडितजींना धर्मेशच्या योजना खूप पसंत पडल्या. 'आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन'- अशा तऱ्हेने पंडितजींना धर्मेशच्या स्वरूपाने जणु दोन डोळेच मिळाले होते. ह्याबद्दल पंडितजींना मोठे समाधान वाटत होते.

योजना तर उत्तम होत्याच आणि पैशाचीही कमतरता नव्हती. त्यामुळे हळु-हळू पं. जिनेशजींच्या छोट्याशा निवासस्थानाने अध्यात्म विद्या शिक्षण संस्थानाचे रुप घेतले. प्रथम तेथे शिक्षण-शिबिराच्या शृंखलेचा शुभारंभ झाला-लोक दूर अंतरावरुनही ह्या शिक्षण-शिबिरांचा लाभ घेण्यास येऊ लागले. त्या शिबिरार्थींना शिकविण्याकरिता एक सोपा पाठ्यक्रम देखील धर्मेशद्वारे तयार करवून घेतला आणि शिक्षण देखील तयार केले गेले.

तेथे धर्मरूप वटबीज धर्मेशच्या सत्प्रयासांनी हळु हळु विशाल वटवृक्षाचे रूप घेऊ लागले ज्याच्या चारी दिशांमध्ये पसरलेल्या मोठमोठ्या फांद्यांच्या थंड सावलीमध्ये श्रोतागण नियमित धर्म लाभ घेऊ लागले.

वयोवृद्ध विद्वान पं. जिनेशजी आपल्या डोळ्यासमोर आपल्या छोट्याशा निवासस्थानाला एका विशाल आध्यात्मिक शिक्षण-संस्थानामध्ये परिवर्तित झालेले पाहून खूप आनंदित होते होते आणि संपूर्ण श्रेय धर्मेशला देत होते. धर्मेश जणुं त्यांना धर्मपुत्राच्या रुपानेच प्राप्त झाला होता. जर त्यांनी दिवा घेऊन हुडकले असते, आकाश-पाताळ एक केले असते तरी देखील त्यांना धर्मेशसारखा शिष्य क्वचितच मिळाला असता. जो त्यांना घरी बसल्या-बसल्या सहज प्राप्त झाला. त्याकडून दिले गेलेले तत्त्वज्ञान धर्मेश घरोघरी पोहोचवून त्यांची मनोकामना अवश्य पूर्ण करेल असा विश्वास त्यांना वाटत होता. वास्तविक ती इच्छा ते स्वतः पूर्ण करू शकले नव्हते. ह्यामुळे त्यांनी कोणाशी सल्ला मसलत केल्याशिवाय, पूर्ण विचाराअंती धर्मेशला संस्थानाचा उत्तराधिकारी म्हणून घोषित केले. मग काय सांगावे ? धर्मेशचा उत्साह द्विगुणित झाला आणि त्याच्या सततच्या प्रयत्नांनी ती शिक्षण संस्थारूपी लघु-वाटिका अशी एक विशाल बाग बनली कि ज्याच्या रंग बिरंगी विविध फुलांच्या सुगंधाने सारा देश दरवळून गेला.

देशाच्या कानाकोपऱ्यातून आध्यात्मिक क्रांति झाली, परदेशामध्ये राहणाऱ्या भारतीय बांधवांपर्यंत ह्या अध्यात्म विद्येचा सुगंध पोहोचला. त्यामुळे मोठे-मोठे विद्वान आणि श्रीमंत देखील धर्मेशच्या त्या शिक्षण संस्थेला पाहण्याकरिता आणि लाभ घेण्याच्या भावनेने येऊ लागले.

धर्मेश आपल्या शिक्षण संस्थेमध्ये नियमित ज्ञान-गंगा वहावतच होता, परंतु वेळोवेळी समाजाच्या आमंत्रणावरुन आपल्या सहकाऱ्यांबरोबर बाहेरगावी जाऊन सुद्धा आध्यात्मिक शिक्षण-प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करीत राहिला.



जर धर्मेशला शिबिरांच्या परंपरेचा जनक म्हटले गेले तरी अतिशयोक्ति होणार नाही. आज पुऱ्या देशामध्ये आध्यात्मिक शिक्षण-प्रशिक्षण शिबिर लावली जात आहेत, खरोखर ही धर्मेशचीच देणगी आहे. जर त्याने ह्याचा शुभारंभ केला नसता तर कदाचित आज देखील जिनवाणी बासनात गुंडाळून कपाटात बंद पडलेली राहिली असती. त्याकरिता धर्मेशचे आणि त्यांच्याद्वारे चालविल्या गेलेल्या शिक्षण संस्थेचे जेवढे आभार मानावेत तेवढे कमीच आहेत. •

धर्मेशला विचारात गर्क झालेला पाहून अमित म्हणाला - "काय धर्मेश कोणत्या विचारात बुडाला आहेस? काय विचार करीत आहेस? एक तू असा आहेस जो रात्रंदिवस कोणत्या ना कोणत्या चिंतेमध्ये मग्न असतोस, कसल्या ना कसल्या विचारात माथाफोडी करुन घेतोस; आणि मी हा असा आहे की ज्याने कधी कोणाबद्दल विचारच केला नाही, कधी कोणती चिंता-फिकीर केलीच नाही.

अरे ! सुरुवातीपासून तू स्वत: कमी चिंतनशील होतास असे नाही. पण आता तर पं. जिनेशचंद्रजीं सारख्या एकांतवास प्रिय असणाऱ्या मौनी बाबांचा सत्संग करु लागला आहेस - तर मग आता तुझ्या चिंतनशीलतेविषयी काय बोलावे ?

अरे, आता तू एक काम कर, पिंछी-कमंडलु घेऊन पुरा संन्यासी बन आणि जा एखाद्या पर्वताच्या शिखरावर"

प्रेमाने रागावून अमित पुढे म्हणाला - "वेडा कुठला ! ही काय आयुष्य जगण्याची पद्धत आहे? काय झाले आहे तुला? कोठे ते बहात्तर वर्षांचे वृद्ध-बाबाजी पं. जिनेशचंद्रजी आणि कोठे तीस वर्षाचा धट्टा-कट्टा नौजवान? काय हे दिवस देवा धर्माच्या भानगडीत पडून अशा तऱ्हेने शरीर कृश करण्याचे आहेत? वा रे वा! तू तर कमालच करु लागला आहेस.

तुझ्या हट्टामुळे एक तर तुझे वडिल त्रासलेले/बेजार आहेत. बिचाऱ्यांनी एकाहून एक सरस मुली तुझ्या करिता पाहिल्या; परंतु तू लग्नास होकारच देत नाहीस. ही काय रीत झाली? काय लग्न म्हातारपणी करणार आहेस? सोड त्या पंडिताची संगत आणि आपली दुकानदारी पहा, धंदा सांभाळ आणि वडिलांना चिंतामुक्त कर-

अरे मित्रा, आपला तर एकच सिद्धान्त आहे की, खा-प्या-आणि मजा करा. ही जवानी आहे ती थोड्या दिवसाकरिता आहे, हसत-खेळत जगावे आणि पोटभरुन प्यावे. ज्याची चिंता करावयाची ते भविष्य कोणी पाहिले आहे?"

अमितने धर्माची कटु निंदा करीत पुढे म्हटले-

"वास्तविक माझी पत्नी सुद्धा माझ्या ह्या विचारसरणीने आणि सवयीने त्रस्त असते किटकिट देखील बरीच करते. धर्मपत्नी आहे नां ती! 'धर्मा' चे लफडेच असे काही विचित्र आहे, ज्याच्या डोक्यात हा 'धर्म' घुसतो त्याला चिंताग्रस्त तर व्हावेच लागते. तू स्वत:चेच पहा नां! 'धर्माच्या' भानगडीत पडताच अडकलास ना चिंतेच्या जाळ्यात ? मी स्वत: तर असा मस्तराम आहे की मनात येईल तेव्हा झोपतो, मनात येईल तेव्हा जागतो, चिंतेला जर कोणाला ग्रासायचे असेल तर तिने आमच्या शत्रुला ग्रासावे. आपण चिंता करुन आपले रक्त-मांस का बरे सुकवावे/आटवावे? कधी काळी एखादा बेबनाव झालाच तर दोनचार पेग घेतो. धर्माची तर काय आम्ही धंद्याची देखील चिंता करीत नाही.

न कुछ लेकर आये थे, न कुछ लेकर जायेंगे ।
मुट्ठी बाँधे आये थे, हाथ पसारे जायेंगे ।।

बस्स! एवढ्यासाठी जितके दिवस आयुष्य आहे, तेवढे दिवस मौज-मस्तीतच का न घालवावे! अखेरीस आपणा सर्वांना ह्या मातीमध्येच विलीन व्हायचे आहे नां ?"

धर्मेश मनातल्या मनात विचार करीत होता - "पाहिलत! कशी फिलॉसॉफी ठोकू लागला आहे? काय हाच अर्थ आहे ह्या वैराग्यवर्धक फिलॉसॉफीच्या कथनांचा की जेवढे दिवस जगावे तेवढे दिवस मनसोक्त प्यावे, दिवस-रात्र एक करुन पैसे कमवावेत आणि विषयानंदी रौद्रध्यानामध्ये आयुष्य गमवावे आणि त्याच्या फलस्वरूप कुमरण करुन नरक-निगोदामध्ये जावे? वाह! खूप चांगला अर्थ काढला ह्याने! कसला वेडेपणा आहे ह्याचा?"

धर्मेशला अमितच्या नास्तिकतेच्या गोष्टी ऐकून चुटपूट तर लागली; परंतु तो आपले मन मारुन गप्प बसला व विचार करु लागला -

"हा कसला शिकला-सवरलेला माणूस आहे? ह्याच्या बोलण्याला काही दिशा नाही. कधी काही म्हणतो तर कधी काही. क्षणापूर्वी म्हणतो की आम्ही चिंता करुन हाड-मांस का सुकवातीत? आमचे शत्रुच चिंता करोत आणि

पुढच्याच क्षणी म्हणतो की, कधीकाळी तणाव निर्माण झाला तर दोन-चार पेग पिऊन घेतो....''

अमित एवढा भौतिकवादी आहे हे धर्मेशला माहित नव्हते. तो तर त्याला एक शिकला-सवरलेला विवेकी व्यक्ति मानत होता. अमितचे लांबलचक लेक्चर ऐकून तो आश्चर्याने दंग झाला.

तो विचार करु लागला की एक नाही, तीन तीन विषयांमध्ये पोस्ट ग्रॅजुएशन करणारी व्यक्ति धर्माच्या बाबतीत एवढी अजाण कशी असू शकते?

तो जैन असूनसुद्धा जैनदर्शनाच्या मूलभूत सिद्धांतापासून सर्वथा अनभिज्ञ असेल ह्याची धर्मेशला कल्पना देखील नव्हती. परंतु पुढच्याच क्षणी पंडितजींनी संगितलेला तो सिद्धांत आठवला ज्यामध्ये पंडितजींनी असे सांगितले होते की, **- प्रत्येक विषयाला जाणण्याची ज्ञानाची पर्यायगत योग्यता स्वतंत्र असते** आणि आता तर शास्त्रीय आणि मानसशास्त्रीय परिक्षणाने सुद्धा ही गोष्ट सिद्ध झाली आहे की बुद्धिमान व्यक्तिची बुद्धिदेखील प्रत्येक क्षेत्रामध्ये एकसारखे कार्य करीत नाही. एका विषयातील विशेषज्ञ (स्पेशॅलिस्ट) व्यक्ति दुसऱ्या विषयामध्ये सर्वथा अनभिज्ञ देखील आढळते; कारण प्राप्तज्ञानामध्ये ज्या विषयाला जाणण्याची योग्यता असते, तोच विषय त्या ज्ञानाचे ज्ञेय बनते, अन्य नाही.

एका फार मोठ्या शास्त्रज्ञाच्या बाबतीत असे म्हटले जाते की त्याच्या एवढी स्थूल गोष्ट लक्षात येत नव्हती की एकाच मार्गातून दोन लहान-मोठी मांजरं आत बाहेर येऊ-जाऊ शकतात. म्हणून तो दोन्ही मांजरींना आत-बाहेर येण्या जाण्यासाठी दोन दरवाजे बनविण्याचा आग्रह तोपर्यंत करीत राहिला, जोपर्यंत त्याला एकाच दरवाजातून दोन्ही मांजरांना प्रत्यक्ष बाहेर काढून दाखविण्यात आले नाही.

हे आवश्यक नाही की एक मोठा इंजिनियर, डॉक्टर, ज्योतिषि किंवा आय.ए.एस. व्यक्ति देखील चांगला चहा आणि स्वादिष्ट भाजी बनवू शकेल. भाजी बनविणे तर दूर असू द्यावे, फार बुद्धिमान व्यक्ति तर शर्टाची बटणेसुद्धा लावू शकत नाहीत. ह्यामुळेच बालकांच्या रुचीनुरूपच आपला विषय

निवडण्याचा सल्ला दिला जातो. बालकांच्या मनाविरुद्ध-रुचिविरुद्ध विषय घ्यायला लावणाऱ्या आई वडिलांची मुले बहुतांशी अपयशी आढळतात- त्यांच्या अपयशाचे कारण हेदेखील आहे की, **बुद्धि तत्समयाच्या पर्यायगत योग्यतेनुसार आपल्या ठराविक विषयामध्येच चालते.**

जैनदर्शनामध्ये तर ह्याला एका मोठ्या सिद्धांतरुपाने स्वीकारले गेले आहे. तेथे म्हटले आहे की, **प्रत्येक पदार्थाला जाणण्याची ज्ञानाची पर्यायगत योग्यता बिलकुल स्वतंत्र असते. प्राप्त ज्ञानामध्ये ज्या विषयाला जाणण्या-समजण्याची योग्यता असेल, तोच विषय त्या ज्ञानाचा ज्ञेय बनेल, इतर नाही.**

ही सैद्धांतिक बाब ज्यावेळेस ऐकली होती. त्यावेळी त्याचा उपयोग त्याला नीट स्पष्टपणे लक्षात आला नव्हता; परंतु आता अमितच्या आयुष्यामध्ये अक्षरशः घटित होत असलेले पाहून धर्मेशला सर्व काही स्पष्ट समजले.

बस, ह्याच सिद्धांताचा आश्रय घेऊन धर्मेशने अमितच्या बिनबुडाच्या गोष्टींमुळे झालेल्या यातनांना उपशमित/शांत करीत विचार केला -

असो आतापर्यंत जे झाले ते झाले. निदान आता त्याच्या काही लक्षात यावे ही शक्यता पण आहे. प्रत्येक समयाचे परिणमन जेव्हा स्वतंत्र आहे तेव्हा भूतकाळाकडे पाहून हताश कां व्हावे? प्रयत्न करण्यामध्ये हानि कोठे आहे?

असा विचार करुन धर्मेशने अमितला प्रेमाने समजावले - "मित्रा! स्वतःच्या बाबतीत, आत्मा-परमात्म्याच्या बाबतीत, संसार, शरीर व भोगांची क्षणभंगुरता आणि संसाराची असारता ह्याबाबतीत विचार करण्याने बुद्धि भ्रष्ट होत नाही, उलट अशा विचारांनी अनादिकाळापासून भ्रष्ट झालेली बुद्धि ठिकाणावर येते."

आपले म्हणणे पुढे रेटीत धर्मेश म्हणाला - "बुद्धि भ्रष्ट होते पाच इंद्रियांच्या विषयामध्ये बुडून राहण्याने, बुद्धि भ्रष्ट होते मोह-राग-द्वेष आणि कषायांच्या कलुषित भावांनी, रात्रंदिवस ह्या भोगसामुग्री एकत्रित करण्याच्या धुंदीमध्ये आणि बेकायदा व्यापार-धंद्याला चिटकून राहण्यामध्ये. बंधु! सर्वात मति भ्रष्ट होते पराचे बरे-वाईट करण्याच्या अनधिकृत चिंतेमध्ये. म्हणून जर तू आपले भले

इच्छित असशील, आपले डोके ठिकाणावर ठेवू इच्छित असशील, तर मी जे सांगतो त्यावर गांभीर्याने विचार कर आणि आपला भौतिकवादी भोगप्रधान दृष्टिकोण बदल-तरच तुझ्या ज्ञानपर्यायामध्ये तत्त्वज्ञान समजण्याची योग्य पात्रता निर्माण होईल. नाहीतर धर्माबाबतीत तुला काही एक समजून येणार नाही.

अमित! मी जाणतो आहे की तुला माझ्या सल्ल्याची गरज नाही, परंतु न जाणो कां माझे मन मला तुला कधी कधी काही सांगण्यास विवश करते. एवढ्यासाठी मी तुला बरंच काही सांगून गेलो, ह्याबाबतीत आणखीन एक गोष्ट सांगण्याची इच्छा आहे. ती ही आहे की, **हे जे परिणाम होतात, त्यांचे काय फळ मिळेल?** ह्या गोष्टीवर देखील थोडा गांभीर्याने विचार कर.

अरे मित्रा! मला आणखी कोणती चिंता नाही. हल्ली मी जे काही थोडे फार दुकानात जातो तर माझे तेथेही मन रमत नाही. तेथे बसल्या बसल्या देखील मी ह्याच संदर्भामध्ये विचार करीत असतो. त्यामुळे बऱ्याचशा अनर्थकारक विचारांपासून वाचतो. जर तू सुद्धा आपल्यामध्ये होणाऱ्या भावां (परिणामां) बद्दल विचार करशील आणि त्यापासून होणाऱ्या पुण्य-पापाबाबतीत चिंतन करशील तर तुझ्या आयुष्यामध्ये देखील क्रांतिकारी परिवर्तन होऊ शकेल आणि अनोळखी आनंदाचा नमुना चाखायला मिळेल."

अमित रुक्षपणे म्हणाला, - "दोस्ता, तुझी चिंता आणि चिंतन हे तुलाच लखलाभ होवो आणि तुझ्यासारखे आयुष्य तुलाच लखलाभ होवो, मी ह्या चिंता किंवा चिंतनाच्या भानगडीत का बरे पडावे? माझ्या जीवनाला असा कोणता धोका आहे की ह्या भानगडीत मी पडावे? अरे यार, माझ्यासारखे आयुष्य तर आता लाखातल्या एखाद्याच्याच नशीबात असेल!"

धर्मेश म्हणाला - "अरे! चिंता आणि चिंतन ह्यामध्ये मौलिक फरक आहे. चिंता अज्ञानाची उपज आहे - तत्त्वज्ञानासंबंधी अज्ञानतेमुळेच तिचा जन्म होतो आणि ती स्वत: आकुलतेची जननी आहे. तसेच चिंतन वस्तुस्वरूपाला हुडकण्याचे (समजण्याचे) सर्वोत्तम साधन आहे, आत्मोपलब्धि आणि अज्ञानजन्य आकुलता मिटविण्याचा अमोघ उपाय आहे."

अमित शिकला-सवरलेला नक्की होता, परंतु चिंता व चिंतन मधील हा फरक त्याला समजला नाही. म्हणून त्याने धर्मेशच्या बोलण्याकडे ध्यान दिले नाही, संतोष प्रगट केला नाही.

धर्मेश आतापर्यंत अमितची रुचि/आवड आणि स्वभावाला चांगलेच समजला होता, म्हणून त्याने त्याच्या म्हणण्याला गंभीरपणे घेतले नाही, त्याच्या म्हणण्याने वाईट वाटून घेतले नाही; कारण त्याला अशाच उत्तराची अपेक्षा होती.



शांत चित्ताने धर्मेश त्याला म्हणाला, - "काही हरकत नाही, मी माझे म्हणणे मागे घेतो. मैत्रीच्या मोहामुळे मीच ही चूक केली कि तुला न मागता सल्ला दिला. खरोखर कोणालाही मागितल्याशिवाय सल्ला देऊ नये.

अरे ! सल्ला मानण्याबाबतीत कोणी कोणाला जबरदस्ती करु शकत नाही आणि केलीही नाही पाहिजे. म्हणून तू पूर्ण स्वतंत्र आहेस, परंतु कधी कधी भेटण्यास यायला काहीच हरकत नाही. भेटत रहाण्यामध्ये काय नुकसान आहे? विचारांची देवाण घेवाण झाल्याने कोणाला तरी कधी काही ना काही फायदा अवश्य होईल."

अमित म्हणाला - "हो, हो, - येईन, अवश्य येईन. न भेटण्याचा प्रश्नच कोठे उभारतो? अरे मित्रा! आपण अगदी बालमित्र आहोत. विचारवंत व्यक्तिंमध्ये मतभेद तर होतच असतात. हां परंतु मनभेद असता कामा नये."

धर्मेश हसत म्हणाला - 'होय, तुझे म्हणणे अगदी शंभर टक्के खरे आहे. मी देखील तुझ्या ह्या विचारांशी पूर्णपणे सहमत आहे."

अमित धर्मेशच्या विचारसरणीला नावे ठेवीत आपल्या घरी निघाला. •

# ६

गंभीर, विचारशील आणि मोठ्या व्यक्तित्वाची हीच ओळख आहे की ते अजाण आणि छोट्या व्यक्तिंच्या लहानसहान गोष्टींनी प्रभावित होत नाहीत, न विचार करता-सवरता कोणत्याही क्रियेची तात्काळ प्रतिक्रिया प्रगट करीत नाहीत. अपराध्यांवर विनाकारण भडकत नाहीत, बडबड करीत नाहीत; उलट त्यांच्या बोलण्यावर, क्रियांवर शांत चित्ताने पूर्ण विचार करुन योग्य निर्णय घेतात, तदनुसार कार्यवाही करतात आणि आवश्यक मार्गदर्शन देतात.

आपले धार्मिक अज्ञान आणि नास्तिकतेचा परिचय देत अमितने जी धर्मेशसमोर भाषणबाजी केली, त्याच्या प्रत्युत्तरामध्ये धर्मेशने विशेष काही न सांगता अमितला मोठ्या शालीनतेने मात्र दोन गोष्टींवर विचार कर असे सांगितले.

त्यावेळी अमित धर्मेशची उपेक्षा करुन, त्याच्या बोलण्याचा पिच्छा सोडवून निघून गेला; परंतु त्या 'बोलण्यांनी' त्याचा पिच्छा सोडला नाही. त्या गोष्टी आक्रमक रोगाप्रमाणे त्याच्या मस्तिष्कामध्ये भिनल्या. आतापर्यंत धर्मेशच्या गांभीर्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाची थोडी थोडी छाप अमितवर पडली होती. त्यामुळेच त्या रात्री तो बराच वेळ त्याच्या बोलण्यावर विचार करीत होता.

हे चरित्र कसे बनू लागले आहे? हे जे परिणाम-भाव होत आहेत, ह्याचे फळ काय मिळेल ?...

अमितने विचार केला - अखेर, धर्मेश ह्या गोष्टींवरून काय सांगू इच्छितो? काय समजावू पाहतो आहे ? तसे तर साधेच बोलणे भासते, पण धर्मेश सारखा माणूस सांगत आहे, ज्याच्या समोर श्रोता म्हणून बसलेले मोठे मोठे विद्वान माना डोलावून वाह ! वाह ! करतात, कमाल आहे - कमाल आहे असे म्हणतात, लांबून लांबून लोक त्याला ऐकण्यास येतात. म्हणून त्याच्या बोलण्यात काहीतरी अर्थ खचितच असला पाहिजे.

दुसऱ्या दिवशी अमित धर्मेशला म्हणाला – ''मित्रा! तू तर जाणतोसच ना कि मी किती बिझी असतो ते. अनेक सामाजिक, धार्मिक संस्थांशी जोडलेला आहे, थोडा-फार राजकारणामध्ये सुद्धा संपर्क ठेवावाच लागतो, कारण माझा धंदादेखील तशाच प्रकारचा आहे नां? ज्यामध्ये राजकारणींचे वजन तर आवश्यक आहे नाहीतर रोज उठून नवीन कटकटी झाल्याशिवाय रहात नाहीत. आज इन्कमटॅक्सवाल्यांची धाड, तर उद्या पोलीसांचा तपास. तरीदेखील मी सुद्धा तुझ्या बोलण्यावर विचार करण्याचा पुरेपूर प्रयत्न केला.

हे पहा, मी दोन गोष्टींवर विचार करावा असे तू म्हणाला होतास. त्यामध्ये प्रथम जी चारित्र्याबद्दलची गोष्ट आहे, ती तर साधु संतांनी विचार करण्याची गोष्ट आहे. आपल्यामध्ये न तर अजून चारित्र धारण करण्याची योग्यता आहे आणि न नजीकच्या भविष्यामध्यें असे सामर्थ्य दिसून येते.

राहता राहिली गोष्ट 'भावांची', त्यामध्ये तर आम्ही एक्स्पर्ट आहोत कारण रात्रंदिवस भावांमध्येच लोळत असतो-आमचा सगळा व्यापार-धंदा भावांवरच आधारलेला आहे. बिछाना सोडताच सर्वात प्रथम आमच्या हाती शेअर बाजाराच्या भावांचे वर्तमान पत्रातील पान डोळ्यासमोर असते. बाजार भावांचा अभ्यास जसा माझा आहे तसा क्वचितच एखाद्याचा असेल. आजपर्यंत अजून कोणी असा जन्मला नाही जो ह्यामध्ये मला हरवेल. बाजारभाव दोन प्रकारचे असतात, एक...''

धर्मेशने अमितने रात्रभर विचार केलेच्या लांबलचक व्याख्यानाला ऐकून प्रथम तर कपाळावर हात मारला. त्याला असे वाटले की रात्रंदिवस शेअर धंद्यामध्ये व्यस्त आणि मस्त अमितला शेअरबाजाराचे भाव दिसणार नाहीत तर आणखी काय दिसणार आहे?

धर्मेशने हसून म्हटले – ''वा! वा!! अमित, शाबास!!! तू योग्य तेच बोललास. तुझ्याकडून हीच अपेक्षा होती. ह्यामध्ये तुझा काही दोष नाही, हा तर तुझ्या दृष्टिचा दोष आहे. ज्याच्या डोळ्यावर जसा हिरवा-लाल चष्मा चढविला असेल, त्याला सर्व वस्तु तशाच दृष्टिगत होतात.''

अमितने खूप विचार करुनच उत्तर दिले होते. त्याला जराही असे वाटले नव्हते की धर्मेशसमोर त्याला खाली पहावे लागेल.

त्याने नम्रपणे विचारले - "अरे! ह्यामध्ये मी चुकीचे काय सांगितले?"

धर्मेश म्हणाला - "मित्रा! तुझ्या शेअरबाजारच्या भावांशी आमचे काय देणे घेणे ? बाजारभाव किती प्रकारचे आहेत - तो तर अर्थशास्त्राचा विषय आहे. मी तर तुला धर्मशास्त्राच्या संदर्भाने आत्म्याचे शुभ-अशुभ, पुण्य-पाप, राग-द्वेष भावांच्या बाबतीत; वीतराग-सराग, शुद्ध-अशुद्ध भावांच्या बाबतीत; संक्लेष - विशुद्ध भाव आणि आर्त-रौद्र भावांच्या बाबतीत विचार करण्यास सांगितले होते आणि तू मला शेअरबाजारचे भाव सांगत आहेस. परंतु ह्यामध्ये तुझा काही दोष नाही. इंद्रियज्ञानाचे स्वरूपच असे असते. तत्त्वज्ञानाच्या बाबतीत तर काय सांगावे, इन्द्रिय ज्ञानाने तर लौकिकज्ञान देखील यथार्थ होत नाही ना ! आकाशात दिसणारे चंद्र-सूर्य-चांदण्या तसेच उडणाऱ्या पक्ष्यांचा जसा आकार आणि रंग असतो, काय ते आपणास तशाच आकारात व रंगात दिसतात काय ? नाही, तसेच दिसत नाहीत; कारण त्यांचे लहान-मोठे दिसणे त्यांच्या अंतरावर आणि आपल्या डोळ्याच्या योग्यतेवर अवलंबून असते.

ह्या उदाहरणावरुन हे स्पष्टच आहे की - वस्तु अनुसार ज्ञान होत नाही, परंतु आपल्या इंद्रिय ज्ञानाच्या योग्यतेनुसारच वस्तु जाणली जाते.

ह्यालाच शास्त्रीय भाषेमध्ये असे म्हटले गेले आहे की - ज्ञेयांनुसार ज्ञान होत नाही, परंतु आपापल्या प्रगट ज्ञान पर्यायीच्या योग्यतेनुसार ज्ञेय जाणली जातात. अर्थात ज्याच्या ज्ञान पर्यायीमध्ये ज्यावेळी ज्या पदार्थाला ज्या प्रकारे (रुपामध्ये) जाणण्याची योग्यता असते, ते ज्ञान त्या पदार्थाला त्या प्रकारे (रुपामध्ये) च जाणते."

ह्या सिद्धांताच्या आधारे धर्मेशने स्वत:च्या मनाला समजाविले की अमितच काय, अमितसारखे आणखीन असंख्य लोक आहेत - असू शकतात; जे जिनवाणीच्या कथनाला आपल्या मिथ्या अभिप्रायानुसार ग्रहण करतात म्हणून ते क्रोधाला पात्र नाहीत; त्यांच्यावर रोष करु नये. बिचाऱ्यांच्या वर्तमान

ज्ञानपर्यायीमध्ये जशी योग्यता असेल, ते आपल्या कथनाला तसेच ग्रहण करु शकतील. ते आपणासारखा समजूतदारपणा कोठून आणतील? ज्यांचे भवितव्य चांगले नसते, त्यांच्या बाबतीत असेच बनाव घडतात. साधनांच्या सद्भावामध्ये देखील ते त्यापासून लाभ घेऊ शकत नाहीत. असे लोक तत्त्ववेत्त्या ज्ञानींच्या प्रत्येक कथनाला अन्य प्रकारे ग्रहण करून आपले अज्ञान पुष्ट करुन राग-द्वेष करीत राहतात आणि ज्ञानी लोक ह्याच सिद्धांताच्या आधारे स्वत:मध्ये उठणाऱ्या संकल्प-विकल्पांचे शमन करुन शांत राहतात, विशुद्ध भावच ठेवतात.

अजूनही अमितच्या पदरी काही पडले नाही; परंतु तो गुपचुप सर्व ऐकत राहिला आणि विचार करु लागला.

## योग्यतेचा अर्थ

जीवाच्या प्रत्येक समयाच्या पर्यायीमध्ये जी राग किंवा वीतरागरूप परिणमन करण्याची स्वतंत्र शक्ति आहे, तिलाच उपादानाची योग्यता म्हणतात.

उपादानाची योग्यता म्हणा, कार्य संपन्न होण्याचा स्वकाल म्हणा, क्रमबद्धपर्याय म्हणा, भवितव्य म्हणा, पुरुषार्थ म्हणा, काललब्धि म्हणा, पर्यायगत धर्म म्हणा - सर्व एकच गोष्ट आहे, सर्वाचा एकच अर्थ आहे.

एखाद्या द्रव्यामध्यें जे काही कार्य होते ते स्वयं द्रव्याच्या आपल्या तत्समयाच्या उपादानगत योग्यतेनेच होते, समया समयाचे क्षणिक उपादानकारण पूर्ण स्वाधीन आहे, स्वतंत्र आहे, स्वयंसिद्ध आहे. त्याला पराची जरादेखील कोणतीही अपेक्षा नाही.

निमित्त मात्रं तत्र, योग्यता वस्तुनि स्थिता।
बहिर्निश्चय कालस्तु, निश्चितं तत्त्व दर्शिभि:॥

वस्तुमध्ये असलेली परिणमनरूप योग्यताच कार्याचे नियामक कारण आहे, ज्याला अंतरंग निमित्त म्हटले आहे. निश्चय काल द्रव्याला बाह्य निमित्त कारण म्हटले आहे.

**- गोम्मटसार, जीवकांड - गाथा ५८०**

# ७

अमित एक खानदानी उद्योगपति आहे. त्याच्या बापजाद्यांचे प्रथमपासूनच कित्येक कारखाने आहेत ज्यांचे त्याला चांगले उत्पन्न आहे. त्याबरोबर तो स्वत: शेअरबाजारमध्ये मोठा ब्रोकरसुद्धा आहे. कमाई तर त्यामध्येसुद्धा खूप आहे; परंतु मानसिक शांति बिलकुल नाही, असूही शकत नाही; कारण शेअर बाजाराचे थोडे स्वरूपच असे आहे की, जेव्हा भाव चढतात तेव्हा स्वर्ग दोन बोटे उरतो आणि जेव्हा उतरतात तर अनायासे पाताळाला प्रोहोचतात. केव्हा काय होईल, सुरुवातीलाच ठीक अनुमानसुद्धा लागत नाही. त्यामुळे लोकांच्या परिणामांमध्ये फार फेरफार होतात, हर्ष विषादसुद्धा खूप होतो. दोन्ही परिस्थितिमध्ये झोप उडून जाते. व्यक्ति सामान्य व्यक्ति सारखी रहात नाही. अशा लोकांना जेव्हा अधिक मानसिक ताण पडतो, तर त्याना ताण कमी करण्याकरिता नशाकारक वस्तुंचा आसरा घ्यावाच लागतो, जे न सामाजिक दृष्टिने सन्मानजनक आहे आणि न प्रकृतिला हितकारक आहे. तसेच धार्मिक दृष्टिने तर पापमय परिणाम (भाव) असल्याने ते त्याज्यच आहेत.

अमित ह्या दोषांपासून दूर राहू शकला नाही. तो सुद्धा कधीतरी मद्यपान करीतच होता. जो मद्यपान करतो तो त्याच्यासारख्या अन्य दुर्गुणांपासून देखील कसा दूर राहील? अमित त्या अन्य दुर्गुणांपासूनही दूर राहू शकला नाही – हळु हळु तो सातही व्यसनांच्या विळख्यात आला.

धर्मेशला वारंवार विचार येत असे की कोणत्याही तऱ्हेने अमितला आपल्या वर्तमानातील पाप परिणामांची ओळख झाली आणि त्यांच्या फलरूप होणाऱ्या दुर्दशेची जाणीव होऊ शकली तर मग निश्चितपणे त्याच्या जीवनात परिवर्तन येईल तर किती बरे होईल! अजून त्याला ह्या पाप परिणति (परिणामां)च्या दुष्परिणामांची जाणीव नाही, म्हणून बिचारा दिवस रात्र पाप करण्यामध्ये मशगुल झाला आहे.

ज्याप्रमाणे एखादे अजाणते मूल विषारी नागाच्या पिल्लाबरोबर निर्भय व निर्द्वंद भावाने खेळते; कारण त्या भोळ्या मुलाला माहित नाही की ह्या विषारी नागाचे पिल्लू किती धोकादायक आहे - प्राणघातक आहे. जर हा रागावला आणि त्याने चावा घेतला तर मरण आल्याशिवाय रहाणार नाही. जर त्या मुलाला त्या आपत्तिचे ज्ञान झाले तर तो त्याच्याशी खेळेल काय?

अगदी अशाच तऱ्हेने आपल्या विचित्र पाप परिणामांच्या फलापासून अनभिज्ञ (अजाण) व्यक्तिच त्या पाप परिणामांमध्ये निरंतर रममाण राहतात आणि ज्यांना ह्याची जाणीव होते की ते परिणाम काळ्या नागासारखे विषारी आहेत, तर मग ते त्यापासून बचाव करुन घेण्याचा उपाय शोधतात.

अशातऱ्हेचा विचार करुन धर्मेशने अमितला दोन गोष्टींवर गांभीर्याने विचार करण्याकरितां प्रेरित केले; परंतु अमितच्या पदरी अजून काही पडले नाही. पडले तरी कसे असते? तो धर्मेशचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकतच कोठे होता? तो तर आपल्याच तोऱ्यात असे. त्याचे लक्षच विरुद्ध दिशेकडे चालले होते, त्यामुळे तो धर्मेशने सांगितलेला अभिप्राय समजू शकला नाही. समजणे काही फार मोठी गोष्ट नाही; परंतु समजण्याची रुचि आणि तदनुरूप परिणाम बदलणे अत्यंत मुष्कील आहे.


अमित भले धनाढ्य होता, परंतु त्याच्या प्रवृत्तिमुळे त्याची पत्नी, पुत्र आणि नातलग - सगळे त्रस्त होते, दुःखी होते. संसाराचे स्वरूपच असे आहे की येथे सर्वांना सर्व प्रकारची अनुकूलता मिळत नाही; कारण असे अखंड पुण्यदेखील कोणाजवळ असत नाही. अशा दुःखी जीवांच्या दुःखांना पाहून धर्मात्म्यांच्या हृदयातून कारुण्याची कारंजी झिरपल्याशिवाय रहात नाहीत, जी त्यांना जगाच्या हितार्थ सत्य सिद्धांताचे निरुपण करण्याकरिता प्रेरित करते.

अमित आणि त्याच्या कुटुंबियांना मानसिक दुःखामुळे दुःखी होत असलेले पाहून धर्मेशच्या मनात सहजपणे करुणाभाव उमलत असे आणि तो त्यांना समजावू लागे. जेव्हा अमित त्याच्या बोलण्याची उपेक्षा करत असे तेव्हा स्वतः दुःखी होण्याऐवजी आपल्या मनामध्ये असा विचार करुन संतोष मानत असे की माझ्या

समजाविण्यामुळे अमितला खरी जाण येणार नाही, मी तर निमित्तमात्र आहे. जोपर्यंत त्याच्या ज्ञानपर्यायीमध्यें स्वत: समजण्याची योग्यता येणार नाही तोपर्यंत मीच काय पण भगवान देखील त्याला समजावू शकणार नाहीत.

अशी पक्की श्रद्धा झाल्यानंतरही सर्व जीवांना भूमिकेनुसार वारंवार समजाविण्याचा भाव आल्याशिवाय रहाणार नाही. धर्मेशला जेव्हा तसे विकल्प येत होते, तदनुसार तो मैत्रीच्या मोहामुळे अमितला सन्मार्गावर आणण्याचा प्रयत्न करीत राहिला. एकीकडे अमित देखील धर्मेशला धर्माच्या भानगडीतून सोडविण्याचा प्रयत्न करीत होता. ह्यालाच तर रागाची विचित्रता म्हणतात.

अमितचा धर्मेशला समजाविण्याचा हा प्रयत्न तोपर्यंत चालू राहिला जोपर्यंत तो भिन्नतेच्या मर्यादेपलीकडे गेला नाही. •



## ८

धर्मेश लहानपणापासूनच संसार-भोगांपासून उदास होता. त्यावेळी त्याला स्वत:ला देखील त्या उदासीनतेचे कारण माहित नव्हते; परंतु त्याचे मन मित्रांच्या घोळक्यात, राग-रंग करण्यात कधी रमत नव्हते, घरातील कोणत्या कामात लागत नसे. लौकिक अभ्यासाच्या बाबतीत देखील तो उदासीनच असे, त्यामुळे तो शाळेत अधिक शिकू देखील शकला नाही.

जरी त्याचे लौकिक शिक्षण मॅट्रीकपर्यंतच होऊ शकले होते; परंतु तो खूप बुद्धिमान होता, प्रतिभासंपन्नदेखील होता त्याच्यामध्ये जन्मजातच अशी बौद्धिक प्रतिभा होती, बाल्यावस्थेपासूनच ज्ञान-वैराग्याची काही अशी पर्यायगत योग्यता होती; जी त्याच्या बोलण्या-चालण्यामधून आणि व्यवहारातून स्पष्ट जाणवत होती. निश्चितपणेच हे सर्व त्याच्या पूर्व जन्मांच्या संस्काराचेच फळ असले पाहिजे, नाहीतर एवढ्याशा वयामध्ये हे सर्व कसे शक्य होते ?

आकर्षक चेहरा, गोरा रंग, सुडौल शरीर, धीर-वीर स्वभाववाला अशा असाधारण अंतर्बाह्य व्यक्तित्वाचा धनी धर्मेश एका व्यापाऱ्याचा मुलगा होता. त्याच्या वडिलांचा स्वत:चा व्यवसाय होता, मोठे दुकान होते, कारभार नीट चालत होता. म्हणून त्यांचे म्हणणे होते की - धर्मेशचे मन शाळेच्या अभ्यासात लागत नसेल तर न लागो, कोणाला नोकरी करावयाची आहे की ज्यासाठी पदवी-सर्टीफिकेट किंवा प्रमाणपत्र पाहिजे? वडिलोपार्जित दुकान आहे, त्यावर बसवून टाकूया दुकानात बसणे पसंत नसेल तर त्याच्या इच्छेप्रमाणे नवे दुकान घालून देऊ आणि त्याने काहीही केले नाही तरी देखील त्याला कोणतीही कमतरता पडणार नाही.

मोठा झाल्यावर धर्मेश दुकानावर बसू लागला, परंतु दुकानदारीमध्ये त्याचे मन रमेना. रमेलच कसे? कारण त्याचे तर भवितव्यच काही वेगळे होते.

धर्मेशच्या आईला चिंता वाटू लागली की शेवटी अशा तऱ्हेने राहून काम कसे चालेल ? उद्या लग्न तर होईलच, मुलंबाळं देखील होतील. ह्या सर्वांचा उदरनिर्वाह कसा होईल? अजूनही आमच्यामुळे ह्याला भाऊ-भावजया आता काही म्हणत नाहीत. परंतु त्यांच्या मनात तर येतच असेल नां ? आयुष्यभर भाऊ-भावजयींच्या भरवशावर त्यांच्यावर ओझे बनून तर राहता येणार नाही. भले ते देखील लहान भाऊ ह्या नात्याने प्रेमापोटी काही म्हणणार नाहीत; परंतु दुसऱ्याच्या आश्रयाने राहणे काही अभिमानाची गोष्ट तर नाही. सर्वांनी आत्मनिर्भर होऊन स्वावलंबी बनून राहिले पाहिजे.

हाच कुटुंबियांच्या चिंतेचा विषय होता. त्यांना काय माहित की धर्मेश तर खरा स्वावलंबी बनून जगणारा आहे. न केवळ स्वतः स्वावलंबी होईल; तर उलट जगातील जीवांना देखील खऱ्या स्वावलंबनाचा धडा शिकवेल. आपले जीवन सार्थक व सफल बनवेल. नाव तर फक्त आई-वडिलांच्या रुचिचे द्योतक असते. नाव ठेवण्याच्या समयी त्या बाळाला आपल्या नावाचे रहस्य किंवा महात्म्य थोडेच माहित असते? तरी देखील धर्मेशने 'यथा नाम तथा गुण' ह्या म्हणीला सार्थक केले.

धर्मेशच्या वडिलांनी आपल्या मनाला आणि कुटुंबातील लोकांना अशाप्रकारे समजाविण्याचा प्रयत्न केला की, काही हरकत नाही, जेव्हा लग्न होईल - डोक्यावर जबाबदारी येईल तेव्हा सर्व ठीक होईल. आता त्याचे वय ते किती आहे - अजून लहान तर आहे तो. लहानपणी अवखळपणा असतोच. ह्या वयामध्ये प्रत्येकजण कवि बनण्याच्या धुंदीमध्ये काव्य लिहून लिहून डायऱ्या भरत असतो, एखादा लेखक बनण्याच्या कैफामध्ये रात्र रात्र जागून कागदच्या कागद लिहिणे व फाडणे हेच काम करीत राहतो. प्रौढ होईपर्यंत ज्यांची रुचि कायम राहते, वाढत रहाते, तेच कवि किंवा लेखक बनतात. धर्मेशचे संत बनण्याचे हे स्वप्नदेखील असेच तात्पुरत्या काळाचे असण्याची शक्यता आहे. ही तर क्षणभंगुर भरती आलेली आहे. वेळ येताच आपोआप स्वतःच शांत होईल.

धर्मेश आता सज्ञान झाला होता. त्याने पंचवीस वर्षे पूर्ण केली होती. तरी आई-वडिलांना साठ वर्षाचा आपला मुलगा आठ वर्षाचा वाटत असतो - ह्या

मानसशास्त्रानुसार त्यांच्या दृष्टीने धर्मेश तर अजून छोटा बच्चाच होता. पुत्र प्रेमामुळे ते हा विचारच करु शकत नव्हते की धर्मेश आता प्रौढ (ॲडल्ट) आणि समजूतदार झाला आहे.

धर्मेशचे मन दिवसेंदिवस जगजंजाळापासून विरक्त-उदास होत चालले होते. त्यामुळे शेवटी त्याने ह्या जगजंजाळाला रामराम ठोकण्याचा निश्चयच केला होता. त्याला असे वाटू लागले होते की ह्या संसारपाशात अडकल्याने मला सत्याचा शोध घेणे शक्य होणार नाही; कारण ह्या कामात पूर्णपणे स्वतःला झोकून देण्याची आवश्यकता आहे. अशा विचारांमुळेच तो लग्नाच्या बेडीमध्ये अडकून आपली बौद्धिक शक्ति आणि वेळेचे विभाजन करु इच्छित नव्हता. दुसरीकडे त्याचे आई-वडिल लवकरात लवकर त्याचे लग्न उरकून त्याला गृहस्थ जीवनात प्रवेश देऊ इच्छित होते आणि स्वतःच्या जबाबदारीतून मुक्त होऊ इच्छित होते. त्यामुळे साहजिकच धर्मेशच्या लग्नासंबंधी चर्चा नेहमी चालत असे जी धर्मेशला बिलकुल पसंत नव्हती, त्याला जराही आवडत नसे. तरीदेखील तो आपल्या आई वडिलांना दुखवू इच्छित नसल्याने लग्न न करण्याचा आपला मनोदय जाहिर करण्याचे साहस करु शकला नाही.

सर्व दृष्टिकोनातून चांगल्या असलेल्या एकाहून एक चांगल्या घरातून मागण्या आल्या. परंतु आई वडिलांनी काय करावे? धर्मेशने स्पष्टपणे होय म्हटल्याशिवाय आश्वासनसुद्धा देता येत नव्हते आणि नकार देणे त्यांना योग्य वाटत नव्हते-त्यामुळे ते टाळाटाळच करीत होते. परंतु त्यांना खात्री होती की ही गोष्ट फार दिवस चालणारी नाही.

धर्मेश सुद्धा शेवटी अशातऱ्हेची टाळाटाळ किती दिवस करणार ? म्हणून आता त्याने लग्नाला स्पष्टपणे नकार देण्याचे ठरविले आणि मनात संकल्प केला की आता स्पष्टपणे सांगेन की, मी लग्न करु इच्छित नाही.

फिरुन त्याला विचार आला - काय एवढे सांगण्यानेच ते ऐकणार आहेत ? ते देखील ह्याबाबतीत खूप हुषार आहेत. ते मला समजावतील, म्हणतील - बेटा तीर्थंकरांनीसुद्धा प्रथम लग्न केले, मुलं झाली, कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळल्या,

समाजसेवा केली, राज्यकारभार सांभाळला; तदनंतर त्यांनी दिक्षा घेतली, स्व-पर कल्याण केले - हाच राजमार्ग आहे. आत्मकल्याण करण्यासाठी आडकाठी कोण करीत आहे ? परंतु त्याचासुद्धा एक काळ असतो; आता तुझे वय ते काय आहे ? तीर्थंकरांचे जीवनच तर तुझा आदर्श आहे; काय तू त्यांच्यापेक्षाही पुढे जाऊ इच्छितोस ?..... तेव्हा मी काय करावे, काय सांगावे त्यांना?

एक क्षणभर थांबून धर्मेश पुन्हा विचार करु लागला - अरे, शेवटी मी पण त्यांचाच बच्चा आहे. मी त्यांना अशात्ऱ्हेने समजावेन की, तीर्थंकरांसारखे सामर्थ्य माझ्यामध्ये कोठून असणार ? त्यांच्यामध्ये अमर्यादित शक्ति होती, ते सर्व करु शकत होते, माझ्याकडून तसे होणे शक्य नाही. मी प्रथम तीर्थंकर भगवान ऋषभदेवाच्या तीर्थकाळाचा महामानव नाही परंतु चोविसाव्या तीर्थंकर भगवान महावीराच्या तीर्थकाळाचा एक क्षुद्र मनुष्य आहे, म्हणून मी तीर्थंकर महावीरांनाच आपला आदर्श कां न मानावा - जेव्हा त्यांनी देखील लग्न केले नव्हते तर मी देखील कां करावे ? ह्या काळात आयुष्याची देखील काही गॅरंटी नाही; म्हणून आपण माझ्या मर्जीवर सर्व सोडावे आणि मला मंगल आशीर्वाद द्यावा की मी माझ्या कार्यात यशस्वी व्हावे.

माझे एवढे सांगणे ऐकून ते निश्चितच माझे ऐकतील - अशी मला पूर्ण खात्री आहे.

शेवटी त्याने आपल्या संकल्पाप्रमाणे आई वडिलांची खात्री केली की त्यांनी काहीही केले तरी तो न लग्न करणार आहे आणि न धंदापाणी!

अशा प्रकारे जेव्हा धर्मेशच्या आई-वडिलांना ही खात्री झाली कि धर्मेश आपल्या इराद्यामध्ये पक्का आहे, त्याच्यावर आपल्या ओरडण्याचा किंवा रडण्याचा काही परिणाम होणार नाही तेव्हा ते साम्यभाव धारण करुन गप्प बसले. हळु हळु तत्त्वज्ञानाच्या आधारे त्यांनी आपल्या मनाला धर्मेशच्या भावनानुकूल वळविले. नंतर जोपर्यंत ते जिंवत होते तोपर्यंत तन-मन-धनाने त्यांनी धर्मेशला सहकार्यच केले. धर्मेश देखील आपले काम करीत असताना श्रावणबाळाप्रमाणे आपल्या आई-वडिलांची सेवा करीत राहिला. •

झाली. तिला आपल्या चारीबाजूला अनिष्ट... अनिष्ट... अनिष्ट... दृश्येंच दिसू लागली, अनिष्ट...अनिष्ट... अनिष्ट... स्वरच ऐकू येऊ लागले.

तिच्या तोंडातून सारखे असेच शब्द येऊ लागले - "आता मी काय करु? कोठे जाऊ? पहाडासारखे मोठे आयुष्य मी कसे पार करु ? हे दररोज पिऊ लागले आहेत, विवेकशून्य होऊन वेड्यासारखे पीत आहेत, अविचाराने हिंसक होऊन आक्रमक-कामोत्तेजित होत आहेत आणि न जाणो आणखीन काय काय करणार आहेत?

ह्यामुळे ह्यांची तब्येत खराब होणारच आहे, मानसिक संतुलन देखील कितपत ठेवणार आहेत ? काही सांगता येत नाही. अशा परिस्थितीमध्ये न ह्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवला जाऊ शकतो न व्यवहारावर भरवसा! काय भरवसा केव्हा काय करतील ते ? मद्यप्याची समाजात काय अब्रू असते, त्याची कदर देखील कोण करतो! दारुच्या नशेमध्ये मनुष्य विवेकशून्य तर होतोच, त्याच्या वासना देखील बळावतात, मग न स्वस्त्री- परस्त्रीचा विवेक, न इज्जत-अब्रूची पर्वा!

हे भगवान! हे चांगले झाले नाही माझ्याबाबतीत! अशा परिस्थितीत ह्यांच्या सोबत मी एक दिवस देखील घालवू शकत नाही. आता मी करावे तरी काय? काही उपाय सुचत नाही."

मनाच्या एका कोपऱ्यातून आवाज आला - होय, एक रस्ता आहे - घटस्फोट! मनाच्या दुसऱ्या कोपऱ्यातून आवाज आला - काय म्हटले घटस्फोट ? मनातल्या विवेकाने समजाविले - घटस्फोटाचा कधी विचारही करु नकोस. घटस्फोटीतेचे आयुष्य काय आयुष्य असते ? त्यापेक्षा मरण बरे. घटस्फोटित स्त्रियांना पाहून कामी पुरुषांच्या तोंडातून कुत्र्यांप्रमाणे लाळ टपकत असते. ते त्यांना ओरबाडायला - चावायला बघत फिरत असतात-ह्याची कल्पनादेखील केली आहेस का कधी? घटस्फोटित तरुणींच्या मांसल शरीराला पाहून जे मवाली चोहीकडे गिधाडासारखे भटकत असतात, त्यांच्या पापी दृष्टितून बचावून निघणे किती कठीण आहे ह्याचा विचार तरी कधी केला आहेस ?

अरे! स्त्री शारीरिक व मानसिक दोन्ही दृष्टिने किती अबला आहे, ह्याची सुद्धा थोडी कल्पना कर. थोड्या धैर्याने आणि विवेकाने काम घे.

सुनंदा विचार करु लागली – आता मरणाशिवाय दुसरे गत्यंतर नाही, परंतु गोष्ट फक्त माझ्यापुरती मर्यादित असती तर गोष्ट वेगळी, परंतु आता ह्याचे पोर माझ्या पोटात आहे. अशा परिस्थितीमध्ये न मी मरु शकते आणि न जगूही शकते.

हे प्रभो! जर मी मेले तर आत्महत्येबरोबर एक संज्ञी पंचेंद्रिय मनुष्याच्या हत्येचे महापाप डोक्यावर घेऊन मरावे लागेल, जे साक्षात नरकगतीचे कारण आहे आणि जर जगावे तर अशा परिस्थितीमध्ये कशी जगू मी ?

लोक असे म्हणतात – घाबरु नकोस 'आशेवर सारे जग जगते'– त्यांची ही गोष्ट खरी असू शकेल आणि ह्याच आशेवर आजपर्यंत जगत होते नाहीतर मी माहेरी असतानाच मेले असते.

वाटले होते लग्न होईल, सासरी जाईन, तेथील स्वर्गीय वातावरणात हे सर्व विसरुन जाईन. परंतु ती सर्व स्वप्नं धुळीत मिळाली. एक नवी निराशेची खाई सामोरी आली ज्यामुळे सफल जीवनयात्रेचा सगळा रस्ता कुंठित झाला. आता कोणाची आशा करु? जर मुलं सुद्धा ह्यांच्यासारखी निघाली तर? शेवटी अपत्यं तर त्यांचीच आहेत नां ?

हाय! माझे पुरे आयुष्यच बरबाद झाले–माझे आयुष्य धुळीस मिळाले हाय! हाय!! प्रभो!!! स्त्री जन्माची कशी ही विटंबना ?

अशातऱ्हेने पुटपुटत ती निपचित पडली, झोपली. अधून मधून जागी झाल्या सारखी झाली तर पुन्हा तिची बडबड सुरु होत होती. •

## १०

सुनंदाची धाकटी बहीण सुनयना खरोखर सुनयना होती. हरिणांच्या डोळ्यांप्रमाणे टपोरे काळे कुळकुळीत डोळे, पोपटाप्रमाणे टोकदार नाक, जवाकुसुमासारखे लाल बुंद ओठ, मोत्यासारखे दात, कंचनवर्णाची काया, नितंबापर्यंत लटकणारे काळे कुरळे केस, हसरा-चमकणारा चेहरा ज्याला पाहून चंद्रसुद्धा लाजावा.

एकीकडे भोळ्या-भाबड्या सुनयनाचे बाह्य रूप एवढे चित्ताकर्षक होते तर दुसरीकडे त्या बिचारीला लहानपणापासून मानसिक त्रास होता.

पुण्य-पापाचा कसा विचित्र संयोग आहे पहा! हे रूप - हे लावण्य खरोखर काही फार मोठी गर्व करण्यासारखी गोष्ट नाही. एवढे आणि असे पुण्य तर पशुपक्षीदेखील कमावतात, बागेतील फुलंदेखील कमावतात, ते देखील दिसण्यात अति सुंदर दिसतात; पण ते किती सुखी आहेत ?

बिचाऱ्या सुनयनाला लहानपणापासून अशा पापाचा उदय होता की ती लहानपणी बारीक सारीक गोष्टींकरिता तासन् तास रडत असे. रडल्यामुळे तिचे डोळे लालबुंद होऊन जात, गळा दाटून येई, चेहऱ्यावरील तेज काळवंडून जात असे. अश्रु ढाळता ढाळता ती मूर्च्छित होऊन जाई. जागी होताच परत रडणे चालू होत असे, जणु ती स्वप्नातही रडत असावी. नाहीतर जागी झाली असता ती कां रडली असती बरे?

तिच्या आईला तिचे हे रडणे पहावत नव्हते-मुलीच्या दुःखाने तीदेखील दुःखी होत असे; परंतु सबंध दिवसभर तिची मनधरणी कोण करणार ? काय करणार तिला देखील घरकामामुळे वेळ तर मिळायला पाहिजे नां ? वडिलांना प्रथम तर आपल्या कामधंद्यापासून फुरसत मिळत नसे, शिवाय पिणारा आणि स्वभावाने बेफिकीर-लापरवासुद्धा! तो काय समजणार आपल्या अपत्याबाबतीतली जबाबदारी आणि आपले कर्तव्य!

आई कधी कधी कंटाळून म्हणत असे – "कदाचित हिच्या नशीबात आयुष्यभर रडणेच लिहले आहे. कारटी केवढी सुंदर दिसते? कसे छान टपोरे डोळे आहेत, परंतु असे वाटते की, रडून रडून ही स्वत:चे डोळे आणि तब्येत दोन्ही खराब करुन घेईल."

सुनयनाचे वडिल आपल्या पत्नीला त्रस्त झालेली पाहून कधी एखादे वेळेस दिलासा देत म्हणत "मुलं आहेत, कधी रडतात तर कधी हसतात, कधी खेळतात-मुलांचा स्वभावच असा असतो. त्यांची अधिक काळजी करण्याचे कारण नाही."

जेव्हा ती रडायचे थांबतच नसे त्यावेळी सुनयनाच्या आईला रहावत नसे तेव्हा ती सुनयनाची समजूत घालून तिला रडण्याचे कारण विचारत असे, ती रडता रडता बोबड्या भाषेत म्हणायची – "कोणीतरी माझ्या बाहुल्याचे डोळे फोडले, पाय तोडले आहेत, त्याच्या पोटात चाकू खुपसला आहे, त्याला मोडून तोडून फेकून दिले आहे तर मग मी रडू नाही तर काय करु? सर्व विध्वंस केला आहे. माझा तर सर्व खेळच खलास केला आहे कुणीतरी."

भले लहान मुलं-मुली आपल्या मनातील भावांना भाषेत सांगू शकले नाहीत, वाणीतून शब्दांद्वारे सांगू शकले नाहीत, परंतु अनुभव तर त्यांनादेखील होत असतो. शास्त्रीय भाषेत सांगावयाचे तर सुनयनाला त्यावेळी लहानपणीदेखील इष्टवियोग आर्तध्यान होत होते. ती आपल्या आवडत्या बाहुल्याच्या तुटण्या-फुटण्यामुळे त्याच्या वियोगामध्ये ओक्साबोक्सी रडत असे, बाहुल्यामध्ये तिने अज्ञान भावाने इष्ट कल्पना केली होती, त्याचा वियोग तिला असह्य वाटत असे. त्यामुळे तिचे सततचे रडणे बंद होत नसे.

त्यावेळी त्या नादान बालिकेला हे माहीत नव्हते की, माझे हे रडणे आणि दु:खी होणे आर्तध्यान आहे, जे तिर्यंचगतिच्या बंधाचे कारण आहे. त्या छोट्या मुलीचे काय सांगावे ? हे तर स्वत:ला समजूतदार समजणाऱ्या आम्हा-तुम्हालाही आजपर्यंत पत्ता नाही की आपण अजाणपणामध्ये कसे कसे पापभाव करीत आहोत आणि करीत होतो.

ध्यानात ठेवावे, कोणाला माहित होवो अथवा न होवो, दुसऱ्यांना देखील माहित होवो किंवा न होवो; परंतु कर्मबंधनापासून कोणी वाचू शकत नाही. भले एखादे लहान मूल असो किंवा वृद्ध माणूस, कर्म आणि कार्माणवर्गणा कोणालाही सोडत नाहीत. कर्माचे बंधन तर सर्वांना आपापल्या भावानुसारच होते, कर्माचा आणि रागादि भावांचा असाच सहज संबंध आहे.

सुनयनाला सतत रडताना पाहून तिची आई तिला चिडून म्हणे -

"बस्स एवढ्याशा गोष्टीवरुन रडून रडून घर डोक्यावर घेतले आहे कार्टीने. अशी रडत आहे की जणु हिची आईच मेली आहे. अरे, बाहुला तुटला-फुटला, फुगा फुटला तर त्यात काय मोठे? खेळणी तर आहेत ह्यामध्ये रडण्याचे काय काम आहे ? दुसरा बाहुला आणून देऊ त्याच्याशी खेळ."

आईचे म्हणणे ऐकून सुनयना नाक-डोळे पुसत ओरडे - "नको मला दुसरा नको, मला तोच पाहिजे; त्याच्यासारखा दुसरा नको तोच पाहिजे. मी तर त्याच्याशी लग्न केले आहे. तुमच्या दृष्टिमध्ये तो फक्त बाहुला आहे परंतु तो माझा सर्व काही आहे. एकदा शेजारणीला तूच तर म्हणाली होतीस की, आमच्या मुलींची लग्नं वारंवार करीत नसतात. जर एखादीचा नवरा मेला तर तिला एकटीला आयुष्य कंठावे लागते." असे म्हणत पुन्हा ती रडू लागे.

सुनयनाचे भाबडे बोल ऐकून आणि तिला रडताना पाहून तिच्या आईला खूप वाईट वाटे व डोळयात पाणी येई तरी देखील लटके हसत ती सुनयनाला म्हणे - "बाळे! हा तर बाहुला-बाहुलीचा खेळ आहे, हे खरोखरचे लग्न थोडेच आहे ? तुझ्यासारखा असा खेळ तर आम्हीसुद्धा खेळत होतो."

आईच्या समजावण्याने सुनयना बाहेरुन तर शांत रहायची परंतु मनातल्या मनात ती कुढत रहायची. कारण तशा अवस्थेतही तिला आपले सर्वस्व लुटले जात आहे असे वाटत होते. त्या वेळेस ती वयाने लहान होती परंतु आत्मा तर जन्मरहित असतो नां ? म्हणून पूर्व भवातील संस्कार देखील जन्मोजन्मी बरोबर येतात. तसेच कोणत्या ना कोणत्या स्वरुपाने भविष्याशी देखील वर्तमानकाळ जोडलेलाच असतो. त्या पूर्वजन्माच्या संस्कारवश सुनयना बालपणातसुद्धा

इष्टवियोग जनित मानसिक पीडेला मनातल्या मनात सहन करीत होती; कारण तिच्या भोळया-भाबड्या विचाराची पर्वा तिचे कुटुंबीय करत नव्हते, उलट तिची थट्टा मस्करीच करीत होते.

त्यांना मानसशास्त्र आणि बालमानसशास्त्राची काय माहिती असणार? दुसऱ्यांचे हसे करणे जेवढे सोपे आहे, त्याचे खरे उत्तर शोधून संतुष्ट करणे तेवढेच कठीण आहे.

जर सुनयनाचा तो खेळ खरोखरीचा खेळ होता तर आपण सर्वजण देखील दुनियेमध्ये तसा खेळच तर खेळत आहोत; मग आपणाला सुद्धा ह्या अनुकूल-प्रतिकूल परिस्थितींना खेळच समजायला पाहिजे. आपणसुद्धा लहान मुलांसारखे का रडतो-आक्रंदन करतो - ओरडतो, बोंबाबोंब करतो ? किंवा आनंदित होतो, खुषी मनवितो, हर्ष-विषाद करतो ? आणि असे करुन का पुण्य-पाप बांधत असतो ?

तत्त्वज्ञान न समजणाऱ्या भोळ्या भाबड्या मायेच्या मूर्तीला-आईला काय माहित असणार की तिची मुलगी सुनयना बालपणी दहावीस रुपयांच्या खेळण्याच्या कारणाने नव्हे तर आपले सर्वस्व लुटले गेले अशा समजुतीने रडत असते. अजूनही जेव्हा जेव्हा त्या बाहुल्याच्या आठवणी तिच्या मनी दाटून येत, तेव्हा तेव्हा तिच्या अंतरंगात अधिक प्रेम उत्पन्न होऊन ती ओक्साबोक्सी रडत असे. कारण तिच्याने इष्टवियोग जनित असह्य मानसिक पीडा सहन होत नसे.

ही एक मनुष्याची कमजोरी आहे, मानसिक रोग आहे; ज्याचा तत्त्वज्ञानरुपी औषधाखेरीज अन्य दुसरा कोणता उपचार नाही. तत्त्वज्ञानशून्य बिचाऱ्या बालिकेला लहानपणी काय माहित होते की, विश्वाची वस्तु-व्यवस्था काय आहे आणि जीवाच्या कोणत्या परिणामाचे काय काय फळ भोगावे लागते ते ? ह्या संसारात अज्ञानी मोही जीवांच्या संयोगामध्ये आलेल्या वस्तु तुटण्या-फुटण्या किंवा हरविल्याने, त्या वस्तुच्या अभावामध्ये शोक केल्याने काय काय नुकसान होते, कोणता कोणता पापबंध होतो ते ?

भले एखादे मूल असो वा वृद्ध, ज्ञानी असो वा अज्ञानी, पुरुष असो वा स्त्री; कर्म किंवा कार्माणवर्गणा तर सर्वांना योग आणि कषायानुसार सतत आस्त्रवित होतात आणि बांधली जातात. कोणाच्या वयाचा काही विचार करीत नाहीत आणि कोणी समजुतदार किंवा बेजबाबदार ह्यामध्येदेखील फरक करीत नाहीत. कार्माणवर्गणा तर सर्वांना मिथ्यात्व आणि कषायभावानुसार बांधली जाते. कषायांच्या हीनाधिकतेनुसार वेळेवर सर्वांना आपले फळ देखील देते. म्हणून तर म्हटले जाते की बाल्यावस्थेपासून ह्याची जाणीव (समज) असणे जरूरी आहे की, कोणकोणत्या भावां (परिणामां) मुळे कशाप्रकारचा कर्मबंध होतो आणि त्याचे फळ काय मिळते ?

जसे पैसे कमविताना नफा-नुकसानीचे ज्ञान होण्याकरिता घेणे-देणे, आवक-जावक, जमा-खर्चाचा हिशोब वगैरेची जाणकारी असणे आवश्यक असते; त्याप्रमाणे धर्म-अधर्माचे खरेखुरे ज्ञान असणे आवश्यक आहे. नाहीतर ज्याप्रमाणे धंद्यामध्ये बेजबाबदार पणामुळे दिवाळे वाजते, त्याप्रमाणे धर्माच्या क्षेत्रामध्ये धर्म अधर्माची जाण नसल्याने अधर्मालाच धर्म समजून करीत राहिल्याने शेवटी निगोदामध्ये जावे लागते.

धर्मेशला ह्या गोष्टी नीट माहित होत्या. म्हणून तो असा विचार करु लागला की अमितची पत्नी सुनंदा आणि तिची छोटी बहीण सुनयना, ज्या रात्रंदिवस आर्तध्यानातच बुडलेल्या असतात त्याना सत्य गोष्टींचे ज्ञान करविणे अत्यंत आवश्यक आहे. आता त्यांना काय माहित असणार की, पूर्वी कधी असे चुकीचे परिणाम केले असतील ज्याचे फळ आता भोगावे लागत आहे ते आणि आतादेखील अशा परिस्थितीमध्ये हा दुर्लभ मनुष्यभव निघून गेला तर मग अनंतकाळापर्यंत ह्या भवसागरामध्ये गोते खावे लागतील. म्हणून त्यांना एकदा का होईना सन्मार्ग दाखविला पाहिजे. तरी देखील जर त्यांची समज अमित सारखीच राहिली तर त्यांचे ते जाणोत. मी तर आपले काम करीनच. असा संकल्प करुन धर्मेश त्यांना सन्मार्ग कसा दाखवावा ह्याचा आराखडा तयार करण्यात गुंतला.

•

# ११

एका बाजूला सुनयनेचे अप्सरेप्रमाणे अकृत्रिम नैसर्गिक लावण्य आणि दुसरीकडे अशी दयनीय, दु:खद प्रतिकूल कौटुंबिक परिस्थिती ज्यात पाहून दुष्ट राक्षसाचे हृदय देखील पाघळेल.

कसा विचित्र खेळ आहे ह्या कर्म आणि तज्जन्य औदयिक भावांचा ? परंतु ही काही नवी गोष्ट नाही. पुराणपुरुष श्रीपाल ह्याचे उदाहरण आहे. ते तद्‌भव मोक्षगामी कोटिभट होते परंतु त्यांनाच कुष्ठरोगाने दु:खित होऊन राज्यकारभारावरुन काढून टाकल्याने निर्जन जंगलामध्ये भटकावे लागले आणि दारोदारी ठोकरा खाव्या लागल्या हे सर्व कर्मांची विचित्रताच सिद्ध करतात.

सर्वगुणसंपन्न असूनदेखील सुनयनाचे लहानपण रडत रडतच गेले होते, तारुण्यदेखील आशा-निराशारुपाने देहाच्या झोक्यामध्ये झोके घेण्यातच गेल्याने व्याकुळतेमध्येच गेले. ही देखील कर्मांचीच विचित्रता आहे.

पिढ्यान् पिढ्याधनिक असून देखील दुर्व्यसनामध्ये लिप्त झालेले वडील, सर्व दृष्टिने अनिष्ट क्लेषदायक संयोगाने घेरलेली मोठी बहिण सुनंदा, गायीसमान अत्यंत भोळी-भाबडी, हीन-दीन मायेची मूर्ती आई; ज्याचे काही निश्चित भविष्य नाही असा अवयस्क छोटा भाऊ - अशा प्रतिकूल अवस्थांमध्ये सुनयनाला कोणाचा न आसरा होता ना संरक्षण.

'स्त्री जन्मा ही तुझी कहाणी' ह्या म्हणीची आठवण काढून काढून उसासे टाकणारी सुनयना सदैव साशंक, भ्यालेल्या हरिणीप्रमाणे आपला आश्रय शोधत इतरत्र भटकत आपले वाईट दिवस घालवित होती.

जेव्हा पापाचा उदय होतो तेव्हा परिस्थिती बदलण्यास वेळ लागत नाही. ज्या गोष्टी आपल्या अभिमानाचे कारण आहेत, सुखाचे निमित्त असतात, त्याच गोष्टी गळ्याचा फास बनतात.

सुनयनेचे सौंदर्य ज्याच्यावर तिच्या आई वडिलांना व इतरांना अभिमान वाटत होता, आज तेच सौंदर्य तिच्या करिता धर्मसंकट बनले होते.

व्यसनापायी तिच्या वडिलांची सामाजिक प्रतिष्ठा धुळीस मिळाली होती आणि तिचा प्रभाव न राहिल्याने तसेच वाईट लोकांच्या वाईट नजरांपासून स्वत:ला वाचविता वाचविता सुनयना चिंतातुर आणि भयाने ग्रस्त झाली होती. आपल्या शीलाच्या सुरक्षिततेमध्ये दक्ष सुनयना आपल्या सुदैवाची प्रतिक्षा करीत होती.

ती विचार करे – मुलांनी ज्या कुळात जन्म घेतला आहे त्यांना पूर्ण आयुष्य तेथेच घालवावे लागते; परंतु मुली ह्याबाबतीत सुदैवी असतात. त्यांना आयुष्यात दोन वेळा भाग्योदयाची संधी मिळत असते. एकदा तेव्हा, जेव्हा ती एखाद्या मोठ्यांच्या घरामध्ये जन्मते. कदाचित दुर्दैवाने एखाद्या सर्वसामान्याच्या घरी जन्मली असता पुन्हा भाग्योदयाची संधी तेव्हा मिळते, जेव्हा तिचा विवाह होतो, एखाद्या मोठ्या घरची सून होते.

माझी पहिली संधी तर वाया गेली. मोठ्या घरी जन्म घेऊन सुद्धा मला त्याचा फायदा झाला नाही. माझा जन्म होताच वडिल कुसंगतिमध्ये अडकले. हळु हळु एक एक व्यसनाने घेरत गेले. वीस वर्षांमध्ये करोडपतिपासून रोडपति बनले, स्वर्गासारख्या घरातील लोक रस्त्यावर येऊन उभारले.

आता दुसरी संधी बाकी आहे. परंतु ही आशा सुद्धा निराशेसारखीच वाटते. ह्यामध्येसुद्धा बहुतांशी निराशाच हाती येणार आहे कारण हुंडारुपी राक्षस ह्या शक्यतेवर पाणी फिरवेल असे वाटते.

सुनयनेचे असा विचार करणे चुकीचेही नव्हते. कारण भले ती सर्वगुण संपन्न होती, पण तिच्या गुणांनी न तर श्रीमंतांचे पोट भरणार होते ना पेटी ! दुसरी गोष्ट म्हणजे पैसेवाल्यांना प्रतिष्ठेचा प्रश्नदेखील आडवा येतो.

अनेक ठिकाणांहून विचारणा झाली परंतु ह्याच कारणामुळे आतापर्यंत कोठेच शेवट आला नाही – कोठे जमले नाही. सर्वांचे हेच म्हणणे असे – मुलगी सुंदर आहे, सर्वगुणसंपन्नसुद्धा आहे, हे सर्व ठीक पण...

वारंवार योग्य-अयोग्य सर्व प्रकारच्या लोकांसमोर आपले प्रदर्शन करता करता, बिनबुडाच्या आलतू-फालतू - खोट्यानाट्या प्रश्नांची उत्तरे देता देता तसेच अपमान गुपचूप गिळून बिचारी सुनयना एवढी वैतागली होती की अशा दु:खद जगण्यापेक्षा मरण परवडले असे तिला वाटू लागले. परंतु काय विचार करुन ती आपले जीवन पुढे रेटीत होती हे काही माहित नव्हते.

तिने एकदा प्रवचनामध्ये ऐकले होते की, आत्मघातकी महापापी- म्हणजेच आत्महत्या करणारा महापापी असतो. अशाला कुगतिच मिळते, त्यामुळे तिने निश्चय केला होता की जी पापकर्म मी बांधली आहेत, कमावली आहेत, त्यांना भोगावे तर लागेलच; मग ह्याच भवात का न भोगावेत ? वेळे अगोदर मरण्याने ही कर्म माझा पिच्छा तर सोडणार नाहीत-म्हणून बरे-वाईट जे काही होत आहे, त्याला फक्त जाणत-पहात रहावे. त्यामध्ये तन्मय होऊ नये-असेच काहीतरी तिने प्रवचनात ऐकले होते.

असे म्हटले जाते की, प्रत्येकाचे एक ना एक वेळ चांगले दिवस येतात, तसेच आशेवर तर जग जगते - अशा तऱ्हेने आशावादी दृष्टिकोणाने व आत्महत्येच्या पापाच्या भयाने सुनयना आत्महत्येच्या पापापासून दूर राहिली.

ज्याप्रकारे हाताची पाची बोटे सारखी नसतात. त्याप्रमाणे सर्व माणसे एक सारखी नसतात. एक तरुण असा देखील होता, जो सुशिक्षित, प्रतिभाशाली, आकर्षक व्यक्तिमत्वाचा आणि व्यसनांपासून अत्यंत दूर असलेला असा होता. पैशाची लालसा आणि आवश्यकता कोणाला नसते ? परंतु एखाद्याच्या मजबुरीचा गैरफायदा घेण्याची त्याची वृत्ती नव्हती. पहिल्या ओळखीतच तो सुनयनेच्या बाह्य व्यक्तिमत्वावर आकर्षित झाला होता. हळु हळु ओळख प्रेमामध्ये बदलत गेली. सुनयनेचा सरळ निष्कपट स्वभाव, सोज्वळता आणि प्रतिकूल परिस्थितीमध्ये सहनशीलता वगैरे गुणांनी तो भारावून गेला. ह्या सर्व गोष्टींमुळेच ती त्याच्या मनात ठसली.

जर त्याने मनात आणले असते तर एखाद्या कोणत्याही मोठ्यांच्या घरातून त्याला दोन चार लाख रुपये मिळवणे सहज शक्य होते; परंतु त्याच्या वृत्तीत

ही गोष्ट नव्हती. सुनयनासुद्धा त्याला पाहताच, नकळत त्याच्याकडे सहज आकर्षित होत गेली. जणु त्याच्याबरोबर तिचे जन्मोजन्मीचे नाते असावे.

त्या तरुणाच्या वडिलांनी देखील आंतरजातीय संबंध असूनदेखील आपल्या मुलाच्या सुदर्शनच्या सद्भावनांना समजून घेऊन घरातील इतरांचा असहकार आणि आंतरजातीय विवाहाच्या विरोधाची पर्वा न करता सुनयनाला आपली सून बनविली.

सुदर्शनचे बाह्य रूप तर सु-दर्शनच होते, तो सदाचारी होता आणि श्रीमंत ही होता. सुदर्शनसारखा पति लाभल्याने सुनयना मनातून सुखावली होती, परंतु अचानक तिच्या स्मृति पटलावर लहानपणातील ती आठवण उमटली की जेव्हा खेळामध्ये तिचा बाहुला फाडून तोडून टाकला होता-त्यामुळे तिचे मन खिन्नतेने व्याकुळ झाले. परंतु लगेचच तिने आपल्या मनाला समजावले की, अगं तो तर बाहुला-बाहुलीचा खेळ होता, खेळामध्ये असे काहीतरी होतेच. त्यात वाईट वाटायचे काही कारण नाही. असा विचार करुन तिने स्वत:ला सावरले. त्यावेळी ती खेळालाच खरोखरीचे लग्न समजत होती, त्यामुळे त्यावेळचे रडणे साहजिकच होते. नवरा दुर्घटनेत अडकावा आणि नवरीच्या डोळ्यात अश्रु येऊ नयेत - असे कधी होऊ शकते काय ?

सुदर्शन तर स्वभावानेच धार्मिक प्रवृत्तिचा होता, सुनयना देखील सुस्वभावी होती, भारतीय स्त्रीचे सर्व गुण तिच्यामध्ये होते. पतीची सावली बनून राहणेच ती आपला धर्म मानत होती.

सुदर्शनने सल्ला म्हणून सुनयनाला सांगितले - "गृहस्थ जीवनात प्रवेश करण्यापूर्वी सर्वात प्रथम एखाद्या अशा पवित्र तीर्थाच्या वंदनेसाठी कार्यक्रम कां न आखावा की ज्यायोगे 'एका दगडात दोन पक्षी मारले' जावेत? तीर्थवंदना सुद्धा होईल आणि त्याबरोबर फिरुन येणेही होईल."

सुनयनेने सुदर्शनच्या म्हणण्याला दुजोरा देत म्हटले - "आपण म्हणता ते अगदी बरोबर आहे. आपला विचार फारच चांगला आहे. 'हनीमून'च्या नावाखाली निव्वळ मौज मजा आणि स्वैर भटकून येण्यात काय फायदा ?"

सुदर्शन म्हणाला – "मला मनात असे वाटत होते की, तुझ्या मैत्रिणी हे ऐकून कोठे तुझे हंसे करतील की ह्या युगामध्ये हा सतयुगातला अवतार कोठून झाला की जो हनीमूनच्या ऐवजी तीर्थयात्रा करण्यास निघाला आहे. तीर्थयात्रा काय आता करण्याची वेळ आहे? ती तर म्हातारपणाची कामे आहेत."

सुनयाने सुदर्शनाच्या मनातील संकोच दूर करीत म्हटले – "असे काही नाही, आणि शिवाय बोलणाऱ्यांना काय ? ज्याला जे वाटेल ते बोलतात. आपण दुसऱ्यांच्या बोलण्याची पर्वा का करावी ? आपण काही चुकीची गोष्ट तर करीत नाही की ज्यामुळे संकोच वाटावा. धर्म करण्याचे काही विशिष्ट असे वय नसते. धर्म तर जीवनाचे एक अभिन्न अंग असले पाहिजे. काय माहित केव्हा काय होईल ते ? शेवटी धर्मच आपला खरा साथीदार आहे."

सुनयनेचे एवढे समजुतदारीचे बोलणे ऐकून सुदर्शन मनातून खूप सुखावला. त्याला वाटू लागले सुनयना खरोखरच एक आदर्श भारतीय धर्मपत्नी आहे म्हणूनच तर धर्मकार्यात साथ देत आहे.

सुनयना म्हणाली – "तुम्ही काही चिंता करु नका, कोणी काही म्हणणार नाही. कोणी म्हटले तरी आपण सांगू – हाच आमचा हनीमून आहे, दांपत्य जीवनाचा शुभारंभ देखील शुभकार्यानेच होणे योग्य आहे."

त्याकरिता त्यांनी दक्षिण भारताच्या तीर्थक्षेत्री जाण्याचे ठरविले. एक आठवड्याची तीर्थयात्रा आनंदाने झाली. तेथून परतताना धर्मस्थलच्या उंच-सखल घाटाचा आनंद लुटत, चोहीकडे हिरवीगार दृष्ये पहात, भगवान बाहुबलीची स्तुतीगीत म्हणत कारमध्ये मोठ्या मजेत येत होते, एवढ्यात अचानक कारचे ब्रेक फेल झाले. शोफरने कार सांभाळण्याचे बरेच प्रयत्न केले, परंतु तो तिच्यावर काबू ठेवू शकला नाही, 'आउट ऑफ कंट्रोल' झाली. त्यांच्या लक्षात आले की आता भगवानाचे नाव घेण्यापलिकडे दुसरा कोणता उपाय उरला नाही...

एकाएक सुदर्शनला सुनयनेचे वाक्य आठवले, जे ती आत्ताच आठ दिवसापूर्वी म्हणाली होती धर्म करण्याचे काही विशिष्ट असे वय नसते, धर्म

तर जीवनाचे एक अभिन्न अंग असले पाहिजे. काय माहित केव्हा काय होईल ते? अशा वेळेस ते दोघे चटकन ध्यानमुद्रेमध्ये मनातल्या मनात णमोकार मंत्र म्हणू लागले.

पाहता पाहताच कार एका झाडावर आदळली आणि वळण घेऊन एका खोल दरीत कोसळणार एवढ्यात एक दरवाजा उघडला आणि सुनयना बाहेर फेकली गेल्यामुळे पडणाऱ्या गाडीतून बाहेर पडून एका झाडाच्या फांदीला अडकली व गाडीसह सुदर्शन दरीत कोसळल्याने त्याचा अंत झाला.



नशीबाचा खेळ पहा, एकाच सीटवर एकत्र बसलेल्या दोघांपैकी सुनयनाला साधासुधा मार लागून ती बचावली आणि सुदर्शनचे पडणे आणि मरणे एकदमच झाले- पहा ही कर्मांची कशी विचित्रता आहे! ज्याचे आयुष्य बाकी आहे त्याला कोणी मारु शकत नाही तथा ज्याच्या आयुकर्माचे निषेक समाप्त झाले आहेत, त्याला कोणी वाचवू शकत नाही.

सुनयनेच्या दुर्दैवाचा शेवट अजूनही आला नव्हता. म्हणून तर एवढा छान संयोग होऊनसुद्धा तिच्या नशीबामध्ये पतिसुख नव्हते. लग्न होऊन काही दिवस झाले नाहीत तोच तिला प्राणाहून प्रिय अशा पतिचे अशा दुःखदायक दुर्घटनेमध्ये मरण झाले आणि सुनयना आयुष्यभर इष्टवियोगजनित आर्तध्यानाच्या दुष्टचक्रामध्ये अडकली.

# १२

स्त्रीजीवनात सर्वात मोठे दु:ख तिच्या वैधव्याचे असते. ह्यापेक्षा अधिक दु:खद अवस्था स्त्रीजीवनात दुसरी कोणती असत नाही. दुर्दैवाने जर असा दु:खद प्रसंग लग्नानंतर लगेचच आला, तर जणु तिच्यावर संकटाचा पहाडच तुटून पडल्यासारखे आहे. पतिच्या वियोगाने सारे आयुष्य अंध:कारमय तर बनतेच, त्याचबरोबर अनेक संकटाचे काळे मेघ दाटून येतात. पतिच्या कुटुंबातील लोकांकडून व शेजाऱ्यांच्या वाईट वागणुकीमुळे व माहेरील लोकांच्या उपेक्षेमुळे जणु ती जिवंतपणी नरकात ढकलल्यासारखी होते आणि तिला जगणे अवघड होऊन जाते.

बायकांना एवढी अक्कल कोठे - एवढा दूरदर्शीपणासुद्धा कोठे असतो? असे म्हणून संपूर्ण स्त्री जातीचा अपमान करणे योग्य नाही परंतु बहुतांशी स्त्रियांचे मानसशास्त्र असे आहे की तिला दुसऱ्या स्त्रीचे दु:ख दु:खच वाटत नाही. दुसऱ्यावर काय प्रसंग ओढविला आहे ह्याची जाणीवच होत नाही. अशा मनोवृत्तीमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणणे फार आवश्यक आहे. नाहीतर स्त्रीजात अशातऱ्हेने अपमानितच होत रहाणार! हीच परिस्थिती सुदर्शनच्या मृत्यूमुळे सुनयनाची झाली होती.

सुनयनेला सासरकडून सहानुभूति आणि आश्रय मिळण्याऐवजी सर्व बाजूंनी हृदय विदारक बोलणीच ऐकावी लागू लागली. कठोर वाग्बाणांनी तिच्या हृदयाला भोके पडू लागली.

सासू म्हणे - ''ही हडळ आहे हडळ! दुष्टेने उंबरठ्यावर पाऊल ठेवताच माझ्या लाडक्याला खाऊन टाकले.''

तिच्या म्हणण्याला दुजोरा देत सासरे म्हणत - ''कुलक्षणी आहे, कुलक्षणी! ज्योतिष्याने देखील काय पाहून होकार द्यायला लावला? पहाना!

घरात पाऊल ठेवताच मुलाला तर कायमचे मुकलो आणि शेअरबाजार देखील कोसळला! लाखोचा फटका पडला ह्या शेअर्समुळे!!''

अंधश्रद्धाळू दीर ओरडे - ''हे जे झाले ते तर ठीक, पण हिच्या आगमनाने तर माझे पुरते बारा वाजले. हत्येच्या अपराधामध्ये चालू असलेल्या फौजदारी खटल्यामध्ये मी सुप्रीम कोर्टामध्ये सुद्धा हरलो. आता कायम सक्तमजूरी तर पक्कीच. कदाचित फाशीची शिक्षा देखील होईल.''

नणंद म्हणे - ''जेव्हा पासून ह्या काळतोंड्या स्त्रीचे तोंड बघितले माझा घरवाला पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात पिऊ लागला. अगोदर तर थोडेफार प्रेमाने बोलायचा आता तर माझ्याकडे ढुंकूनही बघत नाही. जेव्हा पहावे तेव्हा हिचेच गुणगान करीत असतो. काढा या हडळीणीला घराबाहेर. माहित नाही अजून कोणा कोणाला वश करेल ही ?

पंधरा दिवसात सुदर्शनभाऊवर तर हिने अशी जादू केली होती, त्याचे मन असे मोहित केले होते की काही विचारु नका. शेजारपाजारचे सुद्धा हिची स्तुति करताना कंटाळत नाहीत. शेजारी स्वर्गीय सुदर्शनभाऊची आठवण करण्याऐवजी, त्याच्या वियोगावर दुःख प्रदर्शित करण्याऐवजी हिलाच सहानुभूति दाखवून हिच्याच दुःखाचे कौतुक करत आहेत.

अशी कोणती जादूची विद्या आहे हिच्याजवळ? कोणता मोहिनी-मंत्र जाणते ही की सर्व लोक हिच्या बोलण्याने एवढे भारावून जातात?''

अशा तऱ्हेने सुनयनाच्या सासरकडून त्यांच्या अशा वाईट वागणुकीने तिच्या वैधव्याच्या खोल जखमांवर मीठ चोळण्याचेच काम केले. केवळ बोललेच नाहीत तर आणखी काही अमंगल घडू नये ह्या भीतिने तिला घराबाहेर हाकलून दिले. सर्वतऱ्हेने असहाय्य अशी सुनयना मरणाला शरण जाण्याऐवजी आपल्या आईला शरण गेली.

**जुन्या वळणाची स्त्री आपल्या अंधविश्वासाच्या कारणाने आपल्या स्त्री जातीची कशी वैरीण बनते ह्याचा कोणी विचारही करु शकत नाही आणि बायकांच्या मुठीतले पुरुष देखील त्यांच्या बोलण्यामध्ये री ओढत त्यांना साथ देण्यामध्ये दोन पावलं पुढेच असतात.**

मंगल मानल्या जाणाऱ्या विवाहादि विधिंमध्ये स्त्रियाच विधवा स्त्रीची सावलीसुद्धा पडू देत नाहीत. लहानसहान मुलांनासुद्धा विधवा स्त्रियांकडे जवळ पास भटकू देत नाहीत.

अशा स्त्रियांची अशी दयनीय दुर्दशा पाहून, तिला उपेक्षित आणि असहाय्य पाहून हलक्या दर्जाचे पुरुष देखील तिच्या मजबूरीचा फायदा उचलण्याकरिता आपली जाळी पसरुं लागतात. कामी पुरुषांची वक्रदृष्टि त्यांना शांत चित्ताने जगू देत नाही.

दुर्दैवाची शिकार झालेल्या अशा स्त्रिया शिकाऱ्याच्या पंजातून सुटलेल्या भयभीत हरिणीप्रमाणे, आपल्या आईच्या मायेची आठवण करुन माहेरी पोहचतात तोच माहेरचे लोक देखील नसती ब्याद समजून, लवकरात लवकर डोक्यावरील जबाबदारीचे ओझे कमी करण्याकरिता, आलेली ब्याद टाळण्याकरिता तिचा पुनर्विवाह करण्याचा विचार करु लागतात.

आई आणि मुलीमध्ये तसे प्रेम तर खूप असतेच परंतु मुलगी बालविधवा झाली तर मग त्या प्रेमाबद्दल काय सांगावे ? जेव्हा भाऊ-भावजया आणि वडील सर्व एकत्र झाल्यावर ती एकटी बिचारी काय करु शकणार होती? अशा परिस्थितीत आईला मौन बाळगण्याशिवाय दुसरा कोणता उपाय आहे? परिस्थितीशी जुळवून घेऊन आईनेसुद्धा नाईलाजास्तव पुनर्विवाहाला मान्यता दिली तरीदेखील बिचाऱ्या त्या विधवा स्त्रीचे प्रश्न सुटत नाहीत; कारण विधवेशी कोण अविवाहित तरुण लग्न करेल? तिला तर एखादा विधुरच आपलेसे करु शकेल. तरुण वयातील विधुर देखील विधवेला सहजासहजी स्वीकारत नाहीत. कारण ज्यांना एकाहून एक चांगल्या कुमारी कन्या मिळू शकत असतील तर मग विधवेशी कोण लग्न करेल ? अंधविश्वासामुळे त्याला हीदेखील शंका सतत सतावत असते की 'जर हिच्या भाग्यात पति लिहिलेला आहे तर पहिला पति तरी का मेला? शक्यता आहे की ही पुन्हा विधवा होईल? अशा परिस्थितीमध्ये मी आपले प्राण कशाला धोक्यात घालू ? अशा शंका-कुशंकांमुळे देखील विधवांचा योग्य व्यक्तिबरोबर पुनर्विवाह होणे अत्यंत कठीण होऊन बसते.

ह्या सर्व कारणांमुळे सर्व लोक मिळून तिला एखाद्या वयस्कर किंवा म्हातारा होत आलेल्या विधुराच्या गळ्यात बांधून, प्रसव-पीडेशिवायच लहान वयातच अनेक मुला-मुलींची आई बनविण्यास टपलेले असतात.

अशी वाईट वागणूक देताना अशा दुष्ट प्रवृत्तिंचे स्त्री-पुरुष हे विसरुन जातात की समजा ही दुर्घटना आपल्यावर किंवा आपल्या बहिणीवर किंवा मुलीवर जर घटित झाली आणि दुसऱ्यांकडून अशी वागणूक दिली गेली तर आपल्यावर काय प्रसंग ओढवेल ? आणि असे होणे काही अशक्य कोटीतील गोष्ट नव्हे. कोणीही व्यक्ति केव्हाही दुर्घटनेची शिकार होऊ शकते.

म्हणून तर नीतिकारांनी म्हटले आहे -

**'जी आणि जशी वागणूक आपल्याला स्वतःला चांगली वाटत नाही, ती आणि तशी वागणूक आपण दुसऱ्यांशी ठेवता कामा नये.'**

सुनयनेने आपल्या कौमार्य अवस्थेमध्ये, आपल्या वीस वर्षाच्या छोट्या आयुष्यामध्ये, शेजार पाजारच्या अनेक विधवांची दुर्दशा प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहिली होती. म्हणून तिच्या हृदयामध्ये विधवांबद्दल खूप सहानुभूति आणि दयेचा भाव होता. तिला काय माहित होते की अशी परिस्थिती आपल्यावरही येणार आहे.

मधुमिलनाच्या रात्री जेव्हा सुदर्शनने प्रेमाच्या गोष्टी बोलण्याऐवजी सुनयनेला हे समजाविण्याचा प्रयत्न केला की, 'कल्पना कर, कदाचित एखाद्या दुर्घटनेमुळे आपण दोघे नेहमीसाठी वेगवेगळे झालो, एकटेच राहिलो तर…?'

सुनयनेने सुदर्शनच्या अशा अप्रिय, कर्णकठोर गोष्टीवर काही विचार करावा - हे तर शक्यच नव्हते, ती तर अशी गोष्ट ऐकूही शकली नाही. म्हणून वाक्य पूर्ण करण्यापूर्वीच सुनयनेने सुदर्शनच्या तोंडावर हात ठेवला.

सुनयनेच्या डोळ्यात अश्रु दाटले. ती डोळे पुसत म्हणाली - ''आता म्हटले ते म्हटले, भविष्यात कधी देखील असे विचार मनात सुद्धा आणू नका.

मी अशा गोष्टी ऐकू शकत नाही. अशा चांगल्या प्रसंगी अशा वाईट गोष्टी कां कराण्व्यात? असे अपशकुनी विचार तुमच्या मनात आले तरी कोठून ?

उदास मनाने नाराजी प्रगट करीत सुनयना पुनश्च म्हणाली - "तुम्ही जर असे पुन्हा बोलणार असाल तर मी तुमच्याशी बोलणार नाही."

सुदर्शन म्हणाला - "मी असे काय म्हटले बुवा? तू निष्कारणच रागावली आहेस. अगं, तसे तर सर्व चांगलेच होणार आहे; परंतु हे पहा सुनयना! 'सुदैवाला दुर्दैवामध्ये पलटण्यास वेळ लागत नाही. म्हणून दूरदृष्टिने आयुष्यातील प्रत्येक पैलूवर गांभीर्याने विचार करण्यात काय हरकत आहे? आपल्या विचार करण्याचा अथवा म्हणण्याचा दुर्घटनेशी काय संबंध आहे? जे व्हायचे असते तेच होते. जर आपण प्रत्येक परिस्थितीशी तोंड देण्याकरिता दक्षता आणि सावधानता बाळगली तर वाईट परिस्थितीमध्यें 'किंकर्तव्य विमूढ' होत नाही. म्हणून जरी आज अडचणीत नसलो, तरी वेळ असेपर्यंत सावधान राहिलेच पाहिजे. बस्स ह्याच विचाराने मी ह्या गोष्टीला महत्वाचे व उपयोगी समजून चर्चेला तोंड फोडले. तुला एवढे वाईट वाटणार आहे हे माहीत असते तर आज न बोलता पुन्हा केव्हा तरी बोलतो असतो. असो, काही हरकत नाही. तू ह्या शकुन अपशकुन या सारख्या गोष्टींना विसर आणि तुला ज्या गोष्टी चांगल्या वाटतात त्या बोल. मी माझे शब्द परत घेतो. परंतु तुला सदैव खंबीरपणे कोणत्याही गोष्टीला सामोरे जाण्याचे शिकले पाहिजे आणि प्रत्येक परिस्थितीशी सामना करण्याची सदैव तयारी ठेवली पाहिजे."

एखादा कटु सत्य ऐकेल किंवा ऐकू शकणार नाही, सहन करेल किंवा सहन न करु शकेल परंतु जे दुःख व्हायचे असते, ते झाल्याशिवाय रहात नाही.

सुनयना काही काळातच त्या दुर्घटनेची शिकार बनली, ज्या गोष्टीला ती मधुमिलनाच्या रात्री ऐकू शकली नव्हती. आता वारंवार त्या साऱ्या घटना ज्या दोघांच्या मध्ये घटल्या होत्या त्या तिच्या डोळ्यासमोर तरळत होत्या.

सुनयना अपघातामध्ये पति दिवगंत झालेला पाहून अवाक् झाली होती, बेशुद्ध अवस्थेसारखी अवस्था झाली होती. रडू इच्छित असूनही तिला रडू येत नव्हते.

अश्रु बाहेर येण्याऐवजी आतल्या आत सुकत होते. ती डोळे फाडून फाडून बघत राहिली. ती जोपर्यंत रडत नव्हती तोपर्यंत रडत नव्हती. परंतु जेव्हा रडू चालू झाले तर अशी ओक्साबोक्सी रडली की तिला केविलवाणे रडलेले पाहून सारे वातावरण शोकाकुल झाले. उपस्थित सगळे जण शोकग्रस्त-उदास झाले.

सुदर्शनाच्या आकस्मिक निधनाने सुनयनाच्या स्वप्नातील संसार उजडला गेला. तिच्या सर्व मनोरथांचा चकणाचूर झाला होता. तिच्या मनातील साऱ्या कल्पना मनातच थिजून गेल्या.

स्त्रीचे सौभाग्य कायमचे हरपणे स्त्री जीवनाला सर्वात मोठा शाप आहे. अशा परिस्थितीत तिने धैर्य तरी कसे धरावे? तिला तत्त्वज्ञानाचा आधार तर काहीच नव्हता, ज्या जोरावर मोठ्यातल्या मोठ्या प्रतिकूल अवस्थेमध्ये साम्यभाव धारण करता यावा ?

तिच्या डोळ्यांना उसंत नव्हती, त्यातून सारखे अश्रु झिरपतच होते. ओले डोळे लवकर सुकतच नव्हते. तिची ही अवस्था पाहून वेळोवेळी आईच्या मायेला पाझर फुटे. तिला समजावता समजावता ती स्वतःच रडू लागे.

सुनयनाचे दुःख कोणाच्याने पाहवले जात नव्हते. शेजारी पाजारी असलेल्या स्त्रिया तिला समजाविण्यासाठी-सहानुभूति दाखविण्यासाठी येत होत्या, परंतु तिचा विलाप पाहून स्वतःच रडू लागत. समजाविण्याचा असफल प्रयत्न करीत, परंतु स्वतःचे अश्रु थांबविणे त्यांना जमत नव्हते.

लग्न होऊन अजून थोडे दिवसही झाले नव्हते, हाताच्या मेंदीचा रंग अजून पुरता गेला नव्हता. मेंदीचा रंग उडण्याच्या अगोदरच दुर्दैवाने तिच्या मेंदीचा आणि कुंकवाचा रंग पुसला होता.

आईच्या गळ्यात पडून रडत रडत ती एवढी थकून जाई की तिचे अंग अंग शिथिल होऊन जाई. हुंदके भरता भरता ती अर्धमेली होऊन आईच्या मांडीतच कोलमडत असे. ही काही एका दिवसाची गोष्ट नव्हती. असे रडता रडता अनेक दिवस निघून गेले.

सुनयनाच्या सासू-सासऱ्यांनी - ''ह्या अभागिनीने नागिन बनून आमच्या लाडक्याला डसले आणि खाल्ले, आम्ही हिचे तोंड देखील पाहू इच्छित नाही'' असे म्हणून आपले अंग काढून घेतले.

एकमेव आईचाच आसरा होता तिला. आई तर बिचारी स्वतःच चारी बाजूने संकटात अडकलेली होती आणि आता आणखीन एक संकट येऊन ठेपले होते. मोठ्या मुलीचा पति मद्यपि, मुलगा अपंग, पति मनमोहन देखील आयुष्यभर वाईट व्यसनाने घेरलेला होता.

हे तर सर्वज्ञ भगवानच जाणत होते की, तिने ह्या स्वार्थी आणि वासनामयी दुनियेमध्ये स्वतःच्या शीलाचे संरक्षण करता करता आपल्या अपत्यांना कसे पोसले होते ते! जर तिच्यामध्ये धैर्य नसते आणि धर्माचा आधार नसता तर ती केव्हाच आपल्या मुलाबाळांसह परलोकी गेली असती.

हळु हळु ती स्वतः तर स्थिरस्थावर झाली. सुनयनाला देखील शांत करण्याचा प्रयत्न करीत होती. काळाचा महिमाच मोठा अगाध आहे. तो हळु हळु मानवाला पूर्वपदावर आणण्यास मदत करतो. चांगल्या वाईट आठवणी काळाच्या गर्तेमध्ये सहज सामावल्या जातात.

जसा जसा काळ लोटत गेला, तस-तसे सुनयना दुर्दैवाचे प्रहार झेलत झेलत स्थिर-स्थावर होत चालली. •

# (१३)

धर्मेश म्हणाला – "मनमोहन! तुम्ही आपली चूक माना अथवा न माना, परंतु खरी गोष्ट तर अशी आहे की सुनंदा आणि सुनयनासारख्या सर्वगुणसंपन्न कन्या आणि मायेची मूर्ती अशी त्यांची आई मोहिनी यांना दुःखद आणि दयनीय अवस्थेला पोहोचविण्यात आणि एकुलता एक मुलगा जीवंधरला पोलिओ झाल्याने अनाथ बनविण्यामध्ये जर सर्वात अधिक दोष कोणाचा असेल तर तो तुमचा आहे. तुमच्यामुळे तुम्ही जिवंत असताना तुमच्या पत्नीला एखाद्या विधवेप्रमाणे आपले आयुष्य कंठण्यास भाग पडले आणि वडिल असताना मुलाला अभ्यासाकरिता अनाथालयाचा आसरा घ्यावा लागला.

जी व्यक्ति आपली पत्नी आणि अपत्यांचे योग्य तऱ्हेने पालनपोषण, देख-रेख आणि संरक्षणासारखी अनिवार्य कर्तव्यं पार पाडू शकत नाही, त्याला लग्न करुन पत्नी आणि मुलाबाळांच्या सुखाची कल्पना करण्याचा देखील अधिकार नाही. अधिकार आणि कर्तव्य दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यांना वेगवेगळे केले जाऊ शकत नाही. कर्तव्यें विसरताच अधिकार देखील स्वतःच नाहीसे होतात.

तुम्ही वाईट व्यसनांमध्ये पडून आपल्या कुटुंबियांना ज्या घोर दुःखाच्या सागरात बुडविले आहे. त्या दुःखाला तुमचे रडणे-बिडणे, दुःखी होणे, पश्चात्ताप करणे कमी करु शकत नाही."

धर्मेशचे बोलणे ऐकून मनमोहन तर भावनावश झाला आणि स्वतःला सावरु न शकल्याने बायकांसारखा हुंदके देत ओक्सा बोक्सी रडू लागला – पश्चात्तापाचे अश्रु गाळीत तो म्हणाला – "असे कोणते पाप आहे जे मी केले नाही. पित्याची करोडोंची संपत्ति मी पाण्यासारखी व्यसनापायी गमावली,

अशीच बरबाद केली आणि आई-वडिलांना मानसिक क्लेश देऊन देऊन त्यांना जगणे कठीण केले होते. कारण माझे वडील हृदय विकाराने परलोकी गेले. मातेच्या ममतेला मी कुचलले, तिच्या वैधव्याचे कारण मीच बनलो. पत्नी, मुली व मुलाच्या आयुष्याशी मीच खेळ खेळलो. एखादी गोष्ट असेल तर सांगावी पण काय काय सांगू ? माझ्या हातून अगणित पापं घडली आहेत. खरोखरीच मी कोणाला तोंड दाखविण्याच्या लायकीचा राहिलो नाही. म्हणून मला वाटते मला जगायचा काही अधिकारच उरला नाही.''

धर्मेशने त्यांना दिलासा दिल्यामुळे मनमोहन थोडे फार गप्प झाले परंतु त्यांच्या मनातील विकल्प तर काही थांबले नाहीत. अंतर्जल्प चालूच राहिला -

हे भगवान! मी काय करु? कोठे जाऊ ? मला तर ओंजळभर पाण्यात बुडून मेले पाहिज़े. परंतु मरुन देखील मला ह्या अपराधांपासून सुटका मिळणारी नाही - शांति मिळणार नाही! माझ्या प्राणांपेक्षा प्रिय अशा मुलींचे दुःख माझ्याच्याने पहावत नाही. त्यांचे दुःख विसरावे म्हणून जो जो मी दारु पिण्यास सुरुवात केली तो तो दुःख वाढतच चालली आहेत. म्हणून आता मला मेल्याशिवाय दुसरा उपायच नाही. आता मरणालाच शरण जाण्याव्यतिरिक्त दुसरा तरणोपाय नाही. पण आता तर विष खाण्याएवढे सुद्धा पैसे माझ्याजवळ उरले नाहीत. नशेमध्ये चूर होण्याकरिता सुद्धा पैसे पाहिजेत ना ? दारु फुकटात तर येत नाही ? दारु पिण्यासाठी मी आता पैसे कोठून घेऊन येऊ ? घरात तर आता काही उरले नाही. घरातील वस्तु न वस्तु मदिरादेवीच्या बलीवेदीवर चढवली गेली आहे. आता तर एखाद्या खोल नदी किंवा जलाशयात बुडून मरणे हाच एक शेवटचा उपाय बाकी राहिला आहे.

अशा तऱ्हेने अंतर्जल्प करता करता मनमोहनचा डोळा लागला. झोप काय लागली. झोपेतही स्वप्नामध्ये तीच बडबड - हाय...हाय... आता मी काय करु ?

धर्मध्यान, आत्मचिंतन आणि तत्त्वमंथन करण्याकरिता धर्मेश एकांत जागा शोधत कधी नदी काठी, तर कधी डोंगर माथ्यावर, तर कधी घनदाट झाडाच्या सावलीमध्ये, तर कधी बागेमध्ये अथवा एखाद्या तीर्थावर, तर कधी धर्मशाळेत जात असे.

एके दिवशी तो नदी किनाऱ्यावर बसल्या बसल्या सूर्यास्ताचे मनोहर दृष्य पहात होता आणि विचार करीत होता - ''जशी ह्या सूर्याची ही लीला समाप्त होत आहे, ह्याचा प्रताप व प्रकाश प्रत्येक समयाला क्षीण होत आहे, अगदी असेच मनुष्याचे जीवन समया समयाला मृत्यूच्या दाढेकडे अग्रेसर होत आहे. हे आयुष्य सूर्याप्रमाणे वेगाने मृत्यूरुपी अस्ताचलाकडे चालले आहे, म्हणून जीवनामध्ये जोपर्यंत प्रकाश आहे तोपर्यंत यथासंभव लवकरात लवकर आत्मावलोकन करुन घेतले पाहिजे. अशी नैसर्गिक दृष्ये पाहण्यामध्ये आपला वेळ वाया घालविता कामा नये.''



असा विचार करुन ध्यानस्थ होण्याची तयारी करीत असतानाच एकदम 'धडाम्' असा आवाज आता. जणु एखाद्याने डोंगरावरुन नदीमध्ये उडी टाकली असावी!

वळून पाहिले असता गटांगळया खाणारी, घाबरुन डुबक्या खाणारी, हात पाय आपटणारी एक व्यक्ति दिसून आली. ती व्यक्ति थोडीफार ओळखीची वाटली म्हणून धर्मेशने जवळ जाऊन पाहिले तर तो बघतच राहिला.

"अरे हे तर मनमोहन आहेत. ह्यांना हे काय सुचले ? भले त्याला आपल्या केलेल्या दुष्कृत्याबद्दल खूप पश्चात्ताप वाटतो आहे. वाईटही खूप वाटत आहे. परंतु... असा अनर्थ!

नक्कीच त्याने आपले मानसिक स्थैर्य गमावले आहे. नाहीतर मनुष्य गतीतील ह्या साधारण अल्पकालीन दु:खापासून वाचण्याकरिता, दीर्घकालीन दु:खाला त्याने आमंत्रण दिले नसते.

अरे! मी हा काय विचार करीत बसलो? कोणत्या विचारात अडकलो ? पाहूया कदाचित तो अजूनही जिवंत असेल. आता ही वेळ विचार करण्याची नाही.

असा विचार करुन आपल्या प्राणाची पर्वा न करता त्या नदीमध्ये त्याने उडी घेतली आणि त्याला नदीच्या किनाऱ्यावर आणले.

मनमोहनच्या पोटात पाणी शिरले होते, थोड्या वेळात शेवट होईल की काय असे वाटत असतानाच प्रयत्नाला यश येऊन सुदैवाने तो वाचला. पश्चात्तापाच्या पंचाग्निमध्ये तप्त होऊन आणि प्रायश्चित्ताच्या गंगेमध्ये गोते खाऊन त्यांनी आपल्या पापाचे प्रक्षालन तर केले. परंतु अजूनही त्याची आत्मग्लानि कमी झाली नाही, त्याला आत्मसंतोष अजूनही वाटत नव्हता.

ते धर्मेशला म्हणाले - "अहो दुर्व्यसनांपायी मी आत्महत्येसारखे हलके पाप करण्यास उद्युक्त झालो आणि नदीमध्ये उडी घेतली. जर तुम्ही मला वाचवले नसते तर...

आता तर मी ह्या आयुष्याला कंटाळलो आहे. जणु मी त्या आयुष्याला मेलोच आहे. आता पुनश्च मी ह्या पापचक्रामध्ये आणि विषयवासनेच्या दलदलीमध्ये फसू इच्छित नाही. आता तर मी आपल्या सान्निध्यात राहून धर्मध्यानाकरिताच जगू इच्छितो. आपल्या शरणी येऊ इच्छितो."

असे म्हणत असता तो खूप भावनाविवश झाला आणि त्याच्या डोळयातून पश्चात्तापाचे अश्रु वाहू लागले. •

# १४

धर्मेशचा मित्र अमित व्यसनी तर होताच, परंतु बेईमान आणि बदमाश नव्हता. आपल्या व्यसनांच्या वाईट सवयीमुळे आपल्या कुटुंबीय जीवनाची वाताहात पाहून आणि आपल्या सासऱ्याच्या कुटुंबाचे हाल पाहून तो आपली व्यसनाची सवय वाईट आहे असे मनापासून मानू लागला होता आणि ती सवय सोडावी असा विचार करीत होता, परंतु अजून तो सोडण्यात यशस्वी होत नव्हता.

जेथे अगोदर तो व्यसनांची निंदा किंवा त्यापासून होणारे नुकसान ह्याबद्दल ऐकायलाही तयार नव्हता, तो आता त्या वाईट व्यसनांबद्दल आणि त्यांच्या परिणामांबद्दल न केवळ ध्यानपूर्वक ऐकत होता पण आता कबूलही करीत होता की वास्तविक ते त्याज्य आहेत. एवढेच नव्हे तर त्यांना त्यागण्याचा विचारही करत होता.

जेव्हा तो अशी इच्छा व्यक्त करीत होता तेव्हा धर्मेशसह त्याच्या नातेवाईकांनादेखील खूप आनंद होत असे, बरे वाटत असे; परंतु त्याचा संकल्प आठवडा-दोन आठवड्याच्यावर टिकत नसे. पुन्हा 'येरे माझ्या मागल्या' - पुन्हा तो व्यसनाधिन होऊन जाई.

ह्या व्यसनांचे स्वरुपच काहीसे असे आहे, जो एकदा अडकला तो अडकलाच. पुनश्च त्यातून बाहेर पडणे मोठे कठीण! त्यामुळेच ह्या वेळेला त्याच्या त्यागाच्या संकल्पाकडे कुणी लक्ष दिले नाही की जाहिरपणे आनंद व्यक्त केला नाही.

परंतु ह्यावेळेला अमितने खरोखरच दृढ संकल्प करून पुन्हा आयुष्यभर व्यसनाधिन न होण्याचा संकल्प केला आणि धर्मेशबरोबर दररोज नियमित होणाऱ्या प्रवचनात सामील होऊ लागला.

**जेव्हा जाग येईल तेव्हा सकाळ होते** ह्या म्हणण्यानुसार अमित व्यसनापासून विरक्त झाल्याची बातमी हा हा म्हणता गावभर पसरली. सर्वांमध्ये हीच चर्चा - अमित… अमित… अमित, परंतु जितकी तोंडं तेवढ्या विविध कल्पना!

एखादा म्हणे - "करुन करुन भागले आणि देवपूजेला लागले…'

त्याचे म्हणणे खोडीत दुसरा म्हणे - "अरे बाबा! ह्यामध्ये कोणती नवलाई आहे, मोठे मोठे धर्मात्मादेखील धर्मात्मा बनण्यापूर्वी पापीच तर होते. पापीच तर पापाचा त्याग करुन एखाद्या दिवशी पुण्यात्मा आणि धर्मात्मा बनतात. श्रीकृष्णाचा पुत्र शंभुकुमार आणि राजा मधु यांच्या पौराणिक कथा ह्याची ज्वलंत उदाहरणं आहेत.

हरिवंश पुराण वाचणारे हे चांगल्या तऱ्हेने जाणतात की - महाराणी जांबुवतीच्या पोटी जन्मलेल्या शंभुकुमारने आपली हवस पुरी करण्याकरिता वाईट भावनेने, आपले पिता श्रीकृष्णाकडून, त्यांना कसेही करुन खूष केले व बक्षिस म्हणून एक महिन्याकरिता राज्यसत्ता प्राप्त केली आणि जेव्हा शंबुकुमारला सत्ता सोपवून श्रीकृष्ण अज्ञातवासामध्ये गेले तेव्हा संधी मिळताच शंभुकुमारची पापमय स्वच्छंदवृत्ति कशा तऱ्हेने प्रबळ झाली होती! त्याची कामवासना एवढी पराकोटीला पोहोचली होती की जणु आगीमध्ये तेल पडले असावे. अशा वेळेला त्याने काय-काय अनर्थ नाही केले? अशी निर्लज्ज कृत्यं केली की सांगण्यामध्ये सुद्धा एखाद्याला लाज वाटावी !

तरीदेखील पुराण सांगते की, त्याच शंभुकुमाराने आपल्या पापाचे प्रायश्चित्त करुन, आत्मसाधनेच्या अपूर्व पुरुषार्थाद्वारे गृहस्थपणा सोडून मुनिधर्म अंगीकार करुन निजस्वभाव साधन द्वारे त्याच भवामध्ये घातिया-अघातिया कर्मांचा क्षय करुन केवलज्ञान प्राप्त केले आणि तो मोक्षाला गेला.

असाच एक दुसरा प्रसंग राजा मधुच्या बाबतीत घडला. त्याने आपल्या आधीन असलेल्या राजा हरिभद्राची पत्नी चंद्राभाचे अपहरण करुन तिला आपली पत्नी बनवून घरी ठेऊन घेतले. त्यामुळे चंद्राभाचा खरा पति आपली प्रियतमा चंद्राभाच्या वियोगाने वेडा झाला आणि गल्लो गल्ली व दारो दारी आपली

पत्नी परतविण्याकरिता याचना करत फिरु लागला. तरी देखील राजा मधूने तिला परत केले नाही. असा घोर अन्याय करुन देखील राजा मधूने शेवटी आपली चूक सुधारली व स्वर्गासमान भोगभूमिमध्ये उत्तम गति प्राप्त केली.''

तिसरा म्हणाला - ''म्हणून तर म्हणत आहे की बाबा रे! ह्या फंदातून तो सुटला आहे तेच चांगले आहे. व्यसनातून मुक्त होणे काही सोपी गोष्ट नव्हे. हे काम एखादे महाभारतातील युद्ध जिंकण्यापेक्षा कमी दर्जाचे आहे असे मानू नका.

युद्ध जिंकणे सोपे आहे पण व्यसनातून बाहेर पडणे मोठे कठीण आहे. जो दिवसातून दहा दहा पेग पीत असेल, रात्रंदिवस दारुच्या नशेत चूर असेल, चेन-स्मोकर असेल आणि दिवसभर तोंडातून रेल्वेगाडीच्या कोळशाच्या इंजिनप्रमाणे धूर सोडणारा असेल. रात्र रात्र जागून नृत्यांगनांच्या नाच गाण्यातच मश्गुल होत असेल, दिवसभर डोळ्यात झोप असल्याने झापडं नीट उघडत नाहीत अशा अवस्थेत असेल, न वेळेवर खाण्या-पिण्याची शुद्ध असेल, मसालेदार तिखट व गरिष्ट भोजन करणारा असेल. आणि रोज नव्या नव्या वेश्येचे दार ठोठावत असेल - अशा व्यक्तिकडून जो काही किंवा जेवढा त्याग होत असेल तो तर चांगलाच आहे. आपणच विचार करा की अशा व्यक्तिकडून विषय-वासना आणि व्यसनापासून विरक्त होण्याची आशा आणि अपेक्षा देखील कशी केली जाऊ शकते?''

चौथा म्हणाला, - ''ह्या गोष्टीमध्ये काय मोठे आहे? तो आता सुद्धा सुधारला नसता. पण झाले असे की एक दिवस त्याच्या फॅमिली डॉक्टरने सांगितले, 'जा, आता घरी जा. आता माझ्याकडे येण्याची गरज नाही. बस्स, दोन महिने. दोन-चार महिने प्या, खा, मजा करा आणि नंतर…' असे म्हणत म्हणत डॉक्टर गप्प बसले.''

डॉक्टरला गप्प झालेले पाहून अडखळत त्याने विचारले - ''नंतर? नंतर काय…?

डॉक्टर म्हणाले - ''नंतर अनेक सागर वर्षांपर्यंत दारु तर काय, पाण्याचा एक थेंब व अन्नाच्या एका कणासाठीसुद्धां मोताद व्हायचेच आहे.''

त्याचे बोलणे मध्येच थांबवत तिसरा म्हणाला – "अजून काय काय सांगितले डॉक्टरने?"

चौथा त्याला म्हणाला, –"अरे! त्यांनी अमितला साफ सांगितले की, हे पहा अमित, सिगरेट व दारु पिण्याने तुझी फुफ्फुसं पार निकामी झाली आहेत, लिव्हरने काम करावयाचे बंद केले आहे. मांसाहारामुळे तुझी आतडी बिलकुल खराब झाली आहेत. बाजारात स्त्रियांच्या संपर्कामुळे तुला 'एड्स' सारखा भयानक जीव घेणारा रोग होऊ शकतो. 'सिगरेट, सुरा आणि सुंदरी' यांनी तुझे अंग अंग जर्जर होत आहे. जेवढी वर्षे तू जगला आहेस तेवढे दिवस देखील तुझ्या जगण्याची आशा उरली नाही."

पाचवा म्हणाला – "अच्छा, असे आहे काय! तरीच म्हटले की सूर्य पश्चिमेला कसा काय उगवला ? आता समजले की मृत्यू डोक्यावर थैमान घालत असलेला पाहून धर्मात्मा बनून परमात्म्याला प्रसन्न करण्याचा प्रयत्न चालू आहे; परंतु अशा पाप्यांकडून परमात्मा प्रसन्न होत नसतात म्हणावे.

भगवान एवढा भोळा थोडाच आहे? ह्याने तरी त्यांचे कधी ऐकले होते जे आता भगवान ह्यांचे ऐकणार आहे? तू का एवढी स्तुति करतो आहेस त्याची ?"

चौथा पुन्हा म्हणाला – "अरे बुवा! तुला एकट्यालाच त्याच्याबद्दल एवढी तेढ का आहे ? आपण सगळेच एका माळेतले मणी आहोत. कोणी दोन पावलं पुढे तर कोणी दोन पावलं मागे! त्याने काय फरक पडतोय ? ही शक्यता आहे की आपण त्या स्टेजपर्यंत पोहोचणारही नाही, स्वतःला सावरुही शकणार नाही. आपणाला आपल्याकडेही पाहिले पाहिजे. असे घडू नये की आपणास कुत्र्यासारखे मरण यावे आणि कानामध्ये धर्माचे दोन शब्द ऐकणे तर दूर, पण तोंडात दोन थेंब पाणी टाकणाराही भेटू नये!"

ह्याच गोष्टीला पुष्टी देत सहावा म्हणाला – "अरे बाबा! असे का म्हणत आहेस ? तसे पाहिले तर सर्व महान आत्मादेखील कधी ना कधी अशा तऱ्हेने वाट चुकलेले होते. म्हणून तर ते संसारात जन्म-मरण करीत होते. जेव्हा सावरले गेले-सुधारले, तेव्हाच ते मोक्षाला गेले, म्हणून तर म्हटले आहे – 'पापाची घृणा करा पाप्याची नव्हे.' पापी तर केव्हाही परमात्मा बनू शकतो.

भगवान महावीराचा जीवच बघा! कोठे पुरुरवा भिल्लासारखा हिंसक मारेकरी, कोठे मारीचि सारखा मिथ्यादृष्टि आणि कोठे परमपूज्य भगवान महावीराची परम पवित्र पर्याय !

भिल्लाच्या भवामध्ये त्यांनी कोणते पाप करायचे बाकी ठेवले होते? मद्यसुद्धा पीत असावेत, मांसही खात असावेत-शेवटी रानटी तर होते तेव्हा. म्हणून भूतकाळाला तर विसरावेच लागेल. वर्तमान काळाला सांभाळण्यामुळे भविष्यकाळ आपोआप सांभाळला जातो. म्हणून अमितने जे काही केले ते चांगलेच केले. जागृत झाला ते ठीकच आहे. कल्याण होण्यामध्ये फार वेळ लागतच नाही. अनंतकाळाच्या चुका सुधारण्याकरिता अनंतकाळ थोडाच लागतो ? ज्याप्रमाणे रात्रभर पडलेली स्वप्नं जाग येताच समाप्त होतात, ठीक त्याचप्रमाणे भेदज्ञान होताच सम्यग्ज्ञानरुपी सूर्य उदित होतो आणि सारा अज्ञान अंधःकार नष्ट होतो आणि पापाचार सुटतात.''



सहाव्या व्यक्तिने आपली बाजू मांडताना म्हटले - "हां, अजूनदेखील जर तो आत्म्याचा आश्रय घेऊ शकला नाही आणि जैनदर्शनाच्या मूलभूत सिद्धांतांना समजू शकला नाही व केवळ बाह्य क्रियाकांडालाच धर्म मानून संतुष्ट झाला तर तो **पीडाचिंतन सारख्या आर्तध्याना** पासून स्वत:ला वाचवू शकणार नाही. जेव्हा एवढ्या भयंकर रोगाने पछाडला आहे तर दुखावा तर होणारच, वारंवार त्या पीडेकडे उपयोग वळल्याशिवाय रहाणार नाही. शारीरिक पीडेबरोबर मानसिक पीडादेखील बरोबर असतेच असते.

ह्या सर्वांपासून वाचण्याकरिता शरीर आणि आत्म्याची भिन्नता आणि वस्तु स्वतंत्र्याच्या सिद्धान्ताला सतत आठवणे (लक्षात ठेवणे), आपण केलेल्या पापाच्या फळाचा विचार आणि संसाराच्या असारतेचे वारंवार स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे.

नाहीतर पीडाचिंतन आर्तध्यानाचे फळ तर अधोगतीच आहे; कारण ह्यामध्ये परिणाम निरंतर संक्लेशमयच असतात, ज्यांचे फळ नरक-निगोद आहे.

छहढाला मध्ये म्हटलेच आहे -

**'अति संक्लेश भाव तें मर्‌यौ, घोरश्वभ्र सागर में पर्‌यो।'**

मित्रहो! ही गोष्ट केवळ एकट्या अमितची नाही, ह्याबाबतीत आपण सर्वजण अमितचे लहान-मोठे भाऊच आहोत. म्हणून जर खरोखरीच आपले कल्याण करण्याची अभिलाषा जागृत झाली असेल तर धर्मेश सारख्या व्यक्तिच्या सान्निध्यामध्ये रहावेच लागेल."

अशाप्रकारे अमितमुळे त्याच्या ओळखीच्या लोकांमध्ये बराच ऊहापोह झाला... ज्यामुळे अनेक लोकांच्या भ्रमाचा भोपळा फुटला तसेच बऱ्याच चांगल्या गोष्टींचे त्यांना ज्ञान झाले. असे कोणी तरी म्हटलेही आहे की - 'वादे-वादे जायते तत्त्वबोध:'

अशी चर्चा करीत करीत सगळे आपापल्या घरी परतले.

इकडे अमितने भयंकर पीडेमुळे उसासा टाकीत आपली कुशी बदलली आणि डोळे बंद करुन झोपण्याचा प्रयत्न करु लागला. •

# १५

सहज दैववशात धर्मेशच्या सद्भाग्याने त्याला एक असा ग्रंथ हाती पडला ज्याने न केवळ त्याचे मन आनंदले पण त्याची दिशाच पलटली.

ग्रंथ हस्तलिखित होता आणि राजस्थानी-ढूंढारी जुन्या भाषेतील लिहिलेला होता, जी धर्मेशची मातृभाषा तर नव्हतीच नव्हती आणि प्रचलित राष्ट्रभाषा देखील नव्हती. म्हणून त्याला वाचण्यामध्ये खूप त्रास झाला; तरीदेखील त्याने तो ग्रंथ वारंवार वाचला. वाचून तो त्या ग्रंथामुळे एवढा प्रभावित झाला की 'जणु त्याला साक्षात मोक्षमार्गच मिळाला असावा.' अनायासे तेच चिंतामणी रत्न त्याच्या हाती गवसले, ज्याच्या शोधात तो होता. म्हणून तो त्याला कंठस्थ करु इच्छित होता. आत्मसात करु इच्छित होता. हस्तलिखित ग्रंथ होता आणि एकच प्रत होती आणि ती देखील जीर्ण अवस्थेतील. म्हणून त्याने पूर्ण ग्रंथ आपल्या हाताने आपल्या भाषेत लिहून काढला. मग काय सांगावे, त्याच्या आनंदाला पारावार उरला नाही.

आता जो कोणी त्याच्याकडे येई, सर्वांना रस घेऊन घेऊन त्या ग्रंथाचा महत्वपूर्ण अंश वाचून वाचून दाखवित असे. जो ऐके तो देखील सद्गदित होत असे. न केवळ सद्गदित होत असे तर त्यावर लट्टू होत असे आणि समर्पित देखील होत असे.

ज्यांचे भवितव्य चांगले असते, त्यांचाच पुरुषार्थ योग्य दिशेने सक्रिय होतो आणि त्यांना निमित्त देखील अनुकूलच मिळतात.

धर्मेशने त्या ग्रंथाच्या पहिल्या अध्यायाच्या सुरुवातीलाच जेव्हा ह्या ओळी वाचल्या की, - अहो! उत्तम भवितव्य आहे ज्यांचे, त्यांना असा विचार येतो की मी कोण आहे ? **माझे स्वरूप काय आहे ? हे चरित्र कसे बनत आहे? हे जे माझे परिणाम होत आहेत, त्यांचे काय फळ मिळेल?...**

ह्या ओळी वाचून धर्मेश एकदम गंभीर झाला आणि विचारात गढून गेला. त्याला वाटले - अहा! ह्या ग्रंथामध्ये एक एक वाक्य अनमोल आहे, एक एक गोष्ट विचारणीय आहे, मी तर ह्या दृष्टिने कधी विचारच केला नाही.

जरी धर्मेशचे लौकिक शिक्षण विशेष झाले नव्हते तरी त्याला विचार करण्याचे सामर्थ्य खूप होते.

त्याने विचार केला - बिहारी कवीच्या सतसईच्या बाबतीत जे असे म्हटले जाते की -

**सतसैया के दोहरे, ज्यों नाविक के तीर ।**
**देखन में छोटे लगें, घाव करें गंभीर ॥**

परंतु त्या दोह्यांमध्ये एवढे गांभीर्य कोठे आहे जेवढे गांभीर्य, सखोलता ह्या ग्रंथाच्या ह्या ओळींमध्ये आहे ? ह्या ग्रंथाच्या लेखकाने तर कमाल केली आहे.

स्वाध्याय तर सगळे करतात, परंतु धर्मेश सारख्या व्यक्ति विरळ्याच असतात, ज्या ग्रंथातील प्रत्येक वाक्यावर एवढ्या खोलवर विचार करतात. एक एक ओळीवर एवढे ध्यान देतात, एक एक सत्य सिद्धांतावर समर्पित होतात, लट्टू होतात.

धर्मेशची विचारधारा अशी होती जे शोधावे ते सापडते त्यासाठी त्याच्या अंतरंगापर्यंत खोलवर जाणे जरूरी आहे.

जो जिनवाणीरूपी समुद्रामध्ये खोलवर डुबकी मारतो, रत्नत्रयरुपी रत्नं त्याच्याच हाती लागतात. जे गोता मारण्यास कचरतात, त्यांच्या हाती तत्त्व लागत नाही.

धर्मेश जन्मजात क्रांतिकारक तर होताच, वयात येत येतच सत्याच्या शोधामध्ये तो लागला होता. त्याला त्या ओळी असामान्य वाटल्या. त्याचे मन तेथेच थबकले, पुढे सरकावे असे त्याला वाटेना. वास्तविक गोष्ट देखील असामान्यच होती. जो कोणी त्या ओळी ध्यानपूर्वक वाचेल, ऐकेल, त्यावर गंभीर विचार करेल त्याच्या मनावर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.

त्याने अमितला देखील त्या ओळींवर ध्यान देण्यास, चिंतन मनन करण्यास सांगितले होते परंतु त्याने ह्याच्या बोलण्याकडे लक्षच दिले नाही.

पहा नां! **'भले भवितव्य आहे ज्यांचे'** अहा! हे एक वाक्यच किती कमालीचे आहे! सर्व जग तर पुण्याच्या उदयामुळे प्राप्त झालेल्या बाह्य अनुकूलतेलाच आपले भले भवितव्य मानत आहे.

सुखाच्या बाबतीत सुद्धा बहुतांशी लोकांची अशी मान्यता आहे -

**पहला सुख निरोगी काया, दुसरा सुख घर में हो माया।**
**तीसरा सुख कुलवंती नारी, चौथा सुख पुत्र आज्ञाकारी ॥**
**पंचम सुख प्रमुखता घर-बाहर, छठवा सुख समाज में आदर।।**
**इससे अधिक और क्या भाई, तीन लोक की संपत्ति पाई ॥**

ह्याकरिताच जगातील लोक तन-धन-स्त्री-पुत्राची अनुकूलता आणि आदर-सन्मान प्राप्त करण्याकरिता आयुष्यभर आटापिटा करतात.

हे मूर्ख जग न जाणो अशाच किती काल्पनिक बाबतीत सुख मानत आहे आणि त्याला आपले चांगले नशीब - भली होनहार - भले भवितव्य मानत आहे; वास्तविक हे सर्व क्षणिक संयोग आहेत. एका क्षणातच ह्या सर्व अनुकूल गोष्टींना प्रतिकूलतेमध्ये बदलण्यास वेळ लागत नाही. हे कसले भले भवितव्य जे क्षणार्धात वाईट भवितव्यात बदलते ?

खरे धर्मात्मा तर खऱ्या देव-शास्त्र-गुरुंचे शरण प्राप्त होण्यालाच आपला भाग्योदय मानतात. धर्माची रुचि आणि तत्त्व समजण्याची जिज्ञासा जागृत होणे हाच आपल्या अति पुण्याचा उदय, धन्य जीवन आणि उत्तम भवितव्य मानतात.

दर्शन-पाठातील खालील ओळी त्याचे प्रत्यक्ष प्रमाण आहे -

अति पुण्य उदय मम आया, प्रभु तुमरा दर्शन पाया।
तव पद मम उरमें आये, लखि कुमति विमोह पलाये।
निज ज्ञानकला उर जागी, रुचि पूर्ण स्वहित में लागी ॥

पहा येथे असे म्हटले नाही की –

अति पुण्य उदय मम आया, पाई निरोग काया।

आणि असेही म्हटले नाही की –

अति पुण्य उदय मम आया, अरबोंका वैभव पाया।

आणखीन अशा तऱ्हेने काय म्हटले आहे आणि काय म्हटले नाही – ह्यावर विचार केला पाहिजे.

धर्मेश विचार करीत होता – या सर्व गोष्टी सखोलतेने विचारार्ह आहेत. ह्या ग्रंथात न जाणो अजून अशा किती गोष्टी असतील? अहाहा? ह्या ग्रंथाच्या एक-एक ओळीमध्ये गहन अर्थ भरला आहे.



नुसत्या एकट्याने स्वाध्याय केल्याने आपला उपयोग तेवढा स्थिर होत नाही, जेवढा आपण सामूहिक स्वाध्याय करावा, आपसात चर्चा करावी. असे केल्याने उपयोगाची विशेष स्थिरता होते. जर असे काही घडले तर सर्वांच्या दृष्टिने ते हितावह होईल.

असा विचार करीत करीत तो आपल्या कामात गढून गेला.

•

# १६

भारतभूमीमध्यें जन्मलेल्या मनुष्याला धर्माचे ज्ञान असो अथवा नसो, ते धर्माचे खरे स्वरूप जाणत असोत अथवा नसोत, ते धर्मात्मा असोत अथवा नसोत; परंतु धर्म करण्याची भावना आणि धर्मात्मा बनण्याची भावना तर बहुतांशी सर्वांमध्ये असतेच. आणि आपापल्या ज्ञानानुसार बहुतांशी सगळे धर्मसाधन देखील करतातच.

पापीमधील पापी व्यक्ति, मग भले तो कत्तलखान्यात कसायाचे काम करणारा असो, रात्रंदिवस खोटे-नाटे, धोका-फसवणूक करणारा असो, एक नंबरचा चोर-ठग किंवा डाकू असो, गुंड बदमाश असो; असा महालोभी असो की पैशालाच परमात्मा समजत असो, दारुडा असो, सर्व व्यसनांमध्ये लिप्त असो; तो देखील आपापल्या कुवतिनुसार-शक्तिनुसार धर्माच्या नावाखाली काही न काही अवश्य करतो. मग तो भले कबुतराला दाणे टाकेल, मुंगीच्या वारुळामध्ये पीठ टाकेल, गाईला, चारा घालेल किंवा देव देवींच्या चित्रासमोर अगरबत्ती पेटवून त्यांची पूजा करेल, सकाळ-संध्याकाळ दोन्हीं वेळा काही ना काही अवश्य करेल आणि मगच आपल्या धंदापाण्याला लागेल, परंतु विवेकाशिवाय हे सर्व केल्याने काही लाभ होत नाही. हा तर निव्वळ कोरा आत्मसंतोष आहे. स्वतःलाच धोक्यात ठेवण्यासारखे आहे. पाप परिणति मग ती कोणात्याही कारणाने असो, त्यामुळे पापबंध तर होईलच होईल. आजीविका वगैरे बहाणे त्या पापबंधापासून वाचवित नाहीत.

संपत शेठने धर्माच्या नावावर अशाच किंवा अशा प्रकारच्या काही किंवा ह्याहीपेक्षा अधिक खर्चिक क्रिया केल्या-करविल्या असल्या तरीदेखील त्या क्रिया त्याच्या धर्मात्मा होण्याची लक्षणं नाहीत.

अहो बंधुंनो! धर्म ही काही प्रदर्शनीय वस्तु नाही. धर्मतर आत्मदर्शनाचे नाव आहे; ज्याचे सविस्तर विवेचन जैनदर्शनामध्ये आहे. नुसते जैनकुळामध्ये जन्म घेतल्याने आणि धर्मायतन निर्माण करण्यासाठी पैसे देण्याने धर्म उपलब्ध होत नाही. त्यासाठी स्वत:ला जैनदर्शनाचा अभ्यास (स्वाध्याय) हा करावाच लागणार. तरच ह्या भवामध्ये व परभवामध्ये सुख मिळू शकेल. परंतु संपत शेठमध्ये अजून अशी लक्षणं काही दिसून येत नव्हती.



संपत शेठना आपल्या उद्योगधंद्याच्या व्यापामध्ये अतिशय व्यग्रता असल्या कारणाने परभवासंबंधी विचार करण्यास फुरसतच कोठे होती? जेव्हा कधी कोणी प्रवचनामध्ये येण्यासाठी किंवा स्वाध्याय करण्याचे सुचवित असेल तर त्यांचे एक ठराविक साच्यातले उत्तर तयार असे – अरे बाबा! आता तर मरायलासुद्धा फुरसत नाही ... हां, आमच्या लायक कोठे काही काम असेल तर सांगा, आवश्यकतेनुसार आम्ही आपल्याला तन-मन-धनाने सहकार्य देण्यास तयार आहे.

खरे पाहिले असता वास्तविक गोष्ट अशी आहे की त्यांना आत्मा-परमात्मा आणि परलोकाविषयी न काही ज्ञान आहे आणि न कोणती जिज्ञासादेखील. त्यांनी एवढ्या दूरदृष्टिने कधी विचारदेखील केला नाही. धार्मिक कार्यामध्ये पैसे खर्च करण्यामुळेच त्यांना सर्वात जास्त मानसन्मान मिळत होता, त्यामुळे पैसे कमविण्याची आणि खर्च करण्याची त्यांची रुचि वाढतच होती.

संपत शेठचे मानणे असे होते की, आजकाल जगामध्ये पैशाशिवाय काही चालत नाही. धर्मदेखील पैशाशिवाय कसा होईल? दान-पुण्य वगैरे करण्याकरितासुद्धा पैसाच पाहिजे नां? भगवानांची प्रतिष्ठा देखील पैशाशिवाय होत नाही. म्हणून कुटुंबातील पुरुषांचे मुख्य काम तर उद्योगधंदा वाढविणे हेच आहे. धर्मध्यान आणि जप तप करण्यासाठी तर घरात निरुद्योगी बसलेल्या स्त्रियाच खूप आहेत.

संपत शेठच्या विचारानुसारच त्यांच्या कुटुंबातील स्त्रिया आपल्या पति, पुत्र, कुटुंबाच्या आणि व्यापाराच्या भरभराटीसाठी यथाशक्ति व्रत-उपवास, पूजा-पाठ, दान वगैरे पुण्याची कामे करीतच होत्या, तसेच देव-देवींना नवस वगैरे करीत होत्या. हां, ज्या कार्यामध्ये मान सन्मान आणि सामाजिक नेतृत्व मिळत असेल, त्या बाबतीत शेठ कधी मनाई करीत नसत.

संपत शेठ जन्मत: जैन असल्या कारणाने वेगळ्या अशा देव देवतांची मंदीरं तर बनविली नाहीत; परंतु जी जैनमंदिरं बनविली, त्याच्या आसपास रक्षक म्हणून देव देवींना स्थापित करवूनच घेतले.

शेठ विचार करे – ''जर ते आपणास मदत करणार असतील तर करु द्या आणि करणार नसतील तर न करो. तरी देखील त्यांची उपासना करण्यामध्ये काय नुकसान आहे? आपल्या जवळचे काय घेऊन जाणार आहेत? जेवढा खर्च त्यांच्या पूजाभक्तिमध्ये होतो तेवढे तर एवढ्या मोठ्या व्यापारात तर उंदीर-मांजर खाऊन जातात. देवी-देव जर मूठभर तांदूळ, फुलं, दीप, धूप आणि फलादींनीच प्रसन्न होतात, तर ह्या पेक्षा अधिक स्वस्त सौदा आणखी कोणता असूं शकेल?

धर्म वगैरे करण्याची सर्व साधने जोडणे आपले कर्तव्य आहे आणि ती सर्व साधने तर जोडतच आहे. आणि खरे पाहिले असता पुढचा जन्म पाहिलाच कोणी आहे? तरी देखील जरी असला तरी त्यासाठी भरपूर तजवीज केलेलीच आहे. ह्यापेक्षा अधिक आणखी काय केले जाऊ शकते?''

शेठ ह्यापेक्षा आणखी जास्त काय विचार करु शकणार होते? व्यापारी-बनिया होता ना तो? 'पैसा फेका आणि तमाशा पहा' ह्याशिवाय आतापर्यंत त्याने दुसरे काही केलेलेही नव्हते.

परहितासारखा धर्म नव्हे ह्या म्हणण्यानुसार शेठ परोपकाराच्या उद्देशाने अनाथालय, औषधालय, विद्यालय, वृद्धाश्रम आणि विधवाश्रम वगैरे समाज कल्याणाची कामे तर आपल्या स्वत:च्या पारमार्थिक ट्रस्ट द्वारे चालवितच होते; परंतु जेव्हा त्यांनी कोणाकडून ऐकले की औषधदान केल्याने आपले शरीर निरोगी राहते, शारीरिक बल वाढते; ज्ञानदानाने आपले ज्ञान वाढते; बुद्धी प्रगल्भ होते; आहारदानाने आपले घर अन्नपूर्णा बनते, घरामध्ये अन्नाचे अक्षय भांडार भरलेले रहाते; वृद्धांची, विधवांची, अनाथांची, भिकाऱ्यांची सेवा केल्याने यशाचा लाभ होतो; तेव्हापासून त्यांची रुचि अशाप्रकारच्या कार्यामध्ये आणखीन विशेष वाढली.

आता ते विचार करु लागले - ह्या पारमार्थिक ट्रस्ट चालविण्याने आपल्याला नुकसान तर काहीच नाही, उलट फायदा आहे. ह्यामध्ये खर्च होणारा पैसा सर्व धर्मादाय फंडातूनच येतो, जो सरळ इतर व्यापऱ्यांकडूनच येतो--म्हणून ह्याचा आर्थिक बोजा तर आपल्या डोक्यावर काहीच नाही.

नावापरी नाव आणि त्याबरोबर इतर होणारी कामे-ह्यापेक्षा आणखीन उत्तम काय असू शकणार आहे? जेव्हापासून इस्पितळ खोलले आहे, डॉक्टरांची हजारो रुपये फी तरी वाचू लागली, किरकोळ औषधं देखील तेथून मिळू लागली नुसत्या एका टेलीफोनवरुनच इस्पितळातील मोठ्यातला मोठा डॉक्टर तात्काळ सेवेला हजर होतो.

मुलाच्या ट्यूशनमध्ये जो खर्च होत होता, तो खर्च आता आपल्या विद्यालयातील शिक्षकांच्या विशेष सेवांमुळे कमी झाला आहे.

व्यक्तिगत घरगुती कामाकरितां जरुर पडली असतां विधवा आश्रमातील हव्या त्या महिलेला दिवसा-रात्री कधीही बोलावले तर तात्काळ त्या सेवेला हजर होतात-त्या बिचाऱ्यांना दुसरा काय आधार आहे बरे?

धर्मेश संपत सेठच्या ह्या अशा धार्मिक अज्ञानापासून आणि आर्त-रौद्रध्यानरूपी प्रवृत्तिपासून अपरिचित नव्हता. त्यांच्या ज्या काही धार्मिक क्रिया आणि त्याबद्दलच्या मान्यता होत्या त्या निदान नावाच्या आर्तध्यानाच्या आणि परिग्रहानंदी रौद्रध्यानाच्या सीमेबाहेर पडत नव्हत्या-त्यामुळे धर्मेशला वारंवार विकल्प उठत असे -

कदाचित ह्यांचे अशा परिस्थितीत मरण ओढवले तर निश्चितपणे ह्यांची अधोगतिच होईल. लोकोपयोगी कार्यांकडे पाहून लोक भले त्यांच्या देहाला आदराने चंदनाच्या चितेवर दहन करतील, मोठमोठे नेते त्यांच्या शोकसभमध्ये श्रद्धांजली वाहतील आणि त्यांच्या ह्या कार्याचे कौतुक करतील, तरी परंतु ह्या सर्वांमुळे ह्याच्या आत्म्याला काय लाभ होईल?

एखाद्या चौकात त्यांचा पुतळा उभारला जाईल, जो पाहून-पाहून कुटुंबातील लोकांना अभिमानही वाटेल; परंतु संपत शेठच्या आत्म्याला तर त्यांच्या परिणामांचे फळ भोगावेच लागेल. संपत सेठची जी काही परमार्थ कामे आहेत, ती केवळ सांगण्यापुरतीच परमार्थाची आहेत, वास्तविक ती सर्व भोगसामुग्रीच्या प्राप्तिकरिता आणि त्या भोगसामुग्रीच्या रक्षणाकरिता आणि भोगांच्या पुष्टीकरिताच आहेत म्हणून स्पष्टपणे अशुभ निदान आर्तध्यानच आहे.

धर्मेशने विचार केला - त्या बिचाऱ्याला तर काही माहित तर नाही की - **माझे जे हे परिणाम होत आहेत, त्याचे फळ काय असेल बरे?** म्हणून असा एखादा उपाय अवश्य शोधला पाहिजे की ज्यायोगे लोक प्रभावित होतील आणि जिनवाणीला शरण येतील आणि धर्माचे मर्म ते ओळखतील.

धर्मेश हेसुद्धा चांगल्या तऱ्हेने जाणत होता की भले एखादे आध्यात्मिक क्रांतिकारी पाऊल एखाद्याला अेकदम पटणार नाही, त्यामुळे कदाचित विरोधही होईल; परंतु सर्वसाधारण रुचि बाळगणाऱ्यांना एकत्रित करण्याचा त्याशिवाय दुसरा कोणता उपायदेखील नाही. विरोध करणाऱ्यांना नंतर शांततापूर्वक समजावू. यश मिळाल्याने अनेकांना न समजावताच समजून येईल. सुरुवातीला थोडा धोका तर पत्करावाच लागेल.

अशा विचाराने तो मनातल्या मनात खुष झाला आणि तो आराम करण्यास निघून गेला.

# १७

संपत शेठ धर्मेशच्या वडिलांचे घनिष्ट मित्र होते, ते धर्मेशच्या शेजारीच रहात होते. दोन्ही कुटुंबियांमध्ये खूप घरोबा होता.

संपत शेठ गावातील लोकांमध्ये आर्थिक दृष्ट्या सर्वात संपन्न होते. त्यांना कोणत्याही प्रकारची कमतरता नव्हती, परंतु ते खूप महत्वाकांक्षी होते. म्हणून बीस वर्षांपूर्वी व्यापाराच्या वाढीकरिता ते मुंबईला गेले होते-तेथे नशीबाने ते दहा-बारा वर्षातच फार मोठे उद्योगपति बनले. आता तर त्यांची टाटा-बिर्ला सारख्या उद्योगपतिबरोबर गणना होऊ लागली होती.

आता त्यांच्याकडे मिळकतीचे एवढे अधिक कायमचे मार्ग निर्माण झाले होते की त्यांनी जरी आपल्या अमूल्य आयुष्यातील बाकीचा एकक्षण-देखील उद्योगधंद्याला दिला नाही तरी देखील त्यांच्या मिळकतीवर आणि उद्योग धंद्यावर कोणताही विपरीत परिणाम होणार नव्हता.

त्यांचे उद्योग व्यवस्थित चालविण्यासाठी त्यांच्याकडे चांगल्यात चांगले ऑफिसर्स व कर्मचारी तर होतेच, शिवाय त्यांची मुलं आणि नातू देखील खूप हुषार झाले होते आणि पूर्ण जबाबदारी सांभाळू लागले होते. बहुतेक उधोगधंदेसुद्धा त्यांच्या मुला-नातवांच्या आधुनिक टेक्नीकल ज्ञानामुळे वाढूच लागले होते.

परंतु संपत शेठना स्वतःलाच पैसे कमविण्याची भारी हौस होती. त्यांना कमविण्याच्या कामात खूप आनंद वाटत असे. पंचाहत्तराव्या वर्षीदेखील ते व्यापारामध्ये एखाद्या तरुणाप्रमाणे उत्साहित होऊन रुचि घेत होते आणि आठ-दहातास ऑफीसमध्ये बसत असत. वास्तविक डॉक्टरांनी त्यांना संपूर्ण आराम करण्याचा सल्ला दिला होता. त्यांना दोन वेळा तर सिव्हीयर हार्ट-ॲटॅक येऊन

गेले होते, परंतु काय कोणास ठावूक, ते आपले प्राण धोक्यात घालून असे का करीत होते? मनाई करुनदेखील ते का मानत नव्हते?

असे वाटत होते की शेठचे भवितव्यच खोटे आहे. नाहीतर असे दिवस काय मोह-ममतेमध्ये पडण्यासाठी आहेत? आणि विनाकारण काम करण्याचे थोडेच आहेत?

एखाद्याचा नाईलाज असावा, अन्न, कपडे आणि घराचा प्रश्न असेल तर गोष्ट वेगळी आहे; परंतु त्यांच्याबाबतीत असे काहीच नव्हते-त्यांच्याजवळ तर सात पिढ्यांना पुरेल एवढ्या आजीविकेची पुरती तयारी होती.

त्यांच्याजवळ करोडो रुपये तर नगद असतील-मोठमोठया उद्योगांचे ते मालक होते. अरबो रुपयांचे मोठे मोठे ऑटोमॅटिक प्लँटस् होते ज्यामध्ये आपापल्या विषयात तज्ञ असलेले लोक मोठ्या कौशल्याने काम करीत होते. घरातील लोक देखील देखभाल करण्यामध्ये जागृत व सावध होते. नुकसान होण्याचे काही कारणच नव्हते.

मुंबई शहरात संपत शेठचे बंगले-घरे तर होतीच. परदेशातही प्रमुख औद्योगिक शहरातून त्यांची स्वतःची घरे होती. तीर्थक्षेत्रावर आणि पर्यटन स्थळांवर देखील बंगले बांधलेले होते.

जर संपत शेठने विचार केला असता तर ते चोवीस तास रिकामे राहू शकत होते व आपला सर्व वेळ धर्म-ध्यानात लावू शकले असते. परंतु ते धर्म-ध्यानाकडे बिलकुल ध्यान देत नव्हते. त्यांना तर परिग्रहांचा संग्रह आणि त्याचे प्रदर्शन करण्यातच आनंद वाटत असे.

शेठ आपल्या वैभवाच्या प्रदर्शनाकरिता वर्षातून एक दोन वेळा आपल्या गावी अवश्य जात असत आणि तेथील सामाजिक व धार्मिक कार्यात स्वतः खूप मदत करीत. आजसुद्धा जागो जागी त्यांनी दिलेल्या दानाच्या पाट्या लटकलेल्या दिसून येत होत्या. अशा वेळेला धर्मेशच्यासुद्धा त्यांच्याशी गाठी-भेटी होत असत. जोपर्यंत धर्मेशचे वडील होते तोपर्यंत तर संपत केवळ त्यांना भेटण्यासच गावात येत असत; कारण त्यांची व्यक्तिगत मैत्री होती.

हृदयविकाराचा रोगी असूनसुद्धा शेठ येणाऱ्या पाहुण्यांना आपला कारभार, घर, बंगला तसेच चोहीकडे विखुरलेले वैभव तासन् तास फिरून, वर-खाली चढ उतार करुन दाखवित असत. मधून मधून विनाकारण ओ रामू! ओ शामू! वगैरे हाका मारुन मारुन आपल्या चेतन-परिग्रहाची जाणीव करुन देत असत.

बिचारे पाहुणेदेखील शेठचे मनोविज्ञान जाणत होते-म्हणून इच्छा नसतानासुद्धा खऱ्या खोट्या म्हणण्याला दुजोरा देत शेठच्या हसण्याबरोबर आपले नकली हास्य जोडत होते. लवकर सुटका व्हावी म्हणून कोणते ना कोणते कारण हुडकत होते. परंतु शेठजींची पकड जळवांपेक्षा कमी प्रतीची थोडीच होती की जी सहजासहजी सुटावी?

संपत शेठ चहा-नाश्त्याच्या निमित्ताने उरले-सुरले वैभव देखील दाखवूनच श्वास घेत. असे करुन करुन शेठ शरीराने भले थकत असतील, परंतु मनाने कधी थकत नसत कारण त्यांना ह्यातच आनंद वाटत होता.

संपत शेठ ज्याला आपले सुदैव समजत होते, भाग्योदय मानत होते, तेच त्यांच्याकरिता दुर्दैव बनून-क्रूर यमराज बनून त्यांना चिरडून टाकेल-ह्याची त्यांना कल्पना नव्हती. त्यांना माहित नव्हते की हे **परिग्रहानंदी रौद्रध्यान** त्यांना नरकगतीच्या गर्तेत ढकलून देईल.

धर्मेशने स्वत: देखील संपत शेठना एक-दोन वेळा स्वाध्याय करण्याकरिता आणि प्रवचन ऐकण्याकरिता प्रेरणा दिली होती आणि वेळ मिळताच आश्रमात येऊन लाभ घेण्याचा विनंतिपूर्वक आग्रहही केला होता; परंतु शेठचे सर्वांसाठी एकच नेहमीचे उत्तर असे -

"अरे! आता तर आम्हाला मरायला देखील फुरसत नाही आणि तुम्ही स्वाध्यायाच्या गोष्टी करता आहात? ह्या सर्व फुरसतीच्या गोष्टी आहेत. जेवढा मोठा व्यापार तेवढ्या अधिक अडचणी. शिवाय दररोज राजकारणाची कामे आणि सामाजिक संस्थांना सांभाळणे ह्या सर्वांमधून वेळ मिळाला तर स्वाध्यायाचा विचार करावयाचा नां?"

शेठनी धर्मेशलादेखील हेच उत्तर दिले. आणि शिवाय हे सुद्धा सांगितले -

"अरे! तुमची आमची तर जुनी ओळख आहे. तुझ्या वडिलांची आणि आमची जानी दोस्ती होती. म्हणून सांगतो आमच्या लायक काही काम असेल तर जरुर आमची आठवण कर – आम्ही अवश्य येऊ."

धर्मेशनेसुद्धा त्याच जुन्या लहानपणीच्या टोनमध्ये म्हटले – "संपत काका! आपली तीच जुनी ओळख आणि प्रेमच आम्हाला त्रास देत आहे आणि म्हणूनच वारंवार आपणास हे सांगण्याचा विकल्प येतो. परंतु आपण तर आमच्या बोलण्याकडे लक्षच देत नाही."

शेठजींच्या बोलण्यावरुन धर्मेश त्यांच्या ह्या मनोविज्ञानाला समजून चुकला की, ह्यांना आदर-सन्मान पाहिजे, आमंत्रण पाहिजे-म्हणून जे ह्यांना खास कार्यक्रमांना आदरपूर्वक बोलावतात, तेव्हा हे तेथे मोठ्या प्रेमाने जातात. म्हणून त्याने विचार केला –

"का न शेठना एखाद्या शिक्षण शिबिराच्या उद्‌घाटनामध्ये प्रमुख पाहुणा म्हणून बोलवावे? एकदा जर का येथे येऊन येथील वातावरण पाहतील, प्रवचन ऐकतील तर शेठजी सावरले जाण्याची शक्यता आहे. एकदा रुचि जागृत झाली की मग फुरसतच फुरसत आहे त्यांना. पण ते आमंत्रणाशिवाय येणार नाहीत; म्हणून संधी साधून त्यांना आमंत्रण पाठवावे लागेल."

**मोठा शेठ, मोठा विद्वान, मोठा नेता किंवा मोठा नट-कोणतीही मोठे नाव असणारी व्यक्ति असो, जर तत्त्वज्ञान विरहित असेल तर त्याला 'मोठेपणा' नावाचा रोग होतोच-मग तो लहान विद्वानांना, लहान साधूंना, लहान प्रवचनकारांना संसर्गजन्य रोग आहे असे समजून त्यांची उपेक्षा करु लागतो, त्यांच्यापासून दूर दूर राहू लागतो, भले मग ते लहान त्याच्यापेक्षा बुद्धिने, ज्ञानाने किंवा वैराग्यामध्ये वरचढ का असेनात?**

अशा मोठ्या लोकांचे सर्वात मोठे दुर्दैव हे असते की त्यांना तत्त्वज्ञान प्राप्त करण्याच्या संधी दुर्लभ होत जातात. हे मोठे लोक छोट्या विद्वानांकडून तत्त्वाच्या गोष्टी कशा ऐकू शकतील बरे? मग भले स्वतःला त्या विषयातील काही एक काडी इतके ज्ञान नसेल. परंतु त्यांचे हे कृत्रिम 'मोठेपण' त्यांना तत्त्वज्ञान प्राप्त करण्यामध्ये सर्वात मोठा अडथळा बनतो.

असे लोक लहान-मोठ्या विद्वानाची ओळख त्यांच्या आगमज्ञानाने अथवा तत्त्वज्ञानाने करीत नसून त्यांच्या सामाजिक प्रभावाने करतात, त्यांच्या अनुयायांवरुन किंवा प्रशंसा करणाऱ्यांच्या संख्येवरुन करतात. अथवा कोण त्यांना किती सन्मान देऊ शकतो, द्यायला लावू शकतो – ही आहेत त्यांची विद्वानांना लहान-मोठा मानण्याची मोजमापं! परंतु हे सर्व तर पुण्याधीन आहे. तत्त्वज्ञानाशी त्यांचा काय संबंध आहे? जरी तत्त्वज्ञानाच्या प्रसार-प्रचारामध्ये सातिशय पुण्योदयाचा देखील हातभार आहे, परंतु तत्त्वज्ञान व पुण्योदय ह्यांचा मणिकांचन योग तर एखाद्या विद्वानालाच असू शकतो. ही गोष्ट ह्या श्रीमंतांच्या लक्षात येत नाही. संपत शेठ देखील अशाच श्रीमंतांपैकी एक होते.

धर्मेशने विचार केला – असो, काहीही झाले तरी, कमीत कमी संपत शेठना तरी नीट मार्गावर आणावेच लागेल. वडिलांच्या जुन्या पिढीतले तर ते एकमेवच उरले आहेत, ज्यांना आपण लहानपणापासून प्रेमाने संपतकाका म्हणत होतो आणि ते सुद्धा आपल्यावर खूप प्रेम करीत होते. जेव्हापासून ते गाव सोडून धंद्यानिमित्त मुंबईला गेले आहेत आणि तेथे गेल्यापासून उद्योगधंदा आणि व्यापारात एवढे अडकले आहेत की आता त्यांची गाठ-भेट पडणे कठीण झाले आहे. त्यांनादेखील 'मोठेपणा' चा रोग जडला आहे. ते काहीही असो, संपतकाकांना एखादे वेळेस बोलवायचे तर आहेच.

असा विचार करुन धर्मेशने संपतशेठना शिबिराच्या उद्घाटनाचे आमंत्रण पाठवूनच दिले.

इतक्या दिवसांमध्ये धर्मेशच्या तत्त्वज्ञानाच्या नियमित अभ्यासामुळे तो ज्ञानी तर झालाच होता, आणि त्याला वयानुसार एकदंरीत भारदस्त व्यक्तिमत्वही प्राप्त झाले होते. त्यातही तत्त्वज्ञानाबरोबर पुण्य व पवित्रपणा यांचा असा सुमेळ बसला होता की त्याच्या वक्तव्याची इतरांवर चांगली छाप पडत होती. हळु हळु त्याची प्रशंसा करणाऱ्यांची आणि अनुयायांची संख्यादेखील वाढू लागली. त्याचे नाव आणि यश हवेतील सुगंधाप्रमाणे चोहीकडे पसरु लागले.

धर्मेश आता मोठ्या विद्वानामध्ये मोजला जाऊ लागला होता. बाल ब्रह्मचारी आणि आश्रमात रहात असल्याने सर्व सामान्य लोक धर्मेशला संतच समजत होते.

त्याच्याकडून अध्यात्म्य विद्येचा लाभ होत असल्याने त्यांच्याजवळ संपर्कामध्ये राहणारे बहुंताशी लोक त्याला आदराने 'गुरुदेव' म्हणू लागले. ज्याच्याकडून तत्त्वज्ञानाचा लाभ मिळत असेल, त्यांना गुरुदेव म्हणणे काही अयोग्य/अनुचित नव्हते. म्हणून त्यानेदेखील त्या म्हणण्याला विरोध दर्शविला नाही.

'गुरुदेव' ह्या नावाने प्रसिद्धी पावलेल्या धर्मेशच्या आश्रमामध्ये मोठ-मोठे शेठ व मोठ मोठे विद्वान देखील बिनधास्त येऊ-जाऊ लागले होते.

अशा वेळी अध्यात्म गगनातील उगविता सूर्य-असा धर्मेश बनू लागला होता आणि उगवत्या सूर्याला नमस्कार करण्याची परंपरा तर खूप जुनी आहे. म्हणूनच हळु हळु मोठ मोठे लोकदेखील धर्मेशने सांगितलेल्या तत्त्वज्ञानाचा लाभ घेण्याकरिता मोठ्या संख्येने उपस्थित राहू लागले. संपतशेठ देखील धर्मेशच्या कीर्तिपासून अनभिज्ञ नव्हते-म्हणून त्यांनी देखील शिबिराच्या उद्घाटनाची संमति मोठ्या आनंदाने दिली.

शिबिराच्या उद्घाटनाचा सोहळा सुरु झाला. संपत शेठ प्रमुख पाहुणे म्हणून बसले होते. शिक्षण शिबिरांची आवश्यकता आणि त्यांचा उपयोग ह्या विषयावर धर्मेशचे हृदयस्पर्शी मार्मिक भाषण झाले. ते ऐकून लोक फारच प्रभावित झाले.

भाषणामध्ये धर्मेश म्हणाला – "पहा बंधुनो! ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे की जेव्हा एखादा दोन-चार दिवसाच्या प्रवासाकरिता घराबाहेर पडतो, तेव्हा तो नाश्ता-पाणी, नेसण्याचे कपडे अंथरुण-पांघरुण ह्या सर्व गोष्टींची व्यवस्था तर करतोच. परंतु केव्हा कोठे थांबायचे, तेथे काय व्यवस्था असेल? ह्याचा सुरुवातीपासूनच आराखडा तयार करतो आणि ती तयारी केली देखील पाहिजे. नाहीतर जो त्रास होतो त्यापासून कोणी अनभिज्ञ (अजाण) नाही.

जेव्हा ट्रेनमध्ये एक रात्र घालविण्यासाठी दोन तीन महिन्या अगोदर रिझर्वेशन्स केली जातात, शंभर-शंभर रुपये जास्त द्यावे लागले तरी ते देतात, हजार-हजार रुपये रोज असलेल्या हॉटेल्समध्ये कित्येक दिवस अगोदर रुम्स बुक करतो, तर आमच्या डोक्यात ही गोष्ट का येत नाही की **ह्या जन्मामध्ये पुढच्या जन्मांच्या अनंतकालीन लांबच्या प्रवासाकरिता सुद्धा कोठे तरी एखाद्या रिझर्वेशनची आवश्यकता असते कां? ज्याचे रिझर्वेशन ह्या धूळ-रजकणाच्या-मातीच्या धनाने नव्हे तर धर्माच्या धनाने होते.**

अहो! साठ-सत्तर वर्षाच्या ह्या मनुष्य जीवनाला सुखी करण्याकरितां जेव्हा आपणाला दिवस-रात्रीचे चोवीस तास कमी पडतात तर त्याच्या तुलनेमध्ये आपल्या भावी जीवनाच्या अनंतकाळाबद्दल आपण का विचार करीत नाही? तो प्रवास सुखाचा होण्यासाठी आपण काय करीत आहोत? आणि जे काही धर्माच्या नावाखाली करीत आहोत, काय ते पुरेसे आहे? काय ते योग्य आहे? ह्याची देखील मोजदाद आम्ही केली आहे?

भविष्य काळ सुखी बनविण्याची गोष्ट तर लांबवर राहिली, आता तर वर्तमानकाळातीत सुखाभासाच्या भोवऱ्यातच आपण आर्तध्यान आणि रौद्रध्यान करुन आपल्या भविष्याला अंधाऱ्या विहीरीमध्ये ढकलण्याचेच काम करीत आहोत.''

धर्मेशने भाषणामध्ये मानव-जन्माच्या दुर्लभतेवर विवेचन करताना ह्या दुर्लभ मानव जीवनाचा आणि सर्वप्रकारच्या अनुकूल संयोगांचा आत्मकल्याण करण्यामध्ये सदुपयोग करण्याची प्रेरणा अशातऱ्हेने लोकांसमोर मांडली की असे वाटू लागले की **खरोखर आपल्या उरलेल्या आयुष्यातील एक क्षणदेखील मौज मजेमध्ये, विषयकषायामध्ये आणि इंद्रियांच्या भोगांमध्ये वाया घालविणे म्हणजे जणु अनंत कालासाठी अनंत दुःखांना आमंत्रण देणे आहे. नरक-निगोदामध्ये जाऊन अमर्यादित दुःखाच्या गर्तेमध्ये जाऊन पडणे आहे.**

धर्मेशने आपल्या भाषणात पुढे म्हटले - ''धन-धान्य, सोने-चांदी, राज्यकारभार वगैरे हे सर्व सांसारीक सुख तर अनंतवेळा मिळाले आहे, म्हणून

हे सर्व तर सुलभ आहे; परन्तु तत्त्वज्ञान अनादिकाळापासून आजपर्यंत मिळाले नाही, म्हणून अजूनदेखील त्याची प्राप्ति होणे दुर्लभ आहे.

**धन-कण-कंचन राज सुख, सबही सुलभ कर जान।**
**दुर्लभ है संसार में एक जथारथ ज्ञान॥**

म्हणून आता एक क्षणदेखील ह्या विषयकषायामध्ये आणि राग-द्वेषामध्ये फुकट दवडणे व वाया घालवणे उचित नाही. आणि ऐका! व्यवहारधर्म देखील आपण अनेक वेळा पाळला आहे. आपण तर एवढ्या वेळा दिगंबर मुनि झालो आहोत की जर आपण त्या पिंछी आणि कमंडलूंचा ढीग रचला तर सुमेरु पर्वताएवढा होईल, तरी देखील तत्त्वज्ञानाला स्पर्श केला नाही. म्हणून नुसत्या व्यवहारधर्मामध्ये अडकून न राहता ह्या जीवनामध्ये यथार्थ तत्त्वज्ञानाची प्राप्ति करावयाची आहे.

छहढाला मध्ये म्हटलेच आहे की –

**यह मानुष पर्याय सुकुल सुनवो जिनवाणी।**
**इह विध गये न मिले, सुमणि ज्यों उदधि समानी॥**

पहा, येथे 'इहविध गये' ह्या वर विशेष जोर आहे. इहविध म्हणजे अशाविधिने धनसंपत्ति कमाविता कमाविता, धनाचा वेगवेगळ्या भोगांच्या माध्यमातून उपयोग करता करता जर हे आयुष्य संपुष्टात आले तर पुनश्च अशी संधी मिळणे कठीण आहे; कारण हे विषयानंदी रौद्रध्यान आहे, ज्याचे फळ म्हणून आपणास नरकामध्ये अनेक सागर वर्षांपर्यंत अनंत दुःखं भोगावी लागतीत.

जो धमशास्त्रांच्या स्वाध्यायाला आपल्या जीवनाचे एक अभिन्न अंग बनवितो, तो तत्त्वज्ञानाच्या जोरावर हळु हळु आपल्या इच्छांना जिंकतो; आणि विषयांच्या निःसारपणाला चांगल्या तऱ्हेने ओळखू लागतो ह्यामुळे त्याला विषय-इच्छा व्यर्थ भासू लागते. तो आपल्या पुण्योदयाने प्राप्त झालेल्या, न्यायाने प्राप्त झालेल्या सामुग्रीमध्येच संतुष्ट राहतो. असा जीवच खरोखर धर्मात्मा आहे.''

धर्मेश पुढे म्हणाला – "आता आपणास धर्माहून धन महत्त्वाचे वाटते. अहो! ज्या धनाकरिता आपण असे वेडेपिसे होत आहोत, ते धन तर धर्मात्म्यांच्या चरणी लोळण घेत येते आणि धर्मात्मा त्याकडे ढुंकूनही पहात नाहीत. का पहावे त्याच्याकडे? आहे काय त्यात पाहण्यासारखे? म्हणून अर्थशास्त्राबरोबर जर धर्मशास्त्राचे देखील गहन अध्ययन केले गेले तर निश्चितपणे सन्मार्ग मिळणे सुलभ होऊ शकते –"

धर्मेशने आपले म्हणणे स्पष्ट करण्यासाठी म्हटले – "ज्या परिणामां (भावां) मध्ये आपण रात्रंदिवस मग्न आहोत, त्या आर्त-रौद्र भावांचे फळ तिर्यंच आणि नरक गति आहे."

धर्मेशने ही गोष्ट आपल्या भाषणामध्ये आगमाच्या आणि युक्तीच्या साह्याने सिद्ध करुन दाखविली. त्याने म्हटले – "जो चक्रवर्ती, चक्रवर्ती पदामध्येच मरतो, तो नियमाने नरकात जातो. आर्त-रौद्रध्यानामुळे मरणाऱ्यांना त्याचे फळ म्हणून कोण कोणत्या गति प्राप्त झाल्या आहेत ह्याचे विस्तृत वर्णन पहावयाचे असेल तर प्रथमानुयोगाची शास्त्रं वाचली तर सर्व गोष्टी लक्षात येतील."

संपत शेठजींनी अशा गोष्टी कधी ऐकल्याच नव्हत्या. ते तर रात्रंदिवस ह्या विषयानंदी रौद्रध्यानातच अडकलेले असायचे. म्हणून धर्मेशकडून आर्त-रौद्रध्यानासंबंधी गोष्टी ऐकून शेठजींच्या अंगावर काटा आला, त्यांचा थरकाप उडाला.

शेठजी विचार करु लागले की – "मी तर रात्रंदिवस ह्या भावांतच बुडालेला असतो, अरे बापरे! ह्या रौद्रध्यानाचे एवढे भयंकर फळ आहे?"

धर्मेशचे भाषण चालूच होते, त्याने पुढे म्हटले – "अनेक लोकांना तर हे देखील माहित नसेल की हे नरक-निगोद काय भानगड आहे? अहो! ह्या अशा हीन गती आहेत जेथे आपणास आपल्या पापाचरणाचे भयंकर फळ मिळते, अत्यंत दुःखी परिस्थितीत सागरोवर्षांपर्यंत दुःखं सहन करावी लागतात-जर त्यांना ही गोष्ट माहित असती तर हे लोक नाहक ह्या आर्त-रौद्रध्यानाच्या लफड्यात पडले नसते, ज्याच्या फलस्वरूप ह्या कुगति लाभतात. ह्याच्या अधिक खास माहितीसाठी छहढाला पहिली ढाल वाचली पाहिजे.

छहढालेच्या पहिल्या ढालीच्या आधारे नरकाच्या विविध दुःखांचे चित्रण करण्यासाठी धर्मेश म्हणाला – "जे लोक परिग्रहामध्ये मग्न राहून पाचही इंद्रियांच्या विषयांच्या विषयामध्ये सुख मानून त्यांच्या संग्रहामध्ये आणि भोगोपभोगामध्ये आपला अमूल्य वेळ वाया घालवितात, ते लोक नियमाने नरकामध्ये जातात, जेथे तृष्णा-भूक, थंडी-गरमी आणि परस्पर कलहाची अंतहीन असह्य दुःखं भोगावी लागतात."

धर्मेशने रौद्रध्यानाच्या फलस्वरूप प्राप्त होणाऱ्या नरकांच्या दुःखांचे वर्णन करताना छहढालाच्या काही ओळी गाऊन दाखविल्या, ज्या अशा आहेत –

**तीनलोक कौ नाज जु खाय, मिटे न भूख कणा न लहाय।**
**सिन्धु नीर तें प्यास न जाय, तो पण एक न बूँद लहाय॥**
**मेरु समान लोह गल जाय, ऐसी शीत उष्णता थाय।**
**जहाँ भूमि परसत दुःख इसो, बिच्छु सहस डसै नहीं तिसो॥**
**जहाँ राध श्रोणित वाहनी कृमि कुल कलित देह दाहनी।**
**तिल-तिल करें देह के खण्ड, असुर भिडावें दुष्ट प्रचंड॥**

धर्मेशचे मनाला भीडणारे भाषण सर्व श्रोते मंत्रमुग्ध होऊन शांतचित्ताने ऐकत होते. एवढ्यात एका नव्या श्रोत्याने भाषणाचा बेरंग करीत उभे राहून जोराने विचारले – "कोणी पाहिले आहेत नरक? जर नरक नसतीलच तर?"

धर्मेश शांतपणे म्हाणाला – "ठीक आहे. नरक जरी नसतील तरीदेखील सदाचारी आणि अहिंसक बनण्यामध्ये लाभच लाभ आहे, त्यात नुकसान काय आहे? आपण तर स्वस्थ आणि प्रसन्न तर रहातोच त्यामुळे इतर जीव देखील निर्भय होऊन जगतील.

वास्तविक आम्हीसुद्धा हीच इच्छा करतो की – अशा सुंदर सृष्टीमध्ये अशी पीडादायक नरकासारखी दुःखद जागा नसती पर फार बरे झाले असते. परंतु तुमच्या आमच्या इच्छा करण्याने किंवा विचार करण्याने काही होत नाही. विश्वाची व्यवस्था तर त्याच्या प्रकृतिनुरुपच होते.

तुम्ही थोडा वेळ कल्पना तर करा की – अहो, नरक निगोद असतील तर त्या दुराचारींचे काय होईल, ज्यांनी पापाचारापासून आपला मोर्चा वळविला नाही, जे रात्रंदिवस हिंसेतच लिप्त आहेत?

दुसरी गोष्ट, हे पहा! जे पाहिले नाही, ते नाहीच नाही; असे मानणे कोठवर योग्य आहे? तसे तर आपण आपल्या पितृवंशाच्या पूर्वजांनादेखील पाहिले नाही, तर मग काय ते होते की नव्हते? जर ते नव्हते तर आपण कोठून आणि कसे आलो असतो?

अशा तऱ्हेने आणखीनही अनेक युक्तिंनी व आगमाने नरक-स्वर्गाची सत्ता सिद्ध होते.

अहो! जर एखादा एखाद्या जीवाची हत्या करतो तर त्या बदल्यात त्याला एकच वेळ फाशीची शिक्षा होते. परंतु जो दररोज आपल्या स्वाद लोलुपतेसाठी अनंत जीवांची हिंसा करतो, त्याला अनंत वेळा फाशीची शिक्षा तर ह्या नरभवामध्ये मिळणे शक्य नाही. म्हणून असे एखादे ठिकाण अवश्य असले पाहिजे की जेथे प्रत्येक क्षणाला मरणतुल्य दु:ख असेल! बस्स, त्याच जागेचे नाव नरक आहे, जे रौद्रध्यानाच्या फलरूपाने मिळते. तत्त्वार्थसूत्रामध्ये म्हटले आहे की खूप आरंभ आणि खूप परिग्रहाच्या धारकाला नरक आयुचा बंध होतो आणि मायाचार करणाऱ्यांना तिर्यंच आयुचा बंध होतो.

अजून अधिक काय सांगावे? जर आपण सर्व पूर्ण पंधरा दिवस याल तर आपणाला येथील मोठ-मोठ्या विद्वानांच्या अनुभवाचा पुरा लाभ प्राप्त होईल.

धंदा व्यापार तर बारा महिने चोवीस तास चालूच असतो आणि सर्व संयोग तर पुण्याधीन आहेत, ज्याच्याकडे येतात तेव्हा छप्पर फाडून येतात आणि ज्याच्या नशीबात असत नाही तो रात्रंदिवस दुकानात बसून माशाच मारतो. म्हणून पुण्यपापावरसुद्धा थोडासा भरवसा ठेवून वेळ अवश्य काढा. अधिक काय सांगावे?"

शेठजीने उद्घाटनकर्त्याच्या रुपाने बोलण्यास हात जोडून नम्र स्वरामध्ये म्हटले – "आता धर्मेशने जे काही सांगितले ते अगदी सत्य आहे. आम्ही लोक व्यापारी खरे, पण खरोखर, व्यापार करणेसुद्धा आम्हाला अजून जमत नाही. आणि आता थोडे फार समजू लागले आहे की असली व्यापार तर आपण लोकच करीत आहात. आम्ही लोक तर शिळेपाके खात आहोत, जुन्या पुण्याचे फळ भोगत आहोत. नवीन कमाई तर आतापर्यंत केलीच नाही. त्याला व्यापारच कसे म्हणावे की ज्यामध्ये नुकसानच नुकसान असावे आणि पापच पाप असावे? खरोखर आत्मकल्याणाचा व्यापारच खरा अस्सल व्यापार आहे. मी आजपर्यंत आपणासारख्या सत्पुरुषांच्या व्याख्यानाची उपेक्षा करुन फार मोठी चूक केली-मी ह्यापुढे आपल्या प्रवचनांचा अधिकात अधिक लाभ घेण्याचा प्रयत्न करीन."

धर्मेश मनातल्या मनात खूप खूष झाला की शेठजींनी ध्यान देऊन भाषण ऐकले आणि थोडे तरी समजण्याचा प्रयत्न केला.

धर्मेशला असे वाटले की, शेठजींची समजण्याची शक्तिसुद्धां चांगली आहे, बुद्धि तर विलक्षण आहेच. जर ह्यांचे भवितव्य चांगले असेल तर त्यांचे कल्याण होईलच. हे पंडित लोक जे ह्या शेठ बरोबर आले आहेत, त्यांची आवडही ह्याबाजूला होऊ शकेल आणि जे जे ह्यांच्या जवळच्या संपर्कामध्ये असतील, ह्यांच्या प्रभावाखाली असतील; त्यांनासुद्धा तत्त्व जाणण्याची जिज्ञासा होऊ शकते.

असे जाणवायला लागले आहे की तत्त्वप्रचार-प्रसारासाठी चांगला काळ उदयास येऊ लागला आहे. अशावेळेला जेवढ्या लोकांपर्यंत जिनवाणी पोहोचेल तेवढे चांगलेच आहे.

उद्घाटनाचा कार्यक्रम पूर्ण झाला. शेवटी 'मैं ज्ञानानंद स्वभावी हूँ' ह्या आत्मगीताबरोबर सभा विसर्जित झाली. •

## १८

संपत शेठ धर्मेशच्या आश्रमात खास पाहुणे म्हणून एका दिवसासाठी आले होते, दुसऱ्या दिवसाचे परतीचे तिकिटसुद्धा बरोबर आणले होते. जास्त दिवस राहण्यासाठी त्यांच्याजवळ वेळच कोठे होता? मोठी माणसं ना ती?

मोठ्या माणसांना एक तर वास्तविक व्यग्रता तर असतेच; कारण व्यापार धंद्याव्यतिरिक्त अनेक संस्था त्यांना जोडल्या जातात आणि हो, गुळाच्या अवती भोवती माशा गुणगुणणे सहाजिकच आहे, त्यामुळे कोणी ना कोणी त्यांना घेरतातच.

आपला मोठेपणा दाखविण्याकरिता त्यांना कधी कधी ओढून ताणून कामाचा ताण दाखवावाच लागतो.

आरामात जीवन जगण्याची सवय पडल्याने खूप काळ घराबाहेर राहणे त्यांना कष्टदायक वाटते. प्रत्येक ठिकाणी एअरकंडीशन, फ्रिज, डनलॉपच्या गाद्या, हवेशीर खुला बंगला, नोकर-चाकर वगैरे घरासारख्या सोयी तर मिळत नाहीत.

हे सर्व असे असूनसुद्धा धर्मेशच्या एक तासाच्या प्रवचनानेच ते एवढे प्रभावित झाले की त्यांनी समस्त आगामी कार्यक्रम रद्द करुन, तसेच अनुकूलते-प्रतिकूलतेची पर्वा न करता, ज्या काही सुखसोयी शक्य होत्या, त्यामध्येच संतोष मानून पूर्ण पंधरा दिवस थांबून प्रवचनांचा लाभ प्राप्त करण्याचा निश्चय केला.

संपत शेठबरोबर आलेले, त्यांच्या विद्यालयात कामावर असलेले पंडित गुणधरलाल, विद्याभूषण विवेक शास्त्री आणि बुद्धिप्रकाश यांना शेठजींच्या ह्या आकस्मिक परिवर्तनाचे आश्चर्य वाटले. ते परस्पर आपापसात बोलू लागले.

पं. गुणधर म्हणाले – “शेठजींना अचानक हे काय झाले? एवढे मोठे परिवर्तन! जे घरातून केवळ कुतुहलवश एक दिवसासाठी आले होते, ज्यांना अशा तात्त्विक प्रवचनामध्ये खास रुचि नव्हती, ते केवळ एक तासाच्या प्रवचनाने एवढे प्रभावित व्हावेत! अशी कोणती जादू केली आहे धर्मेशने?

वरीष्ठ विद्याभूषण म्हणाले – “आहे बुवा! धर्मेशच्या प्रवचनामध्ये तर जादूचा असर आहेच, व्यवहारामध्यें माधुर्य आहे आणि स्वभाव मनमिळाऊ आहे. पहा ना! लहान सहान बालकांपासून ते मोठमोठ्या विद्वानांना किती प्रेमाने आणि आदराने बोलावतात, प्रेमळ विचारपूस करतात. जणु साक्षात करुणा आणि प्रेमाची मूर्ति असावी! प्रवचनांमध्ये श्रोत्यांचा नामोल्लेख करुन जागरुक तर करतातच, त्यांना महत्त्व देऊन त्यांच्यामध्ये आपलेपणा प्रस्थापित करतात. अध्ययन देखील किती कमालीचे आहे? शास्त्राधाराशिवाय तर बोलतच नाहीत.”

विवेक शास्त्री विचार करु लागला – शेठ तर भावनावश आहेतच पण हा पंडित विद्याभूषण सुद्धा कामातूत गेला! असो. तो आपल्या मित्रांना म्हणाला – “बरं बरं ठीक आहे. आता बडबड बंद करा आणि लवकर निघा. प्रवचन सुरु होऊ लागले आहे. उशीरा पोहोचलो तर… काय तुम्हाला माहीत नाही की सर्वांच्या नजरा आपल्यावरच असतात त्या?” शेठ बरोबर सर्व विद्वान जसे प्रवचनमंडपात पोहोचले तेव्हा धर्मेशने त्यांना आदराने पुढे बोलावले.

धर्मेशला शेठजीच्या धार्मिक अज्ञानाची कींव तर वाटत होतीच. आपले म्हणणे समजावतां समजावतां मध्येच ते करुणेच्या स्वरात प्रवचनात म्हणाले –

“शेठजी! सत्तर–बहाहत्तर पावसाळे तर आपण पाहिलेच असतील? मनुष्याचे आयुष्य किती आहे? अधिकात अधिक शतायुषी झाला तरी वीस–पंचवीस वर्ष अधिक मिळतील, भरवसा तर एका क्षणाचादेखील नाही. समजा दहा–वीस वर्षे जरी अजून मिळाली तरीदेखील ‘अर्द्धमृतक’ समान म्हातारपणात दिवस घालवावे लागणार आहेत. जर तत्त्वज्ञानाशिवाय आपले हे आयुष्य निघून गेले तर मग पुढचा जन्म कोठे/कोणत्या योनीत लाभेल, ह्याचा आपणास अवश्य विचार केला पाहिजे.

रात्रं-दिवस झोपेत-जागेपणी, उठता-बसता, खाता-पिता आपला जो बहुतांशी अप्रशस्तभाव असतो त्याचे काय फळ मिळेल? ह्या गोष्टीवर आम्ही कधी विचार केला आहे कां? जर आपण मरुन डास बनलो तर आपली मुलेच आपल्यावर डी.डी.टी. शिंपडून मारतील. जर आपल्या घरच्या खाटेमध्ये ढेकूण म्हणून जन्मलो तर आपल्याच घरातील बायका घासलेट शिंपडून आपले प्राण घेतील. जर कुत्रा-मांजर झालो तर म्युनिसिपालिटीकडून पकडायला लावून मारले जाऊ. जर गाय, म्हैस, बैल वगैरे पशु झालो तर तेथे रहाण्यास एअरकंडीशन, डासापासून बचाव करण्यासाठी 'गुडनाईट' आणि झोपण्यासाठी डनलॉपच्या गाद्या कोठून मिळतील? अरे, खाण्यासाठी मालक जे सडलेले-खराब झालेले अन्न बनवून ठेवेल तेच खावे लागेल.

भगवान आदिनाथाच्या पूजेमधील जयमाला जरा लक्षपूर्वक वाचा तर खरे, तेथे म्हटले आहे -

**ऊँट बलद भैंसा भयो, जापै लदियो भार अपार हो।**
**नहि चाल्यो जठे गिर पर्यो, पापी दे सोटन की मार हो॥**

जर ऊंट, बैल, रेडा, गाढव, घोडा बनलो तर शक्तिपेक्षा कित्येकपटीने अधिक भार लादून जुंपले जाईल; आणि पुढे चालला नाही तर सोट्याने मार बसेल, लाथा बुक्क्यांचा मार खावा लागेल; नाक छेदले जाईल, चोवीस तास बांधून ठेवले जाईल. आणखी काय काय होईल? जरा कल्पना करुन तर पाहूया! जेष्ठ महिन्याची गर्मी, माघ महिन्यातील थंडी आणि मुसळधार पावसामध्यें तहानलेले-भुकेजलेले खुल्या आकाशात उभे रहावे लागेल. सर्व काही गुपचुप सहन करावे लागेल. बोलण्या-चालण्या लायक जीभ सुद्धां मिळणार नाहीं."

धर्मेशने विषयाचा विस्तार करताना पुढे म्हटले -

"जर एकेंद्रिय-द्वींद्रिय, तीन इंद्रिय बनलो तर, तर दुःखाबद्दल काय सांगावे? चिरडले जाऊ, तुडविले जाऊ, घाणेरड्या गटारात पडल्या पडल्या वळवळू, आगीत जळले जाऊ.

मासा, कोंबडी, डुक्कर, बकरा, हरीण ह्यासारखे दीन हीन पशु झालो तर मांसाहारींकडून जिंवत जाळून, शेकून, तुकडे करुन करुन खाल्ले जाऊ.

जर आपण चारही गतीतील अनंतकाळापर्यंतची दुःखं सहन करु इच्छित नसाल तर आपल्या वर्तमान परिणामांना पारखून घ्यावे आणि त्या परिणामांच्या फळाबद्दल शास्त्रामध्ये जे लिहिले आहे त्यावर विचार करावा. आणि मग आपण आपल्या उरलेल्या आयुष्याचा कशा तऱ्हेने उपयोग करावयाचा त्याचाही विचार करावा.

ह्या समाजाचे खरे-खोटे पुढारीपण, न्याय-अन्यायाने कमावलेले हे धन, स्वार्थाचे साथी असलेले हे कुटुंबातील नातेवाईक कोठवर आपणाला साथ देतील? काय सम्राट सिकंदराच्या बाबतीत आपण ऐकले नाही? त्याने अनेक देशांत लुटमार करुन करोडो-अब्जो रुपायांच्या संपत्तिवर आपला कब्जा केला होता. शेवटी त्याच्या लक्षात आले की मृत्यूने दरवाजा ठोठावला आहे. तेव्हा त्याला आपण केलेल्या पापाबद्दल पश्चाताप वाटू लागला.

तो विचार करु लागला - अरे! मी हे काय केले? तेव्हा त्याने स्वत: सांगितले की, 'माझी संपत्ति माझ्या प्रेतयात्रेबरोबर नेण्यात यावी आणि माझ्या मुडद्याचे दोन्हीं हात बाहेर ठेवावेत त्यामुळे जगातील लोक माझ्या प्रेतयात्रेवरुन काही धडा शिकतील आणि झाले असेच.

त्यांच्या अंतिम इच्छेनुसार संसाराच्या असारतेचे आणि लुटालुटीच्या दुःखी परिणामांचे ज्ञान करविण्याच्या उद्देशाने त्याच्या प्रेतयात्रेबरोबर सारा लुटीचा माल मिरवणुकीच्या रुपाने पाठीमागे ठेवला. आणि त्याचे दोन्ही रिकामे हात ताटीच्या बाहेर ठेवले गेले.

एक फकीर त्या बरोबर गात चालला होता -

**सिकंदर बादशाह जाता, सभी हाली मवाली हैं**
**सभी है साथ में दौलत, मगर दो हाथ खाली हैं**''

धर्मेशचे प्रवचन ऐकून तर शेठ सद्‌गदितच झाले. अहो नुसते शेठच काय, त्यावेळी तर सर्वांचे डोळे पाणावले. लोक रुमाल काढून आपले डोळे पुसू लागले.

पंडित विवेक शास्त्री आपल्या मित्रांना म्हणू लागला – "अहो! धर्मेशच्या वाणीमध्ये जोर तर आहेच, परंतु त्याचे प्रवचन तर लोकांना चूर चूर करुन गेले. म्हणून तर लोक म्हणतात की एखादा एकदा का तेथे गेला तर तो तेथलाच होऊन जातो. असो, जे काही झाले, ते सर्व चांगलेच झाले; परंतु आता आपला काय विचार आहे? तुम्ही घरी येणार आहात की आपण देखील शेठजीबरोबर साधू बनण्याचा विचार करीत आहात? शेठ तर भावूक आहेतच, तुमचा काय विचार आहे?"

विद्याभूषण म्हणाला – "मी तर थांबणार आहे बाबा! माझ्या घरी कोणती लहान लहान मुलं रडायला आहेत ? सगळे आपापल्या पायावर उभे आहेत, मला काय चिंता ? आणि मी तर असे म्हणेन की तू देखील थांब. तुझ्या बाबतीतही तुझी वाट बघणारे कोण आहे? न बायको, न मुलं! एकटा जीव सदाशिव आहेस तू. कोणत्या मायाजाळामध्ये तू अडकला आहेस, काही समजत नाही."

त्याला उत्तर देत विवेक म्हणाला – "तू म्हणतोस ते बरोबर आहे; परन्तु पुन्हा एकदा नीट विचार करा-लोक काय म्हणतील? एवढे मोठे पंडित! काय ह्यांना अशिक्षित धर्मेश एवढेसुद्धा ज्ञान नाही की जे तेथे त्याला ऐकण्याकरितां थांबले? आणि लोक हे सुद्धा म्हणू शकतील की ज्या गोष्टी धर्मेश सांगत आहेत आणि जर त्या बरोबर आहेत तर ह्या विद्वानांनी आम्हाला अगोदर का नाही सांगितल्या?

अशा तऱ्हेने आपली मोठी बेअब्रु होईल-ह्यामुळे आपल्याला ह्याविरुद्ध एखादी अशी योजना बनवावी लागेल की, ज्यामुळे कमीत कमी आपली अब्रु तरी वाचेल."

अशा तऱ्हेने ऊहापोह करीत करीत गुणधर आणि विवेक शास्त्री तर आपल्या खोट्या प्रतिष्ठे करिता अर्धवट शिबिरातून घरी परत गेले परंतु विद्याभूषण आणि बुद्धिप्रकाश ह्यांचे मत परिवर्तन झाले होते, म्हणून ते संपत शेठ बरोबर शिबिरामध्ये पूर्ण पंधरा दिवस थांबलेच शिवाय शिबिरानंतरसुद्धा एक महिना थांबून त्यांनी तत्त्वज्ञानाचा भरपूर लाभ घेतला. •

# ११

गेल्या काही दशकांपासून धर्माची साधना केवळ पूजापाठ, विधि-विधान, व्रत-उपवास, जपा-तपापर्यंतच मर्यादित झाली होती. स्वाध्यायामध्ये केवळ कथा-पुराण वाचण्याचीच प्रथा उरली होती. फार काही झाले तर तो त्यागी-व्रती व पंडित-वर्ग करणानुयोगाचे गुणस्थान, मार्गणास्थान वगैरेंची स्थूल चर्चा करुन आपल्यामध्ये संतुष्ट होत होता. एका प्रकारे अध्यात्माची धारा गोठली गेली होती. ह्यामुळे धर्मध्यानाच्या मर्यादा पुण्य-पापापर्यंतच मर्यादित होऊन राहिल्या होत्या. वीतरागतेच्या धर्मधामापर्यंत पोहचतच नव्हत्या.

धर्माची ही अवस्था पाहून धर्मेशला विचार आला - "लौकिक गोष्टी सांगणारे लौकिकजन तर खूपच आहेत. धर्मपुरुषांकडून विशुद्ध धर्मोपदेश आणि तत्त्वचर्चाच अपेक्षित असते. नाहीतर दुसरा कोण बरे करेल ही धार्मिक-अध्यात्म चर्चा की ज्यायोगे हा जैनधर्म जिवंत आहे व जी जैनदर्शनाचा प्राण आहे!

दया-दान, खाणे-पिणे, पूजा-पाठ वगैरे गोष्टी तर सर्व दर्शनांमध्ये जवळ जवळ सारख्याच आहेत. जैनधर्माचे जर काही खास वैशिष्ट्य असेल तर ते एकमेव अध्यात्मच आहे आणि त्यामुळेच तो अन्य दर्शनांहून वेगळा आहे. म्हणून ह्याची चर्चा कोणत्याही परिस्थितीत झालीच पाहिजे."

धर्मेशला हे जाणवले की अध्यात्माचे क्षेत्र पूर्णपणे रिकामे झाले आहे. म्हणून त्याचे रिकामेपण भरुन काढण्याचा त्याने मनोमन संकल्प केला.

धर्मेशचा हा निर्णय आणि संकल्प योग्य वेळी योग्य तोच निर्णय आहे हे शाबित झाले. लोकांमध्ये तत्त्वज्ञानाप्रति जिज्ञासा जागृत झाली आणि दिवसेंदिवस चोहीकडून लोक धर्मेशकडे येऊ लागले.

त्याने विचार केला - ज्या दर्शनामध्ये समयसार, प्रवचनसार सारखे वस्तुस्वरूपाचे निरुपण करणारे; सर्वज्ञता, अकर्तृत्ववाद आणि वस्तुस्वातंत्र्याला सिद्ध

आणि प्रसिद्ध करणारे ग्रंथ असावेत आणि मोक्षमार्गप्रकाशक सारखा सन्मार्गदर्शक दीपस्तंभ असावा, तेथे ह्या अध्यात्मिक दृष्टिहीनतेचा अंध:कार कां? अध्यात्माचा उगम झालेल्या ह्या भूमिवर हे अध्यात्मिक दारिद्रय कां? हेच समजत नाही.

अध्यात्मिक वातावरणाच्या कमतरतेचे एकमेव कारण अरुचि आणि अपरिचयच आहे. ह्या दिशेने प्रयत्न केला गेला तर अपेक्षेप्रमाणे लाभ होऊ शकतो.

असा विचार करुन धर्मेशने नियमित प्रवचन आणि वर्ग सुरु केले. हळु हळु अध्यात्माचा सुगंध चोहीकडे पसरु लागला.

थोड्याच दिवसात धर्मेशबद्दल खूप चर्चा होऊ लागली. त्याच्या बाबतीत वेगवेगळे लोक वेगवेगळ्या प्रकारच्या गोष्टी करु लागले.

एकजण म्हणाला, "धर्मेशच्या वाणीमध्ये न जाणो अशी काय जादू आहे की त्याच्या प्रवचनाला सगळे, शांतभावाने बसले असता मनातल्या मनात असे समाधानी होतात की जणुं ते आनंद सागरात डुंबू लागले आहेत."

दुसरा म्हणाला – "हो बाबा, पहा ना! भले तो श्रीमंत असो, मोठ्यातला मोठा विद्वान असो, लोकमान्य राजकीय नेता असो, जिल्हाधीश, न्यायाधीश, वक्ता कोणीही असो, सर्व जण त्याच्या व्यक्तिमत्वावर आणि वाणीवर मोहित होतात.

जरी धर्मेश संस्कृत-प्राकृत जाणत नव्हता, परंतु त्याच्या सत्याच्या शोधामध्ये कोठे कसर राहिली नव्हती. जिनवाणी रुपी ज्ञानगंगेमध्ये खोल वर डुबकी मारुन आला होता.

ही छोटीशी ज्ञानचर्चा एवढ्या लवकर एवढे विशाल रूप धारण करेल ह्याची धर्मेशला देखील कल्पना नव्हती.

त्या प्रचार-प्रसारामध्ये धर्मेशची हार्दिक इच्छा, व्यवस्थित विचार, उदारवृत्ति, गुण-ग्राहकता, निश्चलवृत्ति, सरलस्वभाव, नियमित दिनचर्या, सत्य शोधणारी सूक्ष्मदृष्टि आणि प्राप्त तत्त्वज्ञानाचा प्रचार-प्रसार करण्याची नि:स्वार्थ, पवित्र आणि प्रबळ भावनाच मुख्य कारणं होती. त्यामुळेच देशाच्या कानाकोपऱ्यांतून धर्मप्रेमी आणि तत्त्वरसिक लोक त्याला जोडले जात होते."

•

## २०

टण...टण....टण असे घड्याळांत नऊ टोल पडताक्षणीच ॐकार ध्वनिसह धर्मेशचे सकाळचे प्रवचन सुरु झाले.

त्यांनी सांगितले – "विपरीतमिथ्यात्व, एकांतमिथ्यात्व, विनयमिथ्यात्व, संशयमिथ्यात्व आणि अज्ञानमिथ्यात्वाला वशीभूत होऊन आपण अशी घोर पापं केली आहेत की ज्यांचे वर्णन ह्या वाणीने करता येत नाही. जसे आलोचना पाठामध्ये विस्ताराने म्हटलेच आहे."

विपरीत मिथ्यात्वामुळे होत असलेल्या जीवाच्या सर्वात मोठ्या चुकांचे उदाहरण देताना धर्मेशने समजावले – "ज्याप्रमाणे एखादी व्यक्ति खऱ्या हिऱ्याला तर ओळखत नाही आणि काचेलाच हिरा समजून काचेच्या बदल्यात हिऱ्याची किंमत देईल तर त्याची फसगतच होईल. त्या प्रमाणे एखादा वीतराग-सर्वज्ञ देवाला ओळखणार नाही आणि त्यांच्याऐवजी मोही-रागी-द्वेषी देवगतितल्या देवाला अथवा अन्य अदेवाला देव मानून भगवाना प्रमाणे पूजू किंवा मानू लागला तर तो वीतरागतारूप हिरा तर त्याच्या हाती लागणार नाहीच शिवाय मोक्षरूपी रत्नत्रयाचा व्यापार सुद्धा होणार नाही. मोह-राग-द्वेष यांच्या भानगडीतच अडकला जाईल.

जे स्वत: दु:खी आहेत, ते आपणास सुखी कसे करतील? अशा तऱ्हेने वीतरागी देवाऐवजी विपरीत रागी-द्वेषी देवगतितल्या देवांना मानणारा-पूजणारा विपरीत मिथ्यादृष्टी आहे.

अशातऱ्हेने ज्ञानानंदस्वभावी, अनादिअनंत, अखंड अनंत, चिन्मात्र ज्योतिस्वरूप आत्म्याच्या स्वरूपाला जाणत-ओळखत नाही आणि विपरीत जड देहाला व चेतन जीवाला एक मानून किंवा जड देहालाच चेतन जीव मानून

जीवाला ज्ञानानंदस्वभावाच्या विपरीत सुखी-दु:खी, नाशवान, रागीद्वेषी-मोही मानले तर तो विपरीत मिथ्यादृष्टि आहे; कारण त्याने आत्म्याच्या स्वरूपाला यथार्थ न जाणतां जीवतत्त्वाची विपरीत श्रद्धा केली.

अशाप्रकारे जे अजीव तत्त्वाला अजीव न मानता शरीराच्या उत्पत्तिमध्ये आपल्या आत्म्याची उत्पत्ति, शरीराच्या नाशामध्ये आत्म्याचा नाश मानून विपरीत श्रद्धा करतात-तसेच आस्रव आणि बंध तत्त्व जे आत्म्याचे विकार आहेत, दु:खदायी आहेत त्यांचे अवलंबन घेण्यात आनंद मानतात, संवर-निर्जरा जे सुखद व सुखस्वरूप आहेत त्यांना कष्टदायक मानतात. मोक्षाला कर्मबंधापासून मुक्तिच्या रुपामध्ये सिद्धस्वरूप न मानता वेगळ्या रुपाने आत्म्याचे स्वतंत्र अस्तित्वच समाप्त झाले असे मानतात, असे सगळे लोक विपरीत मिथ्यादृष्टि आहेत.

अशातऱ्हेने सात तत्त्वांच्या बाबतीत झालेली विपरीत मान्यता विपरीत मिथ्यात्व आहे. छहढाला मध्ये म्हटले देखील आहे -

**ताको न जान विपरीत मान, करि करै देह में निजपिछान**

दुसरी चूक एकांत मिथ्यात्वाच्या रुपाने होत असते - ह्या मिथ्यात्वाच्या प्रभावामुळे जीवाला अनेकांतमय धर्मामध्ये दृढ आस्था/श्रद्धा उत्पन्न होत नाही. विश्वातीत सर्व पदार्थ अथवा वस्तु (द्रव्य) अनंत धर्ममय आहेत, अनंत गुणमय आहेत, अनंत शक्ति संपन्न आहेत. वस्तुंमध्ये वस्तुत्वपणाला उत्पन्न करणाऱ्या परस्पर विरोधी शक्तींना धर्म किंवा अंत असे म्हणतात. 'अनेके अन्त: येषां ते अनेकान्त:।' ह्या सूत्रवाक्यानुसार ज्या वस्तुं (द्रव्यां) मध्ये परस्पर विरोधी अनेक गुण, धर्म किंवा शक्ती असतात, त्या सर्व वस्तूंचे एक नाव अनेकांत आहे. जो वस्तुंच्या अशा अनेकांत स्वरुपाला न मानता फक्त त्यांच्या कोणत्याही एका धर्माचा अथवा स्वभावाचा स्वीकार करतात, ते एकांत मिथ्यादृष्टि आहेत.

आत्मा अनादि-अनंत असल्याने नित्यदेखील आहे आणि प्रत्येक समयाला परिणमनाच्या अपेक्षेने क्षणिक किंवा अनित्यसुद्धा आहे; परंतु केवळ नित्यच मानणे अथवा केवळ अनित्यच मानणे हा एकांत आहे. आत्म्याप्रमाणेच इतर सर्व पदार्थांनासुद्धा नित्य किंवा अनित्यच मानणे एकांतमिथ्यात्व आहे.

ह्या जगाच्या सर्व वस्तुंमध्ये अस्ति-नास्ति, एक-अनेक, भिन्न-अभिन्न, सत्-असत् वगैरे परस्पर विरोधी अनेक धर्म (स्वभाव) आहेत. त्यांना नयसापेक्ष न मानता सर्वथा अस्तिरूप किंवा नास्तिरुपच मानणे, एकांत धरुन एक रुपच अथवा अनेकरुपच मानणे; वास्तविक आत्मवस्तु अभेद अखंड असल्याने एकसुद्धा आहे आणि गुणभेद असल्याने अनेक देखील आहे - परन्तु एकांत मिथ्यादृष्टि असे मानत नाही. बस्स, हेच त्याचे एकांत मिथ्यात्व आहे. अशा तऱ्हेने आणखीन समजून घेणे. उदा. काही जण 'पुरुषार्थानेच कार्य होते'- असा पुरुषार्थाचा एकांत करुन अन्य समवायांचा सर्वथा निषेध करतात, तर काहीजण भाग्याच्या भरवशावरच पुरुषार्थाचा निषेध करतात, वास्तविक कार्य होण्यामध्यें सर्व समवायांचे आपापले स्थान आहे. हां, कथनामध्यें कोठे एखादा मुख्य असतो तर एखादा गौण.

पं. टोडरमलजींनी जैन एकांतींना तीन वर्गांमध्ये विभागले आहे -

(१) निश्चयाभासी (२) व्यवहाराभासी (३) उभयाभासी.

**कोऊ नय निश्चय से आत्मा को शुद्ध मान,**
**भयो है सुछन्द न पिछाने निज शुद्धता।**
**कोऊ व्यवहार-दान-शील-तप भाव को ही,**
**आत्मा को हित मान छांडत न मुद्धता॥**
**कोऊ नय निश्चय व व्यवहार के मारग को,**
**भिन्न-भिन्न पहचान करै निज उद्धता।**
**जब जाने निश्चय के भेद व्यवहार सब,**
**कारण है उपचार माने तब बुद्धता॥**

तिसरी मोठी चूक विनय मिथ्यात्वाच्या रुपाने होते; कारण 'विनय' पाप देखील आहे आणि पुण्य देखील आहे आणि धर्म देखील! मिथ्यात्वामध्ये 'विनय मिथ्यात्व' सर्वात मोठे पाप. षोडशकारण भावनेमध्ये 'विनयसंपन्नता भावना' सर्वात मोठे पुण्य; तसेच तपामध्ये 'विनय नावाचे तप' सर्वात मोठा धर्म आहे – तिघांच्या नामसादृश्यामुळे भ्रम होण्याची शक्यता अधिक आहे; म्हणून त्यांना बरोबर चांगल्या तऱ्हेने समजून विनयमिथ्यात्व सोडण्यायोग्य – त्याज्य – आहे.

रागी-द्वेषी आणि विषयकषायांमध्ये लिप्त झालेले कुगुरु, कुदेव व कुधर्माला देखील मानणे, पूजणे तसेच वीतरागी देवांना सुद्धा मानणे-पूजणे; वीतरागी व रागी देव आणि निर्ग्रंथ व सग्रंथ गुरुंना समान आदर देणे – हे विनय मिथ्यात्व आहे. असे करण्याने वीतरागी देवांचा आणि निर्ग्रंथ गुरुंचा अवर्णवाद तर होतोच शिवाय भोळ्या जीवांचा भ्रम वाढण्याच्या व सन्मार्गापासून चलित होण्याच्या शक्यता वाढतात. काही लोक ह्याला धार्मिक उदारता, हृदयाची विशालता, सरळपणा वगैरे गोष्टींचे गोंडस रूप देण्याचा प्रयत्न करतात, जे खरोखर योग्य नाही. एखाद्याची निंदा न करणे, टीका-टिप्पणी न करणे विवादग्रस्त विषयांविषयी न बोलणे वगैरे वेगळ्या गोष्टी आहेत आणि सर्वांना एकसारखा आदर-सन्मान देणे किंवा पूज्यत्वाचा भाव ठेवणे बिलकुल वेगळी गोष्ट आहे – उदारपणाच्या नावाखाली दोघांना एका जातीचे समजणे चुकीचे आहे. धर्माची श्रद्धा बिलकुल व्यक्तिगत विषय आहे, ह्यामध्ये सामाजिक एकता किंवा राष्ट्रीय एकता वगैरे सूत्रं बिलकुल बाधा आणणारे नाहीत. म्हणून येथे सर्वात जास्त विवेकाची आणि जागरुकतेची आवश्यकता आहे."

संशय मिथ्यात्वाचे स्पष्टीकरण करण्याकरिता धर्मेशने संशय मिथ्यादृष्टिंच्या विचाराबद्दल ऊहापोह करताना म्हटले – "संशय मिथ्यादृष्टि विचार करतो की, ह्या कळिकालामध्ये प्रत्यक्ष जाणणारा सर्वज्ञ तर नाही; शास्त्रांची कथनं परस्पर जुळत नाहीत; सर्व धर्मांच्या साधुंचे देखील एकमत नाही. जैनदर्शनामध्ये जर सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्राला मोक्षमार्ग म्हटले आहे, तर अन्य मतामध्ये

एखाद्याने फक्त ज्ञानालाच मुक्तिचा मार्ग म्हटले आहे तर एखाद्याने भक्तीला! सर्व मतवाले वेगवेगळा मार्ग दाखवितात. काही निश्चित सांगता येत नाही की कोण खरा आहे आणि कोण खोटा? म्हणून ज्या धर्ममार्गावर आमचे वाडवडील चालत आले आहेत तेच ठीक आहे. तत्त्वाची ओळख नसणाऱ्या अज्ञानींची अशी अनिश्चितता हेच संशय मिथ्यात्व आहे.''

अज्ञान मिथ्यात्वाची व्याख्या करताना धर्मेशने समजाविले – ''हिताहिताची परीक्षा केल्याशिवाय जो भाव असतो ते अज्ञान मिथ्यात्व आहे. ज्यांचे असे विचार आहेत की स्वर्ग-नरक किंवा मोक्ष कोणी पाहिला आहे? स्वर्गाच्या बातम्या कोणापाशी आल्या आहेत? पाप-पुण्य काय चीज आहे? हे कोठे होतात? कोणाला चिकटतात? अरे, स्वर्ग-नरक हे सर्व 'बोलाचीच कढी बोलाचाच भात' आहे. नुसते सांगण्यापुरते आहे – धर्मवेड्या – भोळ्या घाबरट लोकांना घाबरविण्यासाठी व त्यांना घाबरवून त्यांना लुबाडण्याचा धंदा आहे. खरे पाहता येथेच सर्व स्वर्ग-नरक आहेत. सुखी जीवनच स्वर्ग आहे आणि दुःखी जीवनच नरक आहे.

पुण्य-पाप व धर्म-अधर्मापासून सर्वथा अजाण अज्ञानी मिथ्यादृष्टि जीव अशाप्रकारच्या गोष्टी करुन सर्वज्ञ आणि सर्वज्ञ कथित तत्त्वांचा निषेध करतात तसेच पाच पापामध्ये आणि पाच इंद्रियांच्या विषयामध्ये स्वच्छंद प्रवृत्ति करतात. भक्ष्य-अभक्ष्याचा काही पत्ता नाही, नीति-अनीतिचा काही विवेक नाही, देव-अदेव-कुदेवाचा काहीदेखील निर्णय नाही असा अज्ञानरूप अभिप्रायच अज्ञान मिथ्यात्व आहे.

अशी मान्यतावाले लोक म्हणत असतात की 'जेव्हा जे होईल तेव्हा पाहता येईल'. अशा तऱ्हेने मनाचे समाधान करण्यापुरते त्यांचे विचार चांगले ठरु शकतात, परन्तु हा काही त्या प्रश्नावरील तोडगा नव्हे. हे तर संकटाला पुढे ढकलण्यासारखे आहे. किंवा त्याकडे कानाडोळा करण्यासारखे आहे. वास्तविक प्रश्न समोर ठेवून त्याचे योग्य उत्तर शोधणे हेच शहाणपणाचे आहे.

हे पाच प्रकारचे मिथ्यात्व गृहीतदेखील असते आणि अगृहीतदेखील. ह्याला वश होऊन जीव घोरपाप करतो. म्हणून सर्वात प्रथम आगमाच्या अभ्यासाने अज्ञान मिथ्यात्वाचा मुळापासून नाश करायला पाहिजे, तरच सन्मार्ग मिळू शकेल.

शेवटच्या पाचव्या प्रकारचे जे अज्ञान मिथ्यादृष्टि जीव पुण्य-पाप, पुनर्जन्म, आत्मा-परमात्मा आणि सर्वज्ञाच्या अस्तित्वावर विश्वास ठेवीत नाहीत, त्यांना ह्यांच्या आस्तित्वाचे ज्ञान करविण्यासाठी एवढे म्हणणेच पुरेसे होईल की पुण्य-पाप, नरक-स्वर्ग कोणी पाहिले नाहीत तर आपल्या पूर्वजांनादेखील कोणी पाहिलेले नाही. तर मग ते होते की नाही? ज्या तर्काच्या आधारे तुम्ही ह्यांना मानता, त्याच तर्काच्या आधारे स्वर्ग-नरकाची सिद्धि होते.

जरा विचार करा – आपल्या सर्वांचे चेहरे एक सारखे नाहीत, बुद्धिदेखील एक सारखी नाही, आर्थिक आणि पारिवारिक परिस्थिति देखील एक सारखी नाही – शेवटी असे का व्हावे? त्याचे उत्तर असे होऊ शकते – सर्वांचे परिणाम एक सारखे नसतात. पुण्य-पापाचा बंध झाला. त्याच्या फलस्वरूपच हे वैविध्य आढळते. जर असे नसते तर जन्मतःच एखादा सुखी किंवा दुःखी का आहे? जर पुनर्जन्मच नसता तर जन्मतःच व्यक्ति प्रतिभावान असू शकत नाही; ज्याला लोक ईश्वराची देणगी म्हणतात किंवा 'गॉडगिफ्ट' मानतात. ते खरोखर दुसरे तिसरे काही नसून पूर्वजन्माचे संस्कारच आहेत."

धर्मेशने म्हटले – "बंधुंनो! आपण जैन असल्याकारणाने एवढे तर आपण जाणतच असाल की, जैनधर्म श्रद्धा आणि भावनाप्रधान धर्म आहे. सम्यक् आणि मिथ्या श्रद्धा आणि शुभाशुभ भावांनीच धर्म-अधर्म व पुण्य-पाप होते, बाह्य शारीरिक क्रियांमुळे नव्हे. परंतु बाह्य शारीरिक क्रिया देखील अंतरंग भावांचेच अनुसरण करतात. जर आत्म्यामध्ये क्रोध भाव आला तर चेहऱ्यावर देखील क्रोधाची चिन्हं दिसू लागतात, भुवई ताणली जाते, डोळे लाल होतात, ओठ फडफडू लागतात, शरीर थरथर कापू लागते.

परंतु ध्यानात ठेवावे, पापबंध अंतरंग आत्म्यामध्ये झालेल्या क्रोध भावानेच होतो, बाह्य शारीरिक विकृतिमुळे नव्हे. शारीरिक हालचाली तर फक्त अंतरंग भावांची अभिव्यक्ति करतात, त्यांच्यामुळे पुण्यपाप होत नाही.

अशातऱ्हेने जेव्हा अंतरंगात जिनेंद्र भगवानाच्या भक्तिचा शुभभाव होतो तेव्हा शरीरामध्ये तदनुकूल यथायोग्य अष्टांग नमस्कार, तीन प्रदक्षिणा वगैरे शारीरिक क्रियादेखील होतातच."

अंतरंग-बहिरंग व्याप्तिचे ज्ञान करविताना धर्मेश पुढे म्हणाले - "ज्यांच्या अंतरंगामध्ये पूर्ण समताभाव असेल, वीतराग परिणति असेल तर बाहेर त्यांची परमशांत मुद्राच दिसून येईल. न हसरी न उदास. असाच अंतरंग व बहिरंग भावांचा सहज संबंध असतो. ह्यालाच निमित्त-नैमित्तिक संबंधदेखील म्हणतात.

एवढ्यासाठीच म्हटले जाते की, 'भावना-भवनाशिनी-भावना भववर्धनी' म्हणजे भावांमुळेच भव अर्थात संसारामध्ये जन्म-मरणाच्या दुःखाचा नाश होतो आणि भावांमुळेच जन्म-मरणाचे दुःख वाढते."

पाचही प्रकारच्या मिथ्यात्व आणि शुभाशुभ भावांच्या सामान्य चर्चेनंतर हिंसा-अहिंसा वगैरेची चर्चा करताना धर्मेश म्हणाला - "पूर्ण पवित्र भावनेने, पूर्ण काळजी घेऊनसुद्धा आणि डॉक्टरांच्या रोग्याला वाचविण्याच्या प्रामाणिक प्रयत्नानंतरसुद्धां जरी ऑपरेशन टेबलवरच रोग्याचा अंत झाला तरी डॉक्टरला दोषी मानले जात नाही, हिंसाजनित पापबंधही होत नाही. तसेच चार हात पुढील जमीन पाहून चालूनसुद्धा जर पायाखाली एखादा सूक्ष्म जीव मेला तरी मुनिराजांनासुद्धा हिंसेचा किंचितही दोष लागत नाही.

**आत्म्यामध्ये रागादि भावांची उत्पत्ति होणेच हिंसा आहे तसेच आत्म्यामध्ये रागादि भावांची उत्पत्ति न होणेच अहिंसा आहे – हाच जिनागमाचा सार आहे.**

तात्पर्य हे आहे की जैनदर्शनामध्ये पुण्य-पाप आणि धर्म-अधर्म जीवांच्या भावांवर आणि श्रद्धेवर अवलंबून आहे. ज्या कार्यामध्ये जशी श्रद्धा आणि भावना जोडल्या असतील, कर्मफल त्यानुसारच प्राप्त होईल.

हिंसा-अहिंसेप्रमाणेच असत्य, चोरी, कुशील आणि परिग्रह वगैरे पाप आणि धर्म-अधर्माच्या बाबतीत समजून घ्यावे. आत्म्याला घातक असल्याने असत्य, चोरी, कुशील व परिग्रह पापदेखील हिंसेमध्येच गर्भित आहेत. सर्व आत्मघातक असल्याने हिंसेचीच विविध रूपं आहेत आणि ती महादु:ख देणारी असल्याने सर्वथा त्याज्य आहेत. परंतु नीट समज नाही तरीदेखील लोकांनी त्याना केवळ खेळणेच कां समजले आहे? शिकार करण्यासारखी संकल्पी हिंसा, कुशील सारखे अनर्थकारी पाप व जुगार व नशेसारख्या दुर्व्यसनांनासुद्धा ज्या लोकांनी मनोरंजनांची साधनं बनविली आहेत त्यांच्या दिवाळखोर बुद्धिमत्तेबद्दल काय बोलावे? खरोखर बटाटे भरले आहेत ह्यांच्या डोक्यात, डोळ्यावर अज्ञानाची पट्टी बांधली आहे.... खरोखर ....

असे बोलता बोलता धर्मेशचा गळा दाटून आला आणि तो गप्प बसला.

वेळही जवळ जवळ संपतच आली होती. जिनवाणीच्या स्तुतिबरोबर सभा विसर्जित झाली, सर्व लोक भावनाविवश होऊन आपापल्या घरी परतताना रस्त्यात प्रवचनाबद्दल चर्चा करीत जात होते.

एकजण म्हणाला - "हे मिथ्यात्व देखील काय बला आहे? आत्मारूपी घराच्या कोपऱ्यामध्ये उंदराप्रमाणे कोठे कोठे लपून बसते आणि तत्त्वज्ञानाच्या महत्त्वपूर्ण दस्तावेजांना, संयम आणि सदाचाराच्या भारी कपड्यांना कुरतडते."

दुसरा म्हणाला - "हां पहा ना, विपरीत, एकांत, विनय, संशय आणि अज्ञान मिथ्यात्व धर्माचा वेष धारण करुन जीवाबरोबर धोकेबाजी करण्यामध्ये कसर

करीत नाहीत. चलाख तर केवढे आहेत? मी मी म्हणणाऱ्या पंडितांना देखील संभ्रमांत टाकून परस्पर लढायला लावते. वेगवेगळे पक्ष निर्माण करुन सर्वांचे नेतृत्व करु लागते."

तिसरा म्हणाला – "म्हणून तर गुरुदेव धर्मेशने सावध केले आहे की, ह्या मिथ्यात्व भावांपासून सावध रहा आणि ह्यांच्या चालबाजीला समजण्याचा प्रयत्न करा. नाहीतर हे पुन्हा जीवांना अचेतनासारखे होऊन अनंतकाळ रहावे लागेल अशी हवा खाऊ घातल्याशिवाय रहाणार नाहीत."

चौथा म्हणाला – "जर आपण लक्षपूर्वक ऐकले असेल तर गुरुदेवांनी एके दिवशी आपल्या प्रवचनामध्ये मिथ्यात्वावर सांगत असताना लाटी संहितामधील एक श्लोक सांगितला होता ज्याचा भावार्थ असा आहे – मिथ्यात्वासहित जीवन जगण्यापेक्षा सर्पमुखात प्रवेश करणे चांगले आहे; विषभक्षण करणे चांगले आहे. दावाग्निमध्ये भस्म होणे किंवा पाण्यात बुडून मरणे चांगले आहे परंतु मिथ्यात्वासह जीवन जगणे कोणत्याही परिस्थितीत चांगले नाही. कारण ह्या सर्व कारणांमुळे तर एकच भव नष्ट होतो, परंतु मिथ्यात्वामुळे अनेक भवांमध्ये दुःख भोगावे लागते.

मिथ्यात्व हे सर्व पापांचे मूळ आहे, पापरूपी वृक्षाचे बीज आहे, नरकरूपी घराचे प्रवेशद्वार आहे, स्वर्ग आणि मोक्षाचा शत्रु आहे.[१]

म्हणून हे भव्य जीवांनो! तुम्ही ह्याला दुरुनच नमस्कार करा, ह्याला आपणा जवळ भटकूं देऊ नका."

चौथ्या व्यक्तिच्या तोंडून गुरुदेवांचा हा संदेश ऐकून सर्व श्रोत्यांनी संकल्प केला की सर्वात प्रथम ह्या मिथ्यात्वाला मुळापासून उखडण्याचा प्रयत्न करु. तेव्हाच आपले सर्व प्रयत्न सार्थक होतील. ●

---

१. वरं सर्प मुखं वासो, वरं च विषभक्षणम्।
अचलाग्नि जले पातो, मिथ्यात्वे च जीवितम्॥
सकल दुरित मूलं, पाप वृक्षस्य बीजम्।
नरक गृह प्रवेश स्वर्ग मोक्षैक शत्रुम्॥

# २१

धर्मेश आपल्या दैनंदिन कार्यक्रमानुसार संध्याकाळच्या भोजनानंतर आपल्या मित्रांबरोबर व शिष्यांबरोबर फिरण्यास जात होते, रस्त्यामध्ये एके दिवशी एका घरातून सुंदर स्वरामध्ये एक आध्यात्मिक भजन ऐकू आले. धर्मेशजींचे लक्ष त्या भजनाच्या शब्दावर गेले व ते ते भजन कान देऊन ऐकू लागते. भजनातील शब्द असे होते –

**परिणति सब जीवन की, तीन भाँति वरनी।**
**एक पुण्य एक पाप, एक राग हरनी॥**
**तामें शुभ-अशुभ अन्ध, दोय करे कर्मबंध।**
**वीतराग परिणति ही, भव समुद्र तरनी॥ परिणति० ....**

बरोबरच्या एका व्यक्तिने विचारले – "गुरुदेव! आपण चालता चालता का थांबलात? काय विशेष आहे या संगीतामध्ये?"

धर्मेश म्हणाले – "संगीतामध्ये तर काही खास बात नाही; परंतु भजनाचा प्रत्येक शब्द फार मोलाचा आहे, विचारणीय आहे. पहा नां, काय म्हटले आहे? जर भवसमुद्रातून पार व्हायचे असेल तर वीतराग परिणतिरूप तरणी (नौका) च आपणास ह्या संसार सागरातून पार करु शकते. म्हणून आपणास शुभाशुभ भावांमुळे मलीन झालेल्या आपल्या परिणतिचा त्याग करुन जसे शक्य असेल तसे-मरण ओढवले तरी स्वत:मध्ये वीतराग परिणति उत्पन्न करण्याचा पुरुषार्थ करावयास हवा.

आपल्या ह्या मिथ्यात्वाने मलीन, कषायाने कलुषित, तसेच रागाने रंगलेल्या परिणतिची आपणास माहितीच नाही. सगळे आपापल्या रंगामध्ये मदोन्मत्त झाले आहेत. कोणाला देखील ही पर्वा नाही की अशा परिणतिमध्ये आपले मरण झाले तर मेल्यानंतर आपण कोठे जाऊ? कोणती गति असेल आपली?

म्हणून आज का न ह्या विषयावर ज्ञान चर्चेच्या वेळी चर्चा करावी? त्यामुळे लोकांनी ह्या बाबतीत विचार करावा आणि निरंतर होत असलेल्या आर्त-रौद्रध्यानरूप वाईट परिणतिच्या दुष्परिणामापासून वाचू शकावे.''

संध्याकाळचे सात वाजत होते. धर्मेश आपल्या ठरलेल्या विषयानुसार चर्चा करण्यासाठी आसनावर जाऊन बसले. सात वाजेपर्यंत सर्व श्रोतेदेखील हळु हळु जमा होत होते. जेथे जागा मिळेल तेथे गुपचुप बसत होते.

धर्मेशने मनमोहन यांना पुढे बोलावले तेव्हा तेथे बसलेल्या सर्वांच्या नजरा प्रवेशद्वारातून येणाऱ्या मनमोहनकडे वळल्या. अनेकांचे चेहरे प्रश्नांकित झाले. गुरुदेव मनमोहन सारख्या व्यक्तिला एवढा सन्मान का बरे देत आहेत?

त्यांना काय माहीत होते की धर्मेशने मनमोहनला जीवदान दिले होते. मृत्यूच्या दाढेतून वाचविले होते. ही गोष्ट फक्त धर्मेश आणि मनमोहन ह्यांनाच माहित होती. इतरांना कोणाला माहीत नव्हते. धर्मेशची सहानुभूति आणि प्रेम मिळाल्याने मनमोहनला कृतार्थ झाल्यासारखे वाटले. तो पुढे जाऊन गुपचुप खाली नजर करुन बसला. दोन मिनिटे झाली तरी कोणाकडून कोणताही प्रश्न न विचारला गेल्यामुळे धर्मेशच्या मनामध्ये जे ध्यानासंबंधी चिंतन चालू होते, त्यालाच सुरु करण्यासाठी त्याने आपल्या समोर बसलेल्या मनमोहनच्या चिंताक्रांत चेहेऱ्याला आपल्या प्रकरणाचा मुद्दा बनवून म्हटले -

''मनमोहन, तुमच्या चेहऱ्यावर जे हावभाव आम्ही पहात आहोत, ते भाव तुमच्या मनातील भावांना दाखवित आहेत की तुम्ही यावेळेस कोणत्या भावामध्ये विचरण करीत आहात. तुमचे मनोगत तुमच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे झळकत आहे. निश्चितपणे तुमची परिणति एखाद्या कषायाच्या दुष्टचक्रामध्ये अडकली आहे, रागद्वेषाच्या जंजाळात अडकली आहे, मोह-मायेमुळे मलिन होत आहे अथवा एखाद्या संयोग-वियोगाच्या शंकेच्या वादळामध्ये किंकर्त्तव्यमूढ होत आहे.

तुम्ही जाणत आहात का कि ह्या परिणति रुपामध्ये तुम्हाला कोणते 'ध्यान' होत आहे? आणि ह्याचे फळ काय मिळेल?

धर्मेशचे म्हणणे ऐकून मनमोहन अवाक् झाला. तो मनातल्या मनात विचार करु लागला कि – ध्यान? मी तर आज पर्यंत कोणतेही ध्यान केले नाही. ध्यान करणे तर साधु-संतांचे काम आहे. पित्याच्या निधनानंतर मला तर रात्रंदिवस तेल, तूप, मीठ, मिरची, तांदूळ आणि कुटुंबाच्या चिंतेमध्ये धर्मध्यान करण्याची गोष्टतर सोडा-ह्याबद्दल विचार करायला सुद्धा फुरसत नव्हती. काय चिंता-फिकीर करणे देखील ध्यान होऊ शकते? माझ्या चेहऱ्यातर चिंता दिसू शकते परंतु त्या भावावरुन धर्मेश काय समजले? मी तर ह्या बाबतीत काही बोललो सुद्धा नाही. हे अंतर्यामी केव्हापासून बनले? कमाल आहे.

मनमोहनला गुपचुप पण चिंतेत गर्क असलेला पाहून धर्मेश म्हणाले –

"मी समजलो की तुम्ही काय विचार करीत आहात? कोणत्या चिंतेत पडला आहात? मनमोहन तुम्ही व्यसनातून तर मुक्त झाला आहात; परंतु पश्चात्तापाच्या आगीमध्ये अजूनसुद्धा जळत आहात, तुम्हाला माहीत नाही, ही शोक संतप्त परिणति देखील तुम्हाला ह्या संसार सागरातून पार होऊ देणार नाही.

हा एक सहजच योगायोग आहे की आज अनायासे तुम्ही चर्चेमध्ये आला आहात आणि आजच अनायासे जीवांच्या विविध परिणतिंचा परिचय करविणारे असे क्रांतिकारी मार्मिक भजन माझ्या ऐकण्यात आले, ज्याने माझ्या मनातील विचारांना ढवळून काढले आणि मी त्यावेळेसच निश्चय केला की आजच्या ज्ञानचर्चेमध्ये आपण जीवांच्या परिणतिचीच चर्चा करावी. तुम्हाला चिंताग्रस्त पाहून मला ही चर्चा अधिक उपयुक्त वाटू लागली-खरे आहे, जेव्हा एखादे चांगले काम व्हावयाचे असेल, तेव्हा अशा गोष्टी सहजच जुळून येतात. योग्य निमित्त देखील आपोआप जुळून येतात. मी जाणतो आहे की तुम्ही ज्या भावामध्ये वावरत आहात, ते कोणते ध्यान आहे. तुम्ही ह्या वेळेला हे काही सांगू शकणार नाही. परंतु माझ्या प्रश्नामुळे तुमच्या मनात जी उलथा-पालथ झाली आहे, जे प्रश्न डोळ्यासमोर उभे आहेत, जी जिज्ञासा जागृत झाली आहे, ती जिज्ञासाच तुम्हाला तुमच्या प्रश्नांची उत्तरे हुडकण्यास विवश करेल."

मनमोहनने नम्रतेने म्हटले – " गुरुजी, जीवांच्या विविध परिणामांची ओळख करुन देणारे ते भजन आणि त्यातील ते क्रांतिकारी भाव आम्हीसुद्धा जाणू इच्छितो, जर शक्य असेल तर आज ह्याच विषयावर चर्चा झाली तर आमच्यावर मोठी मेहरबानी होईल."

धर्मेशने सुरुवात केली – "अहाहा! काय भावपूर्ण भजन होते ते! पूर्वीच्या कवींची काव्य रचना आणि भाषा शैली तर सरस होतीच, परंतु भाव देखील किती अप्रतिम कमालीचे आहेत ह्या आध्यात्मिक भजनामध्ये!

**'परिणति सब जीवन की तीन भाँति वरनी।'**

ह्या भजनामध्ये जीवांच्या भावांचा परिचय देताना कवि म्हणतो की 'शुभ आणि अशुभ दोन्ही परिणाम अंध आहेत आणि कर्मबंधाचे कारण आहे.' अहा! एकमेव वीतराग परिणामच भवसमुद्रातून तारणारी नौका आहे, संसारसागरात गटांगळ्या खाणाऱ्या जीवांना तरुन नेणारी नौका आहे.

ज्याप्रमाणे नाव जीवांना नदी किंवा समुद्राच्या ह्या किनाऱ्यावरुन किंवा प्रवाहाच्या मध्यातून पलिकडच्या किनाऱ्यावर पोहोचवते, त्याप्रमाणे वीतराग परिणतिरूप नाव जीवांना संसार सागर तरुन नेते, भवसमुद्र पार करुन देते."

धर्मेशद्वारे प्रस्तुत केलेल्या चर्चेचा रस वाढतच होता एवढ्यात मनमोहन मध्येच म्हणाला- "गुरुजी, आपले म्हणणे बिलकुल वाजवी आहे, खरे आहे; परंतु आमच्यासारख्या पापी जीवाने काय करावे? कमीत कमी आम्हासारख्यांना तर आता पाप सोडण्याचा व पुण्य करण्याचाच उपदेश उपयोगी आहे. आम्हा लोकांमध्ये तर अजून माणूसकी देखील नाही, प्रथम आम्हाला माणूस तर बनू द्या, मगच भगवान बनण्याच्या गोष्टीला अर्थ उरेल नाही कां?

मनमोहनचे हे मध्येच बोलून विषयामध्ये अडथळा आणणे लोकांना आवडले नाही. एक जण दुसऱ्याच्या कानात म्हणाला – "धर्मेश गुरुजींनी ह्या मनमोहनला पुढे काय बोलावले, ह्याला तर एकदम भावच चढला, हा एकदम फारच शेफारला आहे. कोण्या एका विचारवंताने योग्यच म्हटले आहे – छोट्या व्यक्तिला आवश्यकतेपेक्षा अधिक मान मिळाला तर तो त्याला पचत नाहीं."

शेजारचा एकजण म्हणाला –" काय रे, तुम्ही काय माणसं आहात? काही ऐकू द्याल कां उगीच बडबडत बसाल? बोलणे काही ऐकू द्याल की स्वत:चा आणि दुसऱ्याचा वेळ वाया घालवत बसाल?"

मनमोहनचे बोलणे ऐकून सुरुवातीला धर्मेश थोडेसे हसले नंतर धीर गंभीर होऊन म्हणाले –"अहो! पाप सोडण्याचा उपदेश तर सारी दुनिया परस्पर एकमेकाला देतच असते – आणि दिला पण पाहिजे. परंतु येथे विचार करण्यासारखी गोष्ट अशी आहे की जे पापी पाप करतात, मनापासून ते देखील त्याला वाईटच मानत असतात परंतु नाईलाजास्तव करीतच राहतात आणि वेळो वेळी 'पापाचा त्याग केला आहे' असे देखील जाहीर करतात. आता तुम्हीच सांगा–अशा उपदेशाने किती जणांनी सोडले आहे पाप करण्याचे? हे बंधुंनो! तत्त्वज्ञानाशिवाय पापप्रवृत्ति सुटत नाही. कषायांच्या मंदते–तीव्रतेमध्ये पापाची हीनाधिकता तर होतच रहाते; परंतु पाप मुळासकट जातच नाहीत.

अहो! जेव्हा पापं वाईट असतात हे छोटी मुलंदेखील जाणतात, तर मग त्यासाठी उपदेशाचीदेखील काय गरज उरते? तरी देखील असा उपदेश देणारे पावलो पावली आढळतातच. पाप करण्यापासून पत्नी थांबविते, आई–वडिल समजवितात, मुला–मुलींबद्दलचे प्रेम आडवे येते, शेजाऱ्यापाजाऱ्यांची लाज पाप न करण्याची अप्रत्यक्ष प्रेरणा देते. एखादा जर कायेने पाप करीत असेल तर त्याला सरकार शिक्षा देते, वाणी ने जर अखादा पाप करीत असेल तर समाज त्याचा बहिष्कार करतो, मनावर देखील धर्माचा अंकुश लागतोच. पाप न करावे ह्याची प्रेरणा देण्यासाठी काय येवढे सर्व कमी पडत असेल काय? की मलादेखील तुम्हीं याचाच उपदेश देण्याचा आग्रह करीत आहात आणि ते देखील वीतरागी तत्त्वचर्चेच्या ठिकाणी?

जरासे आत्मनिरीक्षण करा. कुठे असे तर नाही नां की वीतराग चर्चेला बंद करविण्यासाठी तुमच्या अंतरंगात दडलेला मोहराजा तुम्हाला असे सांगण्यास प्रेरीत करीत आहे? कारण मिथ्यात्व राजाला वीतरागी चर्चेची चीड आहे. म्हणून जेथे जेथे वीतरागी चर्चेची योजना बनविली जाते तेथे ह्या मिथ्यात्वाद्वारे अशा

तऱ्हेचे विद्रोही वातावरण निर्माण केले जाते. म्हणून आपल्या अंतरंगात दडलेल्या मोह मिथ्यात्वरूपी शत्रुला ओळखा आणि वीतरागी चर्चेला नकार देऊ नका.

अरे बाबा! शुभ परिणाम आपापल्या ठिकाणी चांगले आहेत, म्हणून तर त्यांचे नाव शुभ आहे, अशुभ परिणामाप्रमाणे ते शुभ परिणाम देखील भवसमुद्र पार करण्यासाठी 'तरणी' (नाव) बनू शकत नाही; कारण दोन्हीही रागापासूनच बनलेले आहेत. राग परिणामच पुण्य-पापरूप आहेत, ज्यांचे फळ संसार आहे आणि वीतराग परिणाम धर्मरूप आहेत, ज्यांचे फळ मोक्ष आहे. म्हणून वीतराग परिणतिलाच 'भवसमुद्र तरणी' असे म्हटले आहे.

ज्याप्रमाणे लौकिकातील नदी-समुद्र पार करण्यासाठी नाव लाकडाचीच बनविली जाते. लोखंड वगैरे धातुंची नाही. त्याचप्रमाणे भवसमुद्र पार करावयाचा असेल तर वीतराग परिणामरूप लाकडाचीच तरणी बनेल, रागरूपी धातूची नव्हे.

**होय, जेवढे सहकार्य-मदत-लाकडी नाव बनविण्यामध्ये लोखंडी खिळे, नट-बोलटांचे असते तेवढे सहकार्य वीतराग परिणामाबरोबर शुभरागाचे होऊ शकते; परंतु नाव लाकडाचीच म्हटली जाते, लोखंडाची नव्हे.''**

धर्मेशकडून आगम, युक्ति आणि उदाहरणांनी समजावून देखील तत्त्वज्ञान माहीत नसल्याने मनमोहन काही समजू शकला नाही; परंतु एवढे निश्चित समजले की धर्मेश खरोखर धर्मात्मा आहे, फार मोठा ज्ञानी पुरुष आहे आणि तो देखील पापाला सर्वथा वाईटच मानतो तसेच पुण्य कार्याला सुद्धा यथायोग्य प्रेरणा देतो. शुभकार्य करतो देखील पण शुभामध्ये अडकत नाही. जो काही धर्मेशच्या विरुद्ध प्रचार आहे, ती सर्व मोहाचीच महिमा आहे. अज्ञानाचा जोर आहे. खरोखर धर्मेश देवता आहे, देवमाणूस आहे. जसे नाव आहे तसेच काम देखील आहे.

अशातऱ्हेने मनमोहन धर्मेशच्या चर्चेबाबतीत पूर्ण समाधानी होता. त्याला असे वाटले-खरोखर ऐकण्यासारख्या गोष्टी तर ह्याच आहेत. असा विचार करता-करता तो आपल्या भूतकाळात हरवला व आतापर्यंत झालेल्या आपल्या परिणामांचे तो आत्मनिरीक्षण करु लागला.

धर्मेशने मनमोहनला संबोधून पुन्हा म्हटले – "अहो मनमोहन! कोठे हरवलात? काय विचार करीत आहात? कोणाचे ध्यान करु लागलात? आत्मध्यानाशिवाय मिथ्यात्वाच्या भूमिकेमध्ये जो काही विचार कराल किंवा आतापर्यंत करीत आलात, ते सर्व आर्त-रौद्रध्यानच आहे. ह्याचा कधी विचार केलात का की काय फळ मिळेल या आर्त-रौद्र भावांचे? कधी धर्मध्यानसुद्धा केले की नाही?

सावरून बसत मनमोहन म्हणाले – "आमचे कसले हो ध्यान? आम्हाला काय माहीत ध्यान करण्याचे? खरोखर आम्ही तर पापी आहोत, रात्रंदिवस पापाचेच चिंतन चालते, पापाच्या धुनमध्येच धुंद असतो आम्ही! ध्यान करणे तर फार मोठी गोष्ट आहे, आम्ही तर ध्यानाची व्याख्या देखील जाणत नाही. त्यामुळेच हातातल्या माळा फिरविता-फिरविता युगंन् युगं गेली पण मन काही फिरले नाही.

कबीरने ठीकच म्हटले आहे –

**माला फेरत जुग गया, गया न मन का फेर।**
**कर का मनका डार दे मन का मनका फेर॥**

गुरुजी, मी आपणापासून काय लपवूं? आपण तर माझे ज्ञान-गुरु आहात, सन्मार्ग दर्शविणारे आहात, मी स्वतःच्या आयुष्यात खूप पापं केली आहेत. आपणास माहित असेल किंवा नसेल,परंतु सत्य हे आहे की माझ्या व्यसनापायी माझी पत्नी मोहिनी तर आयुष्यभर त्रासात राहिलीच, परंतु माझ्या दोन्ही कन्या सुनंदा व सुनयना यांनासुद्धा सुख मिळाले नाही, त्यांचे देखील सारे आयुष्य दुःखमय झाले, व्यर्थ गेले.

त्यांना पाहून माझे मन आत्मग्लाग्निमुळे एवढे भरले आहे की आता आणखी काय करावे काही सुचतच नाही. धर्मक्रियेमध्येसुद्धा मन बिलकुल रमत नाही. त्यांच्या दुःखाच्या कल्पनेनेच अंगावर शहारे येतात, काळीज कापते, डोल्ळयातून अश्रुधारा वहाण्याचे थांबत नाहीत. काही समजत नाही आता मी काय करावे?

अशा परिस्थितीमध्ये ध्यान करणे तर फारच लांबची गोष्ट आहे, ध्यानाबद्दल काही विचार करणे समजणेसुद्धा शक्य वाटत नाही. मी आजपर्यंत ध्यान वगैरे काही केलेच नाही. ध्यानाच्या नावाखाली कधी मिनिट दोन मिनिट देखील बसलो नाही. मी काय विचार करु त्याच्या फळाबाबतीत? काय अपेक्षा करु त्याच्या फळाची? जेव्हा ध्यानाचे बीजच पेरले नाही तर फळ कोठून प्राप्त होईल? कसे प्राप्त होईल?....''

बोलता बोलता मनमोहनचा गळा भरुन आला, कंठ दाटला, तो पुढे बोलू शकला नाही.

धर्मेशना मनमोहनच्या अशाच प्रकारच्या उत्तराची अपेक्षा होती; कारण त्यांना हे तर माहीत होते की, जी व्यक्ति रोज देवदर्शनसुद्धां करीत नाही तो काय जाणे संसार वाढविणारे आर्त-रौद्र ध्यान आणि धर्मध्यान? तो तर अरिहंत सिद्धाच्या नावाने माळा फिरविण्यालाच ध्यान समजत होता.

धर्मेशचा प्रश्न फक्त धर्मध्यानाच्या विषयामध्ये होता, ध्यानाच्या विषयी नव्हता. परंतु मनमोहनला येवढे सूक्ष्म समजण्याची पात्रता कोठे होती? मनमोहनच काय पण आणखीन कित्येक जण असे असतील की ज्यांना धर्मध्यान व आर्त-रौद्र ध्यानाची ओळख नसेल.

तसे पाहिले असता मनमोहनच काय कोणताही संज्ञी पंचेंद्रिय ध्यानाशिवाय कधी राहू शकत नाही. ही गोष्ट वेगळी की **जेथे ध्यान असत नाही, तेथे त्याच ध्यानाची भावना असते.** परंतु ते देखील एकप्रकाराने ध्यानच आहे. कारण कर्मबंधाच्या अपेक्षेने ध्यान व भाव ह्यामध्ये काही खास फरक पडत नाही.

कदाचित धर्मध्यान नसेल, परंतु आर्त-रौद्रध्यान तर मनमोहन सदैव करीतच होते. परंतु आर्त-रौद्रध्यानाने केवढे मोठे पाप आपण करीत आहोत ह्याचा त्याला पत्ताच नव्हता. खरोखर ह्या आर्त-रौद्रध्यानाला तर कोणी पापच मानायला तयार नाही.

मनमोहनने स्वतःला सांभाळून आपले म्हणणे चालू केले – ''धर्मेशजी! माझी कथाच मोठी विचित्र व वेगळी आहे. आपण तर फक्त एवढेच जाणता

की मी आपला बालमित्र अमितचा सासरा आहे. कदाचित ह्यापेक्षा अधिक आपणास माझ्या बाबतीत काही माहिती नाही… कधी वेळ मिळताच मी माझी कथा आणि व्यथा सांगून माझ्या मनातले ओझे कमी करु इच्छितो. आता ती दुर्दैवी कथा सांगून मी आपला आणि या जिज्ञासू जीवांचा अमूल्य वेळ बरबाद करु इच्छित नाही, परंतु काय करु? सांगितल्या शिवाय देखील गप्प रहावत नाही. जर आपली परवानगी असेल तर ….''

धर्मेशने विचार केला – ह्याच्या मनाचे ओझे हलके करण्यासाठी ह्याच्या मनात घिरट्या घालत असलेल्या दु:खाच्या ढगांना पाऊस पाडण्यास वेळ द्यावाच लागेल, नाहीतर आपली होत असलेली सर्व चर्चा ह्याच्या डोक्यावरून जाईल, डोक्यात घुसणार नाही. भावनांचा निचरा तर झालाच पाहिजे.

ह्याची व्यथा आणि कथा कदाचित शक्य आहे की आपणा सर्वांना प्रथमानुयोगाप्रमाणे प्रेरणादायक व धडा देणारी ठरेल! ह्याच्यावर जो प्रसंग ओढविला आहे तो देखील पुण्य-पापाचाच तर खेळ आहे!

अशा तऱ्हेचा विचार करुन धर्मेश हसत उत्तरले – ''सांगा! सांगा!! अवश्य सांगा. आम्ही सर्व मन लावून ऐकू. ही वेळ देखील प्रश्नांची उत्तरेच – समस्यांचे समाधान-करण्यासाठीच आहे. नंतर आणखीन वेळ कधी असणार आहे? जर तुम्हाला सर्वांसमक्ष सांगण्याला संकोच वाटत नसेल तर अवश्य सांगा.

मनमोहनने मनातल्या मनात विचार केला – सर्वांच्या समोर सांगण्यामध्ये संकोच कसला? जेव्हा जगासमोर पापाचरण करण्यामध्ये संकोच केला नाही, तर गुरुतुल्य धर्मेश आणि साधर्मी लोकांसमोर सांगण्यामध्ये आता कसला संकोच? मी सर्वांसमोर सांगून आपल्या पापाचे प्रायश्चित्त करीन.

असा निश्चय करुन ते म्हणाले – ''धर्मेशजी, जवानीच्या जोषामध्ये, तारुण्याच्या तोऱ्यामध्ये व्यक्ति 'होश' घालवून बसतो. त्या उपरांत जर आर्थिक अनुकूलता असेल तर मग त्याबद्दल काय बोलावे?

माझे वडिल तर फार मोठे व्यापारी होते, जमीन जुमला, पैसा-अडकादेखील त्यांच्या जवळ खूप होता, शेतीपासून, सावकारी केल्याने, व्यापारामुळे भरपूर पैशाची आवक असायची. त्यांच्या देखरेखीखाली सर्व कामे मुनीम आणि गुमास्तेच करीत होते. वडिलांचा पुण्यप्रताप असा होता की त्याच्या प्रभावाने मोठमोठे बुद्धिशाली आणि बलशाली लोक त्यांच्या सेवेला सदैव हजर रहात होते आणि त्यांच्या इशाऱ्यावर नाचत होते. त्यांच्या आज्ञेचे उल्लंघन करण्याची कोणाची टाप नव्हती.

सामाजिक कार्यात ते अग्रगण्य होतेच, राजकारणातही त्यांचा बोलबाला होता. ह्या सर्व कारणांमुळे माझे बालपण मोठ्या राजेशाही थाटातच गेले, तरुण झाल्यावरदेखील मला कशाचीही जबाबदारी जाणवली नाही. आपमतलबी मित्रांबरोबर रागरंग आणि मौज-मस्ती करण्यात वेळ जाऊ लागला. बस, अशातच माझे लग्न झाले.

दुर्दैवाने काही दिवसातच माझे वडील वारले. अचानक पतिच्या मृत्यूने माझी आई वेडीपिशी झाली. माझी विषयासक्त वृत्ति आणि बेजबाबदारी यांचा फायदा घेऊन हळु-हळु जमिनी त्यावर कामावर असलेल्या शेतकऱ्यांनी हडप केल्या. सावकारी मुनीम-गुमास्त्यांनी आपापसांत संगनमत करुन हस्तगत केली. योग्य देखरेख नसल्याने व्यापार-उद्योग देखील ठप्प झाला. घेण्या-देण्याच्या गडबडीमध्ये धोका दिला ह्या खोट्या सबबीवरुन मला दोन वर्षाचा कारावास झाला. पापोदयाच्या एकाच वादळामध्ये सर्व काही मातीमोल झाले. बायको, मुलगा व मुली सर्व बेसहारा झाले. आज त्यांची जी दशा झाली त्या नुसत्या कल्पनेनेच अंगावर काटे उभारतात.''

आपली कर्मकहाणी सांगता सांगता मनमोहनचा गळा दाटून आला. पुढे तो सांगू शकला नाही.

धर्मेशने त्याला सांत्वन करीत म्हटले – ''बंधू! दुःखी होऊ नका. ह्याने देखील पापबंध होतो. हा सर्व तर आपल्या पाप-पुण्याच्या उदयाचा खेळ आहे. ही पाप-पुण्यं काय काय करतात. ते त्यांनासुद्धा फक्त ज्ञानाचे ज्ञेय बनवून सोडून द्या, त्यामुळे प्रभावित होऊ नका.''

एक श्रोता मध्येच उठून मोठ्या नम्र आवाजात सांत्वनपर म्हणाला, – ''अहो! आपल्या जीवनातील ह्या घटनांनी तर जणु पौराणिक पुरुष राजा सत्यंधरच्या इतिहासाची पुनरावृत्तिच केली आहे. आपली राणी विजयाच्या मोहामध्ये मूर्च्छित झालेल्या सत्यंधराच्या चारित्राबद्दल लिहिताना शास्त्रात योग्य तेच म्हटले आहे –

**विषयासक्त चित्तानां गुण को वा न नश्यति।**
**न वैदुष्यं न मानुष्यं, नाभिजात्यं न सत्यवाक्॥**

विषयामध्ये आसक्त चित्तवाल्यांमध्ये असे कोणते गुण आहेत, जे नष्ट होत नाहीत? त्यांच्या जीवनात न विद्वत्ता राहते, न माणूसकी राहते, न मोठेपणा राहतो आणि न सत्यवचनही रहाते.''

मनमोहनला जाणवले आणि त्यांनी त्याचा स्वीकारही केला व बोलले – ''होय बाबा, आपण बिलकुल खरे बोलत आहात. जेव्हा एकेका विषयामध्ये आसक्त जीव आपला प्राण घालविण्यास मागेपुढे पहात नाही, तर पाच इंद्रियांच्या विषयामधील आसक्त जीवांबद्दल काय सांगावे? ह्याचे प्रत्यक्ष उदाहरण हा मी आपणासमोर उभा आहे. म्हणून जर आपले कल्याण इच्छित असाल तर सदैव ह्या इंद्रियांच्या विषयांपासून दूरच राहिले पाहिजे.''

आज चर्चेची वेळ मनमोहनच्या बोलण्यामध्येच पुरी झाली परंतु सर्वांना असे वाटले की हेदेखील एक फार मोठे काम झाले. ह्या प्रसंगामुळे मनमोहनच्या जीवनामध्ये एक क्रांतिकारक बदल तर झालाच परंतु अशा गोष्टीच्या अंमलात असणाऱ्या लोकांचा देखील फायदा होईल.

सर्वांच्या मनात हाच विचार थोड्याफार फरकाने आला की चर्चा तर फार चांगली झाली व सर्वांना फायद्याची ठरली. ध्यानाची चर्चा आज नाही तर उद्या – कधीतरी होईल. ह्या आशेने चर्चा संपुष्टात आली. सगळे आपापल्या घरी परतले. •

# २२

रात्रीचे चांदणे पडले होते, सुखद मोसम होता, रात्रीचे आठ वाजत आले होते. ज्ञानचर्चा पंधरा मिनिटे अगोदरच संपली होती. रोजच्या प्रमाणे सर्व लोक चर्चेमधील विषयावर ऊहापोह करीत आपापल्या घरी जात होते. परंतु चर्चा रोचक होती. म्हणून बहुतेक श्रोते रस्त्यावरील बाकावर बसूनच चर्चा करु लागले होते.

एकजण म्हणाला – "आज मनमोहनने तर कमालच केली बुवा!"

दुसरा म्हणाला – होय बुवा, त्याच्या हिंमतीची दाद द्यायला पाहिजे. परंतु हे जे काही झाले ते सर्व गुरुदेवांच्या कृपेनेच झाले आहे; नाहीतर काय बिशाद होती की तो गुरुजीसमोर एवढे मनमोकळे बोलू शकेल."

आजच्या ज्ञानचर्चेमध्ये धर्मेश आणि मनमोहन यांच्यामध्ये झालेल्या लांबलचक चर्चेची थोडीफार प्रतिकूल प्रतिक्रिया देखील अनेक नव्या श्रोत्यांच्या मनात उमटली. परंतु अनुरागच्या मनात जास्तच तिखट प्रतिक्रिया झाली. त्याला गप्प रहावले नाही. त्याने आपला थोरला भाऊ विरागला थोडाशा उपहासात्मक भाषेत म्हटले –

"पाहिलस दादा! हा राग कसा घुसखोर असतो, किती पक्षपाती असतो, ह्याची कधी आपण कल्पना तरी केली होती कां? पहा नां! ह्या रागाने धर्मेश गुरुजीसारख्यांनाही सोडले नाही; नाहीतर त्यांनी मनमोहनला पुढे का बोलावले असते?

बोलण्यातील आवाजाचा टोन बदलत अनुराग पुढे म्हणाला – "तसे पाहिले तर तुमच्या गुरुजींना काय घेणे-देणे होते त्या मनमोहनशी? की त्यासाठी त्यांनी मुद्दाम त्याला पुढे बोलाविले आणि एवढे बोलू दिले? परंतु तो अमितचा सासरा आहे नां? आणि अमित तर गुरुजींचा बालमित्र आहेच. बस ह्यामुळेच संधी मिळाली. अन्यथा तुमचे गुरुजी, जे भल्या भल्यांची डाळ शिजू

देत नाहीत. बस्स! हीच तर आहे रागाची करामत! कसा-कसा, कोठे-कोठे घुसखोरी करतो हा राग!''

विरागने उपहासाचे उत्तर उपहासात्मक पद्धतिने देत म्हटले - ''अरे! गुरुजी कोणासाठी डाळ कशाला शिजू देतील? आणि भले भले लोक जेवायला थोडेच आले आहेत की ज्यांच्यासाठी डाळ शिजवायची होती? ते आवश्यकतेनुसार सर्वांना आपापली गोष्ट सांगण्याची संधी देतात आणि सर्वांचा यथायोग्य आदर-सन्मानदेखील करतात, प्रोत्साहन देखील देतात. तसे बघितले तर त्यांना साधर्मीप्रती अनन्य प्रेम आहे; परंतु ते प्रयोजनाशिवाय वाद-विवाद व तर्क-वितर्कामध्ये अडकत नाहीत. प्रत्येकाच्या तोंडी लागत नाहीत. त्यामुळे जर एखादा टिका अथवा निंदा करीत असेल तर करो भले, त्यामुळे ते प्रभावित होत नाहीत. त्यांच्या कपाळावर आठ्या पडत नाहीत.''

अनुराग म्हणाला, -''हेच तर मी म्हणतो की अशा लोकांना संधीच का दिली जाते? लोकांचे काय? संधी मिळताच मग तो मुका असेल तरी बोलू लागतो. गुरुजींनी मनमोहनला पुढे बोलाविले काय! तो तर समजला त्याला जणु अभयदान मिळाले! पहा नां, जी व्यक्ति गुरुजींच्या समोर एक वाक्यदेखील व्यवस्थित बोलू शकत नाही. बोलण्यामध्ये जीभ अडखळते, हातपाय कापत होते, अशा पठ्ठ्याने गुरुजीच्या प्रोत्साहनाची संधी मिळताच बोलण्यास प्रारंभ केला की त्यामुळे गुरुजींना 'ध्याना' वर बोलण्याची संधी दिली नाही. पूर्ण पाऊण तास स्वतःच बोलत राहिला. गुरुजींना देखील लक्ष्यभ्रष्ट केले.

गुरुजींनी त्याला 'ध्यान' विषयावर केवढा सुंदर प्रश्न विचारला होता. त्याचे त्याला फक्त हो किंवा नाहीमध्ये उत्तर द्यावयाचे होते - परंतु पठ्ठे बहाद्दर सांगू लागला आपली व्यथापूर्ण कथा! त्याची ती व्यथापूर्ण कथा सांगण्या-ऐकण्यामध्ये तो ध्यानाचा एवढा चांगला विषय बाजूलाच राहिला!

विराग म्हणाला - ''हे खरे आहे की ध्यानासारखा उपयोगी आणि दुर्मिळ चर्चित विषय बाजूलाच राहिला - हे देखील खरे आहे की एखाद्या लौकिक व्यक्तिशी राग करणे चांगले नाही. हे देखील खरे आहे की लोक तत्त्वज्ञान प्राप्त करण्याच्या उद्देशाने एवढ्या लांबून लांबून येतात. आपापले उद्योग-धंदे बाजूला

सारुन येतात; म्हणून वेळेचा पुरेपूर सदुपयोगच झाला पाहिजे. परंतु हे देखील परम सत्य आहे की वेळेच्या सदुपयोगाची चिंता तुम्हा आम्हापेक्षा स्वत: गुरुजींना अधिक आहे, तेव्हाच तर ते अशा शिबीरामध्ये १०५ डिग्री तापामध्येसुद्धा प्रवचन करतात. डॉक्टरांनी मनाई केली असली तरी मानत नाहीत.

अजून तुला गुरुजीच्या अंतरंगाची पुरी ओळख झाली नाही. अजून तू नवा नवा आला आहेस नां? तुला काय वाटते तुझी उपहासात्मक भाषा आम्हाला समजत नाही? तू रागाला भला आणि वाईट असे म्हणून गुरुजींवर अप्रत्यक्षपणे आरोपच केला आहेस; परंतु तू स्वत: विचार कर, अजून गुरुजी पूर्ण वीतरागी तर झाले नाहीत! अरे, अजून ते मुनींच्या भूमिकेमध्येसुद्धा नाहीत. तुमच्या आमच्यासारखे सामान्य श्रावक आहेत.

अरे बाबा! मुनिराजांच्या भूमिकेमध्ये देखील शास्त्र लिहिण्याचा, वाचण्याचा, शिकविण्याचा व प्रवचनादि शुभकार्य करण्याचा प्रशस्त राग येतो, परंतु येथे गुरुजी तर गृहस्थ आहेत. जर परोपकाराच्या भावनेने मनमोहनच्या भावनांना ऐकून त्याच्या मनोविकाराचा निचरा करण्याचा भाव त्यांना आला ह्यात चुकीचे काय आहे?

मनमोहनने देखील विद्यागुरुच्या समक्ष आपले दोष प्रगट करुन जणु एकाप्रकाराने प्रतिक्रमणच तर केले, प्रायश्चित्तच तर केले. काय त्याचे हे करणे तुम्हा-आम्हांलादेखील अनुकरणीय नाही? काय त्याच्या ह्या कृत्याने आपणाला एखादा धडा किंवा प्रेरणा मिळत नाही?

जरा शांतिने विचार करा - गुरुजींच्या भूमिकेमध्ये असा राग किंवा विकल्प येणे योग्य आहे की अयोग्य?

अरे भाऊ! मनमोहनाच्या विचारांचा निचरा तर करावयाचाच होता. नाहीतर त्याला तत्त्वचर्चेचा काहीही लाभ झाला नसता; कारण तो तर त्याच विचारात गर्क राहिला असता, त्याच विचाराच्या गर्तेत अडकून राहिला असता.

हा सर्व विचार करुन गुरुजींनी त्याला एवढी जी संधी दिली ती निश्चितपणे नीट खोलवर विचार करुनच दिली असणार.

अरे! साधक-बाधक विचार केल्याशिवाय अशा छोट्या गोष्टीमुळे गुरुंच्या बद्दलची श्रद्धा खंडित होऊ देता कामा नये. असे झाल्याने त्यांच्याकडून मिळालेल्या तत्त्वज्ञानाचा पूर्ण लाभ मिळत नाही. हे तर जाणतोच आहेस की, कारणाशिवाय गुरुजी कोणाशी बोलत देखील नाहीत. अजून तुला गुरुजींची विलक्षण तल्लख बुद्धि, तात्काळ निर्णय घेण्याची अद्‌भुत क्षमता व प्रतिभेचा पत्ता नाही. ते जेथे एकीकडे दुःखी कष्टींच्या बाबतीत द्राक्षाप्रमाणे कोमल आहेत. तसेच ते दुसरीकडे सिद्धांताच्या बाबतील नारळाप्रमाणे कठोर देखील आहेत.

जशी करुणा त्यांनी दाखविली, तशी करुणा गृहस्थांनाच काय मुनिराजांना देखील येऊ शकते. म्हणून तर शास्त्र लीहिली जातात. जरी करुणा राग आहे असे धर्मात्मा जाणतात तरी भूमिकेनुसार अशा करुणेचे भाव आल्याशिवाय रहात नाहीत आणि आलेसुद्धा पाहिजेत.

गुरुजींनी त्याच्यावर थोडीशी कृपा केली तर तुझ्या पोटात का दुखायला लागले? की त्यामुळे गुरुजींवर शिंतोडे उडविण्यास सुरुवात केलीस.

पहा! प्रत्येक शब्द विवेकाच्या तराजूत तोलून मापूनच बोलला पाहिजे. आणि ऐक, गुरुजी नुसते माझे एकट्याचेच गुरुजी नाहीत, माझे गुरु झाल्याने ते तर तुझे गुरुंचे गुरु झाले; कारण मी तुझा मोठा भाऊ तर आहेच व गुरुदेखील आहे. ज्यांना ज्यांना त्यांच्यापासून तत्त्वज्ञान शिकण्यास मिळाले, ते त्या सर्वांचे गुरुजी आहेत. अरे! शाळेमध्ये लौकिक शिक्षण देणारे देखील आपले गुरु आहेत, तर धर्मेशजींनी तर आपल्याला तत्त्वज्ञान शिकविले आहे. म्हणून त्यांनादेखील विद्यागुरुंचा दर्जा देणे तर आपले नैतिक कर्तव्य आहे. अरे लौकिक विद्या शिकविणारे गुरु तर गल्लोगल्ली मिळतील; परंतु अध्यात्म विद्येचे ज्ञान देणारे तर ह्या युगात अत्यंत दुर्लभ आहेत मोठ्या भाग्यानेच मिळतात."

विराग व अनुराग दोघे सख्खे भाऊ आहेत, विराग अनुरागपेक्षा दहा वर्षांनी मोठा आहे. विराग तर अनेक वर्षे धर्मेशजींच्या सान्निध्यात आहे, त्यामुळे त्यांचा धर्मानुराग, विशाल हृदय वगैरे अनेक गुणांशी तो चांगला परिचित होता. परंतु अनुराग आपल्या मोठ्या भावाच्या प्रेरणेने पहिल्यांदाच धर्मेशजींच्या आश्रमात आला होता-म्हणून तो तेथील प्रत्येक कार्यक्रमांना समीक्षकाच्या दृष्टिने बघत होता-पारखत होता आणि आपल्या मोठ्या भावाशी एकांतात तेथील गुण दोषांची

चर्चा केल्याशिवाय त्याला रहावत नसे. विरागदेखील त्याच्या भावना दाबून टाकण्यापेक्षा, त्याचे म्हणणे शांतपणे ऐकून त्याचे योग्य समाधान करणेच योग्य समजत होता. जरी त्याला अनुरागने केलेली गुरुजीवरील टीका मनातून आवडली नव्हती, तरीदेखील तो त्याच्यावर खेकसला नाही आणि नाराजसुद्धा झाला नाही.

विराग बुद्धिमान व दूरदर्शी तर होताच शिवाय मोठ्या भावाचा मोठेपणादेखील त्याच्यात होता, त्याने अनुरागला डोळे वटारुन घाबरवले नाही, दम देऊन गप्प बसविले नाही, तो मानवाच्या मानसशास्त्राला नीट जाणत होता. तो जाणत होता की, ज्याप्रमाणे रबरी चेंडूला आवश्यकतेपेक्षा अधिक दाबून ठेवले तर तो फुटून तरी जाईल अथवा उडून दूर कोठेतरी जाऊन पडेल. अगदी अशाप्रकारे जर नव्याने येणाऱ्या लोकांना गरजेपेक्षा जास्त गप्प बसविले, तर ते तुटतील तरी किंवा येथून दुसरीकडे दूर अन्य ठिकाणी जातील तरी आणि जेव्हा आपल्याजवळ खरे तत्त्व आहे, खरे तथ्य आहे, प्रबल युक्ति आणि आगमाचा सबळ पाठिंबा आहे, तर आरडाओरडा करण्याची गरजच कोठे आहे? हळु हळु सगळेजण आपले आपण सर्व समजतील. थोडे दिवस ऐकू तर द्यावे त्यांना शांतिने! अशी घाई तरी कसली आहे?

अनुराग धर्मेशजींच्या प्रवचनात कोणतीही गोष्ट ऐकत असे तेव्हा ती त्याला सहजपणे पटत नव्हती, मनात प्रतिक्रिया देखील होत असे, परंतु त्याने विरागच्या सांगण्यानुसार हादेखील निश्चय केला होता की पहिल्यांदा तो सर्व गोष्टी पूर्णपणे ऐकून घेऊन त्यावर विचार करेल आणि मग जर समजले नाही तर नंतर विनयाने आपल्या मर्यादेमध्ये राहून एक एक गोष्ट विचारेल आणि स्वतःचे सर्व प्रकारे समाधान करुन घेण्याचा पुरेपूर प्रयत्न करेल, तेव्हाच तो एखाद्या निर्णयाप्रत पोहचेल.

'ध्याना' वर तर प्रवचनं चालतच होती, प्रसंगानुसार अधून मधून सम्यग्दर्शनाचे हेतूभूत भेदज्ञान, दृष्टिचा विषय शुद्धात्मा तसेच दर्शन-पूजन वगैरेंचा उपयोग ह्यावरही प्रवचनं झाली. ह्या सर्व गोष्टींचे अनुरागला काहीही ज्ञान नव्हते. त्याने आतापर्यंत अशा आध्यात्मिक दृष्टिकोणातून हे विषय ऐकलेच नव्हते. त्यामुळे तो धर्मेशच्या व्यक्तित्त्व आणि विचारांनी दिवसें-दिवस प्रभावित होत चालला. त्याने आता तर जेव्हा शक्य असेल तेव्हा अधिकात अधिक वेळ तेथे थांबून जास्तीत जास्त लाभ घेण्याचा निश्चय केला. •

# २३

धर्मेश स्वत: दररोज पहाटे पाच वाजता आपल्या आश्रमवासी लोकांबरोबर व शिष्यांबरोबर फिरावयास जातच असत परंतु वेळोवेळी बाहेरगावाहून आलेले साधर्मीसुद्धा त्यांच्या सान्निध्याचा फायदा घेण्यासाठी त्यांच्याबरोबर फिरायला जात.

धर्मेश फिरताना बहुतांशी गप्पच रहात. जर एखादे वेळेस काही सांगण्याचा भाव आला तर त्यावेळेला त्यांच्या मनात जे तात्त्विक चिंतन चालू असेल, त्याचीच चर्चा करीत असत. राग-द्वेष वर्द्धक राजनैतिक व सामाजिक विकथा ते कधी करीत नसत.

शिक्षण शिबिराच्या वेळी त्यांच्याबरोबर फिरायला जाणाऱ्यांची संख्या वाढत असे. भले गर्दीमुळे त्यांना धर्मेशशी बोलण्याची संधी जरी मिळाली नाही तरी स्नेहवश ते त्यांच्याबरोबर फिरत असत.

ह्या फिरणाऱ्यांबरोबर काही चलाख व चतुर लोक असे देखील असत की ज्यांना खरोखर ना फिरण्यामध्ये खास रुचि असे आणि न तत्त्वचर्चेमध्ये आवड; तरी देखील त्यांच्याबरोबर फिरत असत.

असे लोक धर्मेशशी प्रत्यक्ष सलगी वाढवून फक्त त्यांच्या डोळ्यात आपण भरावे ह्या उद्देशानेच फिरावयास जात असत. कारण त्यांना धर्मेश आणि त्यांच्या अनुयायांची एक खास कमजोरी माहीत होती; जिचा ते आपला स्वार्थ साधण्याकरिता उपयोग करु इच्छित होते.

धर्मेशची अशी कमजोरी होती की ते त्यांच्या परिचयातील व्यक्तिंच्या नावाचा उल्लेख सहजपणे प्रवचनात करीत. जे अशा लोकांना एक प्रकारचे वरदानच वाटे. त्यांना वाटे आपणास प्रतिष्ठा मिळत आहे. तसेच त्यांच्या अनुयायांची कमजोरी

अशी होती की धर्मेशच्या तोंडून ज्याचे नाव निघेल, त्याच्याकडे त्यावेळेला सर्व शिष्य व श्रोत्यांच्या नजरा वळत असत. न केवळ त्यांच्या नजरा वळायच्या तर ते सगळे काहीही मागचा पुढचा विचार न करता त्याच्यावर विश्वास ठेवत-ह्या कमजोरीचा अनेक लोकांनी वेळोवेळी गैरफायदा सुद्धा घेतला.

एके दिवशी तत्त्वचर्चेच्या वेळेलाच धर्मेशच्या आवडत्या शिष्याने 'ध्यानाविषयी' विचारले – ''गुरुजी! आपण तत्त्वज्ञानाची शिबीरं तर लावत आहात, तशीच जर ध्यानाची शिबीरंसुद्धां लावली तर आणखीन लाखो लोक आपल्या मिशनमध्ये जोडले जातील. ज्ञानाबरोबर 'ध्यानशिबीर' जोडले गेल्याने मिशनची प्रतिष्ठा देखील वाढू शकते.

कदाचित आपणास माहीतही असेल की आजकाल ध्यानाची शिबीरं देखील खूप लोकप्रिय होऊ लागली आहेत. त्यांची लोकप्रियता पाहून काही मुमुक्षुबंधु देखील त्याबाजूला आकर्षित होत आहेत. आपण देखील ध्यान शिबीर कां लावत नाही?''

धर्मेश म्हणाले – ''हां; हां, माहीत आहे, माहीत आहे, सर्व माहीत आहे; परंतु अरे, शिबीर ज्ञानाचेच लागते, ध्यानाचे नाही. ज्ञानार्जनाकरिता गुरु पाहिजे, शिष्य पाहिजे आणि ज्ञानाची साधनं पाहिजेत. ह्याविरुद्ध ध्यानाकरिता बिलकुल एकांत पाहिजे.

शिक्षणशिबीर ज्ञानाचे शिक्षण-प्रशिक्षण देण्याकरितां लावली जातात आणि **ध्यान ज्ञानी जीवांची अंतर्मुख होण्याची प्रक्रिया आहे, जी एकांतामध्ये स्वभाव सन्मुखतेच्या पुरुषार्थानेच शक्य आहे. ज्ञान व ध्यान ह्यामध्ये हाच महत्त्वाचा फरक आहे.**

स्वाध्याय व ज्ञानार्जन करण्याचे स्वरुपच असे काही आहे की, ह्यामध्ये एकापेक्षा दोघे असणे चांगले असते, जास्तजण असतील तर फारच उत्तम! परस्पर चर्चा करण्यामध्ये ते ज्ञान निर्मल होते. इतरांच्या ज्ञानाचा लाभ सहजच होतो. परंतु ध्यानामध्ये असे काही नाही. ध्यानाची साधना ज्ञानाहून सर्वथा वेगळी आहे. ध्यानामध्ये दुसऱ्यांचे काय काम? गर्दीमध्ये तर भलभल्या साधकांची चित्तवृत्ति चंचल व अस्थिर होते, तुम्हा आम्हा बाबतीत तर काय बोलावे?

ज्या ध्यान शिबिरांच्या लोकप्रियतेबद्दल तू बोलत आहेस, ते तर लोकप्रिय व्हायलाच पाहिजेत; कारण त्यामध्ये लोकांच्या आवडी आणि रुचिनुसार शारीरिक स्वास्थ्याचे खूप चांगल्यातऱ्हेने प्रशिक्षण दिले जाते – नैसर्गिकरित्या स्वस्थ (निरोगी) राहण्याची कला सांगितली जाते. मोठ्यात मोठ्या आजारापासून बरे होण्याच्या आणि निरोगी राहण्याच्या विधिमध्ये प्रशिक्षित केले जाते.

परंतु अहो! आपले लक्ष्य वेगळे आहे. त्यांना आपले काम करुद्या, आपण आपले काम करीत आहोत. आपल्याजवळ येवढा वेळ आणि सामर्थ्य कोठे आहे की आपण हेही करावे आणि तेही करावे. आणि शेवटी ही आपापल्या रुचिची गोष्ट आहे, मला एवढी रुचि त्याच्यात नाही. माझी रुचि तर विशुद्ध अध्यात्मामध्ये आहे.

वास्तविक ती आत्म्याच्या ध्यानाची किंवा धर्मध्यानाची शिबीरच नाहीत. ती तर योग साधना केंद्र आहेत, शारीरिक स्वास्थ्य केंद्र आहेत. त्यामध्ये आसन, प्राणायाम आणि योगिक क्रियांद्वारे स्वास्थ्याच्या लाभाच्या मुख्यतेनेच बहुतेक कार्यक्रम असतात, श्वसन क्रियेवर ध्यान केंद्रित करण्यास सांगितले जाते. ती स्वास्थ्याच्या दृष्टिने महत्त्वपूर्ण व उपयोगी आहेत, परंतु त्या शिबिरांमुळे आपले प्रयोजन पूर्ण होत नाही."

दुसरा शिष्य विनयपूर्वक म्हणाला – "गुरुजी! आपले म्हणणे खरे आहे, परंतु तेथेदेखील खूप शांतिचा अनुभव होतो. मी स्वतः त्या शिबीरात जाऊन अनुभव घेतला आहे.

धर्मेशजीने स्पष्टीकरण करीत म्हटले – "अहो! तुमचे म्हणणे बरोबर आहे. रात्रंदिवस विषयकषायाच्या आगीमध्ये आणि धंद्यापाण्याच्या चिंतेच्या ज्वालेमध्ये होरपळणाऱ्या तसेच सामाजिक, राजनैतिक पळापळीमध्ये यथा तथा भटकणाऱ्या व्यक्ति, जर दहा-पंधरा दिवसांसाठी संपूर्ण निवृत्ति घेऊन तेथे जातील व शांतिने तेथे अज्ञातवासात राहतील तर ७५ टक्के तर काही न करताही सुटका, शांति व सुखाचा अनुभव करतील. शिवाय तेथील नियमानुसार तेथील बाऊंड्रीच्या बाहेरचे सर्व संबंध तोडले जातील, जसे ते करवून घेतील तसेच पूर्ण नियमानुसार करत रहाल तर रिलॅक्स व्हालच. परंतु ते रिलॅक्सेशन म्हणजेच शारीरिक आराम व मानसिक शांति तेवढ्या दिवसाचीच असते जेवढे दिवस तुम्ही तेथे रहाल. तेथून

बाहेर पडताच पुनश्च तीच रागरूपी आग, विषयकषायांची ज्वाला आणि कर्तृत्त्वाच्या चिंतेच्या ठिणग्या! असा सुद्धा अनुभव केलास की नाही?''

लाभानंदाने सुखानंद व रामानंदाकडे पहात परस्पर डोळ्यांनी एकमेकाला खुणावत धर्मेशच्या म्हणण्याचे समर्थन करीत म्हटले –''होय, ही गोष्ट अगदी बरोबर आहे, तेथून आल्यानंतर तर....''

धर्मेश पुढे म्हणाले – अरे बाबा! जीवाने हे सर्व तर अनंतवेळा करुन तो थकला आहे; परंतु ह्याने काय साध्य झाले? जेव्हा शरीरच राहणार नाही तर स्वास्थ्य कोठून राहील? म्हणून आता फक्त शरीराच्या पालनासाठी/ सांभाळण्यासाठी पूर्ण ताकद लावता कामा नये.''

धर्मेशजीने प्रेरणा देत म्हटले – ''**जब लौ न रोग जरा गहै, तब लौ झटति निजहित करो।** जोपर्यंत वृद्धत्वरूपी रोग देहाला जखडत नाही, त्या अगोदरच शीघ्र आत्मकल्याण करुन घ्या.''

धर्मेश म्हणाले – ''आणि हे पण ऐका! कसे एकाहून एक उत्तम कवि होऊन गेले ज्यांनी आपले डोळे उघडण्याचा प्रयत्न केला.

**जौलों देह तेरी, काहू रोग सौं न घेरी; जौलों,**
**जरा नाहिं नेरी, जासों पराधीन परि है।**
**जौलों जमनामा वैरी, देय न दमामा; जौलों,**
**मानै कान रामा, बुद्धि जाइ ना बिगारि है।**
**तौलों मित्र मेरे, निज कारज संभाल ले रे,**
**पौरूस थकेंगे, फैर पीछे कहा करि है?**
**अहो! आग आये, जब झोंपरी जलन लागै,**
**कुआ के खुदाये तब, कौन काज सरि है?**

अरे बंधुंनो! जेव्हा असाताचा उदय येईल, तेव्हा ही आसनं, प्रणायाम वगैरे देखील स्वास्थ्याला अनुकूल ठेवूं शकणार नाहीत. वृद्धत्व आणि मरण स्वतःच एकप्रकारे रोगच तर आहेत, जे अनिवार्य आहेत. ह्या रोगांपासून आसन-प्राणायाम देखील वाचवू शकत नाहीत.

दुसरी गोष्ट अशी आहे की – सर्व प्रकारच्या शिबीरामध्ये शिक्षण-प्रशिक्षणच मुख्य असते आणि शिक्षण-प्रशिक्षण ही एक त्रिमुखी प्रक्रिया आहे, ह्यामध्ये कमीत कमी तीन बाजू तर असतातच. एक शिक्षक, दुसरा विद्यार्थी आणि तिसरे शिक्षण-प्रशिक्षणाचे साधन. **ध्यान ही संयोगावरुन ज्ञानोपयोगाला आत्म्यामध्ये केंद्रित करण्याची, उपयोगाला आत्मसन्मुख करण्याची अंतर्मुखी प्रक्रिया आहे. ह्यामध्ये एका शुद्धात्म्याच्या आलंबनाशिवाय अन्य ( कशाचीही गरज नाही ) काही नको. येथवर की मन-वचन-काय देखील नको आहे, जे वास्तविक आत्म्याबरोबर एकक्षेत्रावगाही आहेत. जेव्हा त्या तिन्ही योगांपासून देखील काम करणे बंद करुन जेव्हा आत्म्याचा ज्ञानोपयोग आपल्या स्वरूपामध्ये स्थिर होतो, त्याला अध्यात्मामध्ये आत्मध्यान अथवा निश्चय धर्मध्यान असे म्हणतात.**

ध्यानात असू द्यावे, सामान्यपणे आर्त-रौद्र ध्यान देखील ध्यानच म्हटले जाते, परंतु येथे त्या आर्त-रौद्र ध्यानांची गोष्ट नाही – हे आत्मज्ञानाचे प्रकरण आहे, म्हणून येथे 'ध्यान' ह्या शब्दाला धर्मध्यानाच्या अर्थामध्ये ग्रहण केले पाहिजे.

मन कोणत्या ना कोणत्या एका विषयामध्ये अडकलेले असल्याकारणाने जीवाला प्रत्येक समयी कोणते ना कोणते ध्यान तर असतेच. परंतु जे ध्यान राग-द्वेष मूलक असते, ते सर्व अप्रशस्त आर्त आणि रौद्र ध्यानच आहे."

लाभानंदाने विचारले – "गुरुदेव! ही आर्त-रौद्र ध्यान काय असतात?

ह्यांच्याबाबतीत हे तर खूप ऐकले आहे की ते कुगतिचे कारण आहेत, परंतु ह्यांची ओळख आणि ह्यांच्यापासून वाचण्याचा उपाय काय आहे? हे सांगितलेत तर उपकार होतील."

धर्मेशजी म्हणाले – "हा विषय असा फिरता फिरता सांगण्यासारखा-समजावण्यासारखा नाही. ह्यावर बसून शांतिपूर्वकच चर्चा होऊ शकते-उद्या ज्ञानचर्चेमध्ये प्रश्न विचारा, तेथे एकेका ध्यानावर एकेक दिवस विस्ताराने चर्चा करु तेव्हा चांगला खुलासा होईल.

बोलता बोलता फिरण्याची वेळ कधी संपली लक्षातच आले नाही. धर्मेशजी आपल्या विश्राम स्थानी गेले. इतर लोक देखील आपापल्या घरी निघून गेले.

# २४

धर्मेशमध्ये एक आदर्श यशस्वी अध्यापकाप्रमाणे असे वैशिष्ट्य होते की ते ज्या विषयावर प्रवचन करीत, त्याचा स्वत: सर्वांगीण अभ्यास, मनन, चिंतन करीत असत–एवढेच नव्हे तर आवश्यक नोटस् देखील काढीत की ज्यामुळे प्रवचनाच्या महत्त्वपूर्ण मुद्यांचे विशेष स्पष्टीकरण केले जावे, कधी विसरले गेले तर स्वत:देखील पहाता यावे.

हल्ली साऱ्या देशामध्ये 'ध्याना' चा विषय बहुचर्चित विषय बनला होता, कारण जागो जागी ध्यानाचे शिबीर लागत होते. आश्रमात देखील कुजबूज होतच होती. लोक धर्मेशजीकडून ह्याबाबतीत ऐकू व समजू इच्छित होते. सर्व श्रोत्यांमध्ये ध्यानाचे स्वरूप आणि त्याची यथार्थ प्रक्रिया विस्ताराने समजण्याची जिज्ञासा जागृत झाली होती. म्हणून सर्वांमध्ये हा विषय ऐकण्याचा उत्साह होता.

धर्मेशजींच्या जवळच्या संबंधामुळे अमित आणि मनमोहन यांच्या जीवनामध्ये जे आश्चर्यकारक परिवर्तन झाले, त्यामुळे अमितची पत्नी सुनंदाला कौटुंबिक शांति तर मिळालीच, अगोदरपासूनच तिचा कलसुध्दा धर्माकडेच होता परंतु आता धर्माचे मर्म जाणण्याची जिज्ञासा देखील जागृत झाली.

सुनंदाबरोबर तिची विधवा बहीण सुनयनाला देखील सन्मार्ग मिळाला. ती बिचारी पतिच्या वियोगाने दु:खी होतीच. अशातऱ्हेने हे पुरे कुटुंब धर्मेशजींच्या फार जवळ ओढले गेले. आता हे लोक तत्त्वज्ञान आणि धर्मध्यानाचा लाभ घेण्याकरिता सदैव हपापलेले होते. ह्यांच्या लक्षांत ही गोष्ट चांगल्याप्रकारे आली होती की सुखशांतिचा एकमेव उपाय हाच आहे. म्हणून हे देखील ध्यानावर होणाऱ्या प्रवचनांची मोठया उत्सुकतेने वाट बघत होते.

धर्मेशजींनी देखील 'ध्यान' हा विषय खास ह्याच उद्देशाने निवडला होता; कारण ते ह्या सर्व कुटुंबाला बहुतेक आर्त-रौद्र ध्यानातच डुंबलेले पहात होते. म्हणून त्यांना वाटे की ह्या सर्वांनी ह्या विषयाला सुरुवातीपासून शेवटपर्यंत ऐकावे.

धर्मेशजींना हे ऐकून आनंद झाला की सगळे वेळेवर हजर आहेत आणि उत्सुकतेने प्रवचनाची वाट पहात आहेत.

घड्याळात तीन वाजताच ॐ कार ध्वनीसह धर्मेशजींचे प्रवचन सुरु झाले. ते म्हणाले. "आज आर्तध्यानाच्या विषयावर विचार करावयाचा आहे. आर्तध्यान काय आहे ? ह्याचे खरे स्वरूप काय आहे ? हे का होत असते ? किती प्रकाराने होते ? ह्याचे फळ काय आहे ? ह्यापासून कसे वाचता येईल ?

आर्तध्यानाच्या संदर्भामध्ये हे प्रश्न विचार करण्यासारखे आहेत. तसे तर आपण इष्टवियोग जनित दु:खाच्या रुपाने, अनिष्ट संयोगांच्या चिंतेच्या रुपाने आणि रोग जनित वेदनेच्या रुपाने रात्रंदिवस आर्तध्यानच करीत असतो; परंतु हे जाणत नाही की ते आर्तध्यान आहे की ज्याच्या फलरुपाने एकेंद्रिय निगोदापासून पंचेद्रिय पशुंची पर्याय प्राप्त होते.

धर्मेशने आगमाच्या आधारे आर्तध्यानाच्या बाह्य लक्षणांची चर्चा करताना म्हटले - "परिग्रहामध्ये अत्यंत आसक्त होणे, कुशीलरूप प्रवृत्ति करणे, कंजूषी करणे, अधिक व्याजाने आजीविका करणे, अति लोभ करणे भयभीत रहाणे, उद्वेग करणे, अतिशय शोक करणे, पश्चाताप करणे, अश्रु ढाळणे वगैरे आर्तध्यानाची बाह्य लक्षणं आहेत."

आर्तध्यानाची ही लक्षणं ऐकून सर्व श्रोते मनातल्या मनात आपल्या परिणामांना पारखू लागले.

मनमोहन विचार करु लागला - परिग्रहामध्ये अति आसक्तपणा, कृपणता, अधिक व्याज वसूल करणे, भय, उद्वेग, शोक, पश्चाताप हे तर मला सारखे

होतच असतात; परंतु धर्मेश गुरुजींनी माझ्या मनातल्या ह्या सर्व गोष्टी कशा जाणल्या ? मी तर कधी कुणाला काही सांगितले देखील नाही. अरे! हे तर अंतर्यामी लोक असावेत असे वाटते.

सुनंदा, सुनयना आणि अमितदेखील धर्मेशजींचे प्रवचन ऐकून आपल्या अंतरंगात डोकावतात तर ते स्वत:ला देखील कोणत्या ना कोणत्या स्वरूपामध्ये ह्याच भावांनी युक्त असलेले पहातात आणि मनातल्या मनात विचार करतात – ह्या गोष्टी तर एकदम खऱ्या आहेत. अशा तऱ्हेने अमित आणि त्याचे नातलग धर्मेशच्या प्रवचनांनी प्रभावित झाले होते.

धर्मेशने पुढे म्हटले – "महापुराणामध्ये देखील चर्चा आहे-तेथे म्हटले आहे की 'ऋत्' म्हणजेच ज्या भावामुळे दु:ख उत्पन्न होते, पीडा होते ते आर्तध्यान आहे. हे आर्तध्यान मुख्यत: अप्रशस्तच असते; कारण हे ध्यान अविद्येमुळे उत्पन्न होते, मिथ्याज्ञानाच्या वासनेने उत्पन्न होते.

दुसऱ्यांच्या दोषांचे ग्रहण करणे, दुसऱ्याच्या संपत्तीची इच्छा करणे, परस्त्रीकडे टक लावून पाहणे तसेच दुसऱ्यांचे भांडण पहाणेसुध्दां आर्तध्यानच आहे.

स्वत: विषयांच्या प्रवृत्तिरहित जरी असला, तरी दुसऱ्यांच्या पाहिलेल्या, ऐकलेल्या, सांगितलेल्या भोगलेल्या विषयांची चर्चा ऐकली, मनातल्या मनात आठवून त्यामध्ये रुचि दाखविली तरी त्याने सुध्दा आर्तध्यान होते.

पं. सदासुखदासजींनी रत्नकरंडश्रावकाचारच्या टीकेमध्ये आर्तध्यानाची जी बाह्य लक्षणं सागितली आहेत, त्याचा गोषवारा असा आहे की, ज्यामध्ये द्वेषामुळे असे वाईट चिंतन होते की, अमुक एखाद्याचा मुलगा मरावा, बायको घर सोडून पळून जावी, अमक्याला तुरुंगात जावं लागावे, अमुक व्यक्तिला धंद्यात नुकसान व्हावे, बुद्धि भ्रष्ट व्हावी, अमक्याचे हात, नाक, कान तुटावेत, इंद्रियं नष्ट व्हावीत, लोकामध्ये नाचक्की व्हावी.

अशा तऱ्हेच्या विचारांद्वारे दुसऱ्याचे अनिष्ट इच्छिले जाते, वाईट चिंतन केले जाते, त्यामुळे त्याचे तर काही बिघडत नाही; कारण त्याचे जीवन-मरण, हानि-लाभ तर त्याच्या पाप-पुण्याच्या आधीन असते. हां, पण वाईट इच्छा करणाऱ्याचा हा भाव/परिणाम आर्तध्यानरूप असल्याने त्याला पापबंध अवश्य होतो; परंतु अविवेकी मिथ्यादृष्टिला काही विवेक नसतो. जरा थोडासा देखील विवेक असता तर त्याने असे केले असते का ?"

धर्मेशजी पुढे म्हणाले – "असे जीव सदैव शंकाकुल, शोक, भय, ह्याने ग्रस्त राहून दु:खीच तर असतात. असे लोक दिशाहीन मनाचे, भ्रमित अवस्थेमध्ये, चंचल, विषयोन्मुख, झोपाळलेले, कलह-ग्रस्त आणि खिन्न देखील असतात.

असे लोक अनिष्ट संयोगज व इष्ट वियोगज आणि पीडाचिंतवनामध्यें तसेच ह्यांच्या शक्यतेमुळे आकुल/व्याकुल आणि आगामी सुखाच्या आकांक्षेमध्ये सतत चिंतित असतात-अशा प्रकारच्या आर्तध्यानामध्ये अत्यंत संक्लेश परिणाम असल्याने तीव्र पापाचा बंध होतो, ज्याचे फळ नरक निगोद आहे."

ज्यांनी-ज्यांनी धर्मेशच्या ह्या गोष्टी लक्ष देऊन ऐकल्या, त्यांनी आपापल्या अंतरंगात डोकावून पाहिले तेव्हा सर्वांना असे जाणवले की खरोखर आपणदेखील ह्या मानसिक रोगाने पीडित आहोत, ग्रासलेलो आहोत. त्यांचा हा निव्वळ भावनेचा खेळ नव्हता, तर वास्तविक थोड्या फार फरकाने सगळेच अशा प्रकारची प्रवृत्ती करीत होते.

अमितने धर्मेशजींचे व्याख्यान फार लक्षपूर्वक ऐकले, कारण त्यामध्ये जी काही चर्चा होत होती, त्यातील सर्व गोष्टी त्याला लागू पडत होत्या-तो सुनंदा आणि सुनयनेचे दु:ख तर प्रत्यक्ष पहातच होता, स्वत: देखील भांडणं, शोक, भयाच्या चक्रातून बाहेर पडू शकत नव्हता-शारीरिक पीडा तर अपार होतीच.

म्हणून तो विनयाने धर्मेशजींना म्हणाला – "अहो, तुम्ही माझे मित्रदेखील आहात आणि गुरुदेखील. मी शिकला-सवरलेला नक्कीच आहे,

परंतु खरोखर माझे ते शिक्षण तुमच्या तत्त्वज्ञानासमोर खूप थिटे पडते. आपण मला ह्यो आर्तध्यानापासून वाचण्याचा उपाय सांगावा. मी समजत होतो की, पैशाने काय होऊ शकत नाही ? परंतु मी उपाय करुन पाहिले. जोपर्यंत पापाचा उदय आहे, तोपर्यंत कोणतेही औषध लागू पडत नाही. तसेच रोग वगैरे प्रतिकूल परिस्थितीमुळे माझे जे हे भाव होत आहेत, हे सर्व भाव आपण सांगितल्याप्रमाणे नि:संशय आर्तध्यानच आहेत, ज्यांचे फळ महापापरूप आहे म्हणून आपण ह्यांच्यापासून वाचण्याचा उपाय अवश्य दाखवावा.''

धर्मेशजी उत्तरले – ''**ऐका. ह्यासाठी तुम्हाला नियमित स्वाध्याया द्वारे तत्त्वाभ्यास करावा लागेल. पाप-पुण्य आणि धर्माच्या स्वरूपाला समजावे लागेल. सात तत्त्वांचे स्वरूप आणि सहा द्रव्यांच्या स्वतंत्र परिणमनाला समजावे लागेल. असे केल्याने तुम्हाला आत्मा-परमात्म्याचे स्वरूप समजून येईल आणि स्व-पर भेद विज्ञान होईल.**

बस्स, भेदज्ञान होताच इष्ट-अनिष्टपणाच्या मिथ्या कल्पनांचा अभाव होईल, त्याने मिथ्याश्रद्धेमुळे वाटणारे भय, भीति वगैरे संपतीलच, हळु हळु चारित्रमोह-जनित राग-द्वेष देखील कमी होतील आणि यथार्थ धर्मध्यान होऊ लागेल.''

धर्मेशजींच्या दया आणि प्रेमाने ओत-प्रोत भरलेल्या उपदेशाला ऐकून अमितला फार हलके हलके वाटले आणि इतर श्रोत्यांना देखील सुखद अनुभूतिचा अनुभव झाला.

अमित-म्हणाला – ''गुरुदेव! आम्ही असे ऐकले आहे की आर्त-रौद्रध्यान तर मोठमोठ्या त्यागी, व्रती आणि मुनीराजांना सुध्दा होतात, अशा परिस्थितीमध्यें आमच्या सारख्या व्यक्ती ह्यापासून कशा वाचू शकतील ?''

धर्मेशजी म्हणाले – ''मित्रा, घाबरु नकोस! जे तुम्ही ऐकले आहे, खरे तेच ऐकले आहे. शास्त्रानुसार रौद्रध्यान पंचमगुणस्थानवर्ती देशसंयमींना तसेच आर्तध्यानातील निदानाला सोडून इष्टवियोग, अनिष्ट संयोग आणि पीडा चिंतवनाचे अस्तित्व मुनींच्या भूमिकेमध्ये सुद्धा आढळते.

परंतु लक्ष द्या, ह्यामुळे आपल्याला घाबरण्याचे कारण नाही आणि शिथिल होण्याचेही कारण नाही, उलट सर्वांनी आपापल्या शक्ति अनुसार सावधानी बाळगली पाहिजे.

जेवढे आणि ज्याप्रकारचे आर्त-रौद्रध्यान त्यांचे असते, ते त्यांचे फार नुकसान करू शकत नाहीत कारण त्यांच्याजवळ तत्त्वज्ञानाचे बळ आहे आणि सम्यक्‌चारित्राचे सामर्थ्य आहे.

ज्याप्रमाणे आपण प्रभावित होतो, तसे ते प्रभावित होत नाहीत. खरोखर व्रती-महाव्रतींचे आर्त-रौद्र परिणाम गारुड्यांच्या सापाप्रमाणे आहेत, जे विषदंतरहित केवळ म्हणण्यापुरते साप आहेत. त्यांच्याकडे पाहून आपण आपल्यामध्ये होणाऱ्या कषायांनी कलुषित झालेल्या आर्त-रौद्र परिणामांच्या भयंकर विषारी सापांशी खेळ करता कामा नये, त्यांना मनोरंजनाचे साधन बनविता कामा नये.

ही वाईट ध्यानं आपल्याजवळ असली तरी, त्यांच्या अस्तित्वाला आपण थांबवू शकणार नाही, तरीदेखील तत्त्वज्ञानाच्या महामंत्राने त्यांना विषदंतरहित तर बनवू शकतो. अप्रशस्तातून प्रशस्त बदलू तर शकतो, धर्मध्यान रूप देखील बदलू शकतो. जिनवाणीचा स्वाध्याय आणि देव-गुरु-धर्मांचे शरणच एकमेव ह्यापासून वाचण्याचा उपाय आहे. म्हणून ह्या दिशेने सदैव सक्रिय राहिले पाहिजे.''

धर्मेशजींचा धर्मस्नेह आणि कारुण्याने भरलेला धर्मोपदेश ऐकून अमितने थोडा-फार सुटकेचा निश्वास टाकला, सुनंदा, सुनयना वगैरे श्रोतेसुद्धा उपदेशाने भारावून गेले.

•

## २५

लाभानंदाच्या ध्यान शिबीर लावण्याबाबतीतच्या प्रस्तावाला धर्मेशजीनी दिलेल्या युक्तीसंगत उत्तराने जवळ जवळ सर्व श्रोते समाधानी होते, परंतु लाभानंदाच्या मनातील त्या योग साधनेच्या शिबीराबद्दलचे आकर्षण अजूनही कमी झाले नव्हते. कारण त्याने त्या ध्यान शिबीरांमध्ये हजर राहून मिळणाऱ्या मानसिक व शारीरिक स्वास्थ्याचा लाभ प्रत्यक्ष अनुभवला होता.

लाभानंदाने चिकाटीने पण विनम्र शब्दामध्ये म्हटले – ''गुरुजी, आपण भले त्यांच्यासारखे शारीरिक व मानसिक स्वास्थ्याकरिता लागणाऱ्या योग साधनांची शिबीरं लावू नका, ज्यामध्ये व्यायामाची वेगवेगळी आसनं व प्राणायाम वगैरे क्रियाच मुख्य असतात; परंतु जिनागमामध्ये देखील ध्यानांचे विस्तृत वर्णन आहे. तेथे ध्यान करण्याची पध्दत सुध्दा सांगितली असेल. जैन साधु संतांच्या तर ध्यान आणि अध्ययन ह्या दोन क्रियाच मुख्य असतात. का न आपणदेखील त्या विधींना आत्मध्यानाच्या मुख्यतेने गृहस्थोपयोगी बनवून त्याचा विकास करावा ? काय जिनागमामध्ये ध्यान करण्याची कोणती प्रयोग पध्दत नाही कां ?''

इतर उपस्थित श्रोत्यांना लाभानंदाचे म्हणणे पटले, म्हणून त्यांनी देखील ज्ञानार्णव नावाच्या शास्त्राकडे धर्मेश गुरुजींचे ध्यान आकर्षित करुन लाभानंदाच्या म्हणण्याला आपला दुजोरा दिला.

जेव्हा लाभानंदाच्या म्हणण्याचे श्रोत्यांनी देखील समर्थन करून धर्मेशजींना ध्यानाचे शिबीर लावण्याचा विनम्र आग्रह केला तेव्हा ते गंभीर होऊन म्हणाले –

''अहो बंधुनो! ज्या ध्यान क्रियेने आपण एवढे प्रभावित/उत्तेजित झाला आहात, त्याबाबतीत मला पण सर्व माहित आहे. वर्तमान काळात शरीर

विज्ञानाच्या आणि मानसशास्त्राच्या पद्धति अनुसार ध्यानाचे तीन प्रकार आहेत - शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक. शरीर विज्ञानाच्या सांगण्यानुसार ध्यानाचा पहिला प्रभाव शरीर तंत्रावर पडतो; ह्यामुळे रक्ताभिसरण, हृदय स्पंदन, ग्रंथींचा रसस्त्राव आणि मनातील भाव हे देखील प्रभावित होतात. हे ध्यान उत्तरोत्तर शरीर, मन आणि अंत:चेतनेला ऊर्ध्वमुखी बनवितो. इतर शारीरिक क्रियांप्रमाणे ध्यानाने मनातील तरंगामध्ये बदल घडू लागतो.रमेश जैन

अशा प्रकारचे सर्वसामान्य ध्यान शरीराला शांत आणि मनाला स्थिर करण्याची प्रक्रिया आहे. ध्यानामुळे इंद्रियंदेखील स्वत: नियंत्रणामध्ये येतात. ह्या ध्यानाच्या अभ्यासाने शरीराच्या नाडीतंत्रामध्ये आणि मेरुदंडामध्ये देखील जागृति होते.

भारतीय योगाभ्यास करणाऱ्यांची जवळ जवळ सर्वांची हीच मान्यता आहे की, योगसाधना शरीरिक तंत्राच्या स्वास्थ्याची प्रक्रिया आहे आणि मनोवृत्तींना काबूत ठेवणे आणि त्यांची योग्य दिशा बदलणे ह्यासाठी सुध्दा योग साधना व ध्यान उपयोगी आहे. अशाप्रकारे योग, प्राणायाम आणि ध्यान शरीर व मनाच्या नियंत्रणामध्ये उपयोगी आहे - ह्या गोष्टींपासून मी अनभिज्ञ (अजाण) नाही."

धर्मेशजी पुढे म्हणाले - "ह्यामध्ये जरादेखील शंका नाही की ही योगसाधना आणि त्या संबंधीची ध्यानाची प्रक्रिया, शारीरिक स्वास्थ्य-लाभ आणि मानसिक तणावांपासून सुटका करुन घेण्यासाठी ती नैसर्गिक नियमांच्या जवळची असल्याने इतर उपचारांच्या तुलनेमध्यें सर्वोत्कृष्ट आहे. स्वास्थ्याच्या लाभाच्या दृष्टिने तर ह्याचा उपयोग नि:संदिग्धच आहे; परंतु ह्या योग आणि प्राणायामाद्वारे शरीराच्या अंग-उपांगावर आपला ज्ञानोपयोग केंद्रित करण्याने म्हणजेच शरीराच्या अंगांचे ध्यान केल्याने आत्म्याचे किंचित देखील हित/फायदा होत नाही.

वास्तविक जैनदर्शनानुसार तर ही योगसाधना आणि प्राणायाम वगैरे धार्मिक क्रिया देखील नाहीत कारण आचार्य अकलंकदेव, आचार्य शुभचंद्र वगैरे अनेक मनीषिंनी प्राणायामाला मोक्षमार्गामध्यें बाधक मानले आहे.

ते लिहतात की – **मोक्षमार्गामध्ये प्राणायाम कार्यकारी नाही; कारण श्वासोश्वास रोकण्याच्या वेदनेने शरीराच्या नाशाची शक्यता आहे. ह्यासाठी ध्यानावस्थेमध्यें श्वासोश्वास नैसर्गिकच असला पाहिजे.**[1]

प्राणायामामध्ये पवनसाधनेमुळे विचलीत झालेल्या मनाला स्वास्थ्य प्राप्त होत नाही. म्हणून मोक्षमार्गामध्ये प्राणायाम उपयोगी नाही. तेथे 'ध्यान' शब्दाचा अर्थ जैनदर्शनाच्या धर्मध्यानाहून सर्वथा वेगळा आहे. जैनदर्शनाच्या धर्मध्यानाची गोष्टच काही वेगळी आहे, ते तर आत्मज्ञानाशिवाय असतच नाही. धर्मध्यान करण्याकरितां आत्मानुभूति होणे अनिवार्य आहे.

वास्तविक तुम्ही सर्व लोक 'ध्यान' शब्दामुळे भ्रमित होत आहात ! जैनदर्शनाचा 'ध्यान' शब्द आणि योगसाधने मध्ये वापरलेला 'ध्यान' ह्यामध्ये काही खास साधर्म्य नाही. दोघांच्या व्याख्या बिलकुल वेगवेगळ्या आहेत.

**जैनदर्शनानुसार निश्चितपणे धर्मध्यान आत्म्याची अंतर्मुखी प्रक्रिया आहे. ह्या प्रक्रियेमध्ये साधक आपल्या ज्ञानोपयोगाला इंद्रियांच्या विषयांपासून, मनाच्या विकल्पांपासून, पर पदार्थ आणि आपल्या मलिन पर्यायींपासून हटवून अखंड, अभेद, चिन्मात्र ज्योतिस्वरूप भगवान आत्म्यावर केंद्रित करतो, आपल्या ज्ञानोपयोगाला आत्म्यामध्ये स्थिर करतो.**

बस्स! ह्यालाच निश्चयाने धर्मध्यान म्हटले जाते. योगसाधना आणि ध्यान शिबीरांमध्ये ह्या ध्यानाची तर चर्चा सुध्दा होत नाही.

**वास्तविक धर्मध्यान ज्ञानोपयोगाची ती अवस्था आहे, जेथे समस्त विकल्प शांत होऊन एकमेव आत्मानुभूतिच उरते, विचारश्रृंखला थांबते, चंचल चित्तवृत्ति निश्चल होते. अखंड आत्मानुभूतिमध्ये ज्ञाता-ज्ञेय व ध्याता-ध्येय ह्यांचा विकल्प देखील रहात नाही.**

अशाप्रकारे निश्चय धर्मध्यानाच्या साधनेकरितां व्यवहार धर्मध्यानामध्ये चिंतन केलेल्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाद्वारे ज्ञानोपयोगाला आत्मकेंद्रित केले जाते.

---

१. तत्त्वार्थ राजवार्तिक, ९/२६

ह्याच्या विरुध्द योग साधनेच्या ध्यान शिबिरामध्ये आसन आणि प्राणायामाच्या माध्यमातून साधकांना ध्यान करण्याच्या सूचना दिल्या जातात, त्यामध्यें ध्यानाला अर्थात ज्ञानोपयोगाला नखापासून डोक्यापर्यंत शरीराच्या एक एक अवयवावर श्वासोश्वासाला तेथे थोपवण्यास आणि श्वासाला येताना जाताना पहायला किंवा जाणायला आणि विशिष्ट अमुक अवयव शिथिल होत आहे, शून्य होत आहे – असा अनुभव करण्यास सांगितले जाते. आपल्या मनाला श्वास आणि उश्वासावर केंद्रित करा आणि साक्षी भावाने येणाऱ्या जाणाऱ्या श्वासोश्वासाचा अनुभव करा – अशा सूचना दिल्या जातात ह्या ध्यानामध्ये आत्म्याची चर्चाच केली जात नाही तर मग आत्मानुभव होण्याचा प्रश्नच उभा रहात नाही. खरोखर हि तर केवळ स्वास्थ्य साधना केंद्रं आहेत, ह्यांनी आपल्या धर्मध्यानाचे लक्ष्य (अंतीम ध्येय) पूर्ण होत नाही.

लोकांचे काय ? लोकरुचि तर तशीही बहिर्मुखी आहे–लोकांना तर बहाणा (कारण) मिळायला पाहिजे आणि ते देखील धर्माच्या नावावर! ह्यासाठी हवी तेवढी गर्दी एकत्रित करा. सर्वांना निरोगी बनण्याचा लाभ तर होतोच. स्वस्थ राहण्याची क्रिया स्वास्थ्याकरिता एखादा करीत असेल तर त्यात काही हरकत नाही; परंतु धर्मक्रिया मानून तर करू नये."

लाभानंदाने विचारले – "गुरुजी, ही आसनं, प्राणायाम आणि प्रत्याहार जे आपण सांगितलेत, त्यांचा उल्लेख तर जिनागमामध्ये देखील आला आहे नां ? असे ऐकले आहे आचार्य शुभचंद्रांनी ह्यावर मोठ्या गांभीर्याने विचार केला आहे आणि पूर्वाचार्यांनी जे प्राणायामाचे तीन भेद सांगितले आहेत – त्याचा देखील त्यांनी उल्लेख केला आहे. प्राणायामाच्या बाबतीत ज्ञानार्णवामध्ये मूळ कथन अशा प्रकारे आहे –

**त्रिधा लक्षणभेदेन, संस्मृतः पूर्व सूरिभिः ।**
**पूरकः कुम्भकश्चैव रेचकस्तदनन्तरम् ॥ ३ ॥ ( सर्ग २९ )**

पूर्वीच्या आचार्यांच्या द्वारे लक्षणाच्या भेदाने प्राणायाम तीन प्रकारचा मानला गेला आहे–कुम्भक, पूरक आणि रेचक.

**कुम्भक** – श्वासाला हळु हळु आत ओढून नाभिरूप कमलामध्ये आत कुंभाच्या आकारामध्ये दृढतापूर्वक रोकणे.

**पूरक** – कुम्भकामध्ये घेतलेला श्वास रोकून ठेवणे.

**रेचक** – पूरकमध्ये रोकलेला श्वास हळु हळु सोडणे.

**ह्या तिन्ही श्वासाच्या क्रिया करणेच प्राणायाम आहे.**

**वास्तविक प्राणायाम श्वासोश्वासाच्या अंतर्गमन - बहिर्गमन व अंतः-स्थापन ह्याच्या नियंत्रणाची प्रक्रिया आहे. असे म्हणतात की - उपर्युक्त प्राणायामामध्यें रेचकाने उदरातील व्याधि आणि कफ नष्ट होतो, पूरकाने शरीर पुष्ट होते आणि खूपशा व्याधिंचा नाश होतो तसेच कुम्भकाने हृदय कमळ विकसित होते. अशाप्रकारे प्राणायाम मूलतः शारीरिक स्वास्थ्य लाभाचा विषय आहे.**

**आचार्य शुभचंद्रानी प्राणायामच्या व्यतिरिक्त प्रत्याहाराची चर्चा देखील एका स्वतंत्र अध्यायामध्ये केली आहे. प्राणायामाच्या अध्यायामध्यें प्रथम तर प्राणायामाला अंतःकरणाच्या शुध्दि करितां सांगितले गेले परंतु नंतर प्रत्याहाराबद्दल सांगताना प्राणायामाला ध्यानामध्यें बाधक म्हटले आहे.**

**त्यांचे म्हणणे आहे - प्राणायामाच्या क्रिया स्वतः मूळतः श्रमसाध्य असल्याने थकवा उत्पन्न करीत असल्याने ध्यानामध्ये बाधक बनते. म्हणून धर्मध्यानाकरितां प्राणायाम उपयुक्त नाही.**

अशाप्रकारे आचार्य शुभचंद्रानी सुध्दा प्राणायामाला बाधकच मानले आहे.''

धर्मेशजींच्या ह्या आगमसंमत आणि युक्तीसंगत विचारांना ऐकून इतर आत्मार्थी तर संतुष्ट व आनंदीत तर झालेच, लाभानंद, रामानंद व मनमोहन ह्यांना देखील समजले।

धर्मेशजीने पुढे म्हटले - ''प्रत्याहाराचे स्वरूप स्पष्ट करताना आचार्य शुभचंद्र ज्ञानार्णवामध्ये म्हणतात की - इंद्रियांच्या आणि मनाच्या विषयांपासून आपल्या उपयोगाला हटवून इच्छेनुसार जेथे केंद्रित करावे वाटेल तेथे केंद्रित करण्याच्या प्रक्रियेला प्रत्याहार म्हणतात.

असा प्रत्याहार करणारा ज्ञानी साधक पाचही इंद्रियांच्या आणि मनाच्या विषयासून आपल्या ज्ञानोपयोगाला (मनाला) पृथक् करुन आकुलतारहित होत होत आत्मस्थ होतो.

**सम्यक् समाधि सिध्द्यर्थं प्रत्याहं प्रशस्यते ।**
**प्राणायामेन विक्षिप्तं मनः स्वास्थ्यं न विन्दति ॥**

समाधिला चांगल्या प्रकारे सिध्द (प्राप्त) करण्याकरितां प्रत्याहारच प्रशंसनीय आहे; कारण प्राणायामाने क्षोभित झालेले मन शीघ्र स्वस्थ (शांत-निश्चल) होऊ शकत नाही।[१]

प्राणायामाचे साफल्य शरीराला हलके-जड करण्यामध्ये उपयोगी आहे; परंतु मुक्तिच्या अभिलाषा बाळगणाऱ्यांच्या अभीष्ट प्राप्तिमध्ये तर प्राणायाम बाधकच आहे.

प्राणायामाच्या बाबतीत आचार्य स्वत: लिहितात की, – ''ज्या प्राणायामाच्या वायुसंचार विषयी क्रिया आपल्या संदेह (शंका) आणि पीडेचे कारण आहेत, त्यांनी काय अभीष्टाची सिद्धी (प्राप्ति) होणार आहे ? काहीही नाही. जे मुक्तिचा हेतु आहे असे ध्यान व प्रत्याहार यांचाच का न अंगीकार करावा ?

अशातऱ्हेने आपण पाहतो की जैनदर्शनामध्ये सामूहिक ध्यानाची तर अशी कोणतीही विधि (पध्दत) नाही, ज्यामध्ये दुसऱ्यांच्या मार्गदर्शना (सूचनां) मध्ये सामूहिक ध्यान केले जात असावे.''

अशातऱ्हेने धर्मेशने लाभानंदाच्या मनातील समस्येचे शास्त्रसंमत समाधान करून हे स्पष्ट केले की शारीरिक स्वास्थ्याच्या दृष्टिने योगसाधनेचा उपयोग असून देखील आत्मकल्याणामध्ये ह्याचे कोणतेही स्थान अथवा सहकार्य/मदत नाही.

धर्मेशजींच्या ह्या कथनाने लाभानंदाचा ध्यान शिबिर लावण्यासंबंधीचा दुराग्रह आपोआप समूळ नष्ट झाला. त्याच्या ध्यानात आले की, शिबिर तर ज्ञानाचेच लागते, ध्यानाचे नाही. •

---

१. ज्ञानार्णव : श्लोक ४, सर्ग ३०

# २६

पवित्र उद्देशाने, निस्वार्थ भावाने आणि निश्चल मनाने निघालेला अंतरात्म्याचा आवाज सरळ स्वभावाच्या जागृत श्रोत्यांच्या मनाला भिडल्या शिवाय रहात नाही.

जर वक्त्याच्या वाणीला आगमाचा आधार असेल, युक्तिंचे अवलंबन आणि स्वानुभवजन्य आत्मविश्वास असेल, मग तर काय सांगावे ?

अशा उत्कृष्ट वक्त्यांना जेव्हा समजाविण्याचा विकल्प येतो तेव्हा समजावे की, त्या क्षेत्र-काळामध्ये अशा भल्या होनहार (भवितव्य) वाले मंदकषायी श्रोतेदेखील आसपास कोठे ना कोठे असणारच; कारण पुण्यात्म्यांचे विकल्प निरर्थक असत नाहीत. ध्यानावर होत असलेली धर्मेशजींची प्रवचनं ह्या अनुभवसिद्ध गोष्टीला सार्थक सिद्ध करीत होती.

धर्मेशजींनी जेव्हा आपल्या प्रवचनामध्ये ह्या आर्तध्यानाची यथार्थ परिस्थिती व त्याच्या दुःखद फळाचे जोरदार भाषेमध्ये वैराग्यवर्धक सजीव चित्रण प्रस्तुत केले तेव्हा अनेक लोकांच्या डोळ्यात अश्रु आले, हृदय गद्‌गदित झाले. परिस्थिती येथवर गेली की लोकांना रात्रभर झोपदेखील आली नाही. सर्वात अधिक अमित सुनंदा मनमोहन आणि सुनयना यांची झोप पार उडाली. कारण धर्मेशजींच्या प्रवचनाने सर्वात जास्त त्यांच्याच दुःखाला अधिक स्पर्श केला होता, त्यांच्याच हृदयातीत भावनांना हात घातला होता. त्यांना असे वाटत होते की जणु धर्मेशजींनी त्यांच्या मनात प्रवेश करुन त्यांच्या मनातील भाव ओळखले.

मनमोहन विचार करीत होता - हे आर्तध्यान असा राजरोग आहे, जो थोडाफार तर धर्मात्म्यांनादेखील असतो; परंतु तत्त्वज्ञानशून्य अशा आमच्या सारख्या अज्ञानींना तर हा एक मोठा शाप आहे. आमच्या सारख्यांना तर हा कधी कधी जीवन-मरणाचा प्रश्न बनतो - ह्या - पासून कसे वाचता येईल बरे ?

सुनंदा तर अनिष्टसंयोगज आर्तध्यानाची साक्षात मूर्तिच होती. तिचे आतापर्यंतचे पूर्ण आयुष्य ह्या आर्तध्यानातच गेले होते. वडीलांच्या व्यसनीपणामुळे तिचे बालपण ज्या प्रतिकूल परिस्थितीत गेले होते, ज्या ज्या यातना तिने त्या प्रतिकूल परिस्थितीमध्यें भोगल्या होत्या, धर्मेशजींचे प्रवचन ऐकून त्या त्या अनिष्ट संयोगांची दृश्ये तिच्या डोळ्याच्या पडद्यावर चलत-चित्राप्रमाणे येऊ लागली. धर्मेशजींचे प्रवचन ऐकून तीदेखील हाच विचार करीत होती की, हाय! ह्या **परिणामांचे ( भावांचे ) फळ काय मिळेल? ह्यांच्यापासून सुटका कशी मिळेल ?**

ऐन तारुण्यामध्ये अमितसारखा दारुबाज पति पदरात पडल्यामुळे ज्या अनिष्ट संयोगामध्ये आणि त्या निमित्ताने होणाऱ्या आर्तध्यानाच्या दुष्टचक्रामध्ये ती अडकली होती; ती दृश्ये देखील तिच्या नजरे समोरुन गेल्याशिवाय राहिली नाहीत - ती रात्रभर अंथरुणात पडल्या पडल्या अनिष्टाच्या आशंकेने एवढी घाबरली होती की तिची झोपच गायब झाली.



सुनयना इष्टवियोगज आर्तध्यानाचे मूर्तिमंत उदाहरण होती. तिच्या तर आतापर्यंत पुऱ्या आयुष्याची हालतच झाली होती. धर्मेशजींच्या प्रवचनाने तिच्या-स्मृतिपटलावर ती सर्व दु:खद दृश्ये सरसर येऊन गेली. इष्टवियोगाच्या कल्पित गोष्टींमध्ये तिचे बालपण गेले होते आणि तारुण्यातील सुखद कल्पना

देखील आकस्मिक झालेल्या दुर्घटनेने अनायासे धुळीला मिळाल्या होत्या. ती सगळी दृश्ये तिच्या नजरेसमोर वारंवार येऊ लागली.

अमित दुर्व्यसनापायी राजरोगांनी असा घेरला गेला होता की त्यामुळे रात्रंदिवस कण्हत होता. आता तर पीडेच्या कल्पनेनेच आरडा-ओरड करीत होता. कालच्या प्रवचनामध्ये जेव्हा पीडाचिंतवन आर्तध्यानाच्या दुःखद दुष्परिणामांचे चित्रण केले गेले तेव्हा अमितची दशा आणखीनच खराब झाली. तो तर गडाबडा लोळण घेऊन धर्मेशजींच्या चरणी पडला आणि म्हणू लागला – ह्यापासून वाचण्याकरिता उपाय सांगा. आपण जे म्हणाल ते सर्व करण्यास मी तयार आहे.

अशातऱ्हेने मनमोहनचा आतापर्यंतचा सगळा काळ निदान नावाच्या आर्तध्यानातच गेला. धर्मेशजींच्या प्रवचनाने त्याला देखील आपल्या चुकांची पुरेपूर जाणीव झाली. त्याच्या डोळ्यासमोर त्या सर्व घटना स्पष्ट दिसू लागल्या, ज्यामध्ये त्यांनी लौकिक कामनांनी आपले धन वैभव कमविण्यासाठी–रक्षणासाठी व उपभोगाकरिता देवी देवतांना प्रसन्न करण्याकरितां नाना प्रकारचे प्रयत्न केले होते, नवस केले होते. त्याला जाणवत होते की त्याच्या त्या धार्मिक क्रिया सकाम असल्याने निदान–आर्तध्यानच होत्या. त्यामध्ये लौकिक अभिलाषा नव्हती असे नव्हते.

लौकिक कामनेसह केली गेलेली पूजा–पाठ, जप–तप वगैरे सर्व निदान–आर्तध्यानाच्या सीमेमध्येच येतात – धर्मेशजींच्या कालच्या प्रवचनात ही गोष्ट फार चांगल्या तऱ्हेने स्पष्ट झाली होती.

प्रवचनामध्ये तर हे देखील आते होते की मिथ्यादृष्टिच्या समस्त शुभभावना आणि शुभध्यान देखील आर्तध्यानच मानले जातील. कारण मिथ्यात्वाच्या भूमिकेमध्ये धर्मध्यान तर होत नाही आणि ध्यानाशिवाय कोणी राहू शकत नाही, म्हणून मिथ्यादृष्टिचा शुभभाव निदान नावाचे आर्तध्यानच आहे.

अशाप्रकारे आणखीन सर्व श्रोत्यांना जवळ जवळ असेच जाणवले होते की कोणत्या न कोणत्या रुपाने आपले आर्तध्यान होतच आहे – धर्मेशजींच्या

प्रवचनांमुळे प्रेरणा घेऊन ज्यांनी कोणी आपल्या मनात डोकावले त्यांना सर्वांना वाटले की जणु हे आपलीच गोष्ट सांगू लागले आहेत. सर्वांना आपापल्या चुकांची जाणीव झाली, आपापल्या उणीवा लक्षात आल्या. आपल्या परिणामांची पापमय परिणति स्पष्ट दिसू लागली होती.

सर्व लोक बरोबर समजत होते की अजून धर्मध्यान होण्याची तर कोणामध्ये पात्रतासुध्दा नाही. असेलच कोठून ? त्यासाठी तर प्रथम सम्यग्दर्शन असणे अनिवार्य आहे-चतुर्थ गुणस्थानामध्येच धर्मध्यानाचा शुभारंभ होतो. त्याच्या अगोदर मिथ्यात्वाच्या भूमिकेमध्ये तर धर्मध्यान होतच नाही. ह्या दृष्टिने विचार केला तर मिथ्यादृष्टिची पूजा-भक्ति, व्रत-उपवास वगैरे क्रियांमध्ये जे ध्यान होते, ते धर्माचे बाह्य साधन असल्याने लौकिक व्यवहारामध्ये भले त्याला धर्मध्यान म्हटले जात असेल; परंतु मिथ्यात्वाच्या भूमिकेमध्ये वास्तविक तो शुभभाव निदान नावाच्या शुभ आर्तध्यानाच्या प्रकारात मोडतो.

आगम आणि युक्तिच्या आधारे सांगितलेल्या धर्मेशजींच्या एक एक गोष्टी श्रोत्यांच्या मनात ठसल्या होत्या - मिथ्यात्वाच्या भूमिकेमध्ये धर्मकार्यांच्या पाठीमागे देखील कोणती ना कोणती अभिलाषा/कामना असतेच, भले मग ती हीच का न असावी -

**होऊ भव-भव स्वामी मेरे मैं सदा सेवक रहूँ ।**

ही देखील एक कामनाच तर आहे.

जर ह्या आर्तध्यानापासून वाचावयाचे असेल आणि धर्मध्यानाची खरोखर भावना असेल तर त्याकरिता तर वीतराग देव, निर्ग्रंथ गुरु आणि अनेकांतमयी धर्म आणि स्याद्वाद शैलीमध्ये निरुपित केलेल्या शास्त्रांचा यथार्थ निर्णय, जीव-अजीव, आस्रव-बंध, संवर-निर्जरा, मोक्ष, पुण्य-पाप वगैर तत्त्वांचे यथार्थ ज्ञान-श्रद्धान तसेच स्व-पर भेदविज्ञान वगैरे सुद्धा करावे लागेल.

**निश्चय धर्मध्यान ज्ञानचेतनेची ती अवस्था आहे, जेथे समस्त शुभ विकल्प उपशमित होऊन एक आत्मानुभूतिच उरते, भेद-रेखा मिटल्या**

**जातात, विचारश्रृंखला थांबतात, मनाची चंचलवृत्ति निश्चल होते, अखंड आत्मानुभूतिमध्ये ज्ञेय-ज्ञायकाचा भेद उरत नाही.**

ज्या विकल्पात्मक साधनेने उपयोगाला आत्मकेंद्रित केले जाते, त्याला व्यवहार धर्मध्यान म्हटले जाते. मुख्यत: द्रव्य-गुण-पर्याय, वस्तुची कारण-कार्य व्यवस्था, वस्तुस्वातंत्र्यासारख्या सिद्धांताच्या आधारे अकर्तृत्वाच्या भावनेला दृढ़ करीत, बारा भावना आणि वैराग्य भावना यांच्या माध्यमाने संसार, शरीर आणि भोगांच्या असारतेला आणि क्षणभंगुरतेला जाणून, जगापासून उदास होऊनच चंचल मनोवृत्ति नियंत्रित केली जाऊ शकते. ह्या प्रक्रियेचे नाव व्यवहार धर्मध्यान आहे.

जोपर्यंत परामध्ये कोणत्याही प्रकाराने परिवर्तन करण्याचा किंवा करविण्याचा विचार असेल तोपर्यंत मनाच्या वृत्ति/प्रवृत्तिवर नियंत्रण शक्य होणार नाही. म्हणून ध्याना अगोदर जगाच्या स्वतंत्र, स्वयंचलित वस्तुव्यवस्थेचे ज्ञान होणे अति आवश्यक आहे.

शास्त्रानुसार ज्ञान तर अनेकांना होते, परंतु ज्ञानाबरोबर त्याच्यावर श्रद्धा असणे देखील अति आवश्यक आहे. प्रतीति (श्रद्धे) शिवाय प्रीति असत नाही आणि प्रीतिशिवाय प्रवृत्ति होत नाही. श्रद्धा-ज्ञान-चारित्राचा अत्यंत घनिष्ट संबंध आहे. म्हणून सर्वात प्रथम जैनदर्शनाच्या मूलभूत (भौतिक) सिद्धांताचे ज्ञान-श्रद्धान होते, तेव्हा कोठे आत्म्याचे ध्यान होते आणि ध्रुवधाम आत्म्याच्या ध्यानानेच पर्यायामध्ये ध्रुवतेची प्राप्ति होते.

ज्याला अजून देव-अदेवाचा विवेक नाही, आस्रव-संवरामधील फरक नीट समजत नाही, बंध व मोक्षाच्या प्रक्रियेचा पत्ता नाही, जीव-अजीवामध्ये भेदज्ञान नाही. त्याला सम्यग्दर्शन कोठून होईल ? कसे होईल ? आणि जोपर्यंत सम्यग्दर्शन होत नाही तोपर्यंत धर्मध्यान देखील होणार नाही.

अशा प्रकारे धर्मेशच्या प्रभावशाली तत्त्वज्ञानपरक प्रवचनांना ऐकून सर्व श्रोते स्वत:ला धन्य धन्य समजत होते. ●

# २७

"आपण कधी याचा विचारही केला नसेल आणि सामान्यत: असा कोणी विचारही करीत नाही की सकाळी झोपेतून उठताच आपण दररोज ज्या लहान सहान कामांनी आपला दैनंदिन कार्यक्रम सुरु करतो, त्यांनी देखील भयंकर पापाचा बंध होतो. वास्तविकता ही आहे की आपल्या सकाळच्या कामाची सुरुवात बहुतांशी पापभावानेच होते आणि तीसुध्दा अशा क्षुल्लक व्यर्थ कामांनी की ज्यापासून आपली कोणती लौकिक प्रयोजनं सुद्धा पूरी होत नाहीत.

जर थोड्याशा विवेकाने काम केले तर आपण खूपशा व्यर्थ पापापासून वाचू शकतो व आपले जीवन मंगलमय बनवू शकतो.

विचार करा - अंथरूण सोडताच सर्वात पहिल्यांदा आपल्या हातामध्ये जे वर्तमानपत्र असते, त्यातील मुख्य बातम्या वाचताच आपले चंचल मन एकतर आनंदित होऊन नाचू लागते किंवा मन उदास होते. त्यावेळेला मनामध्ये जे हर्ष विषादरूप नाना प्रकारचे संकल्प-विकल्प होतात, त्यातील हर्षाचे भाव रौद्रध्यान आणि विषादाचे भाग आर्तध्यानामध्ये मोडतात, जे भाव निव्वळ पापभाव आहेत आणि क्रमश: नरकगति व तिर्यंचगतिचे कारण आहे.

जरा विचार करा-आपण जेव्हा लहान मुलांचे लाड करतो, त्यांना मांडीवर घेऊन खेळवितो, त्यांच्याबरोबर त्यांचे व आपले मनोरंजन करतो, त्यांना न्हाऊ घालतो, चांगले चांगले कपडे घालतो, त्यांच्या बारीक सारीक हालचालीवर प्रसन्न होतो, त्यांचा-वाढदिवस साजरा करतो, लग्न करतो, पार्ट्या देतो, स्वत: देखील खात-पीत, हसत, हसवत कामाला जातो, मित्रांबरोबर गप्पा मारतो, आई-वडिल, पत्नी-पुत्र यांच्याशी प्रेमाने बोलतो; तेंव्हा काय आपल्याला असे कधी जाणवते कां की आपण खरोखर कोणते पाप करीत आहोत ? अहो ! न तर आपल्यालाही असे जाणवते आणि सर्वसाधारपणे न जगही असे मानते की असे करण्यामध्ये आम्ही कोणते पाप केले आहे.

परंतु वास्तविकता ही आहे की हे सर्व अशुभभाव असल्याने पापरूपच आहेत, आनंदरूप असल्याने रौद्रध्यान आहेत, ज्याचे फल नरकगति आहे, कुगति आहे.''

अशातऱ्हेने आपल्या रोजच्या जीवनाच्या संदर्भामध्ये रौद्रध्यानाची चर्चा करीत असताना धर्मेशजींनी म्हटले –

''आपल्याला स्वतःलाच माहित नाही की आपण केवढ्या घोर अंधःकारात फसलेलो आहोत. खूपसे पापभाव तर आपणास पापभाव वाटतच नाहीत. घरात सर्व नातेवाईक जेव्हा एकत्र बसून मोठ्या प्रेमाने टी.व्ही पाहतो, पत्नीशी प्रेमाच्या चार गोष्टी बोलतो, मुलांशी बोलतो, एकमेकांबरोबर मनोरंजन करतो, परस्पर प्रेमाने राहिल्याने मनातल्या मनात खूष होतो, अभिमान वाटतो आणि आपल्या घराला–कुटुंबाला आदर्श मानतो; परंतु जर धर्मदृष्टिने त्याचा विचार केला आणि परिणामांची परीक्षा केली तर पत्ता लागेल की काय खरोखर त्यावेळेस आपणास पुण्यबंध होत आहे का पापबंध होत आहे अथवा मिथ्यात्वरूप महाअधर्म होत आहे ? निश्चितपणे हे अशुभ भाव असल्याने पाप परिणाम आहेत आणि रौद्रध्यानाचे भाव आहेत; त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे स्वतःला धोक्यात ठेवण्यासारखे आहे, स्वतःची फसवणूक आहे.

ह्याशिवाय आणखीन देखील जे अशुभ भाव असल्याने पाप परिणाम आहेत, त्यामध्ये आनंदाची अनुभूति रौद्रध्यानच आहे, ज्यांना आगमामध्ये अशातऱ्हेने म्हटले आहे –

**हिंसा, असत्य, चोरी आणि विषयांच्या सरंक्षणासाठी निरंतर चिंतन करणे रौद्रध्यान आहे.**

जो हिंसेमध्ये आनंद मानतो, खोटे बोलण्यात आनंद मानतो, चोरी, विषय सेवन आणि परिग्रह संग्रह करण्यामध्ये आनंद मानतो, ह्या कार्यामध्येच ज्याचे मन लिप्त असते, रममाण असते, ते सर्व रौद्रध्यान आहे.''

आर्त–रौद्र ध्यानातील फरक स्पष्ट करताना धर्मेशजींनी म्हटले – ''आर्तध्यानाचा स्वभाव (प्रकृति) दुःखस्वरूप आहे आणि रौद्रध्यानाचा स्वभाव (प्रकृति) आनंदरूप आहे. सांग पाहू अमित, तुझा 'खा–प्या आणि मजा करा' वाला सिद्धांत कोणत्या ध्यानाच्या प्रकारात बसतो ?''

अमित क्षणभर विचार करुन म्हणाला – "आपल्या सांगण्यानुसार तर हे परिणाम रौद्रध्यानरूपच झाले; कारण खा-प्या आणि मौज करा ही वृत्ति विषयांमध्ये आनंद मानण्यासारखीच तर आहे."

हसत धर्मेशजी म्हणाले – "वा! वा!! वास्तविक प्रवचन तर तू ध्यान देऊन ऐकले आणि समजलास देखील, ह्या करिता तुला जेवढे धन्यवाद देता येतील तेवढे कमी आहेत. अहो! पूर्ण जगत ह्या विषयामध्ये आणि विषयसामुग्रीच्या संग्रहामध्ये मग्न आहे. कोणाला काही माहीतही नाही की आपल्या ह्या परिणामांचे फळ आपणास कोणती दुर्गति देईल ?

हे पहा ! जैनधर्मानुसार पाप-पुण्याचा व धर्माचा मूळ आधार तर अभिप्राय आणि मान्यताच आहे. म्हणून म्हटले आहे की, कोणत्याही तऱ्हेने दुसऱ्याची संपत्ति हिसकावून घेणे किंवा हडप करणे वगैरे प्रकारचा अभिप्राय, खोटे बोलण्याचा अभिप्राय, दुसऱ्याला मारणे-झोडणे व जीवानिशी मारणे वगैरेचा अभिप्राय रौद्र-ध्यान आहे. तसेच पाच स्थावर आणि त्रस-ह्या षट्कायिक जीवांच्या विराधनेमध्ये आणि असि-मसि-कृषि वगैर हिंसक साधनांद्वारे परिग्रहाच्या संग्रहामध्ये आनंद मानणे देखील रौद्रध्यानच आहे.

रौद्र ध्यानाची व्याख्या सांगताना आगमामध्ये हेदेखील सांगितले आहे कीजे भाव जीवाला जन्म-मरणाच्या दुःखामध्ये लोटतात, भ्रमण करवितात ते रुद्र म्हटले जातात. ह्या दृष्टिने हिंसा, असत्य चोरी आणि परिग्रह संग्रह-परिणाम रुद्र आहेत, ह्या रूद्र भावांमध्ये रात्रंदिवस मग्न राहणे व त्यात आनंद मानणे हेच रौद्रध्यान आहे.

स्वतः किंवा दुसऱ्यांकडून एखाद्याला मार-झोड करुन, तो दुःखी झाल्याने त्यान आनंद मानणे तसेच युध्दामध्ये हार-जीतची भावना, सूड घेण्याची भावना वगैरे भाव देखील रौद्रध्यान आहे."

रौद्रध्यानी व्यक्तिची बाहय चिन्हं सांगण्यासाठी धर्मेशजी म्हणाले –

"क्रूर बनणे, हत्यार बाळगणे, हत्यारं चालविण्याच्या कलेमध्ये निपुण होणे, हिंसेच्या कथा ऐकण्यामध्ये रुचि घेणे, उंचविलेली भुवई, विकृत

मुखाकृति, रागामुळे घाम येणे-शरीर कापणे वगैरे तसेच कठोर वचन, मर्मभेदी वचन, आरडा ओरडा करणे, तिरस्कार करणे, एखाद्याला बांधणे, मारणे, परस्त्रीवर अतिक्रमण करणे वगैरे रौद्रध्यानीची बाह्य चिन्हं आहेत."

जगाच्या अनुभवाच्या आधारे रौद्रध्यानींचे चित्रण करण्यासाठी धर्मेशजींनी पुढे सांगितले - "जे केवल मनोरंजनार्थ शिकार खेळतात, फक्त गवत खाणारे गरीब भोळे, हीन-दीन ससे किंवा हरिणांसारख्या मूक पशुंना आपल्या हत्याराचे लक्ष्य बनवून खूष होतात, अस्वल, माकड, साप तसेच पोपट, चिमण्या वगैरेंना बंधनात टाकून आपले व इतरांचे मनोरंजन करुन त्यांना पीडित करुन त्यापासून आपल्या उपजीविकेचे साधन मानतात, ते सर्व रौद्रध्यानच आहे."

आणखी हे पण पहा - "ज्या लोकांना पशु-पक्ष्यातील कोंबडे, तीतर, रेडे, बकरे, बोकड, ऊंट यांच्यामध्ये तसेच मनुष्यांमध्ये लढाई जुंपण्यामध्यें, तसेच भांडणाऱ्या प्राण्यांना पाहण्यामध्ये, त्यांना लढण्यासाठी प्रोत्साहित करण्यामध्ये आनंद वाटतो ते सर्व रौद्रध्यानाच्या प्रकारात मोडते."

धर्मेशने अमितला विचारले - "आता तू सांग, मार-झोड, लढाया आणि अश्लिल सिनेमा पाहणे आणि असलेच साहित्य वाचण्यामध्ये रुचि घेणे तसेच रहस्यकथा वाचणे कोणते ध्यान आहे ?"

अमितने उत्तर दिले - "हे सर्व रौद्रध्यानच आहे. कारण रौद्रध्यानींनाच अशाप्रकारचे सिनमा पाहण्याचे आणि असलेच साहित्य वाचण्यामध्ये वगैरे आनंद होत असतो."

धर्मेशजींनी पुन्हा अमितला विचारले - सांग अमित, तू दररोज सकाळी वर्तमानपत्रातील निवडणुकांतील जय-पराजयामध्ये दुःखी किंवा आंनदित होतोस, हर्ष-विषाद करतोस, ते कोणते ध्यान आहे ?"

अमित चटकन म्हणाला - "हर्षामध्ये रौद्रध्यान व विषादामध्ये आर्तध्यान होते."

अमितच्या उत्तरावर समाधान व्यक्त करीत धर्मेशजी म्हणाले - "जसे पेरावे तसे उगवते. ह्या म्हणीनुसार अशा हिंसानंदी रौद्रध्यानींना ह्या परिणामांच्या फलस्वरूप नियमाने नरकगति मिळते, जेथे ते अनेक सागरवर्षांपर्यंत भांडतात-

लढतात, तसेच इतर नारकी ह्यांच्या देहाचे तिळा एवढे बारीक तुकडे करतात ज्यामुळे ह्यांना मरणप्राय पीडा तर होते, पण मरण येत नाही.

ज्यांना भांडण किंवा भांडायला लावणे - मारामाऱ्या करायला लावणे हेच जास्त पसंत आहे, त्यांना नरकामध्ये खूप भांडावे लागते. ज्यांना नरकात जावेसे वाटत नसेल, तर त्यांनी इतरांचे परस्परांमध्ये भांडण लावता कामा नये.

जे उपजीविकेसाठी हिंसोत्पादक व्यवसाय, उद्योग-धंदा करुन अधिक धन मिळवून आनंद मानतात, ते देखील हिंसानंदी रौद्रध्यानी आहेत. मद्य-मास-मध तसेच नशाकारक गोष्टींचा व्यापार, कीटकनाशक वस्तुंचे उत्पादन वगैरे अनेक अशा गोष्टी आहेत, ज्यामध्ये अनंत जीवांची हिंसा (हत्या) अनिवार्य आहे. अधिक कमाईच्या लोभामध्ये पडून असे निकृष्ट धंदे करुन खूष होणे हिंसानंदी रौद्रध्यान आहे अर्थात् ज्याचे फळ नरक आहे.

लक्षात ठेवावे, सर्वांनी आपापली समीक्षा व शोध घ्यावा. दुसऱ्यांना सन्मार्ग दाखविण्यास जिनवाणी माता पुरेशी आहे. दुसऱ्यांवर टीका टिप्पणी करण्याच्या भानगडीत आपण आपले दोष पाहू शकत नाही.

चौर्यानंदी रौद्रध्यानाच्या सीमेमध्ये न केवळ डाकू आणि चोरच मोडतात, तर ते सर्व व्यापारीसुद्धा आहेत की जे अधिक पैसे कमविण्याच्या लोभापायी सोने-चांदी, हिरे-मोती यांची चोरटी आयात करुन तथा कर चुकवून त्यामध्ये यशस्वी झाल्यास आनंदी होतात.

ह्याशिवाय विषय-सामुग्रींना जमवून, चेतन-अचेतन परिग्रहांचा संग्रह करुन, आवश्यकतेपेक्षा अधिक भोगोपभोग सामुग्रीचा संग्रह करुन त्याचे दर्शन आणि प्रदर्शन करण्यामध्ये उत्साहित होणे हे विषयानंदी किंवा परिग्रहानंदी रौद्रध्यान आहे.

ह्या गोष्टी आगमाने सिद्ध झाल्याच आहेत, युक्तिने सुद्धा सिद्ध होतात. जी व्यक्ति हिंसा-खोटे-चोरी कुशील वगैरेच्या संदर्भामध्ये एखाद्या जीवाची हत्या करते, तेव्हा येथे मानवाद्वारे बनविलेल्या कायद्याने त्याला एक वेळ फाशीची सजा देण्याचा नियम आहे आणि जर तीच व्यक्ति दोन, तीन, चार, शंभर, दोनशे, हजार, दहा हजार, लाख, दहा लाख, संख्यात, असंख्यात किंवा अनंत जीवांची हत्या करेल तर ह्या मानवाने बनविलेल्या न्यायालया

जवळ त्याला अनंतपटी ने शिक्षा देण्याची तरतूद आहे ? काहीही नाही. परंतु निसर्गामध्ये असा अन्याय होऊ शकत नाही. म्हणून निसर्गाजवळ ह्याची न्यायोचित तरतूद असलीच पाहिजे. बस, त्याच तरतुदीचे नाव आहे नरक व निगोदवास. जेथे अनंत काळापर्यंत निरंतर मरण्याचे दु:ख भोगावे लागते.

अशातऱ्हेने ह्या खोट्या ध्यानाचे स्वरूप आणि फळ जाणून ह्यापासून जीवाने वाचावे ह्या मंगल भावनेसह आजची गोष्ट येथेच पूर्ण करीत आहे, शेष उद्या!''

अज्ञान अंध:कारात पडलेल्या सर्व श्रोत्यांकरिता धर्मेशजी सम्यग्ज्ञान सूर्य शाबित होत होते-आज त्यांनी जो जो आर्त-रौद्र ध्यानावर प्रकाश टाकला होता - त्या प्रकाशपुंजाने श्रोत्यांच्या हृदयकमळांच्या कळ्या न् कळ्या उमलू लागल्या होत्या. सर्व श्रोते प्रवचनातील विषय वस्तुबद्दल विचार करण्यास विवश झाले.

घराकडे निघालेल्या लोकांमध्ये, जेथे पहावे तेथे घोळक्याने प्रवचनातील चर्चिलेल्या विषयाबद्दलच बोलत असताना दिसून येत होते.

आपल्या घोळक्यात उभा असलेला एकजण म्हणाला - ''पहा बरं! आपण आपल्या समाधानाकरिता एखाद्या व्यक्तिला आपल्या वाग्बाणाचे लक्ष्य बनवून त्याची चेष्टा करतो, एखाद्याची टिंगल, टिका किंवा निंदा करतो, एखाद्या वाईट सवयीमुळे एखाद्याला कोसतो. ह्वे त्याला आपल्या चर्चेचा विषय बनवून त्याच्याबद्दल चांगले-वाईट बोलतो आणि त्यात आनंद मानतो.

आतापर्यंत आम्हाला माहित नव्हते की ह्यामुळे सुद्धा पापबंध होतो. नाही तर आम्ही असे कां वागलो असलो ?

अहो! आता आपणास नीट संकल्प केला पाहिजे की एक-एक गोष्ट नीट विचार करुनच करू, त्यामुळे कमीत कमी फुकटच्या पापापासून तर वाचू!''

घोळक्यातील सर्व लोक त्याचे म्हणणे काळजीपूर्वक ऐकत होते आणि माना डोलावून आपली संमति दर्शवित होते की तू अगदी बरोबर सांगत आहेस आणि ह्यामध्येच आपणा सर्वांचे हित आहे.

अशा तऱ्हेने धर्मेशजींच्या धर्मामृत वर्षावाने भिजलेले सर्व श्रोते अशा पापभावापासून वाचण्याचा संकल्प करीतच आपापल्या घरी परतले. ●

## (२८)

हृदयाच्या तारा छेडणाऱ्या आर्तध्यान-रौद्रध्यानावरील झालेल्या धर्मेशजींच्या प्रवचनांचा श्रोत्यांवर खोलवर झालेल्या प्रभावाकडे पाहून एकदा का होईना सर्वांच्या मनामध्ये 'निमित्ताची अकिंचित्करता' सारख्या अटल सिद्धांतावर देखील प्रश्नचिन्ह लागलेच.

अनायासे अमितच्या तोंडून हे शब्द बाहेर पडले की – "अरे! हे कसले अकिंचित्कर निमित्त आहे, ज्याने माझ्या आणि मजसारख्या अनेक नास्तिकांच्या हृदयाला हादरवले ? **निमित्त खरोखर अकिंचित्करच असतात आणि एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचे काहीही करीत नाही, दोघांमध्ये अत्यंताभाव आहे.** तर मग आपण असा का विचार करीत आहोत की, त्या वाणीचा जादूप्रमाणे प्रभाव (असर) आपल्या हृदयावर होत आहे ? आपल्या डोळ्यासमोर पाहता-पाहता धर्मेशच्या उपदेशाने लाखो लोकांचे जीवन बदलले. लोकांना आत्म्याविषयी आस्था निर्माण होत आहे आणि अनेकांनी अहिंसेचा मार्ग आत्मसात केला आहे, अन्याय-अनीति-अभक्ष्य भक्षणा पासून आपले मन परावृत्त केले आहे.

धर्मेशच्या निमित्ताने एवढे सारे परिवर्तन ? खरोखर हे एक आश्चर्यकारी काम आहे. म्हणून त्याची जेवढी प्रशंसा केली जावी तेवढी कमीच आहे. जो कोणी ऐकतो, तो चुंबकाच्या आकर्षणाप्रमाणे सहजपणे ओढला जातो."

अमित मनातल्या मनात विचार करू लागला – हे सर्व काही असेच अंधश्रद्धेने होत नाही, धर्मेश धर्माचे मर्म खोलण्यामध्ये आणि धर्मासंबंधी मिथ्या मान्यतेच्या भ्रमाला मिटविण्यामध्ये प्रवीणसुद्धा झाला आहे. तो निमित्तांच्या अकिंचित्करपणाला देखील सहजपणे निमित्त-नैमित्तिक संबंध सिद्ध करुन समजावितो. ही गोष्ट खरी आहे की माझ्या डोक्यामध्ये आतापर्यंत

त्याच्या ह्या आध्यात्मिक गोष्टी पूर्णपणे शिरल्या नाहीत, परंतु ही निश्चितपणे माझ्यामधील उणीव आहे. त्यामुळे मला स्वत:लाच समजून घ्यावे लागेल.

धर्मेशजींची प्रवचनं ऐकून त्या श्रोत्यांची परिस्थिती प्रसिद्ध कृष्ण-भक्त मीराबाई सारखी होत होती, जिने राज्य, संपत्ति तसेच पति वगैरेचा सर्वांचा मोह त्यागून **'मेरे तो गिरधर गोपाल, दूसरो न कोई'** असे म्हणून फक्त कृष्णालाच आपल्या मनामध्ये स्थापित केले होते.

भले धर्मेशजीद्वारे, एखाद्या गुरुकुलामध्ये त्यांच्या श्रोत्यांना विधिप्रमाणे शिक्षा-दिक्षा गुरु-शिष्याच्या स्वरुपामध्ये दिली गेली नव्हती; तरी देखील त्यांनी धर्मेशजींना आपल्या मनातच ज्ञानगुरुच्या रूपाने स्थापित तर केलेच होते.

श्रद्धेचे स्वरूपच असे आहे की जे गुणांना महत्त्व देते, लहान मोठे वय बघत नाही.

जेव्हा धर्मेशजींनी चोवीस तासामधील होत असलेल्या आर्त-रौद्र परिणामांचे हुबेहुब चित्र दाखवून दिले तेव्हा तर बहुतेक लोकांच्या अंगावर काटे उभारले.

एकजण म्हणाला – "आम्हाला तर असे वाटतही नव्हते की, वर्तमानपत्र वाचण्यामध्ये देखील पाप होत असते, हसण्यामध्ये, खेळण्यामध्ये, रडण्यामध्ये, आक्रोश करण्यामध्ये देखील पाप होत असते. हे तर आता लक्षात आले की अशा तऱ्हेने विषयांमध्ये आनंद मानणे/मानायला लावणे तर सर्वात मोठे परिग्रहानंदी किंवा विषयानंदी रौद्रध्यान आहे, ज्याचे फळ नरकगति आहे आणि रडणे - आक्रोश करणे आर्तध्यान आहे, ज्याचे फळ तिर्यंचगति आहे."

दुसरा एक वृद्ध गृहस्थ म्हणाला – "आता काय करावे की ज्यामुळे ह्या पाप प्रवृत्ति पासून बचाव करता येईल ? आतापर्यंत माहीत तर नव्हते, म्हणून अजाणतेपणी जे झाले ते झालेच आहे, परंतु आता जाणून बुजून परत तीच चूक करणे योग्य तर नाही!"

तसे पाहता सगळे जणच प्रभावित झाले होते, परंतु संपत शेठ, भूतपूर्व जहागिरदार मनमोहन, अमित आणि लाभानंद विशेष प्रभावित झाले होते. आज ते सात वाजण्यापूर्वीच पावणे सात वाजताच ज्ञानचर्चेच्या कार्यक्रमाला येऊन बसले होते. सगळे गप्प आणि चिंतनाच्या मूडमध्ये बसले होते. असे वाटत होते की जणु हे लोक कालच्या रौद्रध्यानावर झालेल्या प्रवचनामुळे भयाक्रांत होवून असा विचार करीत असावेत की गुरुजींनी सांगितल्याप्रमाणे तर आपल्यातला एकजण देखील नाही की ज्याला कोणत्या ना कोणत्या प्रकारचे रौद्रध्यान होत नाही.

काही लोक उद्योगधंद्याशी जोडलेले आहेत, तर काही मनोरंजनासाठी जोडलेले आहेत, असेही खूप आहेत की जे आपल्या सवयीमुळे नाईलाजाने प्रयोजनाशिवायच रौद्रध्यान करतात.

संपत शेठ चर्चेमध्ये चिंतन करण्याच्या मूड मध्ये बसल्या बसल्या कालच्या प्रवचनाच्या बाबतीत विचार करीत होते – धर्मेशजींनी तर माझे डोळेच उघडले. नाहीतर मला सातव्या नरकात देखील जागा मिळाली नसती. कारण मी तर असा विषयांध झालो होतो की भोगोपभोग सामुग्री गोळा करणे तिचा उपभोग करणे ह्याशिवाय दुसरे काही मला सुचत नव्हते. रात्रंदिवस एकाच गोष्टीत गुंतलो असायचो की न्यायाने-अन्यायाने, खरे-खोटे बोलून-जसे शक्य असेल तसे जास्तीत जास्त पैसा गोळा करणे आणि त्याला यश आणि नाव कमविण्यासाठी व सुखसोयी मिळविण्यासाठी खर्च करणे. ह्यासाठी स्मगलिंग करावे लागले तरी मागेपुढे पाहिले नाही. हिंसेचा आश्रय देखील मी घेतला आणि यश मिळताच आनंदात तल्लीन झालो.

अशातऱ्हेने मी तर सर्वात अधिक हिंसानंदी, मृषानंदी, चौर्यानंदी व परिग्रहानंदी रौद्रध्यानच केले – आता माझे कसे होईल ? कशी सुटका मिळेल ह्या पापापासून ?

अशावेळेला मध्येच धर्मेशजींनी शेठ संपतचा ध्यानभंग करीत म्हटले – "काय शेठ! काय विचार करीत आहात ? कालच्या गोष्टी काही समजल्या की सर्व डोक्यावरुन निघून गेल्या ?"

संपत शेठ धर्मेशजींच्या तोंडून आपले नाव ऐकताच हबकूनच गेले, मग कपाळावरचा घाम पुसत हात जोडून म्हणाले – "गुरुजी! आपण बिलकुल खरे आहे तेच सांगत आहात. मी बसल्या बसल्या हाच विचार करीत होतो. आपण तर ब्रम्हज्ञानी असावे असे वाटते. आपण माझ्या मनातले भाव कसे काय ओळखले ? कालच्या प्रवचनात तर आपण माझ्याच सर्व पापांना तळहातावर ठेलेल्या आवळ्याप्रमाणे स्पष्ट दाखवून माझ्यावर फार मोठे उपकार केले आहेत. मला असे वाटत होते की जणु हे पूर्ण प्रवचन माझ्यासाठीच होत आहे. आता कृपा करुन आपण ह्यांच्यापासून वाचण्याचा उपाय जरूर दाखवावा. त्याकरिता मी आपला अत्यंत ऋणी राहीन."

हसत धर्मेशजी म्हणाले – "धीर बाळगा शेठ! क्रमाक्रमाने सर्व गोष्टी येतील. जिनवाणीमध्यें सर्व काही आहे. जिनवाणी मातेचे आपणा सर्वांवर अनंत उपकार आहेत!

अहो! दिंगबर आचार्यांनी फार कमालीचे काम केलेले आहे. त्यांनी आपणा सर्वांवर अपरिमित उपकार केले आहेत. आम्ही तर त्यांचे दासानुदास आहोत-त्यांचे जेवढे गुणगान करावे, तेवढे कमीच पडेल."

संपत शेठजींचे बोलणे ऐकून मनमोहनची हिंमत वाढली-त्यांनी विचार केला की, मी देखील का न आपल्या चुका सुधारण्याकरिता, आपल्या पापांचे प्रायश्चित्त करण्याकरिता, धर्मेशजीं समोर आपले मन उघडे करुन पापाचा बोजा हलका करावा ? का न आपल्या मनाला उघड करावे ?

पूर्वी जे भाव झाले आहेत, ते तर झालेच आहेत-त्यांना लपवून ठेवण्याचे भावदेखील एक अपराधच आहे आणि शिवाय आई-वडिल-गुरुंपासून तर कधी काही लपविता कामा नये.

मनाचा असा हिय्या करुन मनमोहन म्हणाला – "गुरुजी! मी तर आपल्या उपकाराने कृतार्थ तर झालोच आहे. मला लहानपणापासून शिकार करण्याचा फार शौक होता. काय सांगू गुरुजी! मी तर थोड्या काळातच असा नेमबाज

झालो की आयुष्यात माझा एकही निशाणा चुकला नसेल. न जाणो किती मूक प्राण्यांचे प्राण मी घेतले असतील! खरोखर मी मोठा पापी आहे.

घोड्यावर रपेट तर एवढी करत होतो की भले घोड्याला पळून पळून तोंडाला फेस आला, तो पडला, मेला तरी मला एवढा आनंद होई की त्यासाठी मी कित्येक तास घोड्याला पळवतच असे.

पशु-पक्ष्यांची झुंज लावण्यात मला खूप मौज वाटायची. मग भले एकमेकांवर चोची मारतेवेळी, डोक्याने टक्कर खेळतेवेळी, ठोसेबाजी करतेवेळी आणि एक दुसऱ्यांना पाडल्याने ते घायाळ होत असत, आपली हाडे मोडून घेत असत. मरणासन्न होत असत. अशावेळेला मी कोणाचीही कसलीही पर्वा न करता आपले मनोरंजन करुन मौज घेत असे. अशातऱ्हेने आणखीन काय काय सांगू? सांगण्यास संकोच वाटतो; परंतु सांगितल्याशिवाय् प्रायश्चित्त होणार नाही. माझे मन हलके होणार नाही म्हणून सांगत आहे.

धर्मेशजी, मी जवानीच्या जोषामध्ये समजूतदारपणा हरवून बसलो होतो. शहरातल्या सुंदर मुली व चांगल्या कुळातील स्त्रियांचे मनात येईल त्याप्रमाणे शोषण करणे व त्यांना रडत आक्रंदन करण्यास सोडण्यामध्ये मला धन्यता वाटत होती. ते एक माझ्या मनोरंजनाचे साधन बनले होते. जोपर्यंत जहागिरदारी होती, जहागिरदारीचा प्रभाव होता; तोपर्यंत मी ही सर्व पापं केली. खरोखर अशा परिस्थितीत मला जर मरण आले तर कदाचित सातवा नरकसुद्धा माझ्यासाठी कमीच होईल.

आपण जे काही वर्णन केले, त्यामुळे मला असे वाटले की जणु आपण माझ्या जीवनामध्ये डोकावूनच हे सर्व सांगितले. जेव्हा आपण हे सर्व जाणत आहात तर ह्या पापांपासून सुटका मिळविण्याचा उपायसुद्धा आपण जाणतच असाल. तोही सांगाच! आपण प्रायश्चित्त म्हणून जी काही सजा/शिक्षा द्याल, आज्ञा कराल; ती मला शिरसावंद्य आहे. मी आपले उपकार कधी विसरणार नाही.''

धर्मेशजींना मनमोहनच्या पापरूपी चिखलामध्ये आकंठ बरबटलेल्या जीवनाची गाथा ऐकून खूप दुःख झाले. दीर्घ श्वास सोडून ते म्हणाले – ''असो! काही हरकत नाही. पापी तर थोड्या फार अंशाने सगळेच असतात. मिथ्यात्वाच्या फळामध्ये हे होणार नाही तर आणखी काय होईल ? परंतु तुमच्या जीवनात पापाचरणाचा जरा जास्तीच अतिरेक झाला, असो. जे काही झाले, आता त्याला विसरलेच पाहिजे. भविष्यकाळात पुनरावृत्ती होऊ नये म्हणून खऱ्या देव-शास्त्र-गुरुंचे शरण घेणेच ह्याचा एकमेव उपाय आहे. म्हणून खऱ्या देव-शास्त्र-गुरुंचे स्वरूप समजून तदनुसार आचरण करण्याचा प्रयत्न करा-सर्व काही ठीक होईल. घाबरण्याचे काही कारण नाही.''

मनमोहनने नतमस्तक होऊन धर्मेशजींच्या बोलण्याला शिरोधार्य मानले आणि सदैव त्यांच्या सान्निध्यामध्ये राहण्याचा मनातल्या मनात दृढ संकल्पही केला.

त्याच ज्ञानचर्चेत बसलेला एक वकील विचार करु लागला – आम्ही वकील लोकांनी खऱ्याला खोटे करून आपल्या व्यवसायाला बदनाम तर केलेच आहे शिवाय त्याच्या माध्यमातून मोठ-मोठ्या अपराध्यांना उचित शिक्षा द्यायला लावण्याऐवजी त्यांना शिक्षेतून वाचवून उलट अपराध करण्याकरिता प्रोत्साहितच केले. त्यांच्याकडून मोठमोठ्या फीजचे सौदे करुन, लाखो रुपये घेऊन लखपति बनण्याचे स्वप्न साकार झाल्याने मनातल्या मनात खूप खुषही झालो. अशात-हेने मीदेखील हिंसा-चोरी-असत्य-व्यभिचार आणि परिग्रह वगैरे सर्व पापांना प्रोत्साहन देऊन खुष झालो होतो. परंतु हे देखील रौद्रध्यान आहे, जे नरक-निगोदाचे कारण आहे. म्हणून धर्मेशजींकडून ह्यापासून सुटका मिळविण्याचा उपाय तर समजलाच पाहिजे आणि जे काही ते सांगतील, त्या गोष्टींना दृढ संकल्पपूर्वक आपल्या जीवनात उतरवले पाहिजे. सुखी होण्याचा ह्याशिवाय इतर दुसरा कोणताही उपाय नाही. खरोखर मी आपल्या जीवनातील बहुतांशी वेळ असाच धनसंचय करण्यामध्ये वाया घालविला. न केवळ आयुष्य वाया घालविले तर त्याचा पापकार्यामध्ये दुरुपयोग सुद्धा केला. असा विचार करुन त्या

वकीलाने धर्मेशजींना विनंती केली – "गुरुजी! कृपा करुन ह्या पापांचे प्रायश्चित्त सांगावे आणि यापासून वाचण्याचा उपायसुद्धा सांगावा."

संपत शेठ, मनमोहन आणि अन्य सर्व श्रोत्यांचा एकत्र स्वर ऐकू आला. हां, हां, गुरुजी आम्हा सर्वांची देखील जवळ जवळ हीच स्थिति आहे.

तेथेच बसलेला एक पुढारी म्हणाला – "आमचीच काय; आज सारा देश ह्याच परिस्थितीतून पसार होत आहे, सगळे ह्या आर्त व रौद्रध्यानामध्येच आकंठ बुडालेले आहेत. ही गोष्ट वेगळी आहे की लोकांना ही गोष्ट माहित नाही की हे परिणाम किती धोकादायक आहेत, नरक-निगोदाचे कारण आहेत. यामुळेच सर्वांचे आयुष्य अशाप्रकारे व्यतीत होत आहे.

म्हणून आता उद्यापासून ह्या खोट्या ध्यानापासून वाचण्याच्या उपायांवर विस्ताराने समजाविण्याची कृपा करावी. त्यामुळे आम्ही लोक ह्या संसार सागराचा किनारा गाठू शकू. आपण जे काही सांगाल, आम्हाला त्याचा लाभ होईलच, आणि आम्ही तर त्या गोष्टीला गावोगावी पोहचविण्याचा पूर्ण प्रयत्न करू."

लोकांची रुचि आणि जिज्ञासा लक्षात घेऊन धर्मेशजींनी सर्वांना आश्वासन दिले – "बंधुनो! जिनवाणीमध्ये सर्व काही लिहिलेले आहे, पहाण्याची दृष्टि पाहिजे तसेच समजण्यासाठी थोडा वेळ आणि तीव्र रुचिची आवश्यकता आहे. मी पण प्रयत्न करेन आणि आपण लोकही थोडा थोडा प्रयत्न करा, कठीण काहीही नाही. दिशा बदलताच दशादेखील बदलते.

उद्यापासून धर्मध्यानाच्या स्वरूपाच्या आधारावर आपणा सर्वांच्या जिज्ञासेला शांत करण्याचा प्रयत्न करेन. आपणा सर्वांना समजण्याचा व मला समजाविण्याचा भाव कायम रहावा, ह्यावरुन असे दिसून येते की, हे काम संपन्न (पूर्ण) होण्याची काललब्धि आली आहे व भवितव्य (होनहार) देखील चांगले वाटते. सर्व बाजूंनी पात्रता पक्व झाली आहे, म्हणून आपण सर्व जण निश्चिंत रहा." ह्या आश्वासनाबरोबरच चर्चा समाप्त झाली. ●

# २१

सूर्य चोहीकडून आपली लाली सावरून वेगाने अस्ताचलाकडे जात होता. गोधूलीची वेळ होती, धूळ उडवत गायी आपल्या बछड्यांच्या ओढीने घराकडे धावत होत्या.

हीच वेळ जिनेशचंद्र शिक्षण संस्थानवासींच्या फिरावयाला जाण्याची असे. संध्याकाळचे जेवण आटोपून बहुतांशी बंधु-भगिनी आपापल्या ग्रुपबरोबर फिरावयास जात असत.

सुनंदा, सुनयना, विजया, अमित, मनमोहन आणि संपत शेठ परस्पर ओळखीचे व नातेवाईक असल्याने शिक्षण संस्थानाच्या विश्रांतिगृहाच्या आजू बाजूलाच रहात होते व त्यामुळे एकत्र दररोज फिरावयास एका बागेमध्ये जात होते. तेथे अर्धा-पाऊण तास शांत व एकांत वातावरणामध्ये बसून धर्मेशजींच्या प्रवचनात आलेल्या महत्त्वाच्या मुद्यांवर आपापसात चर्चा करीत होते.

गेल्या दोन दिवसांच्या प्रवचनांमध्ये आर्त-रौद्र ध्यानाचे स्वरूप आणि त्याच्या दुष्परिणामांची कारुण्यपूर्वक चर्चा ऐकून त्यांच्या पाय.खालची जमीनच हादरली. त्यांचे सर्वांचे डोळे तर पाणावलेच होते, प्रत्येकाच्या हृदयाचे ठोकेही वाढू लागले होते. सगळे सुन्न झाले होते.

अमितने धाडस करुन बोलण्यास प्रारंभ केला व तो म्हणाला – ''मनमोहन, पहा, ह्या आर्त-रौद्रासारख्या चुकीच्या भावांमध्ये आपण लोक या वेळेस पुरते बुडालेलो आहोत. भविष्यकाळात ह्यांच्यापासून वाचण्याचा उपाय आणि पूर्वीच्या पापापासून सुटका मिळविण्याची रीत शोधली पाहिजे; नाहीतर जर आताच गोष्ट हाताबाहेर गेली तर अखेरच्या आयुष्यात काय होणार आहे ?

एवढे ऐकताच सुनंदाच्या डोळ्यात अश्रु तरारले, सुनयना देखील स्फुंदून रडू लागली. आई-विजया-देखील किंकर्तव्यमूढ होऊन गुपचुप बसून सर्वांकडे पाहू लागली कारण सगळे कोणत्या ना कोणत्या प्रकाराने वाईट ध्यानामध्ये गळ्यापर्यंत बुडालेले होते.

संपत शेठच्या तोंडून उद्‌गार बाहेर पडले - अहो! आम्हाला तर ह्या गोष्टी माहीतच नव्हत्या! आम्ही तर पुण्यकर्मामुळे प्राप्त फलामध्ये असे एकरूप झालो होतो की जणुं स्वर्ग दोन बोटे उरला होता. परंतु ही तर आपणास नरकात पोहोचविण्याची साधनं ठरु लागली आहेत.

ही संपत्ती तर चोहीकडून आपत्ती बनून आपल्या डोक्यावर मधमाशांप्रमाणे घोंघावू लागली आहे ज्या डंख मारून मारून आपल्याला सुजवतील, मरणासन्न करतील.

धर्मेशजींच्या सांगण्यानुसार ह्यांच्यापासून वाचण्याचा एकमेव उपाय सम्यग्ज्ञानाच्या सागरामध्ये डुंबले जाणेच आहे, नाहीतर हे पिच्छा सोडणारे नाहीत.''

अमितने संपत शेठच्या म्हणण्याला दुजोरा दिला व सर्वांनी निश्चय केला - ''आज तर धर्मेशजींना ह्या पाप परिणामांपासून वाचण्याच्या उपायांवरच प्रवचन करण्याची विनंती करू.''

संपत शेठनी धर्मेशजींना विनंती केली - ''गुरुजी, आपण जे आर्त-रौद्र ध्यानाबद्दल सविस्तर विवेचन केले, त्यानुसार तर आमचे पुरे कुटुंबच ह्या पाप भावांमध्ये आकंठ अडकलेले आहे. अमित, सुनंदा व सुनयना तर रात्रंदिवस अश्रु ढाळत असतात. तरी आपण ह्या पापाच्या दलदलीतून कसे बाहेर पडावे याचे शीघ्र मार्गदर्शन करावे.''

धर्मेशजींनी विचार केला - तसे तर क्रमाप्रमाणे आर्त-रौद्र ध्यानानंतर धर्मध्यानावरच चर्चा करणे योग्य आहे; परंतु तत्पूर्वी अजून इष्ट-अनिष्टाच्या स्वरूपाबद्दल चर्चा करणे अधिक उपयुक्त ठरेल. त्यामुळे सुनंदा व सुनयनेच्या

मनावर जे कष्टाचे घाव पडले आहेत त्यावर थोडीफार मलमपट्टी देखील होईल. धर्मध्यानाची चर्चा उद्या दुपारच्या प्रवचनात करावी.

असा विचार करुन धर्मेशजी म्हणाले – "ह्या विश्वात कोणतीही वस्तु किंवा व्यक्ती मूळत: न इष्ट असते न अनिष्ट! कारण ज्यांचे अज्ञान-राग-द्वेष समाप्त होतात, त्या अरिहंत व सिद्ध भगवंताच्या शब्दकोषामध्ये इष्ट-अनिष्ट शब्दच असत नाहीत. ह्यावरुन हे सिद्ध होते की हे 'इष्ट-अनिष्ट' शब्द फक्त अज्ञान व राग-द्वेषाचीच निपज आहे. राग-द्वेष सापेक्षच ह्यांचे अस्तित्व आहे. हे राग-द्वेषालाच सूचित करणारे आहेत. मोह-राग-द्वेषाच्या अभावामध्ये ह्यांचे अस्तित्वदेखील उरत नाही.

इष्ट अनिष्ट कल्पना व मोह-राग-द्वेष यांचा परस्पर असा घनिष्ट संबंध आहे की जेथे जेथे मोह-राग-द्वेष असतात, तेथे इष्ट अनिष्ट कल्पना असतेच आणि जेथे इष्ट अनिष्ट कल्पना असते, तेथे मोह-राग-द्वेष सुद्धा असतातच.

तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाच्या जोरावर जेव्हा परपदार्थ इष्ट व अनिष्ट भासतच नाहीत तेव्हा मुख्यत: राग-द्वेष व कषाय उत्पन्न होत नाहीत. आपले कर्तव्य तर फक्त तत्त्वाभ्यास करणेच आहे. याच्या बलानेच आर्त-रौद्र ध्यानाचा प्रभाव कमी होत होत क्रमश: अभाव होईल आणि धर्मध्यानाची सुरुवात होईल. तदनंतर क्रमश: शुक्लध्यानात परिणमित होईल व आत्मा परमात्मा बनेल.

एका फार मोठ्या तत्त्ववेत्त्याने लिहिले आहे की – '**कषायभाव पदार्थांना इष्ट-अनिष्ट मानल्यानेच होतात आणि कोणताही पदार्थ इष्ट-अनिष्ट नाही; म्हणून पदार्थांना इष्ट-अनिष्ट मानणेच मिथ्या आहे. जगामध्ये सर्व पदार्थ आपापल्या स्वभावाचेच कर्ता आहेत, कोणी कोणाला सुखकारक-दुःखकारक, उपकारी-अनुपकारी असतच नाहीत. हा जीवच आपल्या परिणामांमध्ये त्यांना सुखकारक-उपकारी मानून इष्ट समजतो अथवा दुःखकारक-अनुपकारी समजून अनिष्ट मानतो, कारण एकच पदार्थ एखाद्याला इष्ट वाटतो, तर एखाद्याला अनिष्ट वाटतो. जसे पाऊस एखाद्याला इष्ट वाटतो तर एखाद्याला अनिष्ट** ......

**माली चाहे बरसना, धोबी चाहे धुप्प ।**
**साहू चाहे बोलना, चोर चाहे चुप्प ॥**

एखाद्या व्यक्तिला देखील एकच पदार्थ एखाद्या विशिष्ट वेळी इष्ट वाटतो आणि दुसऱ्या वेळात अनिष्ट वाटतो. तसेच एखाद्या गोष्टीला कधी इष्ट मानतो, ती गोष्ट देखील अनिष्ट झालेली पाहण्यात येते. जसे सर्वसाधारणपणे शरीर इष्ट आहे, परंतु जर्जर रोग झाला तर तेच शरीर अनिष्ट वाटते. तसेच सर्वसाधारणपणे शिवी अनिष्ट वाटते, परंतु सासरी इष्ट भासते.

अशाप्रकारे पदार्थांमध्ये इष्ट-अनिष्टपणा नसतो. जर पदार्थामध्ये इष्ट अनिष्टपणा असता तर एखादा पदार्थ जो इष्ट वाटतो आहे तो सर्वांना इष्टच वाटला पाहिजे आणि जो अनिष्ट वाटतो आहे, तो सर्वांना अनिष्टच वाटला पाहिजे. परंतु असे आढळून येत नाही. हा जीव स्वतःच्या कल्पनांद्वारे त्यांना इष्ट-अनिष्ट मानतो, म्हणून त्या कल्पना खोट्या आहेत.'

ह्या कथनाने हे सिध्द झाले की पदार्थांना इष्ट-अनिष्ट मानून त्यांच्यामध्ये राग-द्वेष करणे मिथ्या आहे.

हे पहा बंधुंनो! दुःखी होऊन काम चालायचे नाही. प्रत्येक कार्यामध्ये यश प्राप्त करण्याची एक पध्दत असते. ती आत्मसात करावी लागेल.

अमृतचंद्राचार्यांचे म्हणणे आहे - प्रथम शास्त्रस्वाध्यायाद्वारे आपल्या ज्ञानस्वभावी भगवान आत्म्याचा निर्णय करा की मी कोण आहे ? माझे स्वरूप काय आहे ? नंतर पराची प्रसिद्धि करण्याच्या हेतुभूत असणारी जी इंद्रियं, त्यांच्यावरील आपला उपयोग हटवून आत्मसन्मुख करण्याचा प्रयत्न करा. म्हणून कर्ताकर्माच्या भारापासून निर्भार व्हावे लागेल, म्हणून जैनदर्शनाचे मूलभूत सिद्धांत क्रमबद्धपर्याय, कारण-कार्य व्यवस्था, वस्तुस्वातंत्र्य, कर्मसिद्धांतामधील पाप-पुण्य मीमांसा समजली तर हळु हळु सर्व काही ठीक होईल. बाकीचे नंतर ......''

प्रवचनाची वेळ पूर्ण झाली. जिनवाणीच्या स्तुतिनंतर सर्व लोक आपापल्या निवासस्थानी परतले.

# ३०

आर्त-रौद्र ध्यानांवर झालेल्या धर्मेशजींच्या प्रेरणास्पद प्रवचनांनी जे वैराग्याला जोपासणारे वातावरण बनले, त्यामुळे सर्वांच्या सहजपणे लक्षात आले की ही चर्चा किती आवश्यक होती, किती उपयोगी होती!

सर्वांना हे जाणवत होते की धर्मेशकडून योग्य वेळी योग्य गोष्ट फारच योग्य प्रकारे सांगितली गेली आहे. जणु तहानलेल्या धरणीला, सुकलेल्या शेताला-योग्य समयी वर्षा प्राप्त झाली असावी.

कोणतेही खत-पाणी न देता, कोणतेही बी न पेरता देखील बेसुमार वाढणाऱ्या 'बेशरम' (खरपतवार)च्या झुडपांप्रमाणे दु:खदायक आर्त-रौद्ररूप पापभावांच्या विषारी झुडपांमुळे सगळे त्रासले होते. त्यांना मुळासकट उखडण्यासाठी व जाळून भस्म करण्यासाठी धर्मध्यानरुपी अग्नीला प्रज्वलित करणाऱ्या वादळाची प्रतिक्षा सर्वांना होती, जे त्यांना धर्मेशजींच्या स्वरूपाने प्राप्त झाले.

आता सर्व श्रोत्यांची मानसिक भूमिका धर्मध्यानाचे बी पेरण्यायोग्य बनली होती. सर्व लोक धर्मध्यानाचे स्वरुप आणि ध्यान करण्याची प्रक्रिया जाणण्यास आतुर झाले होते - उत्सुक झाले होते.

धर्मेशजींचे प्रवचन सुरु झाले. धर्मध्यानाचा सर्वसाधारण परिचय करण्यासाठी ते म्हणाले - ''धर्म वास्तविक वीतरागभावरुप आहे, रागामध्ये थोडादेखील धर्म नाही. म्हणून धर्मध्यानाकरिता सर्वात प्रथम परम वीतरागी अरिहंत व सिद्ध भगवंतांचे आणि वीतरागतेची पोषक जिनवाणीचे अवलंबन अनिवार्य आहे. ह्यांच्या अवलंबनानेच जैनदर्शनाचे मूलभूत सिद्धांत सर्वज्ञता, वस्तुस्वातंत्र्य, सहा द्रव्य, सात तत्त्व, वस्तुची-कारणकार्य व्यवस्था,

क्रमबद्धपर्याय, लोक-परलोक व नरक-स्वर्गादिच्या अस्तित्वाचे ज्ञान होईल. ह्या विषयांच्या खऱ्या श्रद्धा-ज्ञाना शिवाय धर्मध्यान होतच नाही. म्हणून देव-शास्त्र-गुरुंच्या आणि पंचपरमेष्ठींच्या शरणी जाणे अनिवार्य आहे. ह्या कारणास्तवच ह्यांच्या ध्यानालाच व्यवहार धर्मध्यान म्हटले आहे.

जेव्हा जेव्हा धर्मध्यान करण्याचा विषय निघतो तेव्हा नेहमीच आपले ध्यान एखाद्या विशिष्ट क्रियेकडेच जाते. ह्याच्या साधनेसाठी आसन, प्राणायाम, प्रत्याहार आणि एखाद्या विशिष्ट जागेकडेच आपले ध्यान जाते. परंतु ह्या सर्वगोष्टी धर्मध्यानाची मूलभूत साधनं नाहीत, कारण ह्यांपासून आत्मलाभ होत नाही.

ज्याने आजपर्यंत कधी आत्मा-परमात्म्याला पाहिले-जाणले नाही, तो आत्मा-परमात्म्याचे कसे स्मरण करु शकेल? स्मरण तर दर्शनपूर्वकच होते ना ? ज्याला कधी पाहिलेच नाही, त्याची आठवण-स्मरण कसे होऊ शकेल?

म्हणून धर्मध्यानाच्या अगोदर आत्म्याचे ज्ञान आणि स्व-पर भेदविज्ञान अनिवार्य (आवश्यक) आहे. ध्यान-ध्याता-ध्येय, ज्ञान-ज्ञाता-ज्ञेय ह्यांचे ज्ञान आवश्यक आहे. प्रत्येक कार्याची जी आपापली स्वतंत्र (वेगवेगळी) षट्कारकं आहेत, त्या षट्कारकांच्या स्वतंत्रतेची खरी माहिती (जाण) आवश्यक आहे; कारण त्याशिवाय अज्ञानी जीवांना जोपर्यंत पराच्या कर्तृत्त्वाचा बोजा (जबाबदारी) कायम असेल, तोपर्यंत अंतरंगात प्रवेश होऊ शकणार नाही.

खरे पाहतां ध्यान केले जात नाही. ते तर होऊन जाते. ध्यान तर अशी सहज क्रिया आहे, जी स्वतःच (आपोआपच) संपन्न (पूर्ण) होते. ज्याप्रमाणे आर्त-रौद्र ध्यान कोणी विचार करुन-ठरवून करीत नाही; जेव्हा परामध्ये इष्ट-अनिष्ट कल्पना होते तेव्हा इष्टवियोगज-अनिष्टसंयोगज आर्तध्यान आपोआपच झोपेत-जागेपणी, उठता-बसता, खाता-पिता होतच असते. त्याप्रमाणे जैनदर्शनाच्या सिद्धांतांची श्रद्धा झाल्याने, स्व-पर भेदज्ञान झाल्याने, अनुप्रेक्षा वगैरेंच्या चिंतनाद्वारे ज्ञान-वैराग्य शक्ति प्रगट झाल्याने धर्मध्यान देखील

आपोआप होऊ लागते. प्रयत्नदेखील सहजपणे त्या दिशेनेच होऊ लागतात, निमित्त देखील सर्व तदनुकूल मिळत जातात, निमित्तांना हुडकत बसावे लागत नाही.

लौकिक भाषेमध्ये 'ध्यान' शब्दाचा प्रयोग अनेक प्रकारांनी केला जातो; परंतु त्याचा अर्थ जवळ जवळ सर्व ठिकाणी एक सारखाच असतो. जसे की - 'कृपा करुन ध्यान द्या' 'ध्यानात असू द्या, आपणास वेळेवर यावयाचे आहे,' 'ही गोष्ट ध्यान देण्यायोग्य आहे' - वगैरे.

अध्यात्माच्या भाषेमध्ये आणि व्याख्येमध्ये हा 'ध्यान' शब्द वेगवेगळ्या विशेषणांसहित वेगवेगळ्या अर्थांनी वापरला गेला आहे. उदा. आर्तध्यान, रौद्रध्यान, धर्मध्यान व शुक्लध्यान वगैरे. परंतु जेथे नुसता 'ध्यान' शब्द आला आहे, तेथे ह्याचा अर्थ जवळ जवळ सर्व ठिकाणी धर्मध्यानच केला आहे.

व्यवहाराच्या भाषेमध्ये मिथ्यादृष्टिच्या धार्मिक क्रिया आणि शुभभावांकडे पाहून त्यांनादेखील धर्मात्मा, धर्मध्यानी आणि ज्ञानी-ध्यानी म्हटले जाते; परंतु वास्तविक सम्यग्दृष्टिलाच धर्मध्यान असते मिथ्यादृष्टिंना नाही.

पहा, जगामध्ये ज्याप्रमाणे 'गो' शब्दाचे अनेक अर्थ आहेत, परंतु तो गायीच्या नावानेच रुढ आहे, प्रचलित आहे. 'पूजा' शब्द तर खूप व्यापक आहे, भगवानाला हात जोडून नमस्कार करणे, साष्टांग नमस्कार करणे, प्रदक्षिणा देणे, स्तुति करणे, अर्घ चढविणे वगैरे सर्व क्रिया पूजा आहेत; परंतु जगामध्ये पूजा त्या विशिष्ट क्रियेलाच मानली जाते, ज्यामध्ये स्नान करुन, धुतलेली स्वच्छ वस्त्रं घालून, धुतलेल्या अष्ट द्रव्याने जी पूजा केली जाते ती क्रिया. ह्याच अर्थामध्ये 'पूजा' शब्द रुढ झाला आहे. ह्यामुळे जगामध्ये त्यालाच पूजा करणे असे म्हणतात. इतर नमस्कार वगैरे क्रियांना पूजा मानले जात नाही; परंतु ह्या सर्व क्रियादेखील पूजाच आहेत.

'पुजारी' शब्द पगारासह काम करणारा अशा अर्थामध्ये रुढ झाला आहे. एखाद्या रोज नियमाने पूजा करणाऱ्या शेठजीला जर चुकून देखील 'पुजारी' म्हटले गेले तर रामायण घडेल; परंतु तो शेठच वास्तविक पुजारी आहे.

अशाप्रकारे 'ध्यान' शब्ददेखील धर्मध्यानाच्या अर्थाने रुढ आहे. जिनवाणीमध्ये देखील असा शब्द प्रयोग आढळतो. म्हणून ध्यानाचा विषय वास्तविक ध्यान देण्यायोग्य आहे, ध्यानपूर्वक समजण्यायोग्य आहे.

आर्त-रौद्र भाव देखील ध्यानच आहेत; परंतु ज्याप्रमाणे ध्यानाबरोबर आर्त-रौद्र विशेषणं लावली जातात, तसे व्यवहारातील भाषेमध्ये धर्मध्यानाबरोबर सर्व ठिकाणी 'धर्म' हे विशेषण लावले जात नाही. ज्ञानार्णव ग्रंथातील अनेक श्लोक हे पटवून देतील.

म्हणून जिथे ज्या अपेक्षेने 'ध्यान' शब्दाचा वापर झाला आहे, त्याला तसाच अर्थ ग्रहण केला पाहिजे. धर्मध्यानावर आवश्यकतेनुसार जोर देत आचार्य योगींद्रदेव 'ध्यान' शब्दाचा उययोग करीत म्हणतात की -

"भव क्लेश विनाशाय पिव ज्ञान सुधाकरम् ।

कुरु जन्माब्धि मत्येतु, ध्यान पोतावलम्बनम् ॥ (१२) (सर्ग ३)

संसार-क्लेशांचा नाश करण्याकरितां ज्ञानरुपी अमृताचे पान करा. तसेच जन्म-मरणरूप संसार-सागरातून पार होण्याकरितां ध्यानरूपी जहाजाचे अवलंबन ह्या."

तसेच ज्ञानार्णवाच्या आणखीन अनेक श्लोकांद्वारे आचार्य देवांनी 'ध्यान' अर्थात धर्मध्यान करण्याची प्रेरणा दिली आहे. त्या सर्वामध्ये देखील फक्त 'ध्यान' शब्दाचाच वापर केला आहे जो मूळतः वाचण्यासारखा आहे.

जिनवाणीमध्ये धर्मध्यानाची विस्तृत चर्चा आहे जी जाणणे जरुरीचे आहे. आज तर धर्मध्यानासंबंधी काही सर्वसामान्य गोष्टींबाबतीत चर्चा केली. उद्या ह्या धर्मध्यानाचे स्वरूप, भेद-प्रभेद, धर्मध्यान करण्याची पद्धत आणि त्याचे फळ ह्यावर विचार करु, जे आर्त-रौद्रध्यानापासून वाचण्यामध्ये आपणास सहाय्यक ठरेल."

आजच्या ह्या चर्चेमुळे सर्व श्रोत्यांना खूपशी नवीन माहिती मिळाली. म्हणून ते खूष होते. बाकीची माहिती उद्या मिळेल, ह्या अपेक्षेने श्रोते आजपासूनच उद्याची वाट पाहू लागले. •

# ३१

गुलाबी थंडी पडली होती, थंड थंड वाऱ्याची झुळुक वहात होती, चिमण्या चिवचिवाट करु लागल्या होत्या, कोंबडे आरवून सकाळ होत असल्याचा संदेश देत होते. जणु जगातील जीवांना जागविण्याची जबाबदारी निसर्गाने त्यांच्यावरच सोपविली आहे. कृत्रिम घड्याळ्यांचे अलार्म धोका देऊ शकतात, वाजतील न वाजतील! परंतु कोंबडे वेळेवर आरवल्याशिवाय रहात नाहीत. मानव, त्याने जर इच्छा केली तर तो स्वत: वेळेवर जागा होऊ शकतो आणि इतरांना मोहनिद्रेतून जागे होण्याचा धडा शिकवूं शकतो.

हल्ली नैसर्गिक नियमांचे पालन करण्यामध्ये खरोखर मनुष्यप्राणी जनावरांपेक्षा गया बीता होऊ लागला आहे. पशु-पक्षी कधीही आपल्या प्राकृतिक नियमांचे उल्लंघन करीत नाहीत आणि आजचा तरुण खाणे-पिणे आणि झोपणे-जागे रहाण्याच्या नैसर्गिक नियमांचे बिलकुल पालन करीत नाही.

'कोबड्यांचे कुकुच्या-कूँ... कुकुच्या-कूँ' ऐकून जे जागे झाले, त्यातील काही ज्ञानपिपासू तर स्वाध्यायभवनात चालू असलेले कॅसेटवरील प्रवचन ऐकण्यास गेले. ध्यानप्रेमी धर्मात्मा हात-पाय धुवून एकांतामध्ये चटई घालून ध्यान करण्यास बसले. तसेच स्वास्थ्यप्रेमी लोक प्रात:काळच्या प्राणवायूचे सेवन करण्याकरितां बागेमध्ये गेले, परंतु प्रमादी प्राणी अजून देखील प्रमादवश पडल्या पडल्या कुशी बदलत होते आणि पहाटेची साखर झोप घालविणाऱ्या आवाजाला मनातल्या मनात शिव्याशाप देत होते.

दम्याच्या रोगाने पीडित एक वृद्ध गृहस्थ बिचारा असाही होता की, ज्याला डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पहाटेच्या प्राणवायूचे सेवन करणेसुद्धा अनिवार्य होते आणि तो धर्मलाभापासून वंचित राहू इच्छित नव्हता. म्हणून त्याने एक मध्यस्थ मार्गाचे अवलंबन केले.

तो वृद्ध गृहस्थ जिनेशचंद्र शिक्षण संस्थानाच्या शेजारच्या छोट्याशा बागेमध्ये जाऊन वैराग्य भावना आणि बारा भावना वगैरे म्हणून आत्मसंतुष्ट होत होता.

म्हणता म्हणत्ता भावनावेगामध्ये येऊन त्याचा आवाज मोठा होत असे -

**कोई इष्ट वियोगी विलखै, कोई अनिष्ट संयोगी।**
**कोई दीन दरिद्री विगूचै, कोई तन का रोगी ॥**
**किस ही घर कलहारी नारी, कै वैरी सम भाई ।**
**किस ही के दुःख बाहर दीखें, किस ही उर दुचताई ॥**
**कोई पुत्र बिना नित झूरे, कोई मरै तब रोवै ।**
**खोटी संतति सों दुःख उपजै, क्यों प्राणी सुख सौवे ॥**
**पुण्य उदय जिनके तिनके भी नहिं सदा सुख-साता ।**
**यह जगवास जथारथ देखे, सब ही हैं दुःख दाता ॥**

संसाराच्या स्वरूपाचे यथार्थ चित्रण करणाऱ्या ह्या ओळी म्हणताना तो स्वत: भावनावश व्हायचा आणि जोर जोराने बोलल्यामुळे आसपासच्या घरातील लोक खिडक्या उघडून जेथे ती वृद्ध व्यक्ति बागेत भावूक बनून मनापासून गात असे त्याच्याकडे पहात. त्याला ऐकणाऱ्यांचे व पहाणाऱ्यांचे डोळेसुद्धां आसवांमुळे ओले होत.

संस्थानाशेजारीच स्वत:च्या बंगल्यात रहाणारे संपत शेठ आणि त्यांचे साथीदार अमित, सुनंदा, सुनयना वगैरेंनीसुद्धा ते वैराग्य भावनेचे बोल ऐकले तेव्हा स्मृतिपटलावर ते शब्द जणु सजीव रुप घेऊनच उभे राहिले आणि त्यांच्या आयुष्यात घडलेल्या घटनांची प्रतिबिंबं देखील त्यांच्या डोळ्यांसमोर उभी राहिली.

वृद्ध गृहस्थ गातच होता -

**भोग बुरे भवरोग बढावें, बैरी हैं जग जी के ।**
**बेरस होंय विपाक समय अति, सेवत लागें नीके॥**
**बज्र अगनि विष से विषधर से, ये अधिके दुःखदाई ।**
**धर्मरत्न के चोर प्रबल अति, दुर्गति पन्थ सहाई ॥...**

एवढ्यात मध्येच कोंबडा पुनश्च आरवला, जणु तो झोपणाऱ्यांना म्हणत आहे –

**उठ जाग मुसाफिर भोर भई, अब रैन कहाँ जो सोवत है;**
**जो सोवत है सो खोवत है, जो जागत है सो पावत है।**
**उठ जाग मुसाफिर भोर भई, अब रैन कहाँ जो सोवत है॥**

विराग उठला आणि तयार होऊन कॅसेट ऐकण्यास गेला. स्वत:ला आपल्या मोठ्या भावापेक्षा अधिक धर्मध्यानी समजणाऱ्या अनुरागने हातपाय धुतले आणि चटई व माळा घेऊन तो घरच्या गच्चीवर एकांतामध्ये ध्यान करण्यास गेला.

विरागची अशी इच्छा होती की अनुराग जेव्हा माझ्या आग्रहाखातर कसे बसे आपल्या बिझी आयुष्यातील पंधरा दिवस काढून येथवर आला आहे, तर का न त्याने अधिकात अधिक ज्ञानार्जन करावे. कमीत कमी जैनदर्शनाच्या त्या मूलभूत सिद्धांतांना तर ऐकावेच–समजावेच, जे त्याच्या धर्माचरणामध्ये साधक ठरतील. जर येथे सुद्धा त्याचा जास्तीत जास्त वेळ त्याच धार्मिक क्रियांमध्ये गेला, ज्या त्याने कोणत्या ना कोणत्या लौकिक प्रयोजन पुरे करण्याच्या भानगडीमध्ये आपल्या डोक्यात घेतल्या होत्या, तर त्याचे येथवर येऊनही न आल्यातच जमा होणारे होते. येथे येऊनसुद्धा त्याला त्याचा काही फायदा होणार नव्हता.

एके दिवशी त्याने संधी साधून मोठ्या मानसशास्त्रीय पद्धतिने अनुरागला म्हटले – "अनुराग! एक तू असा आहेस, जो तासभर ध्यानासाठी बसून राहतोस आणि एक मी असा आहे, ज्याचे पाच मिनिटांतच ध्यानातून मन उबून जाते. मी थोडावेळ बसण्याचा प्रयत्न करतो तर मला स्थिरता होत नाही. जीव घाबरा घुबरा होतो, कंटाळा येतो. मला समजत नाही की 'मी ध्यान कसे करावे?' काय तू मला सांगशील की ध्यानाच्या वेळी तू काय करतोस? कोणाचे ध्यान करतोस?

अनुरागने विचार केला – विराग तर वर्षानुवर्षे नियमित स्वाध्याय करतो तरी देखील स्वत: मधील उणीवा दाखवून मला हे विचारत आहे. म्हणून त्याच्या बोलण्यात काही ना काही खोच अवश्य असली पाहिजे. तो आपल्या मनाला कोठे

केंद्रित करु इच्छितो ? आणि जेथे तो आपले मन लावू इच्छितो तेथे मन का लागत नसावे? असो जे काही असेल ते, त्याचे तो जाणो. तो जे जाणू इच्छितो ते सांगणे माझे कर्तव्य आहे - असा विचार करुन अनुराग म्हणाला-

"अहो ! मी तर सर्वप्रथम १०८ वेळा णमोकार मंत्राचा जाप करतो. इतर कोणत्याही भानगडीत न पडता, त्यानंतर पंडीतजींनी सांगितल्याप्रमाणे महावीर स्तुति, पद्मप्रभ स्तुति, पार्श्वनाथ स्तोत्र आणि भक्तामरजीचा पाठ करतो. बस्स ह्यामध्येच पाऊण तास पुरा होतो. जेव्हा इतर काही विचार करण्याला वेळच उरत नाही तेव्हा कंटाळा येण्याचा प्रश्नच कोठे येतो?"

विरागने विचारले- "त्या पंडितजींचे काय नाव आहे? कोण आहेत, कोठले आहेत ते, ज्यांनी तुला ही सर्व पद्धत-रीत शिकविली?

अनुराग म्हणाला - "कदाचित आपण त्यांना जाणत नसाल , परंतु ज्या पंडितजींनी हे सर्व सांगितले ते मोठ्या पोहोचलेल्या लोकांपैकी आहेत. त्यांच्या बाबतीत लोक न जाणो काय-काय बडबडत होते? त्यांनी तर पद्मावती स्तोत्र, मानभद्र स्तोत्र वगैरे आणखीन बरेच काही सांगितले होते, लांबलचक विधिदेखील सांगितली होती; परंतु मी त्यांना सांगून टाकले की हे सर्व आमच्या कुलधर्माच्या हिशोबात बसणार नाही. आमच्या शुद्ध आम्नायामध्ये हे चालत नाही. तर मग त्यांनी माझे म्हणणे ऐकले आणि म्हटले की, आपापल्या आम्नायानुसार जेवढे जे चालेल तसेच करा. फार सज्जन गृहस्थ आहेत ते. कधी कोणत्याही गोष्टीचा अधिक आग्रह करीत नाहीत. ज्याला जे अनुकूल असेल. तसाच उपाय सांगतात ते!

त्यांचे म्हणणे असे होते की, जर आम्ही सांगितलेल्या विधि पद्धतशीर केल्या तर त्याचे खास फळ आहे. तसे तर ही स्तोत्रं रिद्धि-सिद्धि देणारी तर आहेतच, शिवाय संकट निवारण करणारी देखील आहेत. म्हणून जेवढे काही शक्य आहे, तेवढे अवश्य करीत रहा. परलोकाची फारशी चिंता करता कामा नये, परलोकसुद्धा जेवढा सुधरावयाचा असेल तेवढा सुधरेलच; परंतु ह्या जन्मामध्ये जरुर कोणतेही मोठे संकट आपल्यावर येणार नाही. संकटविमोचक सुद्धा आहेत नां हे सर्व ?

त्या पंडितामध्ये लोभ तर नावालाही नाही, स्वत:हून तोंडाने तर कोणाला काही मागत देखील नाहीत. श्रद्धाळु लोक आपल्या इच्छेप्रमाणे जर देतील तर त्याचा सहर्ष स्वीकार करतात. ते स्वत:च सांगत होते की कोण्या एका शेठजीने त्यांना न मागताच सोन्याचे पाच शिक्के दिले होते; कारण त्यांना सांगितलेल्या विधिने पद्मावतीचा जाप आणि पार्श्वनाथ स्तोत्राचा पाठ केल्याने त्यांना व्यापारामध्ये खूप फायदा झाला होता. आणि ते हे सुद्धा म्हणत होते की जेव्हा लोक स्वत:हून भरपूर देत असतात तर आम्ही कोणाला काय मागावे? अधिक लोभामध्ये का पडावे ?

अनुरागचे हे बोलणे ऐकून विरागने कपाळावर हात मारुन घेतला. त्यावेळेस तो काही बोलला तर नाही - सांगण्यासारखे काही नव्हतेदेखील; परंतु विरागने हा निश्चय केला की कोणत्याही तऱ्हेने ह्या चक्रव्यूहातून ह्याला बाहेर तर काढलेच पाहिजे. नाहीतर ह्याचा पुरा वेळ ह्या भानगडीत असाच गृहीत मिथ्यात्व आणि अप्रशस्तध्यानामध्ये वाया जाईल.

घड्याळाचे काटे आपल्या गतीने पुढे सरकत होते. पाहता पाहता साडेसात वाजले. आश्रमाच्या प्रांगणामध्ये लोकांची ये जा सुरु झाली, आठ वाजल्यापासून प्रवचन सुरु होणार होते आणि प्रवचनात उशीरा पोहोचणाऱ्यांना चांगले समजले जात नसल्याने उशीरा उठणाऱ्यांमध्ये गडबड चालू होती.

पूजेमध्ये भले कोणी जात असेल किंवा उशीरा जात असेल, परमात्मा तर कोणाला काही म्हणणार नाहीत, वीतरागी आहे नां ते? परंतु प्रवचनामध्ये वेळेवर न पोहोचण्याचा अर्थ आहे शेकडो श्रोत्यांच्या दृष्टितून उतरणे आणि प्रवचनातील विषयाला मुकणे.

धर्मेशजी तोंडाने भले काही बोलत नव्हते, परंतु एवढे तर समजून होते की कोणती व्यक्ति तत्त्वज्ञानाप्रति कितपत जागृत आहे अथवा कितपत प्रमादी आहे - बेपर्वा आहे.

प्रमादींना प्रमादी राहण्यामध्ये काही वाईट वाटत नसते परंतु प्रमादी म्हणवून घेणे त्यांनादेखील पसंत नसते. म्हणून प्रमादीमधील प्रमादी लोक देखील पाच मिनिटे अगोदरच प्रवचन मंडपामध्ये हजर रहात असत.

प्रवचन सुरु करीत धर्मेशजी म्हणाले - ''बंधुनो! धर्मध्यानाचे विवेचन करण्यापूर्वी मी आपणास प्रथम हे सांगू इच्छितो की 'ध्यान' ज्ञानाशिवाय होत नाही. ज्याच्याबद्दलचे ज्ञानच नाही त्याचे ध्यान करणे कसे शक्य आहे? जर मी आपणास म्हणालो की आपल्या त्या स्वर्गीय आजोबा-पणजोबांचे ध्यान करा जे तुमच्या जन्मा अगोदरच स्वर्गवासी झाले आहेत. ते कसे होते? गोरे की काळे? उंच कां बुटके? कृश की लठ्ठ? टोपी घालत होते का फेटा बांधत होते? मिशा ठेवत होते का नाही? ते हसतमुख होते का गंभीर?

निश्चितपणे आपले हेच उत्तर असेल - जेव्हा आम्ही त्यांना पाहिलेच नाही तर त्यांचे स्मरण कसे करावयाचे? ते आमच्या ज्ञानातच कधी आले नाहीत तर ध्यानात कसे येऊ शकतील?

अरे बाबा! ज्या प्रमाणे दर्शनाशिवाय स्मरण होत नाही. अगदी त्याच प्रमाणे आत्म्याच्या ज्ञानाशिवाय ध्यानदेखील होऊ शकत नाही. म्हणून आत्म्याचे ध्यान करण्यापूर्वी प्रथम आत्म्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. आत्मा आपल्या ध्यानात यावा ह्याकरितां प्रथम त्याला आपल्या ज्ञानात आलेच पाहिजे, त्याला जाणायला-ओळखायलाच हवे.

ज्याप्रमाणे असे म्हटले जाते की आत्मज्ञानच ज्ञान आहे, शेष सर्व अज्ञान. त्याप्रमाणे फक्त आत्म्याचे ध्यानच निश्चयाने धर्मध्यान आहे, शेष सर्व अपध्यान! अपध्यानाला धर्मध्यान म्हणणे ध्यानाचे अवमूल्यन करणे आहे. म्हणून तर आगमामध्ये पावलो पावली असे म्हटले आहे की, सम्यग्दृष्टिंनाच धर्मध्यान असते. चतुर्थ गुणस्थाना अगोदर धर्मध्यान असतच नाही.

जे लोक सकाळ-संध्याकाळ सामायिकाच्या वेळी ध्यानाच्या नावाखाली मंत्राचा जाप आणि स्तोत्रांचे पठन (पाठ) करतात, त्यांनी समजले पाहिजे की, वास्तविक ते धर्मध्यान नाही, खरोखर ते तर सामायिकदेखील नाही; कारण सामायिकामध्ये देखील आत्मध्यानाचीच मुख्यता असते. अथवा सहा द्रव्यांच्या स्वरुपाचे चिंतन-मनन असते; कारण 'समय' शब्दाचे दोनच अर्थ आहेत - एक शुद्धात्मा आणि दुसरा सहा द्रव्यं. जेव्हा सहा द्रव्यांच्या स्वरुपाचा विचार

चालेल तेव्हा वस्तुस्वातंत्र्याचा सिद्धांत स्वतःच फलित होईल आणि तो समता भाव होण्यास कारणीभूत होईल, जे की सामायिकाचे खरे फळ आहे.

खरोखर धर्मध्यानाच्या बाबतीत खूब गडबड चालू आहे म्हणून सर्वात प्रथम आगमाच्या संदर्भातून ह्यावर गांभीर्याने विचार झाला पाहिजे.

पहा, ध्यानाच्या चार भेदांमधील आतापर्यंत जी आर्तध्यान, रौद्रध्यानाची चर्चा झाली आहे. धर्मध्यान त्याहून भिन्नच असले पाहिजे. ह्यावरुन स्पष्ट आहे की ज्यामध्ये इष्ट-अनिष्ट कल्पना असेल, ते धर्मध्यान होऊ शकत नाही. ज्याच्या चिंतनाने रडू फुटावे, मानसिक पीडा व्हावी, दुःख व्हावे, ज्यांमध्ये अश्रु यावेत, ते देखील धर्मध्यान होऊ शकत नाही; कारण असे चिंतन किंवा विचार आर्तध्यानाच्या कक्षेत मोडतो. लक्षात ठेवावे, आर्तध्यान प्रशस्त देखील असू शकते; परंतु असते दुःखरुपच. ह्याचे स्पष्टीकरण देखील आर्तध्यानाच्या प्रवचनात येऊन गेले होते.

रौद्रध्यान आणि धर्मध्यान-दोन्ही आनंदरूप आहेत; परंतु महत्त्वाचा फरक हा आहे की, रौद्रध्यानी पाचही इंद्रियांच्या विषयांमध्ये आनंदित होतो. त्याला पाचही पापांच्या प्रवृत्तिमध्ये आनंद होतो. तो विकथेमध्ये रमतो आणि धर्मध्यानीला फक्त अतींद्रिय आनंदामध्ये सुखानुभूति होत असते. त्याला धर्मकथा, वीतरागी गोष्टीच सुखद वाटतात. जरी दोन्ही आनंदरुप आहेत तरी दोघांच्या आनंदामध्ये जमीन-अस्मानाचा फरक आहे. एक निव्वळ सुखाभास आहे आणि दुसरे खरोखर सुखस्वरुप आहे.

धर्मध्यानाची व्याख्या करताना आचार्यांनी देखील जे काही सांगितले आहे, त्या सर्वांचा थोडक्यात सार हा आहे की धर्माने युक्त ध्यानच धर्मध्यान आहे.

येथे प्रश्न उभा राहू शकतो की धर्माचे क्षेत्र तर खूप मोठे आहे, आपण कोणत्या धर्माने युक्त ध्यानाला धर्मध्यान म्हणू इच्छिता?

हा प्रश्न खूप महत्त्वपूर्ण आहे. खरोखर धर्माचे क्षेत्र फार मोठे आहे. परंतु अहो! येथे तर 'वत्थु सहावो धम्मो' आणि 'चारित्तं खलु धम्मो' धर्माची व्याख्याच प्रासंगिक ठरेल. वस्तुचा स्वभाव अर्थात सहा द्रव्यांच्या स्वभावाला जाणून-

ओळखून तसेच त्यांच्यामध्ये स्व-पर भेदविज्ञान करुन आपल्या आत्म्याच्या स्वरूपामध्ये एकाग्रता करणे निश्चय धर्मध्यान आहे आणि जिनोपदिष्ट वस्तुस्वातंत्र्यासारख्या सिद्धांताचा अभ्यास करणे, त्याच्या आश्रयाने आत्म्यामध्ये एकाग्र होण्याचा अभ्यास करणे तसेच ह्या सिद्धांताचे साधक, आराधक, प्रतिपादक आणि पंचपरमेष्ठीं (देव-शास्त्र-गुरुं) च्या भक्तीद्वारे आपल्या मनाला स्वरूपामध्ये एकाग्र करण्याचा प्रयत्न करणे व्यवहार धर्मध्यान आहे.

ज्या ज्ञानाने आत्म्यांच्या धर्माचे, आत्म्याच्या स्वभावाचे पूर्ण ज्ञान होते; आत्म्यामध्ये त्याच ज्ञानाच्या एकाग्रतेचा स्थिरतेचा अभ्यास धर्मध्यानाचे लक्षण आहे.

वीतराग भावाने, साम्यभावाने राहण्याचा अभ्यास करण्याकरितां साधक जो चारी अनुयोगांचा अभ्यास करतो, ते देखील व्यवहाराने धर्मध्यानच आहे.

इष्ट-अनिष्ट बुद्धीचे मूलभूत कारण मोहच आहे; मोह-राग-द्वेष यांच्या कारणानेच चित्तवृत्ती चंचल होत असते. त्यांना छेद पडल्याने चित्तामध्ये स्थिरता होणे स्वाभाविकच आहे. बस्स ती चित्ताची/मनाची स्थिरताच धर्मध्यान आहे.

आचार्य सांगतात की, निर्विकल्प ध्यानाच्या सिद्धिकरिता चित्ताला स्थिर करु इच्छित असाल तर मोह-राग-द्वेष करु नका.

सम्यग्दृष्टि जीवांचा शास्त्र स्वाध्याय, तत्त्वचिंतन आणि संयमादिमध्ये चित्त लावणे देखील धर्मध्यानाच्या श्रेणीमध्येच येते आणि तत्त्वज्ञान शून्य अज्ञानीचे डोळे बंद करुन तासन तास बसून राहणे तसेच स्तोत्र वाचणे/म्हणणे व मंत्रादिचा जाप जपणेदेखील धर्मध्यानाच्या प्रकारात येत नाही; कारण सर्वज्ञ देवाने सांगितले आहे की - तत्त्वज्ञानाशिवाय धर्मध्यानच होत नाही. म्हणून धर्मध्यानाच्या रसिकांना प्रथम तत्त्वज्ञान अनिवार्य आहे, भेदविज्ञान अति आवश्यक आहे.''

हे ऐकून अनुराग दचकला. त्याला असे वाटले – अरे ! ही तर माझीच पोल खोलली जात आहे. मी तर आपल्या ध्यानाची वेळ अशा तऱ्हेनेच घालवितो. अरेरे ! असे करुन मी कोठे स्वत:लाच तर फसवत नाही ना? त्या पंडिताने तर हे काही सांगितलेच नाही. तत्त्वाची गोष्ट तर त्यांनी चर्चिलीदेखील नाही.

धर्मेशजींचे प्रवचन चालूच होते. ते म्हणले – ''जरी आचार्यांनी पावलो पावली धर्मध्यान करण्याची प्रेरणा दिली आहे, पण येथे विचार करण्यासारखी गोष्ट ही आहे की, काय सम्यग्दर्शनाशिवाय धर्मध्यान शक्य आहे? नाही, कदापि नाही, तर मग धर्मध्यानाची प्रेरणा देण्याचा अर्थ हा झाला की, – ज्या रीतिने धर्मध्यान शक्य असेल ते सर्व करा. जर भेदविज्ञानपूर्वक होत असेल तर प्रथम भेदविज्ञान करा.

समजा, हिंदू शास्त्रामध्ये लिहले आहे की 'अपुत्रस्य गतिर्नास्ति' पुत्राविना मानवाचा उद्धार होत नाही. म्हणून कमीत कमी एक पुत्र तर प्रत्येकाला व्हायलाच पाहिजे. आता आपण विचार करा की अविवाहित व्यक्तिने पुत्र प्राप्तिकरिता सर्वात प्रथम काय केले पाहिजे? प्रथम लग्नच करेल नां? मुलं झाडाला तर लागत नाहीत.

अशा तऱ्हेने धर्मध्यानरुप पुत्र प्राप्त करावयाचा असेल तर सर्वात पहिल्यांदा सम्यग्दर्शन करावे लागेल, आत्मज्ञान करावे लागेल; कारण ज्याप्रमाणे लग्नाशिवाय पुत्र संभवत नाही, त्याप्रमाणे सम्यग्दर्शन अथवा आत्मज्ञान श्रद्धेशिवाय धर्मध्यान होत नाही.''

एका श्रोत्याने मधेच विचारले – ''गुरुजी ! ह्या युगामध्ये सम्यग्दर्शन तर क्वचित एखाद्या विरळ माणसालाच होते तर मग धर्मध्यानाकरितां असा प्रतिबंध का लावला जात आहे की धर्मध्यान सम्यग्दृष्टिंनाच होते.''

धर्मेशजीने हसत उत्तर दिले – ''बंधुनो ! हा प्रश्नच हास्यास्पद आहे. असा प्रश्न विचारणाऱ्याला मुळातच धर्मध्यानाच्या स्वरुपाची माहिती नाही.

अरे बंधु! ज्या आत्मतत्त्वाला जाणण्याचे आणि श्रद्धेमध्ये आणण्याचे नाव सम्यग्दर्शन आहे, त्यामध्ये स्थिर होणे - रममाण होणे व तत्रूप परिणमन करण्याचे नावच धर्मध्यान आहे. ज्याला सम्यग्दर्शन कठीण वाटते, त्याला ध्यान सहजपणे कसे होईल?

धर्मध्यान तर सम्यग्दर्शन आणि भेदज्ञान रुपी बीजाचे फळ आहे. जेव्हा बीजच असणार नाही तर मग धर्माचा वृक्ष कोठून उगवेल? आणि वृक्षाशिवाय धर्मध्यानाची फळं कोठे लागतील?

ज्याला आत्म्याची ओळख होते, आत्मानुभूति होते, ज्याने एक वेळ अतींद्रिय आनंदाचा रस चाखला आहे, त्याला वारंवार त्याचा स्वाद घेतल्याशिवाय चैनच पडत नाही. म्हटले पण आहे -

**जब आतम अनुभव आवे, तब और कछु न सुहावै।**
**गोष्ठी कथा कौतुहल विघटै, पुद्गल प्रीति नसावै॥**

ज्याला ज्याची आवड निर्माण होते, प्रीति होते; त्याला त्याचे ध्यान झाल्याशिवाय रहात नाही. मुलीच्या प्रेमात पडलेल्या एका शेठजीच्या मुलाने अनुभवलेल्या उदाहरणाने ही गोष्ट सहज समजू शकते."

धर्मेशजीने उदाहरण देत म्हटले -

"एका शेठच्या मुलाचे शेजारच्या मुलीशी प्रेम जुळले. मुलगी चांगली होती, संस्कारही चांगले होते; त्यामुळे शेठजींनाही ती पसंत होती. परंतु त्यांना चिंता वाटत होती की, एक तर मुलगा अभ्यासात तसाही बेपर्वाच आहे त्यात भरीला हे प्रेम प्रकरण! काय करावे बरे?"

विचार करता करता शेठजींना एक उपाय सुचला, त्यांनी मुलाला बोलाविले आणि मुद्दाम आवाजात खोटा बदल करीत म्हटले - "खूप झाले आता हे, आता हे काही चालणार नाही. तुझे हे प्रेमाचे नाटक बंद कर."

मुलगा घाबरला, नजर खाली झाली, पायाच्या आंगठ्याने जमीन खोदू लागला.

शेठजीने आपले खरे रूप प्रगट केले व म्हटले – 'बेटा! घाबरु नकोस, मुलगी तर आम्हालासुद्धा पसंत आहे, परंतु..."

"परंतु काय?" मुलाने साशंक होऊन विचारले.

वडील सहजपणे म्हणाले – "बाब तर तशी खास नाही, परंतु एक छोटीशी अट आहे."

"अट! कसली अट? कशाची अट?" मुलाने पुनः शंकेने व्याकुळ होऊन म्हटले.

"बेटा ! घाबरु नकोस, अशी काही गोष्ट नाही. अट अशी आहे की तुला कबूल करण्यास काही त्रास पडणार नाही" असे त्याला आश्वासन देत म्हटले.

आशा-निराशेच्या झोक्यावर झुलत असलेला मुलगा म्हणाला, -"बाबा! आपण काय म्हणत आहात? काय आजतागायत मी आपली एक तरी गोष्ट टाळली आहे? सांगा केव्हा कोणती गोष्ट ऐकली नाही की ज्यामुळे आपण आज अशी अट घालत आहात. सांगा तर बघू शेवटी आपली काय इच्छा आहे? मुलगी तर आपणालासुद्धा पसंत आहे ना?"

"हां, हां; सांगितले ना – मुलगी आम्हालासुद्धा पसंत आहे."

"बस, तर मग सांगा आपण काय सांगू इच्छिता? जर मुलगी आपणास पसंत आहे तर मग मलासुद्धा आपल्या सर्व अटी मंजूर आहेत."

"तर ऐक! आजपासून परीक्षा होईपर्यंत त्या मुलीला तू भेटायचे नाहीस."

"ठीक आहे बाबा! नाही भेटणार, बिलकुल नाही भेटणार."

"दुसरी गोष्ट अशी की चिट्ठी-चपाटी आणि टेलीफ़ोन देखील करायचा नाहीस."

"हे सुद्धा चालेल, नाही करणार! बस..."

"एवढ्यातच बस नाही, तिसरी आणि शेवटची गोष्ट नीट कान उघडे ठेवून ऐक. जोपर्यंत लग्न होत नाही तोपर्यंत तू तिच्या बाबतीत विचारदेखील करावयाचा नाही, ती तुझ्या ध्यानातदेखील आली नाही पाहिजे, स्वप्नात देखील येता कामा नये! समजले…?

मुलगा गंभीर होऊन म्हणाला, - "बाबा! आपण काय म्हणत आहात हे? हे बोलण्यापूर्वी आपण काही विचार तरी केला होता का? माफ करा बाबा! असे होऊ शकत नाही - कदापि होऊ शकत नाही. मनामध्ये येण्यापासून मी तिला कसे अडवू शकतो?"

मुलाने बदलेला पवित्रा पाहून वडिलांच्या लक्षात सर्व काही आले की ज्याच्याशी परिचय आणि प्रेम जडले आहे ते ध्यानात आल्याशिवाय राहू शकत नाही. आता काही देखील सांगणे व्यर्थ आहे, असा विचार करुन पिता गप्प राहिले.

धर्मेशजी म्हणाले - "अहो! ज्याची ज्याच्याशी प्रीति झाली आहे, ते त्याच्या ध्यानात आल्याशिवाय कसे राहू शकते? शारीरिक संबंधावर आडकाठी आणली जाऊ शकते, वाणीला लगाम लावला जाऊ शकतो, परंतु मनामध्ये येण्यापासून, ध्यानात येण्यापासून कोण कोणाला अडवू शकतो बरे? जे ज्ञानात आले आहे, घनिष्ट परिचयाचे झाले आहे, ते ध्यानात येईलच.

म्हणून ध्यान करण्या-करविण्याची - चिंता सोडून प्रथमात प्रथम आत्म्याचे यथार्थ ज्ञान-श्रद्धान करण्याचा पुरुषार्थ करा. आत्म्याचा परिचय करा. त्याच्याशी प्रीति करा प्रेम करा; मग आत्म्याची प्राप्ति सुद्धा झाल्याशिवाय राहणार नाही." ●

# ३२

काही दिवस असेही होते की जेव्हा अमित शरीराच्या बारीक सारीक दुखण्याने घर डोक्यावर घेत असे. डोके, पोट, पाठ कोठेही थोडेसे दुखत असेल तर किंवा हात, पाय, कंबर वगैरे शरीरातील कोणताही अवयव थोडासा दुखत असेल तरी आरडा ओरड करुन आकाश पाताळ एक करीत असे.

आरडा ओरड करीत कधी म्हणायचा - डोकेदुखीमुळे माझे डोके फुटायची वेळ आली आहे. तर कधी म्हणायचा - पोटदुखीमुळे माझी हालत एकदम वाईट झाली आहे. कधी म्हणे… श्वास घेता घेता माझ्या नाकी नऊ येऊ लागले आहेत. मी काय करु? काही सुचत नाही. तुम्हाला कसे समजावू की किती वेदना होत आहेत त्या? साऱ्या शरीरात अशी जळजळ होत आहे की जणु शंभर शंभर विंचवांनी एकदम डसले आहे.

खरे पाहता आजपर्यंत त्याला एका विंचवाने देखील डंख मारला नव्हता परंतु तो शंभर विंचवांनी चावल्याच्या दुःखाशी तुलना करीत होता. परंतु आपली पीडा व्यक्त करण्याचा त्याच्याजवळ दुसरा कोणता उपायही नव्हता.

जरी त्याला तो सांगत होता तेवढी पीडा-कष्ट होत नसतील, परंतु तो मुद्दाम छलकपटाने सांगत होता असेही नव्हते. आपल्या दुःखाला तो ज्याप्रमाणे अव्वाच्या सव्वा वाढवून सांगत होता. मानसशास्त्राप्रमाणे त्याला हळु हळु मनामध्ये देखील तसाच अनुभव होत होता.

तो म्हणत असे - ''माझ्याच्याने हे दुःख सहन होत नाही. जो काही उपाय करायचा असेल तो लवकर करा. रामू कोठे मरायला गेला हा? त्याला सांगा वैद्याला लवकर बोलावून आण. दुसऱ्या डॉक्टरला देखील फटाफट फोन करुन बोलवा. मंत्र तंत्र फुंकणाऱ्या पंडितालाही कळवा. सर्वांना आपापल्या अनुभवाप्रमाणे औषध देऊ द्या. कोणाचा ना कोणाचा तरी उपयोग होईल. कसेही करा पण पीडा लवकर दूर झाली पाहिजे.

आई आश्चर्य व्यक्त करीत म्हणाली - ''सर्वांना एकदम?''

अमित म्हणाला - ''हो, हो! सर्वांना एकदम बोलवा! सर्वांना एकदम बोलाविण्यास हरकत तरी काय आहे? बिचारे सोन्याच्या मोहरा तर मागत नाहीत - ज्याच्या भाग्यात जे असेल ते तो घेऊन जाईल. जोपर्यंत डॉक्टर्स येत नाहीत तोपर्यंत आजीला म्हणावे आपल्या बटव्यातील औषध दे. घरगुती उपचार केल्याने देखील आपले काय बिघडते ?''

अमित थोड्या थोडक्या दु:खासाठी एवढा आरडा-ओरडा करीत होता की जणु त्यावर डोंगर कोसळला आहे. त्याला सहानुभूति दाखवीत त्याची पत्नी स्नेहवश त्याचे पाय चुरु लागे, आई डोक्यावर मायेने हात फिरवी, घाबरुन आजा-आजी देवापुढे नवस बोलू लागत-वडील देवासमोर प्रार्थना करत. डॉक्टरांना फोन केले जात, वैद्यांना बोलावून आणत. सर्व काही अमितच्या सांगण्यानुसार व्यवस्था केली जाई तरी पण त्याला कसलेच समाधान होत नसे. तो दु:ख-दु:ख…दु:ख ओरडतच राही.

डॉक्टर, वैद्य, हकीम, मंत्र-तंत्रवाले…. सर्व एकदम येत असत. आपापल्या पद्धतिनुसार ते प्रत्येक अवयव तपासत; परंतु पीडा तर ते येण्यापूर्वीच गायब व्हायची. जणु अमितच्या आरडण्या-ओरडण्याला घाबरुनच पळून जात असावी. त्याच्या पीडेमध्ये जोरही केवढा होता की त्याच्या ओरडण्यासमोर आणि डॉक्टरांसमोर आपले तोंड दाखवायला उभी राहील! डॉक्टर-वैद्य आपापल्या फीज् घेऊन अमितच्या असहनशीलतेबद्दल गालातल्या गालात हसत परतत असत.

सकाळ होताच शेजारी विचारत - दररोज अमितला काय होते हो, की ज्यामुळे तो सारे घर डोक्यावर घेत असतो? घरातील लोक रात्रभर झोपूच शकत नव्हते. शेजार पाजारचे लोक देखील त्याच्या ओरडण्याने जागे होत असत.

घरचे लोक त्यांना काय उत्तर देणार. त्या बिचाऱ्यांना स्वत:ला काही माहीत नसे. लोक तर्क करत - परस्पर बोलत असत.

एखादा म्हणे - ''बिचाऱ्यावर एखाद्या देवी किंवा देवाचा कोप झाला आहे असे वाटते. हा कोण्या देव-देवीला मानत ही नाही-पूजत ही नाही. नास्तिक आहे ना!''

एखादा म्हणे - "त्यांनीच केलेल्या पापाचे फळ भोगत असेल - तो काही कमी पापी नाही, खाण्या-पिण्यात तर विवेकच नाही, धंदा-व्यापार देखील न्याय नीतिचा कोठे आहे?"

अमित निव्वळ बहाणेबाजी करीत नव्हता, त्याला पीडा तर थोडी-फार होतच होती. भले कारण कोणतेही असो त्याची मुख्य चूक मात्र एवढीच होती की त्याच्यामध्ये दु:ख सहन करण्याची शक्ती नव्हती. त्यामुळे तो पीडेमुळे जेवढा दु:खित होता त्याच्या अनेक पटीने अधिक पीडेच्या संभावनेमुळे त्रासलेला रहात होता. ह्यामुळे तो थोड्याशा दुखण्यानेच खूप बेचैन होत होता आणि जोपर्यंत ते दुखणे संपत नसे तोपर्यंत हा हाय हाय करीतच रहायचा.

हे खरे आहे की जेवढा तो आरडा ओरडा करीत होता, तेवढा त्रास त्याला त्यावेळेला होत नसे. तो दुखण्याला घाबरुनच काही जास्तीच बोंबाबोंब करीत असे. न स्वत: झोपत असे न घरातील लोकांना झोपू देत असे. ह्यालाच शास्त्रीय भाषेमध्ये **पीडाचिंतवन आर्तध्यान** म्हणतात.

एके दिवशी मोठ्या उत्सुकतेने एका शेजाऱ्याने चेक-अप करण्यासाठी आलेल्या एका मोठ्या डॉक्टरांना विचारले - "डॉक्टर साहेब! अमितला दररोज काय होत असते की आपणास दररोज वेळी-अवेळी त्रास घ्यावा लागतो?"

डॉक्टर म्हणाले - "अहो, काही झाले नाही. जास्त प्य ल्यामुळे व अति खाल्ल्यामुळे थोडासा गॅस-ट्रबल होतो, त्यामुळे कधी डोके दुखी होते, कधी पोटात दुखते, कधी पूर्ण अंग दुखते तर कधी कंबर दुखते. कारण एकच आहे, रोग मात्र अनेक दिसतात. त्यांना हे सर्व सांगितले आहे तरीदेखील दररोज विनाकामाचे अनेक डॉक्टरांची गर्दी गोळा करतात. मोठी माणसं आहेत नां? त्यांना कोण समजावणार? डॉक्टरांचे तरी काय? त्यांचा तर धंदा आहे. पैसे मिळतात म्हणून धावत येतात.

चांगला माणूस ओव्हरड्रिंकींग करतो, त्यामुळे नकली-भूक लागते, खूप खाण्याची इच्छा होते म्हणून वेडे-वाकडे काहीही खातो-पितो, पोट तर शेवटी पोटच आहे, ती घाणी किंवा गिरणी तर नाही की ज्याच्यामध्ये काहीही टाकावे?

ज्याला पोटाची काळजी नाही, तोंडाला लगाम नाही, त्याचे तर दररोज हेच हाल होणार!''

डॉक्टर पुढे म्हणाले - ''मी तर साफ निक्षून सांगितले की ह्या कामासाठी पुढे मला कधी फोन करु नये, हा काय पोर-खेळ आहे? एका बाजूला मोठ मोठ्या डॉक्टरांची वेगळी लाईन लागली आहे तर दुसऱ्या बाजूला वैद्य, हकीम, जंत्र-मंत्र-तंत्र वाले - आणि गंडा-तावीज वाले, भगत-पुजारी सर्व एकत्र बसवून ठेवले आहेत. मोठी माणसे असतील म्हणून त्याचा अर्थ असा नाही की, वाटेल त्याला लाईनीत बसवावे. प्रत्येकाचे आपले काही सिद्धांत असतात, काही नियम असतात. प्रत्येकाला पैसा म्हणजे सर्वकाही नसतो.''

ही गोष्ट एक दिवसाची नव्हती, दररोजचे हे रडगाणे होते. अशा परिस्थितीमध्ये ज्या चिकित्सकांमध्ये थोडासा देखील स्वाभिमान होता, त्यांनी तर येण्याचेही बंद केले होते. हळु हळु गल्लीतील लोकदेखील समजून चुकले होते की, अमितकडे जी गर्दी आणि ये-जा होते त्याचे कारण दुसरे काही नसून त्याला दोन-चार शिंका आल्या असतील. परिवर्तनापूर्वीची ही अवस्था होती अमितची!

तोच अमित जेव्हापासून धर्मेशजींच्या अंतर्बाह्य व्यक्तित्वाने प्रभावित झाला, त्यांच्या निकट संपर्कामध्ये आला, त्यांच्या सानिध्यात राहून तत्त्वअभ्यास करु लागला, त्यांचा नियमित श्रोता बनला व त्यांना आपला गुरु मानू लागला; तेव्हापासून त्याचे आयुष्यच बदलले.

आता खरोखर मरणप्राय दु:ख होऊन सुद्धा, शंभर-शंभर विंचू चावल्याने वेदना होतील तशा वेदना होऊन देखील त्याच्या तोंडून कोणताही शब्द निघत नसे. शेजारी पलंगावर झोपलेल्या आपल्या पत्नीला देखील जागे करीत नव्हता. जागवणे तर दूर तिला आपल्या असह्य पीडेचा पत्ताही लागू देत नव्हता. आता तर त्याच्या बेचैनीला तो तरी जाणत होता किंवा सर्वज्ञदेव! इतर कोणी जाणू शकत नव्हता.

आता अमितला दमा वाढल्याकारणाने हिवाळ्याच्या मोठ्या रात्री तो बसूनच घालवत होता. परंतु त्याच्या चाहुलीमुळे कुणाचीही झोपमोड तो करीत

से. डोके दुखत असेल तर डोके पकडून गुपचुप बसत असे पण कोणाला ही सांगत नसे. आपल्या दु:खात तो आता कोणाला सहभागी बनवत नव्हता.

कोठून आली अनायास ही सहनशक्ती त्याच्यामध्ये? कसे झाले एवढे मोठे परिवर्तन?

जेव्हा सारे शहर गाढ झोपेत झोपले असेल, रस्त्यावर शुकशुकाट झाला असेल. शिपायांच्या शिट्टीशिवाय कोठला आवाज ऐकू येत नसेल, तेव्हा आजारी लोकांचा करुणाजनक विव्हळण्याचा आवाज स्पष्टपणे ऐकू येऊ लागतो, जो आसपासच्या लोकांची झोपमोड करतोच आणि आसपासच्या वातावरणाला कारुण्य रसाने भरुन टाकतो. अमितची गणनादेखील आता दमेकरी लोकांमध्ये होऊ लागली होती. आता त्याला खरोखर खूप त्रास होत होता. तो रात्र रात्र झोपू शकत नव्हता. सुनंदादेखील रात्री उशीरापर्यंत जागून पतीचे दु:ख हलके करण्याचा प्रयत्न करीत असे. परंतु शरीर तर शेवटी शरीरच आहे, जेव्हा ती खूप थकून जायची तेव्हा मनात नसूनही झोप यायची.

अमित आता सुनंदाला थोडे देखील कष्ट देऊ इच्छित नव्हता. म्हणून तो सुनंदाला झोप लागली असता तिला उठवत नव्हता. परंतु त्याचे दु:खपूर्ण कण्हणे तिच्या अर्धवट झोपेत ऐकू आल्याने, किंवा त्याचे दु:खपूर्ण उसासे आणि कण्हणे ऐकून, ती स्वत:च दचकून जागी व्हायची. तेव्हा तिला समोर अमित तडफडत असलेला दिसून येई.

काही धाडकन पडण्याच्या आवाजाने जेव्हा सुनंदाची झोपमोड झाली आणि तिने उठून पाहिले तर पाण्याचा तांब्या खाली पडला होता, पाणी पलंगावर पसरले होते आणि अमित पलंगावर उलटे तोंड करुन तहानेने तडफडत होता. तो श्वास घेण्यासाठीही तडपडत होता, त्याला ते खूप कठीण वाटत असल्याचे जाणवत होते. घड्याळात पाहिले तर तेव्हा तीन वाजले होते.

सुनंदाने अमितच्या पाठीवर हात फिरवीत विचारले – "तब्येत कशी आहे? काय अजूनपर्यंत झोप लागलीच नाही? जर झोप येत नव्हती, बेचैनी वाढत होती तर अशा परिस्थितीत उठलातच कशाला? मला का नाही जागे केले?"

अमित म्हणाला, – ''मी विचार केला की तुला जागेकरुन माझी पीडा कमी होणार नव्हती. ती तर मलाच सहन करावी लागणार आहे. मग तु कशाला फुकटचा त्रास द्यायचा? ही काही एखाद्या दिवसाची तर गोष्ट नाही. तू रात्रं रात्रं जागून कोठपर्यंत किती साथ देऊ शकशील? शिवाय तुला दिवसभर सर्व कामे करावयाची तर आहेतच ना? तुझे शरीर तर काही पोलादाचे बनलेले नाही. सुनंदा! मी तुला आयुष्यामध्ये दु:खाशिवाय आणखीन काय दिले आहे ?

बोलता-बोलता अमितच्या डोळ्यातून अश्रु बाहेर पडले.

''हे नाथ! तुम्ही जुन्या आठवणी काढून काढून ह्या नाही त्या गोष्टी का बोलत आहात? आठवते कां, त्या दिवशी धर्मेशजींनी काय सांगितले होते ते? – ज्याचे केले पाहिजे आपणास स्मरण, आपण त्याचे करतो आहोत विस्मरण आणि ज्याचे आपणास केले पाहिजे विस्मरण, आपण त्याचे करतो स्मरण; ह्यामुळेच होत आहे भवाभवामध्ये मरण!


खरोखर भूतकाळ तर विसरण्यासारखाच आहे, त्याला आठवून पश्चात्ताप आणि दु:खाशिवाय आणखीन काय मिळते? भूतकाळ तर तीर्थंकर भगवंतांचा देखील चुकांनीच भरलेला होता, तर तुमची आमची काय बिशाद? भूतकाळात झालेल्या चुकांबद्दल रडत बसणे व्यर्थच आहे.

धर्मेशच्या प्रवचनामध्ये दुसरी महत्त्वाची गोष्ट ही आली होती की '**सुख-दु:ख दाता कोई न आन, मोह-राग-रुष दु:ख की खान**' – एखादी अन्य व्यक्ती कोठल्या दुसऱ्या व्यक्तीला सुख-दु:ख देऊ शकत नाही. आपले अज्ञान (मोह) व राग-द्वेषच आपापल्या दु:खाचा विधाता आहे. म्हणून कोणा इतराला दोष देणे व्यर्थ आहे.

सुनंदाच्या अमृततुल्य तत्त्वज्ञानाच्या गोष्टी ऐकून अमितला असे वाटले की जणु त्याच्या ताज्या जखमांवर कोणीतरी मलमपट्टी लावली असावी. थोड्या वेळापुरती त्याला सुखद अनुभूति झाली. मग त्याला विकल्प आला रात्रीचे तीन वाजले आहेत, सुनंदाने झोपले पाहिजे.

अमित मोठ्या प्रेमाने म्हणाला – "सुनंदा! तू झोपी जा. मला माझ्या हालतमध्ये सोड–माझ्यामुळे तू स्वत:ची तब्येत खराब करु नकोस. आता तू माझ्या ऐवजी माझ्या मुलाची खास काळजी घे. तुझ्या शिवाय आता त्याचा कोण आहे? माझ्या आयुष्याचा तर आता काही भरवसा नाही. असे ऐकले आहे की, दम्याचा रोग दम सोडल्यावरच जातो, शिवाय मला एक रोग थोडाच आहे? हे शरीर तर रोगांचा अड्डा बनला आहे. तुला काय सांगावे अनेक विंचू डसल्याच्या वेदना दिवसभर असतात. खरोखर जर धर्मेशजींचे सान्निध्य मिळाले नसते आणि तत्त्वज्ञानाची बैठक नसती तर शक्यता होती की मी ह्या मरणप्राय पीडेपासून वाचण्याकरिता विष प्राशन करुन नेहमीकरितां झोपी गेलो असतो."

अमितचे बोलणे ऐकून सुनंदाचे डोळे भरुन आले. डोळे पुसत ती म्हणाली – "हे स्वामी! आपण आपल्या तोंडी मरणाच्या गोष्टी का आणत आहात? असा अशुभ विचार मनातच का आणता? अजून तुमचे वय ते काय ? हा पापाचा उदय देखील निघून जाईल. मला खात्री आहे तुम्ही लवकर खडखडीत बरे व्हाल."



अमित उत्तरला - "हे तू नव्हे, तुझा राग बोलत आहे. ठीक आहे, तुझी इच्छा पूरी होवो. जरी मला जगायची इच्छा नाही तशी मरणाचीसुद्धा घाई नाही. जोपर्यंत ही जिनवाणी ऐकण्या-समजण्याची व तत्त्वचिंतन-मंथन करण्याची संधी मिळत आहे, चांगलेच आहे; परंतु तुझ्या-माझ्या इच्छेनुसार तर काही होत नाही. जे व्हायचे आहे, ते निश्चित आहे - माझा ह्यावर पूर्ण विश्वास आहे. परंतु एवढे मी पूर्ण निश्चित केले आहे की आता मी आपले बाकी आयुष्य धर्मेशजींच्या सान्निध्यामध्येच घालवेन. आजपासून तो माझा मित्रच नव्हे, गुरुदेखील आहे. एखाद्याला गुरु बनविण्याकरिता त्याचे वय बघितले जात नाही. गुण पाहिले जातात म्हणून मी त्याला 'गुरुजी' म्हणण्यात जरासुद्धा संकोच बाळगणार नाही."

बोलता बोलता अमितला पुन्हा दमा उफाळून आला आणि तो छाती दाबून तेथेच बसला. बसल्या बसल्या विचार करु लागला - जे केले असेल ते भोगावेच लागेल, त्यापासून पलायन करता येणार नाही. जेव्हा कुत्र्याच्या कानामध्ये किडे पडतात आणि ते त्याला चावतात, तेव्हा तो कान फडफडत इकडून तिकडे आणि तिकडून इकडे धावत असतो, अंधारात जाऊन बसतो. तो विचार करतो की अंधारात किड्यांच्या चावण्यापासून वाचलो जाऊ. त्या बिचाऱ्याला हे माहीत नसते की दु:खाचे कारण बाहेर नाही, माझ्या कानातच विद्यमान आहे. अशीच अवस्था आपली आहे. कर्माचे किडे तर आपल्या आतच आहेत ना? इकडून-तिकडे धावण्याने अथवा अनाठायी मेल्याने काय होणार आहे? कर्म तर पिच्छा सोडणार नाहीत. अज्ञान दशेमध्ये जे काही उपाय आपण करतो, ते सर्व चुकीचे आहेत.

गोष्ट तर हीच खरी आहे की, **अनादिनिधन वस्तु भिन्न भिन्न आपापल्या मर्यादेसहित परिणमित होत असतात. कोणी कोणाच्या आधीन नाहीत, कोणी कोणाच्या परिणमित करण्याने परिणमित होत नाहीत. अशाप्रकारे एक एक परमाणु स्वतंत्र आहे. एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचा कर्ता-धर्ता-हर्ता नाही.**

धर्मेशजीच्या संपर्कामध्ये येण्यापूर्वी जेव्हा सुनंदाला तत्त्वज्ञान माहित नव्हते तेव्हा ती देखील निरंतर हाच विचार करुन-करुन दु:खी रहात होती की -

आईची, सुनयना व जींवधरची आणि माझी जी दुर्दशा झाली-ह्याचे एकमेव कारण माझे वडील आहेत. त्यांच्या व्यसनापायी आम्ही पार धुळीला मिळालो. काय हेच कर्तव्य असते पित्याचे? त्यांच्यामुळे बालपण तर अत्यंत दु:खात गेले, लग्न देखील केले तर अशा माणसाशी केले जो एक नंबरचा पिणारा आहे. ह्या लग्नापेक्षा तर हे चांगले झाले असते की त्यांनी आमचे हात-पाय बांधून आम्हाला एखाद्या खोल विहीरीत टाकून दिले असते. नवऱ्याचे गुण देखील कोठवर सांगावेत? ते वडिलांच्याही पुढे दोन पावलं होते. कोणा कोणाबद्दल सांगावे? शिवाय हे आपले शरीर देखील सहकार्य करीत नाही. दररोज काही ना काही त्रास-रोग. घराबाहेर पडावे आणि ज्याच्याकडे काही अपेक्षा-आशा करावी तर तो पाठ तरी दाखवेल किंवा अब्रुवर घाला घालण्याचा विचार करेल. किती नालायक आहे ही दुनिया? न खाण्यास काही आणि न शरीर झाकण्यास वस्त्र. सर्व बरबाद करुन टाकले. आता तू न जगू शकतेस न मरु शकतेस. काय नव्हते पति आणि पित्यांच्या कुळामध्ये? श्रीमंतीचा थाट-माट होता दोघांकडे, परंतु पार वाट-लावली त्यांनी.

सुनंदाच्या विचारसरणीचा हा एक पैलू अगोदर होता आता दुसऱ्या पैलूकडे पहा. जेव्हापासून सुनंदा धर्मेशजींच्या संपर्कामध्ये आली, धर्मेशजींकडून तत्त्वोपदेश ऐकला-समजली आणि जैनधर्माच्या मूल सिद्धांतांची श्रद्धावान बनली, तेव्हापासून जरी तिला तिच्या बालपणाची आठवण करुन दिली तरी ती विचार करे - जगामध्ये जेवढे जीव आहेत, ते सगळे आपण केलेल्या पुण्य-पापाचेच फळ भोगतात, सुखी-दु:खी करणारा जर एखादा अन्य आहे तर आपल्याकडून केलेल्या पुण्य-पापाचे काय होईल? काय ते निष्फळ ठरणार नाहीत काय?

म्हणून कुणा इतराला आपल्या दु:खाचे कारण मानणे, दुसऱ्यांच्या दोषांना पाहणे मूर्खपणा आहे. कोणताही परपदार्थ चांगला किंवा वाईट नाही, इष्ट-अनिष्ट नाही. आपल्या राग-द्वेषामुळे व अज्ञानामुळेच ते बरे-वाईट प्रतीत होतात."

सुनंदाला जेव्हा कधी पूर्वीच्या दु:खद आठवणी सतावत असत तेव्हा ती लगेच पुराणपुरुष राम, हनुमान, सीता, द्रौपदी, अंजना वगैरेंच्या आदर्शांना

आठवून मनातल्या मनात समाधान मानत असे. अशातऱ्हेने आता तिला सहजपणे, चालता-बोलता, हिंडता-फिरता, खाता-पिता आज्ञाविचय, अपायविचय विपाकविचय धर्मध्यान होऊ लागले.

तरी देखील ती दोन्ही संधी काळामध्ये दोन दोन घडी शांतीपूर्वक बसून एकांतामध्ये पंचपरमेष्ठी मंत्राचे आणि मन, वचन, कायाच्या शुद्धीपूर्वक पंचपरमेष्ठींच्या स्वरुपाचे स्मरण करुन चित्ताला एकाग्र करण्याचा पुरुषार्थ देखील करीत असे, ज्यामुळे उपयोगामध्ये आत्मस्थ होण्याची पात्रता प्रगट होऊ शकेल.

सुनंदा अमितला म्हणाली- "ज्याप्रमाणे आपणास अज्ञान अवस्थेमध्ये आर्त-रौद्र ध्यानाची ओळख नव्हती, त्याप्रमाणे बऱ्याचशा लोकांना आपल्या विशुद्ध भावांचा पत्ताच नसतो. ह्यामुळे ते घाबरतात, विचार करतात की हाय! आम्ही काय करावे? धर्मध्यान तर आमच्याकडून होत नाही, आम्ही तर कधी धर्मध्यान करीतच नाही, तसे देखील आम्ही कधी दहा मिनिटे बसून मनाला एकाग्र करु शकत नाही. म्हणून आम्हाला धर्मध्यानाची प्राप्ति कशी होईल?

परंतु त्यांना चिंता करण्याची आवश्यकता नाही आणि चिंता केल्याने काही होतही नाही. तत्त्वज्ञान झाल्यानंतर, वस्तुच्या स्वतंत्रतेचे भान झाल्यावर, कर्म सिद्धांताचा परिचय झाल्यावर धर्मध्यान स्वयमेव होऊ लागले. सिद्धांताच्या आधारे आपल्या मनामध्ये समता भाव जागवणेच तर धर्मध्यान आहे. ते एकांतामध्ये बसून होऊ शकते आणि चालताना-फिरताना सुद्धा होऊ शकते. म्हणून निश्चिंत होऊन भेदज्ञानाचा अभ्यास करायला पाहिजे. वस्तुस्वरूप समजण्याचा प्रयत्न आणि शास्त्राभ्यासाने परामध्ये एकत्व-ममत्व आणि कर्तृत्व-भोक्तृत्वाच्या धारणेला निर्मूळ केले पाहिजे. धर्मध्यान करण्याचा हा एकमेव उपाय आहे.

ह्याशिवाय कोणतेही क्रियाकांड, आसन आणि प्राणायाम वगैरे क्रिया आपणास धर्मध्यानापर्यंत पोहोचवू शकणार नाहीत."

अशाप्रकारे सातिशय पुण्याच्या उदयाने अमित आणि सुनंदा दोघांच्या जीवनामध्ये जे क्रांतिकारी परिवर्तन झाले, ते खरोखर स्तुत्य आहे, अनुकरणीय आहे.

# ३३

दुर्व्यसनांमुळे जडलेल्या अनेक रोगांमुळे अमितचे शरीर अशक्त तर झालेच होते. खोकला व दमा यांच्या विशेष अधिक्यामुळे कधी कधी तो जास्त त्रस्त होत असे. हे दोन्ही प्राणघातक रोग आहेत, जे रोग्याला खूप त्रासदायक ठरतात. त्यांनी रोग्याला मरणतुल्य वेदना तर होतातच पण मरण लवकर येत नाही. खोकून खोकून बेजार होतो. अशी दयनीय दशा होते की पाहणाऱ्याला देखील रडू यावे.

अमितला दम्याची जोरदार ढास दिवसातून एक दोनदा नव्हे अनेक वेळा येऊ लागली होती. दम्याच्या उबळीमुळे श्वास घुसमटू लागे, श्वास अडकल्याने तो घामेघुम होई. डोळ्यातून अश्रु येऊ लागत, तोंडातून फेस पडत असे. बेचैनी वाढल्याने तो अधीर होत असे. अशावेळी त्याला वाटत असे की जणु तत्त्वज्ञान त्याच्या धैर्याची परीक्षा घेत आहे.

अमित जो-जो धैर्य धारण करुन तत्त्वज्ञानाच्या परिक्षेमध्ये पास होण्याचा प्रयत्न करीत होता, तत्त्वाचे अवलंबन घेऊन दुःखाला समताभावाने सहन करण्याचा प्रयत्न करीत होता, तो तो दम्याचा विकार आणखीन वाढत असे हे लक्षात येई.

सुनंदाला मनुष्य स्वभावाच्या दुर्बलतेनुसार कधी कधी आपल्या कमनशीबावर आणि पतिच्या व्यसनांवर भारी वैताग येत असे व राग पण खूप येत असे. त्यामुळे चिडून कधी कधी ती त्याला बरे वाईट बोलतही असे. परंतु तिच्या मनामध्ये अमितबद्दल अतिशय आदरभाव होता, प्रेम होते, सहानुभूति होती. अमितला सन्मार्गावर आणण्याचे श्रेय धर्मेशशिवाय जर इतर कोणाला जात असेल तर ते एकमेव सुनंदाला जाईल. सुनंदाचे मानणे होते की, 'पापाची घृणा करा पापींची नाही.'' पापी तर एक दिवस पापांचा त्याग करुन परमात्मा सुद्धा होतो. त्यामुळे तिने आपल्या पतिच्या आजारामध्ये सहानुभूतिपूर्वक व्यवहार ठेवला आणि त्याची भरपूर सेवा केली तसेच सर्वप्रकाराने त्याला पुरेपूर सहकार्य दिले.

अमितच्या दुखण्यामध्ये सुनंदा रात्रभरं जागून त्याला पूर्ण सहयोग देण्याचा प्रयत्न करीत होती. ज्या ज्या वेळेला अमितला दम्याची ढास लागायची तेव्हा तात्काळ सुनंदा त्याच्या पाठीवर हात फिरवायची, त्याचे डोळे पुसायची. धावत जाऊन औषध आणायची आणि त्याला खाऊ-पिऊ घालायची. आपल्या मांडीत त्याचे डोके ठेवून डोके थोपटायची. आवश्यक असेल तर हात-पाय दाबायची, त्याला आंघोळ घालायची. स्वच्छ ठेवायची.

सेवा-सुश्रुषा करता करता दुःख विसरंण्याकरिता, पीडेवरील उपयोग हट-विण्याकरितां, तेथून चित्त दुभंगविण्याकरिता तत्त्वज्ञानपरक आणि वैराग्यवर्धक वैराग्यभावना, बारा भावनांचे पाठ ऐकवून वस्तुस्वरुपाचे आणि संसार-स्वरुपाचे ज्ञान सुद्धा करवीत असे. कधी कधी कर्मांची विचित्रता सांगणाऱ्या कथा--गोष्टी सांगून समताभाव जागृत करण्याचा प्रयत्न करीत असे. कधी आध्यात्मिक भजन ऐकवून त्याचे मन रमवत असे. ऐकून ऐकून बरीचशी पद्ये अमितला पाठदेखील झाली होती, जी तो स्वतः अशातऱ्हेने गुणगुणत असे -

**जग है अनित्य[१], तामैं सरन न वस्तु कोय[२]**
**तातै दुःखरासि भववास कौं निहारिए।[३]**
**एक चित् चिन्ह[४] सदा भिन्न परद्रव्यनि तैं[५]**
**अशुचि शरीर में न आपाबुद्धि धारिए॥[६]**
**रागादिक भाव[७] करै कर्म को बढावै तातैं;**
**संवर स्वरूप होय[८] कर्मबंध डारिए।[९]**
**तीनलोक[१०] माहि जिनधर्म[११] एक दुर्लभ है;[१२]**
**तातैं जिनधर्म को न छिनहू बिसारिए॥**

पं. कविवर भागचंदजींच्या ह्या एकाच पद्यात अत्यंत थोडक्यात बारा भावनांचे स्वरूप आले आहे, जे अमितच्या ध्यानात बरोबर येऊ लागले.

एकदा सुनंदाने अमितला विचारले - ''बारा भावनांचा संक्षिप्त सार काय तो सांगाल का?''

---

१. अनित्य २. अशरण ३. संसार ४. एकत्व ५. अन्यत्व ६. अशुचि ७. आस्रव ८. संवर ९. निर्जरा १०. लोक ११. धर्म १२. बोधिदुर्लभ.

अमित बारा भावनांचा सार सांगण्यासाठी म्हणाला -

"अनित्य भावनेमध्ये म्हटले आहे की - ज्या संयोगांमध्ये तू सदैव राहू इच्छितोस, ते क्षणभंगुर आहेत, अनित्य आहेत. पुत्र-परिवार, कंचन-कामिनी सदैव तुझ्या बरोबर राहणारे नाहीत. एक तर हे तुझी सोबत सोडतील अथवा तू स्वत: ह्यांच्यापासून चिरकाल विदाई घेशील. तेव्हा हे साहजिकच सुटतील.

अशरण भावनेमध्ये हे सांगितले आहे की - वियोग होणे हा संयोगाचा मूळ स्वभाव आहे. कोणते असे औषध किंवा मणि, मंत्र-तंत्र नाही की जे संयोगांचा वियोग होण्यापासून वाचवू शकेल. जग अशरण आहे. ह्यामध्ये शरण शोधणे वेडेपणा आहे, पंचपरमेष्ठी आणि निज आत्म्याशिवाय सर्व अशरण आहे.

संसार भावने मध्ये म्हटले आहे - संसारातील संयोगामध्ये जेव्हा सुखच नाही, तर ह्या संयोगाच्या शरणामध्ये जाणेच निरर्थक आहे.

एकत्व भावनेमध्ये हे सांगितले गेले आहे की दु:खांना सर्वांनी एकत्र येऊन/होऊन भोगले जाऊ शकत नाही. एकट्यालाच भोगावे लागते.

अन्यत्व भावनेमध्ये एकत्वाच्या भावालाच नास्तिने दृढ केले जाते आणि ही भावना होताच असे समजते की कोणी कोणा साथीदार होऊ शकत नाही. जेव्हा शरीरच साथ/सोबत देत नाही तर इतर काय सोबत ठेवतील?

अशुचि भावनेमध्ये म्हटले आहे की - ज्या देहावर तू र.ग करतो आहेस तो देह अत्यंत मलिन आहे. अशाप्रकारे प्रारंभीच्या सहा भावना संसार, शरीर आणि भोगांपासून वैराग्य उत्पन्न करविण्यामध्ये निमित्त आहेत. ह्या भावना झाल्याने देह वगैरे परपदार्थांपासून भेदभाव देखील दृढ होतो.

बाकीच्या सहा भावना तत्त्वज्ञानपरक आहेत, ज्यांच्याद्वारे कर्मांच्या आस्रव, संवर, निर्जराचे ज्ञान होते तसेच विश्वाच्या स्वरूपाची विस्तृत माहिती प्राप्त होते. धर्मभावनेमध्ये धर्माच्या स्वरुपाचे विशेष चिंतन करण्याची संधी प्राप्त होते आणि बोधि-दुर्लभ भावनेपासून हा बोध प्राप्त होतो की - रत्नत्रयाची प्राप्ति दुर्लभ आहे, म्हणून वेळ टळून जाण्यापूर्वीच/वेळ उरला आहे तोपर्यंतच त्याला प्राप्त करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे.

ह्या बारा भावनांचे वारंवार चिंतन-मनन करणेच व्यवहार धर्मध्यान आहे. कारण ह्याने ज्ञान-वैराग्याची वृद्धि होते.''

जेव्हा अमितची प्रकृति अधिक खराब होत असे तेव्हा धर्मेशजी स्वत: अमितला उपदेश देण्यासाठी त्याच्याजवळ जात असत आणि त्याला समजावत. तत्त्वचर्चा देखील करत आणि पीडा-चिंतवन आर्तध्यानाचे धोके दाखवून त्यापासून वाचण्याची प्रेरणा देत, तसेच धर्मध्यानाची विषयवस्तु काय आहे आणि व्यवहार धर्मध्यानाची ध्येय काय काय आहेत? ह्या गोष्टींची माहिती देत असत. धर्मेशजींनी एकदा अमितला संबोधित करताना सांगितले -

**जो जो देखी वीतरागने, सो सो होसी वीरा रे।**
**अनहोनी होसी नहिं क्यो ही, काहे होत अधीरारे॥**
**समयो एक बढै नहिं घटसी जो सुख-दु:ख की पीरारे।**
**तू क्यों सोच करै मन कूड़ो, होय वज्र ज्यों हीरा रे॥**

जे वस्तुचे स्वरुप सर्वज्ञ देवाने जसे जाणले आहे, पाहिले आहे, तसेच निरंतर परिणमत आहे. म्हणून संयोगांना इष्ट-अनिष्ट मानून सुखी-दु:खी होणे व्यर्थ आहे. अशा विचारांनीच साम्यभाव होतो.''

जेवढा वेळ धर्मेशजी अमित जवळ बसत असत आणि त्याला तत्त्वचर्चेमध्ये गुंतवून ठेवत, तोपर्यंत त्याला वेदनांची जाणीवच होत नसे. थोडेफार वेदनांकडे लक्ष जाताच तो पुन्हा विषय बदलून पुन्हा तत्त्वचर्चेत रस घेत होता.

बुधजन कविंचे लोकप्रिय आध्यात्मिक भजन ऐकल्याने सहज निर्भयता प्राप्त होते म्हणून ते भजन ऐकविले -

**हमको कछु भय ना रे, जान लियो संसार ॥ टेक॥**
**जो निगोद में सो ही मुझमें, सो ही मोक्ष मंझार ।**
**निश्चयभेद कछु भी नाहीं, भेद गिने संसार ॥ १॥**
**परवश व्हैं आपा विसारिकै, राग-द्वेष को धार ।**
**जीवत-मरत अनादि काल तै, यौं ही है उरझार ॥ २॥**

जाकरि जैसे जाहि समय में जे होतव जा द्वार ।
सो बनि है, टरि है कछु नाही; करि लीनो निरधार॥ ३॥

पहा, आचार्य रविषेण ह्यांनीदेखील ह्या अर्थाचा एक श्लोक लिहिला आहे, ते म्हणतात –

प्रागेव यद् अवाप्तव्यं येन यत्र यथा यतः ।
तत्परिप्राप्यतेऽवश्यं तेन तत्र तथा ततः ॥ ४० ॥[१]

ज्याला जेथे ज्या कारणाने, ज्या प्रकाराने जी वस्तु प्राप्त होणार आहे, त्याला तेथे, त्याकारणाने त्याच प्रकारे, तीच वस्तु अवश्य प्राप्त होते.

धर्मध्यानाच्या व्यापकतेला स्पष्ट करीत धर्मेशजी म्हणाले-

"पहा अमित! तात्त्विक विषयांची चर्चा-वार्ता करणे देखील धर्मध्यानच आहे. ध्यान नुसते डोळे बंद करुन बसल्यानेच नव्हे, तर चालता-बोलता, उठता-बसता, खाता-पिता देखील होते. म्हणून तू निरंतर असाच काही ना काही विचार कर, तर वेदनेपासूनही वाचशील आणि पीडा चिंतवन आर्तध्याना पासून देखील वाचशील!"

अशातऱ्हेने सुनंदा, धर्मेशजी तसेच इतर भेटायला येणाऱ्यामध्ये त्याचे लक्ष इतरत्र गेल्याने दिवसाचा वेळ तर चांगला जात असे, परंतु रात्री एकटा पडताच वेदना जास्त जाणवत असत.

एकटी सुनंदा शेवटी कोठवर आणि किती दिवस जागणार? अमितला देखील आपल्या स्वार्थासाठी तिला जागरण करायला लावणे आवडत नव्हते. आता तर तो धर्मेशजींनी सांगितल्याप्रमाणेच आपल्या वेळेचा सदुपयोग करु लागला. पुण्योदयाने अमित हळु हळु बरा देखील होऊ लागला होता.

काही रोग विनाकारण बदनाम झाले आहेत, ज्यांच्या बाबतीत असे म्हटले जाते की हे मरणापर्यंत पिच्छा सोडीत नाहीत. जसे – दमा दम सोडल्याशिवाय सुटत नाही असे म्हणतात, कॅन्सरवर कोणता हुकमी इलाज नाही, टी.बी. देखील असाच प्राणघातक रोगांमधील एक आहे. लिव्हर, किडनी वगैरे रोगांचे नाव घेताच अनेकजण घाबरतात.

---

१. पद्मपुराण सर्ग ११०

जेव्हा ह्या रोगातील एखाद्या रोगाचे नाव घेताच जिवाचा थरकाप उडतो. तर ज्यांना असे अनेक रोग एकदम झाले असतील, त्यांच्या भीतिचे वर्णन काय करावे?

अमित तशाच रोग्यांपैकी एक होता, जो आपल्याच चुकांमुळे एकाबरोबर अनेक प्राणघातक रोगांनी ग्रस्त होता, ज्यापासून वाचण्याची आता कोणालाही आशा उरली नव्हती.

परंतु हे आवश्यक तर नाही की प्राणघातक रोग प्राण घेतल्याशिवाय जातच नाहीत. जर आयुकर्म बाकी असेल आणि असाता वेदनीय कर्माचा अंत आला असेल तर मोठ्यातले मोठे रोगदेखील बरे झाल्याचे पाहण्यात येते.

ज्या रोगांपासून सुटका होणे अमितला पश्चिमेला सूर्य उगविण्याएवढे अशक्य वाटत होते, ते रोग देखील डॉक्टरांच्या प्रयत्नांनी आणि अमित व सुनंदाच्या सुदैवाने हळु हळु बरे झाले.

अमित आता मोठ्या आजारानंतर शारिरिक व मानसिकरुपाने पूर्ण बरा होऊन सुनंदा बरोबर संध्याकाळच्या ज्ञानचर्चेमध्ये सामील झाला तेव्हा सर्वांना आनंद झाला. धर्मेशजींनी देखील आनंद प्रकट केला आणि हसून त्याच्या चांगल्या स्वास्थ्याबद्दल अभिनंदन केले.

अमित धर्मेशजींना नमस्कार करुन अभिनंदनाचे आभार मानून विनम्र शब्दात म्हणाला -

"धर्मध्यानाच्या दहा भेदांची चर्चा जी जिनागमामध्ये आहे, ते दहा भेद कोणकोणते आहेत? आणि ते ध्यान करण्याची प्रक्रिया/रीत/विधि कोणती आहे?"

धर्मेशजी म्हणाले - "तुमचा प्रश्न महत्वपूर्ण आहे. प्रासंगिक देखील आहे. ह्या शिबिरामध्ये ध्यानाचा विषयच तर चालू आहे."

धर्मेशजींनी तत्त्वचर्चा सुरु करण्यापूर्वी अमितला विचारले - "सांग अमित! आता तुझी प्रकृति बिलकुल ठीक आहे ना? चेहऱ्यावरुन तर तू

चांगलाच दिसत आहेस. आता तुला श्वासाचा सुद्धा तसा विशेष त्रास दिसत नाही. बरे झाले तू चांगला झालास. तुझ्याबद्दल सर्वांना चिंता वाटत होती."

अमित मंद स्मित करीत म्हणाला - "होय, आपणा सर्वांच्या शुभेच्छेमुळे आणि नशीबाने वाचलो आहे. आता उरलेले आयुष्य आपल्या चरणाशीच घालवेन. हां, मी धर्मध्यानाच्या बाबतीत..."

धर्मेशजी म्हणले - "होय माझ्या लक्षात आहे. धर्मध्यानाचे १० भेद जिनागमामध्ये सांगितले त्यांचे थोडक्यात स्वरुप अशाप्रकारे आहे.

**( १ ) आज्ञा विचय** - ह्यामध्ये पाच अस्तिकाय आणि सहा जीवनिकाय (षट्कायिक जीव) वगैरेंच्या चिंतवनामध्ये जेथे आपली बुद्धि चालणार नाही, तेथे सर्वज्ञाची आज्ञा मानून चिंतन करणे आज्ञा विचय धर्मध्यान आहे.

आचार्य अकलंकदेवांनी राजवार्तिक ग्रंथामध्ये आज्ञाविचयाचे जे स्वरूप वर्णिले आहे, त्याचा सारांश असा आहे की, - तीव्र कर्मोदयाने ज्यांची बुद्धि मंद आहे, ते स्वत: तर अमूर्त आणि सूक्ष्म पदार्थांचा निर्णय करु शकत नाहीत आणि तत्त्वज्ञानी उपदेशक सर्वज्ञ सदैव उपलब्ध असतातच असे नाही. अमूर्त आत्मा धर्म, अधर्म द्रव्यांच्या सिद्धिकरिता दृष्टांत व हेतु विश्वामध्ये आढळत नाहीत, जे त्या सूक्ष्म तत्त्वांना समजावू शकतील.

अशा परिस्थितीमध्ये मंदबुद्धि मुमुक्षु जीवांना एकमेव जिनआज्ञेला प्रमाण मानणेच शरणभूत आहे; कारण जिनेंद्र भगवान वीतराग व सर्वज्ञ असल्याने अन्यथावादी असत नाहीत. म्हटले देखील आहे, '**नान्यथा वादिनो जिनः।**'

म्हणून जिनेंद्रकथित आगमालाच प्रमाण मानून त्यामध्ये निरुपित केलेल्या सूक्ष्मतत्त्वांचे चिंतन करणेच आज्ञाविचय आहे.

तसेच स्व-समय, पर-समयाचे ज्ञाता तत्त्वज्ञानी वक्त्यांद्वारे अणि लेखकांद्वारे सर्वज्ञ प्रणित अतिसूक्ष्म पंचास्तिकाय, जिवनिकाय (षट्कायिक जीव) तसेच आत्मा-परमात्म्याच्या स्वरुपाचे आगम व युक्तीच्या अवलंबनाने आणि सरळ आणि सोप्या दृष्टांताने सर्वसामान्य लोकांना समजाविणे तसेच मिथ्यावादींच्या

तर्काचे खंडन करुन त्यांना जिनमत ऐकणे-ऐकविण्याच्या बाबतीत सहिष्णु बनविणे तसेच धर्मकथा वगैरे ऐकविणे कि ज्यायोगे जिनश्रुताची प्रभावना होईल. हे सर्व कार्य देखील आज्ञाविचय धर्मध्यानाच्या सीमेमध्येच येते; कारण ह्यामध्ये देखील सर्वज्ञाच्या वाणीचेच चिंतन-मनन आणि प्रचार-प्रसार होतो.

**( २ ) अपाय-विचय** - शुभाशुभ भावांपासून मुक्त होण्याचे चिंतवन करणे अपाय विचय आहे. राग-द्वेष-कषाय आणि आस्त्रव वगैरे क्रियांमध्ये निंद्य इहलोक व परलोकापासून सुटण्याच्या उपायाचा विचार करणे अपाय-विचय आहे.

उपाय विचयाच्या संदर्भामध्ये आचार्य अकलंकदेवांचे कथन आहे की, अपाय अथवा उपाय दोन्ही शब्द एकार्थवाचकच आहेत. उन्मार्गामध्ये भरकटलेल्या जीवांना सन्मार्गावर आणण्याच्या उपायांवर विचार करणेच अपाय विचय आहे.

राजवार्तिकमध्ये असे म्हटले आहे की - मिथ्यादर्शनामुळे ज्यांचे ज्ञान-नेत्र अंध:कारात झाकले जात आहे, त्यामुळे जे सर्वज्ञप्रणित उपदेशापासून विमुख होत आहेत, सम्यक् मार्गाचे ज्ञान नसल्याने जे कुमार्गामध्ये भरकटत आहेत, त्यांना सन्मार्गामध्ये आणण्याच्या उपायांचे चिंतन करणे, अपाय विचय आहे.

अथवा मिथ्यादर्शनामुळे आकुलित चित्तवाले जगातील जीव, जे कुवादींद्वारे प्रचारात असलेल्या कुमार्गापासून हटून, सन्मार्गी कसे लागतील आणि अनायतन सेवांपासून कसे विरक्त होतील? धर्माच्या नावाखाली फोफावणाऱ्या पापप्रवृत्तिंपासून निवृत होऊन सम्यक् मार्ग कसा आक्रमण करतील? अशाप्रकारच्या उपायांचे चिंतन करणे अपाय विचय धर्मध्यान आहे.

**( ३ ) विपाक विचय** - स्वत: निर्माण केलेल्या किंवा दुसऱ्याने केलेल्या संकट काळी उत्पन्न झालेल्या आकुलतेपासून वाचण्याकरिता त्या संकटांनाच आपल्या कर्मोदयाचे फळ मानून साम्यभाव ठेवणे विपाक विचय आहे.

**( ४ ) संस्थान विचय** - लोकाच्या स्वरुपाचा विचार करणे. हे पिंडस्थ, पदस्थ, रुपस्थ आणि रुपातीत अशा भेदाने चार प्रकाराने केले जाऊ शकते.

राजवार्तिक मध्यें वरील त्याच चारिभेदांसह सहा भेद मिसळून एकंदरीत दहा भेद सांगितले आहेत.

**(५) उपाय विचय** - आत्म्याचे कल्याण करणाऱ्या जिनदेवांनी उपदेशिलेल्या उपायांचे चिंतवन करणे उपाय-विचय आहे.

**(६) जीव विचय** - जीवद्रव्य आणि जीवतत्त्वाचे स्वरूप आणि गुणस्थान वगैरेचे चिंतवन करणे जीवविचय आहे.

**(७) अजीव विचय** - अजीव द्रव्यांच्या स्वरुपाचे चिंतन करणे अजीवविचय आहे.

**(८) विराग विचय** - बाराभावना वैगरेच्या माध्यमातून शरीराच्या अपवित्रतेचे आणि भोगांच्या असारतेचे चिंतन करणे विराग विचय आहे.

**(९) भव विचय** - चारी गतीतील भ्रमण करणाऱ्या जीवांच्या मरणानंतर जी पर्याय प्राप्त होते त्याला भव म्हणतात. हा भव दुःखरूप आहे तसेच हा मनुष्यभव भवाचा अभाव करण्याकरितां मिळाला आहे हा भव जन्म-मरण वाढविण्याकरितां मिळालेला नाही - असे चिंतन करणे भवविचय धर्मध्यान आहे.

**(१०) कारण विचय (हेतुविचय)** - तर्क आणि युक्तीचे अनुसरण करुन स्याद्वादाच्या प्रक्रियेचा आश्रय घेऊन तत्त्वाचे चिंतन करणे हेतुविचय आहे.


ह्याशिवाय बाह्य आणि आभ्यंतर अशा भेदानेसुद्धा धर्मध्यानाच्या दोन भेदाचा उल्लेख आगमात आहे.

शास्त्राचा अर्थ शोधणे, शीलव्रत पाळणे, गुणानुराग ठेवणे, प्रमादरहित होणे तसेच ज्याला इतर लोक देखील अनुमानाने जाणू शकतील त्याला बाह्यधर्मध्यान म्हणतात. तसेच ज्याला केवळ आत्माच जाणू शकतो ते आभ्यंतर निश्चय धर्मध्यान आहे.

अशा प्रकारे धर्मध्यानाच्या वरील दहा भेदांच्या आश्रयाने अशुभभावापासून वाचण्यारूप व्यवहार धर्मध्यान होते आणि शुद्धात्म्याच्या आश्रयाने निश्चय धर्मध्यान होते.

निश्चय धर्मध्यानाच्या पूर्व भूमिकेमध्ये ह्या शुभभावरूप दहा प्रकारच्या व्यवहार धर्म ध्यानांचा आश्रय अवश्य असतो.

हे सर्व धर्मध्यान सामूहिक स्वाध्यायाच्या रुपाने, तत्त्वचर्चेच्या रुपाने, विचारणे वगैरे स्वाध्यायाच्या भेदांच्या रुपाने, बारा भावनांच्या चिंतवनाच्या रुपाने, सामायिकाच्या रुपाने, उठता-बसता, चालता-फिरता तत्त्वविचार करण्याच्या रुपाने, वगैरे अनेक रुपाने होऊ शकते.



एक श्रोता म्हणाला - "गुरुजी! खरोखरच ही ध्यानाची चर्चा ह्या शिबिराची अविस्मरणीय उपलब्धि होईल. एवढ्यासाठी आपले जेवढे उपकार मानावेत तेवढे कमीच आहेत. ह्या चर्चेमुळे आम्हा सर्वांना अपेक्षेपेक्षा अपूर्व लाभ प्राप्त झाला आहे." •

## ३४

सायंकालीन सात वाजताच्या चर्चेमध्ये संपत शेठ म्हणाले - "गुरुजी! धर्मध्यानाची गोष्ट तर थोडी फार समजली, परंतु हे शुक्लध्यान काय असते? काय धर्मध्यानाशिवाय देखील श्रेष्ठ एखादे ध्यान असते का?"

धर्मेशजी म्हणाले - "हा, बाबा हां, सर्वोत्कृष्ट ध्यान तर शुक्लध्यानच आहे. तसे पाहिले असता निश्चय धर्मध्यानाच्या आणि शुक्लध्यानाच्या विषयामध्ये स्थूल दृष्टिने काही विशेष फरक नाही. **ध्यान, ध्याता व ध्येयाच्या विकल्पाने रहित स्वरुपविश्रांतीच निश्चय धर्मध्यान आहे तसेच शुक्लध्यानामध्ये देखील निर्विकल्प समाधिच असते**; परंतु सूक्ष्म दृष्टिने पाहिले असता शुक्लध्यान फक्त उपशमश्रेणी व क्षपकश्रेणीमधील आठव्या गुणस्थानापासून ध्यानस्थ मुनींनाच असते. गृहस्थाच्या भूमिकेमध्ये अशी योग्यता किंवा सामर्थ्य प्रगट होत नाही की त्याला शुक्लध्यान व्हावे! परंतु धर्मध्यानाची सुरूवात अविरत सम्यग्दृष्टि चौथ्या गुणस्थानापासून होते.

शुक्लचा सर्वसामान्य अर्थ सफेद होतो, परंतु येथे शुक्ल शब्दाचा वापर निर्मलतेच्या अर्थामध्ये आहे. भगवान आत्मा स्फटिकमण्याप्रमाणे पूर्ण निर्मल आहे, उज्ज्वल आहे. रागादि मलाने रहित निर्मल स्वसंवेदन ज्ञानाला शुक्ल म्हणतात. अशा तऱ्हेने निज शुद्धात्म्यामध्ये विकल्प रहित समाधिच शुक्लध्यान आहे.

शुक्लध्यानाची व्याख्या सांगताना नियमसारच्या तात्पर्यवृत्ति मध्ये म्हटले आहे, **ध्यान, ध्याता, ध्येय व ध्यानाचे फळ वगैरे विविध विकल्पांपासून विमुक्त अंतर्मुखाकार, समस्त इंद्रिय समूह-अगोचर निरंजन निजतत्त्वामध्ये अविचल स्थितिच शुक्ल ध्यान आहे.**

प्रवचनसारच्या तात्पर्यवृत्ति टीकेमध्ये देखील हे म्हटले आहे की, "**रागादिविकल्प-रहित स्वसंवेदनज्ञानाला आगमभाषेमध्ये शुक्लध्यान म्हटले गेले आहे.**"

आचार्य पूज्यपादस्वामींनी आणि आचार्य अकलंकदेव यांनी शुक्ल ध्यानाची व्याख्या सांगताना असे म्हटले आहे की **''ज्यामध्ये शुचि गुणाचा संबंध आहे, ते शुक्ल ध्यान आहे - ज्या प्रमाणे मळ हटल्याने वस्त्र शुचि होऊन शुक्ल म्हटले जाते, त्याप्रमाणे निर्मल गुणयुक्त आत्मपरिणति शुक्लध्यान आहे.**

कार्तिकेयानुप्रेक्षा मध्ये म्हटले आहे की, **''जेथे गुण अति विशुद्ध होतात, जेथे कर्मांचा क्षय आणि उपशम होतो, जेथे लेश्या देखील शुक्ल बनते; त्याला शुक्लध्यान म्हणतात.''**

ज्ञानार्णव ग्रंथामध्ये शुक्ल ध्यानाचे स्वरुप विशेष स्पष्ट केले आहे, जे अशाप्रकारे आहे - **''जे निष्क्रिय व इंद्रियातीत आहे - 'मी ध्यान करावे'** अशाप्रकारच्या ध्यानधारणे रहित आहे, ज्यामध्ये चित्त अंतर्मुख आहे, ते शुक्लध्यान आहे.''

हे शुक्लध्यान वैडूर्यमण्याच्या प्रकाशाप्रमाणे निर्मल आणि निष्कंप असते.

द्रव्यसंग्रहामध्ये अशाप्रकारच्या ध्यानाची भूमिका प्राप्त करण्याची प्रेरणा देऊन म्हटले आहे की, - **हे भव्य कोणतीही हालचाल करु नकोस, काहीही बोलू नकोस, काहीही चिंतन करु नकोस. त्यामुळे आत्मा निजात्म्यामध्ये तल्लीन होऊन स्थिर होईल. आत्म्यामध्ये पूर्णपणे तल्लीन होणेच परम शुक्ल ध्यान आहे.''**

ध्यानात ठेवा, हे शुक्लध्यान मुनींनाच असते. गृहस्थांमध्ये अशी पात्रता असत नाही.

ह्या शुक्ल ध्यानाच्या उत्तरोत्तर वृद्धिंगत चार श्रेण्या आहेत.

**(१) पृथक्त्ववितर्कवीचार** - शुक्लध्यानाच्या ह्या पहिल्या श्रेणी मध्ये अनेक द्रव्य ज्ञानाचे ज्ञेय बनतात, ध्यानाचे विषय बनतात आणि ह्या विषयांचे ध्यान करते वेळी श्रेणी चढणाऱ्या मुनिंच्या मन-वचन-काय (योग) यांचे परिवर्तन होते, ज्याला योगसंक्रांति म्हणतात. अशाप्रकारे उपयोगामध्ये अबुद्धिपूर्वक ज्ञेय पदार्थांचे तसेच योग प्रवृतींचे परिवर्तन होते.

हे परिवर्तन पुढच्या एकत्ववितर्कावीचार वगैरे श्रेणीमध्ये असत नाही. तेथे उपयोग रत्नदीपाच्या ज्योतिप्रमाणे निष्कंप होऊन स्थिर होतो.

**( २ ) एकत्ववितर्काविचार** – शुक्ल ध्यानाच्या ह्या द्वितीय श्रेणीमध्ये एका द्रव्याचाच आश्रय असतो. ह्यामध्ये ज्ञेयापासून ज्ञेयांतर संक्रमण होत नाही. हे ध्यान क्षीणकषायी बाराव्या गुणस्थानवर्ती मुनिराजांचे असते.

**( ३ ) सूक्ष्मक्रियाप्रतिपाती** – शुक्लध्यानाची ही तृतीय श्रेणी सयोगकेवली – तेराव्या गुणस्थानवर्ती सर्वज्ञ भगवानाची असते. ह्या गुणस्थानामध्ये शेवटच्या अंतर्मुहुर्तकाळामध्ये जेव्हा भगवान स्थूल योगांचा निरोध करुन सूक्ष्म काययोगामध्ये प्रवेश करतात, तेव्हा त्यांना सूक्ष्मक्रियाप्रतिपाती नामक तिसरे शुक्लध्यान असते.

**( ४ ) व्युपरतक्रियानिवर्तीनि** – हे शुक्लध्यान अयोगकेवली चौदाव्या गुणस्थानामध्ये योगाचा पूर्ण निरोध झाल्यानेच होते.

ह्याव्यतिरिक्त बाह्य शुक्लध्यान आणि आध्यात्मिक शुक्लध्यान अशा भेदानेसुद्धा शुक्लध्यानाचे दोन भेद आहेत.

शरीर आणि नेत्रांचे स्पंदनरहित होणे, जांभई वगैरे नसणे, श्वासोश्वासाचे चालणे व्यक्त न होणे हे बाह्य शुक्लध्यान आहे तसेच जेथे फक्त आत्म्याचे स्वसंवेदन आहे, ते आध्यात्मिक शुक्लध्यान आहे.

असे ध्यान करण्याने आत्म्याला चिकटलेल्या अनादिकालीन कर्म मलिनतेचा सर्वथा अभाव होऊन आत्मा पूर्ण निर्मल होतो, मुक्त होऊन सदैव अतींद्रिय आनंदामध्ये मग्न होऊन जातो.

याची प्रत्यक्ष अनुभूति तर फक्त ध्यानस्थ मुनिराजांनाच होत असते. ती देखील उपशम आणि क्षपकश्रेणीवाल्यांनाच! म्हणून ह्या विषयाबाबतीत एवढ्यावरच समाधान मानले पाहिजे. आपण ही भावना बाळगावी की ती संधी आपणास लवकर प्राप्त होवो. ज्यायोगे आपण शुक्लध्यानाला प्राप्त करुन परमात्मदशा प्राप्त करु.

विषय सूक्ष्म होता, परंतु समजण्यासारखा होता, म्हणून सर्व आत्मार्थी जिज्ञासु बंधुंनी ह्या गंभीर चर्चेला देखील मनोयोगपूर्वक ऐकले आणि धर्मेशजींना ह्या सूक्ष्म चर्चेकरिता मनातल्या मनात धन्यवाद दिला. आणि अशी भावना केली की हा महापुरुष दीर्घायुषी होवो, त्यामुळे खूप वर्षे लोकांना त्यांच्या ज्ञानाचा लाभ मिळो.

●

## ३५

धर्मेशजींच्या अंतरंगातून निघालेल्या करुण आणि शांत रसाने भरलेल्या मर्मस्पर्शी भाषणाने श्रोत्यांना भारावून तर टाकले, त्यांच्या अंतर्बाह्य व्यक्तित्वाने देखील आसपासच्या वातावरणाला तत्त्वज्ञानाच्या गंधाने सुगंधित केले. जैनांशिवाय अनेक हिंदू व मुसलमान बंधु देखील त्यांचे रोजचे श्रोते बनले होते.

सुनंदा, सुनयना आणि त्यांचे नातलग तर जणु कृतार्थच झाले होते. ह्या लोकांना तर जुन्या आठवणी डोळ्यासमोर येताच अंगावर काटे उभे रहात व हृदयाचा थरकाप उडे. ह्यांना तर आता धर्मेशजीच आपले सर्वात मोठे शुभचिंतक वाटत होते. म्हणून कोणताही प्रसंग असो, धर्मेशजींची आठवण झाल्याशिवाय रहात नसे.

केव्हाही फुरसतीने गप्पा मारीत एकत्र बसताच धर्मेशजींच्या बाबतीत चर्चा झाल्याशिवाय रहात नसे.

अमित म्हणे – "खरोखर धर्मेशसारखी व्यक्ती ह्या युगामध्ये तर काही आढळून येत नाही. एक काळ असा होता की मला माझ्या शिक्षणाबद्दल अभिमान वाटायचा आणि धर्मेशजीवर मित्र ह्या नात्याने दया वाटायची. त्याच्या अपुऱ्या शिक्षणामुळे मला नेहमी वाईट वाटायचे, दया यायची त्याची, परंतु पाहता पाहता मागे राहिलेला तो किती पुढे निघून गेला! कोठून कोठे पोहोचला! आणि स्वतःला फार मोठा समजणारा मी कोठे गटांगळ्या खात राहिलो.

मला समजते की हे सर्व एकाएक झालेले नाही. ह्याचे मूळ तर त्याच्या बालपणी देखील होते परंतु प्रत्येकाला अशी पारख कोठे असणार? मी देखील त्यांच्यापैकीच एक होतो, जो त्यांना ओळखूच शकलो नाही. तो खरोखर धुळीने झाकला गेलेला हिरा ठरला.

आज तुम्ही-आम्हीच काय सारी दुनिया ज्याच्याबद्दल अभिमान बाळगते असा तो एक, की ज्याच्या संपर्कामध्ये एकवेळदेखील जो कोणी येतो, तो

त्यांचाच होऊन जातो; आणि हा एक मी, जो केवळ धर्मेशच्या दृष्टिकोनातूनच नव्हे तर साऱ्या समाजाच्या दृष्टीकोनातून दयेचा पात्र बनलो आहे.

खरोखर हा धर्माचाच काही अद्‌भुत प्रभाव आहे, ज्याची आजतागायत मी तमा बाळगली नाही. निरंतर अप्रशस्त परिणामांमध्येच जगलो. मतिअनुसार गति व्हावयाची होती ती झाली. जेव्हा जेव्हा मला असा पश्चात्ताप होतो आणि धर्मेशजींजवळ आपल्या मनातील दुःख-शल्य - सांगतो… माहित आहे ते काय म्हणतात? ते म्हणतात - अरे! ही काय फार मोठी हानि झालेली नाही, अजूनही काही बिघडले नाही. तूच काय, अजून तर तू मी - सगळे एकाच श्रेणीमध्ये आहोत; स्वभावाने तर सगळेच भगवान आहेत, परंतु वाट चुकलेले भगवान आहेत. सत्य गोष्ट समजण्याचा देखील आपला स्वकाल असतो. म्हणून भूतकाळाला विसर, भविष्यकाळची चिंता सोड आणि वर्तमानकाळामध्ये आध्यात्मिक अध्ययन, मनन, चिंतन कर, सर्व काही ठीक होऊन जाईल.''

संपत शेठ म्हणाले - ''होय तू खरच योग्य तेच बोलत आहेस, धर्मेशजी असाच महान आत्मा आहे. जरी दुसरा कोणी असता तर सांत्वन करण्याऐवजी बालपणी त्याच्याशी केलेच्या वाईट वागणुकीची वारंवार आठवण काढून काढून आपला अपमान केला असता. परंतु धर्मेशजी तर खरोखर देव माणूस आहे देवमाणूस!

मलाच पहा ना! मी आपल्या श्रीमंतीच्या गर्वाने ज्यांची थोडी फार उपेक्षा केली, ते आज मोठे काय झाले आणि ते माझा एक एक गोष्टीचा सूड उगविण्यास टपलेले आहेत. जगाचीच रीत आहे ही! हे धर्मेशजीच असे आहेत ज्यांनी भूतकाळ विसरुन आपणा सर्वांवर असीम उपकार केले आहेत. धर्मेशजीमुळे मला धर्माचे थोडे फार ज्ञान झाले आहे. खरोखर मला तर त्यांनी - सांगा शेठ! सांगा शेठ! असे थापटून-थोपटून कुंभाराच्या घड्याप्रमाणे घडविले आहे. नाहीतर आम्ही सकाळ पासून संध्याकाळपर्यंत आपल्या खोट्या प्रशंसा करणाऱ्यांकडून आणि चमच्यांकडून घेरलेले असायचो. दानवीर धर्मात्मा, कर्मवीर, धर्मवीर आणि न जाणो कोणकोणती लांब-लचक विशेषणांनी युक्त प्रशंसा मदिरा प्राशन करुन करुन पागल बनत होतो आणि न्याय अन्यायाने मिळविलेल्या संपत्तीला त्यांच्या म्हणण्यानुसार पाण्याप्रमाणे वाहवून त्यामुळे खूष होऊन परिग्रहानंदी रौद्रध्यान करीत होतो.

आम्हाला देखील काही पत्ता नव्हता की, ह्या परिणामांचे फळ काय मिळेल? खरोखर जर धर्मेशजीच्या रुपाने हा धर्मावतार मिळाला नसता तर आपण तर नरकाचीच तयारी चालविली होती. धन्य आहे तो सत्पुरुष! हा दीर्घायु तर होवोच परंतु आपल्या सर्वांच्या कल्याणाचे सतत निमित्त बनावे - हीच माझी मंगल भावना आहे."

मनमोहन देखील हे ऐकून गद्‌गदित झाले, ते डोळे पुसतच म्हणाले - "जर आपणा सर्वांना धर्मेशजींचा सत्समागम मिळाला नसता, धर्मेशजींकडून प्रेरणा व सांत्वन मिळाले नसते, त्यांची अमृतमय वाणी ऐकण्यास मिळाली नसती, तर आपण तर ह्या दुर्व्यसनांच्या दलदलीतून बाहेर पडलो नसतो. धर्मेशजींच्या प्रवचनाव्यतिरिक्त त्यांच्या पवित्र जीवनाने देखील मला प्रेरणा मिळाली आहे. आज मी जे काही समजू शकतो ती धर्मेशजींची मेहरबानी आहे."

सुनंदा व सुनयना तर स्फुंदुन रडू लागल्या. स्त्रिया भावनाशील तर स्वभावतः असतातच शिवाय धर्मेशजींच्या सत्समागमामुळे ह्यांना वचनातीत लाभ झाला होता. त्यामुळे त्या गहिवरुन येत होत्या. त्या काही बोलू शकल्या नाहीत, परंतु काही न बोलता देखील उद्धवाच्या गोपींप्रमाणे अश्रु आणि हुंदक्यांनीच सर्व काही सांगून टाकले -

**नेकु कही बैननि, अनेक कही नैननि,**
**रही-सही सोऊ कहदीनी हिचकीन सौ**

वाणी काही बोलू शकली नाही, बऱ्याच गोष्टी डोळे बोलून गेले. आणि उरलेले-सुरलेले सगळे काही हुंदके सांगून गेले.

संपत शेठना गप्प बसवले नाही. ते पुन्हा म्हणाले - "पहा, पुण्योदयाने मला काही खास कोणत्या शारीरिक किंवा मानसिक गोष्टींनी त्रास दिला नाही. कोणत्या मानसिक चिंता उरल्या नाहीत. शारीरिक रोग झाले नाहीत, त्यामुळे मी जनसेवा, समाजसेवा वगैरे व्याधि पाठीमागे लावून घेतल्या, परंतु ते काम देखील पवित्र भावनेने करु शकलो नाही. त्यामध्ये देखील यश, नाव, प्रतिष्ठा यांची हाव तर राहिलीच, त्या बरोबर वैयक्तिक स्वार्थ देखील कमी नव्हता! ज्या गोष्टींना सागंण्यासही लाज वाटावी अशा पाप प्रवृत्तींमध्ये अडकलो गेलो.

जर धर्मेशजींसारख्या सत्पुरुषाचा समागम मिळाला नसता तर मग मी त्या अप्रशस्त भावांच्या दलदलीतून बाहेर पडू शकलो नसतो.

एका प्रवचनात धर्मेशजींनी सांगितले होते की, **ज्या व्यक्ति राष्ट्रसेवेच्या अथवा समाजसेवेच्या नावाखाली ट्रस्ट बनवून आपल्या काळ्या पैशांना पांढरे करतात आणि त्या पैशाच्या एका दगडाने दोन पक्षी मारतात, त्यांची तर येथे गोष्टच केलेली नाही, त्यांचे ते भाव तर स्पष्टपणे अप्रशस्त भावच आहेत. खरे पाहता ते तर आपला स्वार्थ साधण्यामध्येच गुंग झाले आहेत. ते स्वतःच समजून असतील की ते किती धर्मात्मा आहेत ते! परंतु ज्या व्यक्ति आपल्या पैशाचा उपयोग खरोखर जनकल्याणाच्या भावनेने लोकांच्या हितासाठी करतात, त्या पाठीमागे ज्यांचा यश/प्रतिष्ठा मिळविण्याचा जरा ही/ कोणताही अभिप्राय असत नाही, त्यांनी देखील एकवेळ आत्मपरिक्षण तर करुन पाहिलेच पाहिजे की त्यांची ह्या कार्यामध्ये किती धर्मभावना आहे, किती शुभभावना आहे आणि किती अशुभ भाव चालू आहे? डोळ्यावर पडदे ओढून स्वतःला धर्मात्मा, दानशूर वगैरे मानणे कितपत शहाणपणाचे ठरणार आहे?**

धर्मेशजींच्या त्या उपदेशाने तर माझे डोळेच उघडले. माझे तर जेवढे ट्रस्ट आहेत, त्या सर्वामध्ये माझा व्यक्तिगत स्वार्थ जोडलेला आहे. खरोखर माझे हे कार्य प्रशस्त आर्तध्यानाच्या किंवा शुभभावांच्या श्रेणीमध्येदेखील येणार नाही. धर्माची बात तर फार लांब राहिली.

खरी गोष्ट तर ही आहे की, - जर एखाद्याने इस्पितळ खोलले तर त्याने पाहिले पाहिजे की **आपल्या कृत्याने अल्पफल आणि बहुघात तर होत नाही नां? एकाचा जीव वाचविण्यामध्ये अनेकांचा जीव तर घेतला जात नाही नां? औषधांच्या नावाखाली मद्य-मांस-मधा सारख्या अभक्ष्य पदार्थांचा उपयोग तर केला जात नाही ना? हिंसेमुळे तयार झालेली औषधं तर वापरली जात नाहीत नां?**

**धर्मशाळा निव्वळ कर्मशाळा, पैसा कमविण्याचे साधन आणि पापाचरणाचे अड्डे तर बनत नाहीत नां? धार्मिक शाळा जीवशास्त्र शिकविणाऱ्या शाळा व कॉलेजमध्ये परावर्तित होऊन बेडूक आणि कासवासारख्या प्राण्यांचा प्राण घेणारी केंद्रं तर बनत नाहीत नां?**

**अनाथालय, विधवाश्रम आणि महिला कल्याण केंद्रामध्ये रहाणाऱ्या अनाथांना स्वावलंबी बनविण्याऐवजी, त्यांचे योग्य तऱ्हेने पालन पोषण केल्याशिवाय त्यांचे शारीरिक, आर्थिक व मानसिक रुपाने शोषण तर होत नाही नां?**

जर हे ट्रस्ट आणि ह्या संस्था बिलकुल योग्य तऱ्हेने चालल्या, आपापल्या पवित्र उद्देशांची पूर्णता करु लागल्या, तरी देखील प्रशस्त शुभभाव असल्याने पुण्यबंधाचे कारणच होतील, धर्म तर तेव्हाही होणार नाही; धर्म तर वीतराग परिणतिचे नाव आहे, रागभावाने धर्म होत नाही."

धर्मेशचे अशा युक्तीसंगत आणि न्यायसंगत क्रांति घडवून आणणारे विचार आठवून संपत शेठ म्हणाले - "धर्मेशजींच्या प्रवचनांनी माझे जीवन तर सुधारलेच शिवाय नवीन येणारे श्रोतेदेखील प्रभावित झाले, तसेच विराग बरोबर आलेला त्याचा धाकटा भाऊ अनुराग, त्याचे जीवन देखील आमूलाग्र बदलले. वस्तुचे स्वरूप जाणून त्याचे देखील डोळे उघडले."

हळु हळु धर्मेशजींची ख्याति चोहीकडे पसरु लागली. संपत शेठ तर पूर्णपणे समर्पित झालेच होते, मोठे मोठे राजकीय पुढारी देखील जिज्ञासेपोटी त्यांना ऐकण्यास येत असत.

एकदा असे झाले - एक फार मोठे राजकीय पुढारी, जे स्वत:ला अहिंसेचे पुजारी समजत होते व ज्यांनी पशुहत्या बंद करावी म्हणून आंदोलन सुरु केले होते, त्यांना ह्या गोष्टीचा गर्व होता की, 'मी जींवाचे रक्षण करु शकतो'- एकदा काही कारणाने ते धर्मेशजींच्या धर्मसभेमध्ये हजर होते. कर्मधर्म संयोगाने त्यावेळी धर्मेशजींचे व्याख्यान देखील अहिंसेवरच होत होते. समयसारच्या बंध अधिकाराच्या गाथेच्या आधारे धर्मेशजी सांगत होते की -

**"मैं मारता हूँ अन्य को, या मुझे मारें अन्य जन।**
**यह मान्यता अज्ञान है, जिनवर कहें हे! भव्यजन॥**
**मैं हूँ बचाता अन्य को, मुझको बचावे अन्यजन।**
**यह मान्यता अज्ञान है, जिनवर कहें हे! भव्यजन॥**
**मैं सुखी करता दु:खी करता हूँ जगत में अन्य को।**

यह मान्यता अज्ञान है, क्यों ज्ञानियों को मान्य हो॥
निज आयु क्षय से मरण हो यह बात जिनवर ने कही।
तुम मार कैसे सकोगे जब आयु हर सकते नहीं।।
सब आयु से जीवित रहें यह बात जिनवर ने कही।
हैं सुखी होते दुःखी होते, कर्म से सब जीव जब।
तू कर्म दे सकता न जब, सुख-दुःख दे किस भाँति तब?''

ह्या छंदाचा अर्थ स्पष्ट करताना धर्मेशजींनी सांगितले होते - जो असे मानतो की, मी एखाद्याला वाचवितो, वाचवू शकतो, तर तो मूढ आहे, अज्ञानी आहे.''

धर्मेशजींचे हे भाषण ऐकून पुढाऱ्याला प्रथम थोडेसे पटले नाही, विचित्रच वाटले. साहजिक आहे, असे वाटायलाच हवे होते, परंतु जेव्हा पूर्ण व्याख्यान ऐकले तेव्हा जैनधर्माच्या अहिंसेच्या सखोल अर्थाला जाणून खूपच प्रभावित झाले आणि त्यांनी दुसऱ्या दिवशी देखील प्रवचन ऐकण्याची इच्छा प्रकट कोणी. पुढारी आपल्या सहकाऱ्यांना हसत हसत म्हणत होते - मी त्या संत महात्म्याचे व्याख्यान ऐकू इच्छितो की जो मला काल मूढ म्हणत होता. खरोखर, कोण कोणाला मारु शकतो? वाचवू शकतो? आपण तर केवळ खोटा अहंकारच करतो. होय, आपल्या मनामध्ये जो दया भाव आहे त्यामुळे आपणास पुण्यबंध होतो आणि जो निर्दयतेचा-क्रूरतेचा-भाव आहे, त्याने पापबंध होतो, त्या संताचे हे म्हणणे शंभर टक्के बरोबर आहे.

अशाप्रकारे कोणीही जो धर्मेशजींना ऐकत असे, प्रभावित झाल्याशिवाय रहात नसे. जैनधर्माच्या मूळापर्यंत पोहचण्याचा भाव त्यामध्ये जागृत झाल्याशिवाय रहात नसे. धर्मेशजींना देखील ह्या गोष्टीचे समाधान वाटे की - जिनवाणीची गोष्ट प्रत्येकापर्यंत पोहोचत आहे आणि लोक देखील आपल्या वर्तमान परिणतिला ओळखून ह्यावर गांभीर्याने विचार करीत की - **ह्या परिणामांचे फळ काय होईल?**

अशाप्रकारे लोकांचे हृदयपरिवर्तन झालेले पाहून धर्मेशजी मनोमन समाधान व्यक्त करीत होते. संपत शेठजींच्या मनामध्ये धर्मेशजीबद्दल जी श्रद्धा आणि जो आदर निर्माण झाला होता, तो अनेक प्रकाराने वाणीमध्ये व्यक्त होऊ लागला. शेठजीचे उद्गार ऐकून इतर लोकांची देखील मतपरिवर्तनं झाली.

# ३८

ज्याच्यामुळे जिज्ञासु जीवांच्या जिज्ञासेचे शमन होते, चिरकालीन ज्ञानार्थी तृषेचे शमन होत आहे हे जाणवते; स्वाभाविकच त्याच्याबद्दल कृतज्ञतेचा भाव जागृत झाल्याशिवाय रहात नाही.

लाभानंद देखील धर्मेशजींच्या अंतर्बाह्य व्यक्तित्व आणि ज्ञानामुळे प्रभावित होऊन त्यांना आपला गुरु मानू लागला होता. धर्मेशजींकडून आर्त, रौद्र आणि धर्मध्यानाचे विस्तारपूर्वक हृदयस्पर्शी मार्मिक व्याख्यान ऐकून लाभानंद खूप खुष होता. धर्मेशजींचा संपर्क मिळाल्यामुळे तोदेखील आपले जीवन धन्य आहे असे मानू लागला होता. आतापर्यंत त्याला धर्मध्यानाची साधना म्हणून योगासन आणि प्राणायामाची शिबिरं लावण्याचा आग्रह होता, तो हट्टदेखील धर्मेशजींच्या आगमसंमत आणि युक्तिसंगत विचार ऐकून मुळासकट नाहीसा झाला होता. परंतु धर्मध्यानाच्या नावाखाली कोणती ना कोणती क्रिया करण्याची वृत्ति आणि बाह्य आचरणाची अभिरुचि असल्याने ध्यानासारख्या चिंतनाच्या विषयामध्ये देखील प्रयोगात्मक क्रियेच्या रुपाने कोणती तरी क्रिया करण्याचा आग्रह अजूनही कायम होता.

लाभानंदाला असे वाटत असे की, निव्वळ गप्पा मारल्याने धर्म कसा होईल? काही तरी केले तर पाहिजे नां?

एके दिवशी धर्मेशजींना चांगल्या मूडमध्ये आणि त्यांचा प्रसन्न चेहरा पाहून लाभानंद म्हणाला– "गुरुजी ! ह्या प्रवचनांमध्ये आणि तत्त्वचर्चेमध्ये जो ध्यानाचा विषय चालू आहे, त्याने खूप लोक प्रभावित झाले आहेत, त्यांना लाभदेखील भरपूर मिळाला आहे आणि होत आहे. जेथे पहावे तेथे ह्याच विषयाची चर्चा चालू आहे. आर्त-रौद्रध्यानाचे भयंकर दुष्परिणामांचे भावपूर्ण चित्र जे आपण रेखाटले त्याने सगळे लोक खूप प्रभावित झाले आहेत. आपली ही प्रवचनं ऐकून माझ्यापण अंगावर काटे उभे राहिले आहेत.

जर आपण आमचे ध्यान आकर्षित केले नसते तर आम्हाला काही समजलेही नसते, आमचे इकडे लक्षही गेले नव्हते की 'ह्या परिणामांचे फळ काय मिळेल?'

आता असे वाटू लागले आहे की ह्या आर्त-रौद्र ध्यानापासून कसे वाचावे? ह्यापासून वाचण्यासाठी काय करायला पाहिजे?''

धर्मेशजी म्हणाले - ''लाभानंद! ह्याचा एकच उपाय आहे - तत्त्वाभ्यास! तत्त्वाभ्यासाच्या जोराने जेव्हा परपदार्थ इष्ट-अनिष्ट भासित होणार नाहीत, तेव्हा आपोआप हळु हळु आर्त, रौद्र ध्यान कमी होत जाईल आणि धर्मध्यानात उपयोग अधिक जोडला जाईल.''

लाभानंद नम्रतेने म्हणाला - ''गुरुजी! आपण जी धर्मध्यानाची चर्चा केली, त्याने धर्मध्यानाचा वैचारिक पक्ष तर फार चांगल्या तऱ्हेने स्पष्ट झाला आहे. विचार करण्यासारख्या अनेक गोष्टी देखील ध्येयरुपाने डोळ्यासमोर आल्या. आता का न ह्या ध्येयरूप विषयवस्तुला प्रयोग पद्धतिने आपल्या जीवनाचे अभिन्न अंग बनविण्याकरितां एखादी अशी योजना बनवावी की जशी योगसाधना आणि ध्यान शिबीर लावणारे करतात?''

काय जिनागमामध्ये ध्यानाच्या प्रयोगपद्धतिचे कोठे काहीही वर्णन आढळत नाही? मुनिराज तर ध्यान करतात नां? का न मुनिजनांच्या प्रयोग पद्धतिलाच आंशिक रुपाने आपण देखील आत्मसात करावे? मला असे वाटते की निव्वळ गप्पा मारल्याने काहीही हाती लागणार नाही.''

धर्मेशजींनी लाभानंदाच्या रुचिचा आणि पात्रतेचा विचार करुन म्हटले, - ''बंधु! तत्त्वचर्चेला 'निव्वळ गप्पा' म्हणून त्याची उपेक्षा करणे योग्य नाही. मी तुझ्या भावना समजू शकतो. तुला ध्याना करिता एखादे अवलंबन पाहिजे, धर्मध्यानासाठी योग्य वातावरण पाहिजे, काही करायला पाहिजे. कदाचित शक्य आहे, तुझ्या सारख्या जीवांसाठीच आचार्य माघनंदींनी 'ध्यानसूत्राणि' नावाच्या तीन अध्यायांमध्ये विभागलेली १७४ सूत्रांची एक आध्यात्मिक रचना केली असेल. ह्या सूत्रांच्या आधाराने एकांतामध्ये धर्मध्यान करण्याचा प्रयोगात्मक अभ्यास केला जाऊ शकतो.

धर्मध्यानाच्या साधनांच्या रुपाने सर्वात अधिक महत्वपूर्ण असते त्रियोग शुद्धि. मनशुद्धि, वचनशुद्धि, कायशुद्धि - ह्या तिघांचे एक नाव त्रियोगशुद्धि. म्हणून साधकाला जेवढा वेळ धर्मध्यान करायचे असेल, तेवढ्या वेळाकरितां, यथासंभव इतर सर्व शल्यांपासून निशल्य होऊन, सर्व कार्यांपासून निर्भार होऊन, तसेच सर्व चिंतांपासून निश्चिंत व निराकुल होऊन शोक-भय-विषाद वगैरेपासून रहित होऊन मनाला शुद्ध करणे मनशुद्धि आहे. मौन धारण करणे वचनशुद्धि आहे तसेच स्नानादि रुप बाह्यशुद्धि, तसेच भूक-तहान, मल-मूत्राच्या बाधांपासून निवृत्त होणेरुप अंतरंगकायशुद्धि आहे.

आचार्य शुभचंद्रांनी ध्यानाकरिता योग्य स्थानाचे वर्णन करताना एकदम शांत, क्षोभरहित स्वच्छ व बिलकुल एकांत स्थानच धर्मध्यानाकरिता उपयोगी आहे असे सांगितले आहे.

ते लिहितात - सिद्ध क्षेत्र, संताचे साधनास्थळ, तीर्थंकरांची कल्याणक क्षेत्रं, समुद्राजवळ, अरण्यातील नदीतटी, पर्वत, शिखर, गुहा, स्मशान, शांत (निरव) स्थान, उपद्रवरहित निर्जन ठिकाणच ध्यान योग्य आहे.

ध्यानाभ्यासाच्या प्रारंभिक पृष्ठभूमिमध्यें निराकार निज आत्म्याचे ध्यान एखाद्या साकार प्रतिकांच्या अवलंबनाने देखील होऊ शकते. म्हणून जिनवाणीमध्ये **जिनेंद्र प्रतिमा, मंत्राचे उच्चारण आणि स्तोत्रपाठ वगैरे साकार प्रतिक रूप अवलंबनाचा स्वीकार केला गेला आहे. ह्यांच्या अवलंबनाने झालेल्या आत्मध्यानालाच सावलंबन ध्यान म्हणतात. तसेच ज्या आत्मध्यानामध्ये मंत्र वगैरेंचे अवलंबन असत नाही, त्याला निरालंबन ध्यान म्हणतात.** ह्या सावलंबन एवं निरावलंबन अशा दोन प्रकारच्या ध्यानाच्या भेदांचा उल्लेखदेखील आगमात आढळतो.

सावलंबन ध्यान करण्याकरिता सर्वात प्रथम साधकाने आपल्या देहदेवालयामध्ये विराजमान भगवान आत्म्याला निर्मल जलरुप अनुभव करावा आणि आपल्या राग-द्वेषांनी भरलेल्या मनाला आत्मारुपी जलामध्ये बुडवावे. जेव्हा मन तिथून हटेल तेव्हा लगेच अर्हं, सोऽहं, सिद्ध, अरहंतसिद्ध, ॐ वगैरे मंत्र म्हणावेत. मंत्र म्हणता म्हणता पुन्हा त्या आत्मरुपी जलामध्ये बुडावे. अशा

क्रियांना बदलून-बदलून वारंवार करावे. मधून मधून आत्म्याच्या स्वभावाचा अशाप्रकारचा विचार करा की, ''हा आत्मा परमशुद्ध ज्ञानमय आहे. जेव्हा प्रथम आत्मारुपी जलाच्या अवलंबनाने मन कंटाळेल तर त्या अवलंबनाला बदलून ज्ञानानंद स्वभावी आत्म्याला शरीर प्रमाणाच्या आकाराच्या रुपाने स्फटिक मण्याच्या मूर्तिप्रमाणे निर्विकारी अनुभव करावा. पुन्हा अशा आत्मरुपी स्फटिक मण्याच्या मूर्तिच्या दर्शनामध्ये मन एकाग्र करावे, त्यामध्येच लीन व्हावे. जेव्हा जेव्हा तेथून मन हटेल तेव्हा पंच परमेष्ठी वाचक मंत्राचे अवलंबन घेऊन त्यांना जपत रहावे. मधून मधून आत्म्याच्या स्वरूपाचा विचार करीत रहावा.

**( अ ) पिंडस्थ ध्यान** – हे सुरु करताना शरीरात स्थित भगवान आत्म्याचे ध्यान करावे. 'पिंड' म्हणजे शरीर आणि 'स्थ' म्हणजे स्थित. शरीरामध्ये स्थित भगवान आत्म्याच्या चिंतवनाला पिंडस्थ ध्यान म्हणतात.

आपल्या नाभि कमलाच्या मध्ये स्थित असलेल्या नव केवललब्धिसंपन्न व पंचकल्याणक ज्यांनी प्राप्त केले आहेत अशा वीतराग सर्वज्ञ देवाचे ध्यान देखील पिंडस्थ ध्यान आहे.

**( आ ) पदस्थ ध्यान** – ह्या ध्यानामध्ये मंत्रांच्या पदांद्वारे अथवा अक्षरांद्वारे आत्मा-परमात्म्याचे ध्यान केले जाते.

**( इ ) रुपस्थ ध्यान** – ह्या ध्यानाची रीत अशी आहे की, समोवशरणामध्ये तीर्थंकर अरहंत भगवान अंतरिक्षामध्ये सिंहासनावर विराजमान आहेत, आपल्या स्वरुपामध्ये लीन आहेत, आत्म्याचे रस पान करीत आहेत. त्यांच्या परम शांत मुद्रेमध्ये पाहून भक्तजन आपल्या आत्म्याचे स्मरण करतात आणि आत्म्यामध्ये लीन होतात.

**( ई ) रूपातीत ध्यान** – ह्या ध्यानामध्ये सिद्ध भगवानाला शरीररहित पुरुषाकार आहेत असा विचार करुन आपल्या आत्म्याला सिद्धसमान शुद्ध स्वरुपच आहे असे त्याचे ध्यान करुन त्यात लीन होतो. हे रुपातीत ध्यान आहे.

आचार्य माघनंदींनी धर्मध्यान करण्याकरितां आत्म्याच्या लक्ष्याने जी आध्यात्मिक सूत्रांची रचना केली आहे, ते आत्म्याचा साक्षात्कार करण्यामध्ये पूर्ण

समर्थ आहेत. त्यांचे अवलंबन घेऊन आपण दोन्ही संध्याकालामध्ये (संधी काळामध्ये) एकांतात बसून आपल्या आत्म्याचे ध्यान अशाप्रकारे करु शकतो की,

"मी राग-द्वेष-मोह, क्रोध-मान-माया-लोभ रूप विकाराहून भिन्न अविकारी आत्मा आहे, मी पंचेंद्रिय विषय व्यापाररुप सुखाभासाहून भिन्न शाश्वत सुखस्वरूप आहे, मी मन-वचन-कायेच्या जडक्रियांहून भिन्न चेतनमूर्ति आहे, मी भावकर्म-द्रव्यकर्म-नोकर्माच्या प्रभावापासून वेगळा अप्रभावी आत्मा आहे, मी पुण्याधीन ख्याति-लाभ-पूजेहून पृथक् पूर्ण स्वाधीन स्ववस्तु आहे, मी संसाराला कारणीभूत माया, मिथ्यात्व आणि भोगकांक्षारूप निदानशल्याहून भिन्न निःशल्य आत्मा आहे, मी शब्दाभिमान, रसाभिमान, ऋद्धिअभिमानानेरहित मार्दवधर्म स्वभावी आहे. मी अंतर्बाह्यजल्प स्वरुप मन, वचन आणि जड प्राणमय शरीराहून भिन्न प्राणमय आत्मा आहे."[१]

अशाप्रकारे प्रथम सूत्राच्या आधाराने चिंतन करावे की, मी समस्त विभावभावाहून भिन्न ज्ञानानंद स्वभावी आत्मा आहे. दुसऱ्या सूत्राच्या आधारे असा विचार करावा की -

"मी स्वभावाने सर्व दोषांहून भिन्न निरंजन शुद्धात्मतत्त्व आहे. आपल्या ह्या शुद्धात्म तत्त्वाच्या सम्यक् श्रद्धान-ज्ञान व त्यामध्ये तन्मयता आचरणरूप अभेद रत्नत्रयाच्या साधनेने निर्विकल्प समाधि प्राप्त होते. त्या निर्विकल्प समाधिने वीतरागी सहजानंदाची सुखानुभूति होते तो, वीतरागी सहजानंदच माझे प्रकट स्वरुप आहे लक्षण आहे. त्या वीतरागी सहजानंदाने माझ्यामध्ये स्व-संवेदनाची प्राप्ति होते आणि त्या स्वसंवेदनेने स्वात्म्यामध्ये लीनतारुप सम्यक् चारित्रामध्ये दृढता होत जाते. मी त्याच अभेद रत्नत्रयाने परिपूर्ण आहे."[२]

---

१. राग-द्वेष-मोह, क्रोध-मान-माया-लोभ, पंचेन्द्रिय विषय व्यापार, मनोवचकाय-कर्म, भावकर्म-द्रव्यकर्म-नोकर्म, ख्याति-पूजा-लाभ, दृष्ट श्रुतानुभूत भोगकांक्षारुप निदान-माया-मिथ्यात्व शल्यत्रय, गारवत्रय, दंडत्रयादि विभाव परिणाम शून्योऽहं ॥ १॥

२. निज निरंजन स्वशुद्धात्म सम्यक्श्रद्धाज्ञानानुष्ठान-रुपाभेद रत्नत्रयात्मक निर्विकल्प समाधि-संजात वीतराग सहजानंद सुखानुभूतिरुप मात्रलक्षणे स्वसंवदेनज्ञान सम्यक् प्राह्याभारित विज्ञानेनगम्य प्राह्याभरितावस्थोऽहं ॥ २॥

अशाप्रकारे आपल्या शक्तीनुसार ह्या आध्यात्मिक सूत्रांच्या अवलंबनाने आत्म्याच्या स्वरुपाचे ध्यान केले पाहिजे - विचार केला पाहिजे की -

"मी सहज परिणामिकभाव स्वभावी आहे. मी सहज शुद्ध ज्ञानानंद स्वभावी आहे. मी चैतन्यकला स्वरुप आहे. मी द्रव्यकर्म-भावकर्म-नोकर्मरहित चैतन्यमूर्ति आहे. मी चैतन्य गुण रत्नांचा समुद्र आहे. मी चैतन्यमय अमर कल्पवृक्ष आहे. मी शुद्ध चैतन्यमय ज्ञानामृताचे पान करणारा आहे. मी शुद्ध चैतन्यरुप रसाने बनलेल्या रसायन स्वरुप आहे. मी चैतन्य चिन्ह स्वरुप आहे. मी समस्त पदार्थांना प्रकाशित करणारी केवलज्ञान ज्योति स्वरुप आहे मी त्या ज्ञानामृत प्रवाह स्वरूप आहे. मी पापरहित-निष्पाप स्वरुप आहे. मी चिन्मात्र स्वरुप आहे. मी शुद्ध अखंड एक मूर्तिस्वरुप आहे. मी अनंत दर्शन, अनंत ज्ञान व अनंत सुखस्वरूप आहे. मी अनंत शक्तिस्वरुप आहे.[१]

मी परमानंद स्वरुप आहे, परमज्ञानानंद स्वरुप आहे, सदानंद स्वरुप आहे, चिदानंद स्वरुप आहे, निजानंद स्वरूप आहे, निज निरंजन स्वरुप आहे, सहज सुखानंद स्वरूप आहे, नित्यानंद स्वरुप आहे, शुद्धात्म स्वरुप आहे, समयसार स्वरुप आहे."[२]

"मी परम मंगल स्वरुप आहे, परम उत्तम स्वरुप आहे, परम शरणस्वरूप आहे, संपूर्ण कर्मांच्या क्षयाचे कारण स्वरुप आहे. मी परम समाधि स्वरुप आहे. मी परम भेदज्ञान स्वरुप आहे.

मी परम स्वसंवेदन स्वरुप आहे. मी सहज आत्म्यापासून उत्पन्न आनंदस्वरुप आहे. मी परम आनंदस्वरूप आहे. मी परम ज्ञा ानंद स्वभावाचा

---

१. सहज शुद्ध पारिणामिकभाव स्वभावोऽहम्; सहज शुद्ध ज्ञानानन्दैक स्वभावोऽहम्; चित्कला स्वरुपोऽहम्, चिन्मात्रमूर्ति स्वरुपोऽहम्, चैतन्यरत्नाकर स्वरुपोऽहम्, चैतन्य द्रम स्वरुपोऽहम्, शुद्ध चैतन्यामृताहार स्वरुपोऽहम्, चैतन्य चिन्ह स्वरुपोऽहम्, ज्ञान ज्योति स्वरुपोऽहम्, ज्ञानामृत प्रवाह स्वरुपोऽहं, निरवद्य स्वरुपोऽहम्, शुद्ध चिन्मात्र स्वरुपोऽहम्, शुद्धाखण्डैक अमूर्तस्वरुपोऽहम्, अनंतदर्शन-ज्ञान-सुख स्वरुपोऽहम्, अनंत शक्ति स्वरुपोऽहम्;

२. परमानंद स्वरुपोऽहम्, परमज्ञानानंद स्वरुपोऽहम्, सदानंद स्वरुपोऽहम्, चिदानंद स्वरुपोऽहम्, निजानंद स्वरुपोऽहम्, सहज सुखानंद स्वरुपोऽहम्, शुद्धात्म स्वरुपोऽहम्, समयसार स्वरुपोऽहम्।

परममंगल स्वरुपोऽहम्, परमोत्तमस्वरुपोऽहम्, परम शरणोऽहम्, सकल कर्मक्षयकारण स्वरुपोऽहम्, परम समाधिस्वरुपोऽहम्, परम भेदज्ञान स्वरुपोऽहम्,

धारक आहे. मी सदानंद स्वरुप आहे, चिदानंद स्वरुप आहे. मी अमूर्त आहे, मी नित्य आहे, मी निष्कलंक आहे, मी निर्मोह स्वरुप आहे, मी कृतकृत्य आहे, मी अक्षयस्वरुप आहे, मी शाश्वत आहे. मी सिद्ध स्वरुप आहे, मी पूर्ण परमात्म स्वरूप आहे. मी पूर्ण स्वाधीन स्वयंभू आहे.[३]

इत्यादि विशेषणांनी आपल्या भगवान आत्म्याच्या शुद्ध स्वरुपाचे ध्यान करणे सर्व कर्मक्षयाचे कारण आहे. हेच निश्चयत: धर्मध्यान आहे.

सावलंबन ध्यानाच्या भेदांच्या चर्चेचा शेवट करीत धर्मेशजी म्हणाले - "अशा प्रकारे ध्यानाच्या प्राथमिक भूमिकेमध्ये विविध प्रकारच्या वीतरागवर्द्धक अवलंबनांवर आपल्या उपयोगाला एकाग्र करण्याचा अभ्यास करीत करीत आत्मसन्मुख होण्याचा अभ्यास केला जाऊ शकतो. परंतु धर्मध्यानाच्या ह्या सर्व भेद-प्रभेद रुपाने केले जाणारे ध्यान एकमेव शुद्धात्म्याच्या लक्ष्यानेच केले गेले पाहिजे; कारण सर्व धर्मध्यानामध्ये एक आत्माच ऊर्ध्व असतो. आत्मार्थ्यांना आणि मोक्षाभिलाषिंना धर्मध्यान करण्यापूर्वी प्रथम आत्मज्ञान करण्याचा पुरुषार्थ करणे आवश्यक आहे. नाहीतर रागादिभावांचे फळ तर अनंत संसारच आहे."

अशा तऱ्हेने आत्मज्ञान करण्याच्या प्रेरणेसह धर्मेशजींचे प्रवचन संपले.

हे प्रवचन शिबिरातील शेवटचे प्रवचन होते. म्हणून प्रवचनानंतर लाभानंदाने एक प्रस्ताव मांडला की शिबिराच्या समारोपामध्ये धर्मेशजींच्या अध्यक्षतेखाली एक समारोपाचा कार्यक्रम आखला जावा, ज्यामध्ये शिबिरार्थी शिबिरामध्ये प्राप्त झालेले आपले कडू-गोड अनुभव ऐकवू शकतील, आपले विचार प्रगट करतील, कृतज्ञता व्यक्त करुं शकतील आणि आवश्यक सूचनाही देऊ शकतील. सर्वांना लाभानंदाचा प्रस्ताव उपयुक्त वाटला. म्हणून दुसऱ्या दिवशी समारोप समारंभाच्या घोषणेसह कार्यक्रम संपला. शिबिरार्थी शिबिरामध्ये झालेल्या अपेक्षेपेक्षा जास्त ज्ञानलाभाने मनातल्या मनात सुखावलेल्या परिस्थितीत आपापल्या निवासस्थानाकडे परतले.

●

---

३. परम स्वसंवेदन स्वरुपोऽहम्, सहजानंद स्वरुपोऽहम्, परमानंद स्वरुपोऽहम्, परम ज्ञानानंद स्वरुपोऽहम्, सदानंद स्वरुपोऽहम्, नित्योऽहम्, निष्कलंकोऽहम्, निर्मोह स्वरुपोऽहम्, कृतकृत्योऽहम्, अक्षयस्वरुपोऽहम्, शाश्वतोऽहम्, सिद्धस्वरुपोऽहम्, सोऽहम्, स्वयंभूरऽहम्.

## ३७

"मुंगीच्या चालीने चालणारी व्यक्ति देखील जर योग्य दिशेने वाटचाल करीत असेल, तर उशीरा का होईना, परंतु कधी न कधी तरी आपले अंतीम ध्येय प्राप्त करतेच करते. ह्याच्या विरुध्द गरुड पक्ष्याप्रमाणे हवेच्या वेगाने जाणारी व्यक्ति जर विपरीत (विरुध्द) दिशेमध्ये निघाली किंवा प्रमादामध्येच अडकली, पुढे चाललीच नाही, तर ती कधीही आपल्या अंतीम ध्येयाला प्राप्त करू शकत नाही.

कोण्या एका संस्कृत कविने योग्य असेच सांगितले आहे -

**गच्छन् पिपीलिका याति, योजनानि शतान्यपि ।**<br>
**अगच्छन् वैनतेयापि, पदमेकं न गच्छति ॥**

चालत असलेली मुंगी शंभर शंभर योजन चालत जाते आणि न चालणारा वैनतेय पक्षी एक पाऊल देखील पुढे जाऊ शकत नाही.

धर्माच्या क्षेत्रामध्ये अधिकांश लोकांची वृत्ति प्रमादामध्ये अडकलेल्या गरुड पक्षाप्रमाणे असलेली पाहून कविला हे काव्य लिहिण्याचा भाव झाला असावा असे वाटते."

समारोपाच्या कार्यक्रमामध्ये धर्मेशजींच्या बाबतीत हे विचार व्यक्त करताना लाभानंद म्हणाला -

"भले आपले धर्मेशजी बाल्यावस्थेमध्ये आपल्या आयुष्यात मुंगीच्या चालीने चालले, परंतु आगम आणि युक्तीचे अवलंबन घेऊन निरंतरपणे योग्य दिशेने चालत राहिले, त्यामुळे प्रौढ होत होत आपल्या स्व-विवेकाच्या सहाय्याने गृहीत-अगृहीत मिथ्यात्वाने व्याप्त असेलेल्या संसाराचे वेडेवाकडे रस्ते पार करून शेवटी आपल्या ध्येयाच्या सीमेपर्यंत पोहोचलेच.

असे ऐकले आहे की कार्य पूर्ण होण्यामध्ये इतर सर्व कारणं तर यथासमय मिळतातच; परंतु स्वत:चा पुरुषार्थ हे त्यामध्ये सर्वात अधिक प्रबळ कारण असते.

धर्मेशजींच्या जीवनाकडे पहा! त्यांच्या जीवनामध्ये पुरुषार्थच प्रबल राहिला आहे. अन्यथा इतर कारणं तर अगोदर असंख्यवेळा मिळाली होती, परंतु सम्यक् पुरुषार्थाशिवाय सफलता कोठे मिळते ?

जेव्हा धर्मेशजींच्या उपादानाच्या योग्यतेने जोर केला तेव्हा समर्थ निमित्ताच्या रुपाने घरबसल्या पं. जिनेशचंद्रजींचा सत्समागम सहजच प्राप्त झाला; ज्यांच्या सान्निध्यामुळे धर्मेशजी धन्य झाले.

निमित्तं किती का अकिंचित्कर असोत, त्यांच्या अकिंचित्करपणाचा शंभर टक्के विश्वास असून देखील सहज निमित्त-नैमित्तिक संबंधाची मान्यता असून देखील ज्ञानींना भूमिकेनुसार कृतज्ञतेचा भाव आल्याशिवाय रहात देखील नाही-म्हटले देखील आहे की, **'नहि कृतमुपकारं साधवो विस्मरंति।'**

धर्मेशजींना तत्त्वज्ञान पं. जिनेशचंद्रजीकडून प्राप्त झाले होते; म्हणून ते पं. जिनेशचंद्रांचे उपकार कसे बरे विसरु शकले असते ? धर्मेशजींच्या रोमा-रोमातून त्यांच्याबद्दल कृतज्ञतेचे भाव भरलेले आहेत.

ते ह्या गोष्टीपासून अनभिज्ञ नव्हते की, अकर्तृत्त्व वगैरे सिध्दांत खोडता येत नाहीत, परंतु त्याबरोबर हेदेखील जाणत होते की लौकिक व्यवहाराने त्या सिध्दांताचा थोडासुध्दा कोणताही विरोध होत नाही. भूमिकानुसार सद्निमित्तांबद्दल कृतज्ञतेचा भावदेखील आल्याशिवाय रहात नाही आणि कार्य निष्पण्ण होण्यामध्ये निमित्त काही मदतही करीत नाही.

जिनवाणीचे हे कथन किती सार्थक आहे की, **जो निमित्ताला मानणार नाही त्याचे ज्ञान खोटे आणि जो निमित्ताला कर्ता मानतो त्याची श्रद्धा खोटी.**

सुदैवाने धर्मेशजींना माता-पितादेखील असे संस्कारक्षम आणि सरळ स्वभावाचे मिळाले की जे त्यांच्या तत्त्वज्ञानात साधक तर बनले नाहीत, परंतु ते त्यांच्या आध्यात्मिक कार्यक्रमामध्ये बिलकुल बाधक ठरले नाहीत. त्यांनी आपल्या पुत्र प्रेमाला आपल्या विवेकावर मात करु दिली नाही. वेळोवेळी

संतोष प्रगट करुन धर्मेशजींच्या कार्यक्रमांना प्रोत्साहितच केले मातेची ममतादेखील धर्मेशजींच्या धर्म आराधनेमध्ये कधी बाधक बनली नाही.

परिणामांची विशुध्दि आणि ज्ञानाचा क्षयोपशम तर भवितव्याचे अनुसरणच करतात आणि ह्यांचीसुध्दा कोणती कमतरता (उणीव) धर्मेशजींमध्ये नव्हती."

लाभानंदाने भाषणात पुढे म्हटले – "येथे विचार करण्यासारखी गोष्ट तर ही आहे की ही सर्व साधनं तर आपणा सर्वांनादेखील अनेक वेळा प्राप्त झाली होती, परंतु त्यामुळे काय झाले ?

धर्मेशजी जर आपल्या अंतर्मुखी उग्र पुरुषार्थाद्वारे आपल्या कर्तव्यापासून अचल राहिले नसते, आपल्या दृढ संकल्पापासून अविचलित राहिले नसते तर कोठेही भरकटले गेले असते. त्यांनी कोणकोणत्या संकटांना तोंड दिले नाही ? कशा कशा प्रतिकूल गोष्टींना सामोरे गेले होते ते, तरी देखील ते आपल्या ध्येयापासून विचलित झाले नाहीत. तेही बरोबरच आहे –

**विचारशील आणि कर्तव्यपरायण व्यक्ति आपल्या मार्गामध्ये आलेल्या सुख-दुःखाची पर्वा करीत नाहीत.**

ह्या कारणास्तवच धर्मेशजींनी न तर आपल्या सुखसोयींकडे लक्ष पुरविले व न दुःखांची पर्वा केली.

धर्मेशजींच्या सत्समागमामुळे अमितचे जीवन तर सुधारलेच; सुनंदा, सुनयनाच्या दुःखाचे ढग देखील विखुरले. बिचाऱ्या त्यादेखील आर्तध्यानाच्या महापापापासून वाचल्या गेल्या. मनमोहनदेखील आत्महत्येसारख्या हीन पापापासून वाचले – अनुरागला देखील सत्यमार्ग मिळाला.

संपत शेठजींसारख्या अरबपति उद्योगपतीला देखील हे समजून आले की, **जर परिग्रहानंदी रौद्रध्यानातच आयुष्य वाया गेले तर कदाचित सातव्या नरकातही जागा मिळणार नाही; म्हणून आयुष्य बाकी असेपर्यंत त्यापासून ममत्व कमी करुन लवकर आत्मा-परमात्म्याच्या शरणी गेले पाहिजे.**

संपत शेठबरोबर आलेल्या विद्वानांनादेखील धर्मेशजींच्या पवित्र जीवनामुळे खूप प्रेरणा मिळाली आहे. जे विद्वान आतापर्यंत स्वाध्यायाच्या नावाखाली केवळ

बौद्धिक व्यायामच करीत होते. त्यांना आता हे जाणवत होते की, खरोखर आमच्या ह्या बुद्धिविलासाच्या बगीचांना निराकुल सुख-शांतिची गोड व सुगंधित फळे व फुले लागतच नाहीत. ही कसली उजाड बाग ? ह्यामध्ये धर्माची फळें आणि फुलें फुलतच नाहीत ?

लाभानंदानंतर एक ज्येष्ठ विद्वान म्हणाले – "सा विद्या या विमुक्तये। खरोखर तीच विद्या, विद्या आहे, ज्यायोगे मुक्ति मिळते किंवा मुक्तिकरिता तयारी होते. एक अध्यात्म विद्याच अशी विद्या आहे की ज्यामुळे अतींद्रिय आनंदाची प्राप्ति होते, कर्म बंधनापासून मुक्ति मिळते.

इतर लौकिक विद्यातर नावापुरत्या विद्या आहेत, ज्या आनंदाऐवजी अशांतिची कारणं बनतात, त्यांना विद्या कोण म्हणेल ? विद्या मानेलच तरी कोण ?

जी सुख शांति देण्याऐवजी ज्ञानामध्ये गर्व उत्पन्न करेल-आकुलता उत्पन्न करेल, ती देखील काय विद्या आहे ?

सांगायला तर बहात्तर (विद्या) कला आहेत, परंतु खरोखर तर त्यामध्ये दोनच मुख्य आहेत. त्या दोन मुख्य कलांमध्ये प्रथम कला तर आजीविकेचे उपार्जन करणे ही आहे आणि दुसरी कला आहे आत्म्याचा उद्धार करणे. बस ह्या दोन कलाच सार्थक आहेत. कोणीतरी योग्य तेच सांगितले आहे –

**'कला बहत्तर पुरुष की, तामें दो सरदार ।**
**एक जीव की जीविका, दूजी जीवोध्दार ॥'**

म्हणून ज्यांना आजीविकेची कोणती अडचण नाही, त्यांनी तर जीवोध्दाराच्या कामामध्ये तात्काळ लागलेच पाहिजे. आणि ज्यांना आजीविकेचा प्रश्न आहे, त्यांनीदेखील आजीविकेपासून उरलेल्या वेळेचा सदुपयोग जीवोध्दारामध्येच केला पाहिजे.

ह्या दृष्टीने धर्मेशजींचे जीवन आणि त्यांचा उपदेश खरोखर आदर्श आहे, आपणा सर्वांना अनुकरणीय आहे."

संपत शेठबरोबर आलेल्या वयोवृध्द विद्वान आपल्या ज्येष्ठ विद्वानाचे बोलणे थांबवीत मोठ्या रुध्द कंठाने म्हणाले – "अहो! म्हणून तर मी म्हणतो की तुम्ही

सर्वांनी आमच्या बरोबर महिना दोन महिने येथे थांबून ह्या ज्ञानगंगेमध्ये आकंठ निमग्न होऊन स्नान करा आणि आपल्या राग-द्वेषांनी मलीन झालेल्या आपल्या मनाला स्वच्छ करुनच जा. तुमची कोणती छोटी छोटी बाळं घरी रडत आहेत ? परंतु तुम्ही तर आमची गोष्ट ऐकायला तयारच नाही. दोघे जण तर केव्हाच पळाले आणि आता तुम्ही जायच्या तयारीत आहात .....''

धर्मेशजींचा बालमित्र अमितने विद्वानांना आपले लक्ष्य बनवून आपल्या वक्तव्यात म्हटले - ''आपण विद्वान-पंडित लोक जर थांबलात तर आम्हालादेखील विशेष लाभ होईल. कारण आपल्या निमित्ताने आणखीन अधिक महत्त्वपूर्ण व सूक्ष्म चर्चा चालेल. शिबिरांमधून तर आम्हासारख्या लोकांच्या पातळीसाठी स्थूल विषयच अधिक घेतले जातात. आपण एक महिना थांबून तर पहा किती आनंद येतो तो! आपणामुळे आम्हासही फायदा होईल. आपण जरूर थांबावे. मला खात्री वाटते की आपण लोक माझ्या विनंतिचा विचार कराल.''

एवढे म्हणून अमित खाली बसला तोच तेथल्या उपस्थित लोकांनी अमितच्या म्हणण्याला दुजोरा देऊन त्या विद्वान महोदयांना थांबण्यासाठी खूप आग्रह केला.

अमित पुन्हा म्हणाला - ''अहो! मी तर एक नंबरचा नास्तिक होतो. परंतु धर्मेशजींमध्ये तर एक अशी चुंबकीय शक्ती आहे, ज्यापासून क्वाचितच एखादा वाचू शकेल. माझ्यासारख्या पाप्याला देखील धर्मेशजींनी शेवटी नीट मार्गावर आणले.'' असे म्हणत असतानाच त्याच्या डोळ्यातून अश्रु वाहू लागले.

शेवटी आपल्या भाषणात धर्मेशजी म्हणाले - ''पहा, ह्या वीस दिवसाच्या शिक्षण शिबिरामध्ये आपण सर्वांनी वर्तमानात होणाऱ्या आपल्या भावसमीक्षेद्वारे आर्त-रौद्र ध्यानांवर दृष्टी केंद्रित करुन 'ध्यान' विषयाला मुख्य केंद्र बिंदू बनवून आगमाच्या विश्वात विचरण केले. आपल्या वर्तमान परिणतिला समजून घेण्याचा प्रयत्न केला तसेच संसाराला कारणीभूत अशा शुभाशुभ परिणतिपासून मुक्त होण्याच्या उपायांवर देखील थोडक्यात चर्चा केली.

किंचित मतभेदांसह अधिकांश भारतीय दर्शनांमध्ये निर्वाणाच्या प्राप्तिकरिता मूळतः आत्मा-परमात्म्याच्या ध्यानालाच एकमेव अंतिम उपाय सांगितला गेला आहे.

हे माहीत आहे की, ध्यान व्यक्तिच्या बहिर्मुख मानसिक वृत्तिला अंतर्मुख बनविते. वास्तविक पांच इंद्रिय व मनाद्वारे विखुरलेल्या ज्ञानकिरणांना अंतर्मुखी पुरुषार्थाने आत्म्यावर केंद्रित करण्याची प्रक्रियाच धर्मध्यान आहे. आचार्य कुंदकुंदांनी वचनालाप व चित्तवृत्तिंचा निरोध करुन पूर्ण अंतर्मुखी होण्याच्या प्रक्रियेला सामान्यपणे ध्यान ही संज्ञा दिली आहे. परंतु पूर्ण अंतर्मुखी होण्याअगोदर आत्मज्ञान परम आवश्यक आहे. आत्मज्ञानाशिवाय आत्मध्यान किंवा धर्मध्यान शक्य नाही आणि धर्मध्यानाशिवाय खऱ्या ध्येयाची प्राप्ति शक्य नाही. ध्रुवधाम आत्म्याच्या ध्यानापासूनच पर्यायामध्ये पूर्णतेची प्राप्ति होते.

ह्यासाठी जिनागमामध्ये प्रतिपादित वस्तुस्वातंत्र्याचा सिध्दांत सर्वात जास्त उपयोगी आहे. म्हणून प्रथम व्यवहार धर्मध्यानाच्या माध्यमाने तत्त्वविचार करणे आवश्यक आहे.

जोपर्यंत कर्ताबुध्दिने परामध्ये कोणत्याही प्रकाराने परिवर्तन करण्याची/करविण्याची मान्यता किंवा विचार राहील, तोपर्यंत मनाच्या वृत्ति/प्रवृत्तिवर नियंत्रण शक्य नाही. म्हणून सर्वप्रथम तत्त्वज्ञानाचा व वर्तमानामध्ये होणाऱ्या **आपल्या परिणामांचे फळ काय मिळेल**, ह्या गोष्टीचा विचार केला पाहिजे."

शिबिर समारोपाच्या बरोबर 'ध्यान' विषयाच्या चर्चेचा उपसंहार करताना धर्मेशजींचे जे प्रवचन झाले, त्याने सर्व श्रोत्यांच्या स्मृतिपटलावर पूर्ण शिबिरात चर्चिलेला विषय चलत-चित्रपटाप्रमाणे प्रतिबिंबित झाला.

सर्व श्रोत्यांनी मनोमनी आपल्या ज्ञानगुरु धर्मेशजींना धन्यवाद देऊन त्यांच्या दीर्घायुष्याबद्दल कामना केली.

शेवटी 'मै ज्ञानानंदस्वभावी' राष्ट्रीय गीताबरोबर शिबिर समारोप समारंभ विसर्जित झाला. पुढील आध्यात्मिक शिक्षण-शिबिर लवकर लागावे, ह्या आशा व अभिलाषेसह धर्मेशजी व कार्यकर्त्यांना धन्यवाद देत सर्व लोक आपापल्या घरी निघाले. •